नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

# निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.**

**सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.**

अनुक्रमणिका


मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

युगवाणी
१९८२-८३

B-८२
जा, फेमा, एमे, जूजु, ऑस — ५ अंक



अनुक्रमणिका



वॉलिस स्टीव्हन्स

अनुक्रमणिका

युगवाणी [ Yugwani ] Regd. No. 1174 M H

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत    विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

# युगवाणी

संपादक : माणिक गोडघाटे
सहसंपादक : जयंत देवधर



वर्ष २९ वे    ऑगस्ट सप्टेंबर १९७३    अंक ४–५    श्रावण–भाद्रपद    वर्षा    शक १८९५



या अंकाची किंमत : एक रुपया पन्नास पैसे. **पुढील अंक : दिवाळी अंक**

# अनामिक

जी. ए. कुलकर्णी

गावाची वेस केव्हाच मागे राहिली होती, व आता उरला होता तो गोठल्याप्रमाणे स्तब्ध असलेल्या झाडांच्या दोन रांगांमधला रस्ता, आणि तो तर संपता संपेना. त्याच्याबरोबर हातातील गाठोड्याखेरीज काही सामान नव्हते, परंतु आता त्याचे ओझेदेखील त्याला साहवेना. आपण निरोप घेताना उगाच रेंगाळलो नसतो तर एव्हाना बस स्टॉपजवळ जाऊन पोहोचलोही असतो, असे त्याला सतत वाटू लागले. तोच त्याला स्टॉपजवळचा फिकट टिकलीएवढा दिवा दिसला, व त्याला हायसे वाटले. पण ते समाधान फार वेळ टिकले नाही. समोर झगझगीत प्रकाशाची दोन वर्तुळे दिसली. रस्त्यावर प्रकाश ओतून त्यावरील खडा न् खडा क्षणभर स्पष्ट झाला, आणि पुन्हा सारे अंधारून त्यात फक्त एक लाल डोळा तेवढा दिसला. एवढी धडपड करूनही बस सरळ त्याच्या डोळ्यासमोर निघून जात होती. 'थांबा! थांबा!!' असे ओरडत तो पुढे धावला. त्याने जोरात मारलेली हाक कंडक्टरने अर्धवट ऐकली असावी, कारण बसचा वेग मंदावला, व तो दारात येऊन खांबाला आडवा हात धरून दारातच थांबला. त्याच्या टोपीचे अर्धवर्तुळ कपाळावर आले होते, व त्यामुळे त्याचा चेहरा स्पष्ट दिसत नव्हता. त्याच्यामागे बसमध्ये वरील एका मंद दिव्यातून पिजल्यासारखा प्रकाश येत होता, व त्यात सहनशील अशा तऱ्हेने अगदी हालचाल न करता अनेक माणसे बसली होती. त्यात कोणाचाच चेहरा स्पष्ट दिसत नव्हता. जाणवत होते ते फक्त रंगाचे तुकडे—पांघरलेले कांबळे, लाल शाल, हिरवी लुगडी.

तो गाठोडे घेऊन आत शिरणार तोच कंडक्टरने त्यास बाहेरच थांबवले, व कोरड्या आवाजात विचारले, 'कुठं जायचं आहे?'

त्याने उत्तर देण्यासाठी तोंड उघडले, पण आतून शब्द येईना. त्याच्या डोक्यात एकदम धूर भरल्यासारखे झाले. त्याने खूप प्रयत्न केला, पण मऊ लोकरीच्या ढिगात आपण आंधळेपणाने हिंडत आहो असे त्याला वाटू लागले, व कोठे जायचे ते गावच त्याला आठवेना. आठवण्याचा सतत प्रयत्न करताना तो सदैव समोर असलेल्या अदृश्य भिंतीवर सारखा आदळू लागला. समोरून अनेक शब्द धावले—पाणी, मऊ भात, अंथरूण, गिरिजा, पिकलेला पेरू, देवळाजवळचा तलाव, मोठी पितळी किल्ली—पण त्यात गावाचे नाव नव्हते. हे एकदम असे काय झाले हे त्याचे त्याला समजेना, व तो कपाळाला हात लावून भ्रमिष्टासारखा उभा राहिला.

'अहो, कुठं जायचं आहे तुम्हाला? तुमच्यासाठी बस काही रात्रभर खोळंबून रहात नाही,' अधीरपणे कंडक्टर म्हणाला.

'त्याचीच मी आठवण करत आहे. मला थोडा वेळ द्या. मला चटकन आठवेल ते,' तो विनवणीच्या स्वरात म्हणाला. पुन्हा तोच भिंतीला धडकत शेवाळावरचा प्रवास. यावेळी काही गरज नसलेले शब्ददेखील समोरून मट्सट् निसटत होते. मला कोणत्या गावाला जायचे आहे? माझे गाव कोणते?

'येथे कुठल्या गावाला आलात हे तरी माहीत आहे का?' कंडक्टरने उपरोधाने विचारले. 'ते माहीत नाही असे कसे होईल?' त्याने रागाने विचारले. तो सकाळी इकडे यायला निघाला, त्यावेळी तेथे स्वच्छ ऊन होते, भोवती घाईत असलेल्या माणसांची गर्दी होती. त्याने हमालाला चार आणे जास्त दिले, तेव्हा त्याने आदराने

नमस्कार देखील केला होता. तेथल्या कंडक्टरला इतर काही कंडक्टरच्या मानाने जास्त रीतभात होती. त्याने विचारताच त्याने एक नवी करकरीत नोट पुढे करत म्हटले होते, 'एक–'

पण एक काय म्हटले होते आपण? प्रकाशात आलेली रेषा एकदम उजळून विझली. त्याने आठवण्याचा पुन्हा प्रयत्न केला. एक काय? पण विचाराने डोक्याला मुंग्या आल्या. सारे शरीर बधिरल्यासारखे झाले. तो केविलवाण्या आवाजात म्हणाला, 'ते देखील मला आठवत नाही, हे खरे आहे'

त्याच्या मागच्या प्रकाशातील मळकट पांढऱ्या गोधडीवर शिवलेल्या चिंध्यांच्या आकृतीप्रमाणे दिसणाऱ्या प्रकाशांमधून हसण्याचा आवाज ऐकू आला. दूर कोठूनतरी कोणी म्हटले, 'कंडक्टरसाहेब, त्यांना स्वतःचे तरी नाव माहीत आहे का ते विचारा!'

आता मात्र त्याला संताप आला. गाडीत चढावे व आपले संपूर्ण नाव त्या माणसाच्या कानात ओरडावे असे त्याला फार वाटले. पण तो आवेग गेल्यावर मात्र आपणाला काय झाले आहे याच विचाराने तो त्रस्त झाला, व त्याला विलक्षण भीती वाटू लागली. बसची घंटा वाजली, कंडक्टर आत गेला, आणि बस निघून जाताच काचेची लाल चकती डोहात फेकल्याप्रमाणे तिचा लाल दिवा अंधारात बुडाला तो तेथेच थोडा वेळ उभा राहिला, व त्याने डोके हलवून त्यातील जडपणा घालवण्याचा प्रयत्न केला. पण इतका वेळ झाला तरी त्याला स्वतःचे नाव काही केल्या आठवेना. कोठे जायचे हे माहीत नाही, कोठून आलो हे माहीत नाही, आणि आता आपण कोण हे सुद्धा आपणाला माहीत नाही.

हे असे आपल्याला झाले आहे तरी काय?

येथे यायला निघण्यापूर्वी तसे काहीच घडले नव्हते. ऊन लांबू लागले, तेव्हाच तो वहिणीच्या घरातून बाहेर पडला होता. आता तो पुन्हा वर्षभर येणार नाही म्हणून ती सारखी डोळे पुसत होती. हे दरवर्षी घडे. बरोबर येण्याचा हट्ट धरून बसलेल्या भाचीला त्याने एक रुपया देऊन समजावले होते. तो जाताना ती आईशेजारी गाल फुगवून उभी होती, व तो कोपरा वळून जाईपर्यंत त्याच्याकडे पहात होती. बहीण दर खेपेला वेडघासारखे काहीतरी खायला बांधून देत असे. एवढासा टीचभर प्रवास–रात्री तो आपल्या अंथरुणात झोपला असता, पण नाहीच. तिचा तो आग्रहच असे, आणि त्यासाठी अगदी पहाटेपासून ती सारखी राबत असे. त्यानंतर त्याने वाटेत बालमित्राचा निरोप घेतला होता. तो मित्र एका लहान जुन्या घरात रहात होता. त्याच्या सदऱ्याच्या मानेला जोड होता, आणि त्याच्या गळ्याची हाडे फार वर आली होती. 'चहा करतो रे एक मिनिटात,' असे तो म्हणाला. पण लगेच, 'पण गुळाचा मिळेल हं माझ्याकडे,' असेही त्याने ओशाळलेल्या चेहऱ्याने म्हटले होते. पण त्यालाच घाई होती म्हणून त्याने मान हलवली होती. हा मित्र–नुसता हात पुढे करताच त्यावर ऊबदार ऊन पडावे, त्याप्रमाणे स्वच्छ मोकळ्या मनाने आपुलकी देणारा!

बहीण? पण तिचे तरी नाव काय? पाचोळ्यातून न दिसता हिंडत असलेल्या सापाप्रमाणे तोच प्रश्न पुन्हा सळसळला. लतिका, रेखा, नीता, कविता, संगीता, सीमा, सुमेधा......नाही. ते नाव थोडे जुन्या वळणाचे आहे, पण सात्विक आहे. एखाद्या जुन्या पैठणीप्रमाणे. त्या नावातदेखील निर्लज्जपणे खांद्यावरचा पदर पडून पाठ जगापुढे उघडी झालेली नाही. अपर्णा? नव्हे. वृंदा, वसुंधरा, कृष्णा, रमा–नाही, यातले कोणतेच नाव नव्हे. ही सारी नावे चांदीच्या घंटा हलक्याच वाजाव्यात त्याप्रमाणे किणकिणली, व निर्मम स्वर काढून नाहीशी झाली. त्याच्या डोळ्यांसमोर तुळशीची झाडे, दवणा, आंब्याच्या पानांचे नवे तोरण, इलकली लुगड्याची घडी, रांगोळीचे कमळ, डाळिंबी काकणे, कर्दळीच्या पानावर घातलेला एवढाला गोग्रास,...अशी चित्रे दिसली. त्यातच कोठेतरी ती अदृश्य रूपात आहे, पण तिच्या नावाचा मंत्र कोणता? पुन्हा तो त्या अभेद्य भिंतीवर आदळला. नाव नाही, पुन्हा निरनिराळी चित्रेच. मूक. नाव गिळून बसून स्वस्थ पहात असलेली. दह्यात कालवलेला थंड भात, वापरून मऊ झालेले कांबळे, पिकली फळे घेऊन अवघडून उभे असलेले उंबराचे झाड, पाण्यात पाय सोडून बसायला योग्य असा ओढ्याचा काठ, स्वच्छ सारवलेल्या स्वयंपाकघरात शांत जाळ असलेली चूल, भिजल्या शेतातील मूठभर मऊ काळी माती .....पण या साऱ्यांत मित्राचे नाव कोठे आहे?

आता रस्ता अगदी निर्जन होता, आणि वाऱ्यातही बोचरेपणा आला होता. हात अवघडल्याने त्याने

गाठोडे दुसऱ्या हातात घेतले. आपले सारे शरीरच भेंडाळून गेले आहे असा त्याला भास होऊ लागला.

'या आता माघारी, का असेच उभारणार थंडी-वाऱ्यात ?' कोणीतरी त्याला म्हणाले.

तो एकदम दचकला व त्याने मागे वळून पाहिले. हा बस स्टॉप म्हणजे तीन बाजूंनी पत्रे मारलेले एक शेड होते, व समोरील भागाला निवारा काहीच नव्हता. त्यात मध्ये एक वाकडा लाकडी खांब होता, आणि धूर टाकणारा एक कंदील त्याच्या खालच्या भागाला खिळा ठोकून अडकवला होता. शेडमध्ये एक म्हातारा उसकटलेल्या कपड्याच्या ढिगाशेजारी चटईवर बसला होता. त्याची हाक ऐकून तो शेडमध्ये आला, आणि दोन ओंडक्यावर आडवी फळी ठोकून केलेल्या अरुंद बाकावर बसला.

'आता गाडी गेली नव्हे ? मग तेथे उभारून काय करणार ?' म्हातारा म्हणाला, 'आता जरा जमीन झटकून जाजम टाका, आणि अंग पसरून द्या.'

तेथील जमीन पाऊल अर्धे भरेल इतक्या धुळीने भरली होती. तो बाकावरूनच म्हणला, 'मला काय माहीत माझी गाडी चुकणार म्हणून ? माझ्याजवळ जाजम नाही, काही नाही.'

'मग काय असेच ढोपरे आंखडून बसणार रात्रभर ?' म्हाताऱ्याने हसून म्हटले. 'ही तर शेवटची गाडी आता बक्कळ उजाडेपर्यंत गाडी नाही. कोठे जाणार होता तुम्ही ?'

ज्याची त्याला भीती वाटत होती तोच प्रश्न पुन्हा त्याच्यासमोर आला, व त्याचे अंग जड झाल्या-सारखे झाले. तो म्हणाला, 'म्हणजे त्याचे असे आहे. मी गावची वेस ओलांडून येईपर्यंत चांगला ठीक होतो, पण त्यापुढे जे वत्ताड आहे, तेथे कसले थंड वारे आले कोणास ठाऊक, पण मला आता काही म्हणून काही आठवत नाही. मी कोठे जाणार, कोठून आलो, एवढेच नाही तर खुद्द माझे नाव हे सगळे आठवणीतून स्वच्छ पुसले गेले आहेत, कोणी तरी कात्री घेऊन माझ्या भोवतालचे सारे धागेच कातरून टाकले आहेत, असे मला वाटू लागले आहे.'

'येथे कोणाकडे आला होता ?'

'या गावात माझी बहीण आहे. तिनेच दिले नव्हे का हे गाठोडे ? त्याशिवाय माझा एक जुना मित्र देखील आहे येथे. अगदी लहानपणापासूनचा. परंतु आता त्या दोघांची नावेदेखील आठवत नाहीत मला.

'मग तुम्ही परत जाऊन त्यांना सरळ सगळे विचारत का नाही ?' म्हाताऱ्याने सहानुभूतीने विचारले.

'आत्ताच इतके चालून पाय मेणाचे झाले आहेत, त्यात टेकडी, वत्ताडे तुडवीत जाऊ की काय आता ?' त्याने उलट विचारत म्हटले, 'आणि समजा गेलोच, तर काय विचारू ? मी तुझा भाऊ आहे, आज दुपारीच तुझ्याकडे आलो होतो. आता मला तुझे नाव सांग, माझे नाव सांग, आणि मी कोठल्या गावला परत जाणार तेही सांग म्हणून ? अहो, ती माणसे मला वेड्यात काढतील, आणि वहिणीला तरी काय वाटेल ? माझे डोके किंचित् लागले, तर ती थरथरत दिवसरात्र बसून राहील माझ्यापुढे ! त्यापेक्षा रात्र येथेच काढावी. कशीही तुमची सोबत आहेच. तोपर्यंत उजाडेल, आणि सारे स्वच्छ होईल. होय की नाही ?'

म्हातारा चटईवरच गुडघे उंचावून बसला, व त्याने मान हलवली. 'होय, ते देखील खरेच म्हणा.' तो म्हणाला, 'पण मला भीती वाटली ती निराळीच. समजा, तुम्ही गेलात आणि त्या सगळ्यांनीच तुम्हाला ओळखले नाही तर ? तुमच्या चेहऱ्यात देखील काही बदल झालेला असला तर पुढे काय ? म्हणजे तुम्हीच बघा, तुम्ही काय मी काय, किती तात्पुरते आहोत ! तुम्हाला माहीत असलेल्या पंधरावीस माणसांच्या आठवणीतील तुमचा एक धागा तुटला, तुमचा वीतभर चेहरा बदलला की या जगात तुम्ही कोणीसुद्धा नाही. आणि हे सगळे एका चुटकीत देखील होऊ शकेल. आत्ताच पहा. तुम्ही वेशीच्या आत ठीक होतां, पण बाहेर पडल्यावर स्वच्छ मोकळी पाटी. होय की नाही ?'

तो भेदरून ताडकन उभा राहिला. हळूहळू त्याचा संताप वाढत गेला, आणि सुरकुतलेले तोंड हलवत असले भीषण बोलणाऱ्या त्या म्हाताऱ्याच्या डोक्यात काहीतरी घालावे असे त्याला एकदम वाटू लागले.

'तसे कधीच घडणार नाही. माझी बहीण, माझा मित्र मला खात्रीने ओळखतील. शिवाय सकाळपर्यंत माझी स्वत:चीच आठवण स्वच्छ होईल आरशासारखी.' तो रागाने म्हणाला. पण आतल्या आत मात्र असे घडणेही अगदी अशक्य नाही ही भीती मात्र त्याला

कुरतडत राहिलीच, व तो तडकल्या मनाने पुन्हा बाकावर बसला.

'नाही, तसे होणार नाही, उगाच असे भडकू नका,' त्याला समजावत म्हातारा म्हणाला, 'पण तसे होण्याची शक्यता आहे एवढेच मी म्हणालो. बरे, तुमच्याजवळ जर जाजम नाही, तर तुम्ही झोपणार कसे? माझी चटई देऊ का? मी आपले उपरणे पसरून घेईन.'

त्या मळक्या, बोंदऱ्या चटईकडे पहाताच त्याचे मन तात्काळ विटले. तो घाईघाईने म्हणाला, 'छे, छे, नको मला चटई खरे म्हणजे मला रात्रभर येथे रहायचेच नाही. येथे मला एखादी बैलगाडी मिळणार नाही का जवळपास?'

'राहिले माझे, तुम्हाला बरे वाटेल तसे करा,' निःश्वास सोडत म्हातारा म्हणाला, 'येथे रस्त्यावर बैलगाड्यांना काय तोटा आहे? आणखी तासभर गेला की मिणमिण दिवे लावून बैलगाड्यांच्या रांगाच जाऊ लागतात. त्यांच्या चाकांच्या घरघरीची मला इतकी संवय झाली आहे की त्याखेरीज झोपच येत नाही. बैलांच्या गळ्यातील घंटा वाजतात तेव्हा वाटते, गाव जागले आहे, आणि त्याच्या पाळण्याचे घुंगुर वाजत आहेत. पण तुम्ही बैलगाडी घेऊन करणार काय?'

'काय म्हणजे' त्याने उतावीळपणे म्हटले, 'या असल्या कोंदट खोपटातून जाणार!' 'होय, पण कोठे जाणार हेच जर माहीत नाही, तर बैलगाडी काय, आगिनगाडी काय, येथून जाऊन दुसरीकडे पडाल इतकेच, होय की नाही? मग त्यापेक्षा हीच जागा काय वाईट आहे? तेव्हा जवळ काहीतर असले तर दोन घास खाऊन घ्या, आणि आडवे व्हा. माझ्याजवळ मात्र आता भाकरीचा तुकडा नाही. मी उद्याकरिता काही शिल्लक ठेवत नाही. पाणीदेखील तुमचे तुम्हालाच आणावे लागेल. या रस्त्याने जरा पुढे गेले की ओढा लागतो. अंधार आहे, पायवाटही चांगली नाही, पण त्या ठिकाणाखेरीज पाणी नाही.'

त्याच्याजवळ गाठोडे होते, पण आता त्याची भूकच संपली होती. एका कोपऱ्यात अडकून पडल्याप्रमाणे तो अस्वस्थ झाला होता. भोवती विशेष काही घडले नव्हते. खांबाला ठोकलेला कंदील तशाच गावठीपणाने जळत होता. जवळचे कारंज्याचे झाड तसेच विमनस्कपणे हलत होते. पण आता रात्र एकदम बरीच झाली आहे असे त्याला उगाचच वाटू लागले. त्याला थोडा उत्साहही वाटला. असेच चारसहा तास गेले की सारेच स्वच्छ होईल. पण तोपर्यंत चटईवर अंग आंखडून बसलेला हा म्हातारा आहे, त्याच्या उशाला उपरण्याची चुंबळ आहे, त्याच्या पायाशी विसकटलेल्या कपड्यांचा ढीग आहे—आणि त्याबाबत काहीच इलाज नाही!

'तुम्ही कोठे जाणार?' त्याने विचारले.

'मी होय? मीदेखील कोठे जाणार हे मला माहीत नाही,' म्हातारा हंसून म्हणाला. 'कारण माझे जाणे-येणे ठरवणार ते आमचे मालक! त्याबद्दल मी स्वतःला कशाला त्रास करून घेऊ?'

'मालक ठरवणार? म्हणजे तोपर्यंत तुम्ही येथेच की काय?' त्याने आश्चर्याने विचारले

'म्हणजे त्याचे असे बघा,' म्हातारा पुढे सरकून सांगू लागला, 'मागे एकदा मालकांनी मला येथे आणले, आणि म्हटले 'येथे थांब तू. मी येतो. तेव्हापासून मी येथेच आहे. मालकांनी मला येथे का आणले, ते केव्हा येणार, मला काहीच माहीत नाही. मी तरी त्याचा कशाला विचार करू? थांब म्हटले आहे ना, मी थांबतो. कोणीतरी मूठभर भात, एकादी भाकरी देते. संध्याकाळी, एक माणूस येऊन दिवा लावून जातो. दोन गाड्या येतात, जातात. एकादुसरा माणूस विडी ओढण्यासाठी गाडीतून उतरतो, तुम्ही बसलात त्या बाकावर बसतो, पाऊसपाणी याविषयी बोलतो आणि निघून जातो. मला येथून हलायचीदेखील कधी फारशी गरज पडत नाही.'

'तुमचा मालक—कसलं काम करता तुम्ही त्याच्याजवळ?'

म्हातारा डोके हलवत खडखडीत हंसला, 'अहो. मी अमुकच करीन तमुकच करणार नाही असा करार करायला मी काय ढीग बुके वाचलेला फार शहाणा माणूस पडलो आहे होय? हातापायांच्या बोटापलीकडे मला मोजायला येत नाही. दोन हात आहेत, दोन पाय आहेत. त्यांनी करता येण्याजोगे सगळे काम करत रहायचे. मालकाने सांगायचे, आणि मी ते करायचे, एवढेच काम.'

'मग या पत्र्याच्या डब्यात राहून तुम्हाला बरेच दिवस झाले असतील की!' तो थोड्या कुत्सिततेने म्हणाला.

'तर काय, झालेच की!' म्हातारा म्हणाला. त्याने लगबगीने कपड्यांच्या बोचक्यात हात घातला व त्यातून एक लहानशी मण्यांची माळ काढली; व त्याला दाखवली.

'ही माळ बघ. तिच्यात सात मणी आहेत. एक दिवस गेला की एका मण्यापुढे मी दोरा गुंडाळतो अशी एकदा ही माळ संपली, की मग ही माळ'– त्याने पुन्हा हात घालून आणखी एक पण जास्त मोठी माळ काढली, व म्हटले, 'लहान माळ संपली की या माळेत एका मण्यापुढे मी दोरा गुंडाळतो. मोठा मणी समोर धरायचा, व उजव्या बाजूने सुरवात करून डाव्या बाजूने पुन्हा मोठ्या मण्यापर्यंत वर चढायचे. आणि ही देखील जर भरली की माझ्याजवळ आणखी एक आहे.' त्याने वरचावरचा कपडे काढून इकडे तिकडे फेकले, आणि पसाभर माळ काढली. 'ही जर गळ्यात घातली तर पायापर्यंत पोहोचते. म्हणजे अगदी जन्मभर पुरेल म्हणाना! दुसरी माळ भरल्यानंतर येथे एका मण्यासमोर दोरा बांधायचा. तेव्हा आता तुम्हीच हिशेब बघा की! या माळेत सात मणी झाले आहेत, दुसरीत आठ झाले आहेत आणि लहान माळ उद्या संपणार!'

हा सैलसर म्हातारा वेडा तर नाही ना अशी शंका त्यास स्पर्शून गेली, व याच्या संगतीत सारी रात्र काढायची या कल्पनेने त्याचे मन हादरले. त्याने म्हाताऱ्याकडे निरखून पाहिले, पण काही केल्या त्याला तो वेड्यासारखा वाटेना. त्याचे डोळे त्याच्याकडे सरळ स्वच्छ पाहत, आणि त्याच्यात विक्षिप्तपणाची चमक नव्हती. त्याचा चेहरा सुरकुतलेला होता, पण त्यावरील मोकळ्या हसण्याने तो भाबडा घरगुती वाटत होता इतकेच.

'पण तुम्हाला तरी तुमचे गाव माहित असेल, मालक कोणत्या गावी गेला ते ठिकाण ठाऊक असेल. मग तुम्ही येथे माळावरच्या मातीसारखे का रहाता?'

'माहीत नसायला काय झाले? सगळे काही मला माहीत आहे,' म्हातारा हात उडवत म्हणाला, पण त्या गावात परत कशासाठी जायचे? तेथे मी रहावे, किंवा दुसऱ्या गावाला मी मालकाकडे जावे, असे जर त्याला वाटत असते, तर त्यानेच मला येथे आणून 'थांब. मी येतो' असे म्हटले असते काय? त्याने मला येथे आणले म्हणजे मी येथून अन्यत्र जाऊ नये, अशीच त्याची इच्छा असणार, आणि त्याची इच्छा तुडवून मी दुसरीकडे जाणार की काय? अशक्य!'

म्हाताऱ्याने माळ काळजीपूर्वक बोचक्यात ठेवल्या. मग एक पत्र्याची डबी काढून त्यातील राखेने कपाळाला बोट लावले. म्हाताऱ्याने उघडी डबी समोर धरताच त्यातील अंगारा घ्यावा की नाही याबद्दल त्याला शंका वाटली. पण त्याने बोट लावल्यासारखे केले व म्हातारा डबी ठेवण्यासाठी वळताच त्याने ते मागच्या पत्र्याला पुसून टाकले.

म्हातारा मध्येच कान देऊन काहीतरी ऐकायचा प्रयत्न करत होता. त्याने गुडघ्याभोवती हात गुंडाळले, व तो तयारीत बसला. 'आता गाड्या यायची वेळ होईल. त्यांचा आवाज सुरू झाला की मी अंग पसरतो. मग एकदा पाठ जमिनीला टेकली, की सकाळपर्यंत चिंता नाही बघा. खरे म्हणजे अगदी सकाळपासूनची माझी सारी तयारी असते, ती या झोपेसाठी. पण मालक आला तर नाही ना या भीतीने एकदा दोनदा जागा होतो. मध्येच पण सगळे पूर्वीसारखेच असते, आणि मग लगेच पुन्हा झोप लागते.'

तो बोलताना मध्येच थांबला, व त्याचा चेहरा घाबरल्यासारखा झाला. 'आजचा दिवस गेल्याचा दोरा बांधला नव्हे मी माळेला?' तो स्वतःशीच म्हणाला. अधीरपणे त्याने बोचक्यात कोंबलेले मळकट चुरगळलेले कपडे खसाखसा बाहेर काढून आतून ती लहान माळ काढली व मणी मोजले. त्यावर तो मुलाप्रमाणे हसला व त्याने चुटकी वाजवली. 'तशी चूक व्हायची नाही. मघा गाडी गेली ना, तेव्हाच बांधला होता मी दोरा.' तो समाधानाने म्हणाला.

'पण समजा, लक्षात राहिले नाही म्हणून दोरा बांधायचा राहिला, किंवा तुम्ही जास्तीचा दोरा बांधला तर काय?' त्याने विचारले.

'तर काय होणार? एकाददुसरा दिवस कमी जास्त होईल इतकेच. दिवस जास्त झाले की कमी झाले हे समजायला खरे दिवस किती झाले हे मुळात माहित पाहिजे, होय की नाही? ते माहीत असणार

मला एकट्यालाच, आणि मलाच जर ते माहीत नसेल, तर एक दिवस जास्त कमी होऊन चूक झाली, असे ठरवणार तरी कोण ?'

'मग दर दिवसाला दोरा बांधण्याची तरी काय गरज आहे ?' त्याने विचारले. 'परंतु मग किती दिवस निघून गेले, हे समजणार तरी कसे ?' म्हाताऱ्याने आश्चर्याने विचारले.

तो गप्प राहिला. त्यावर त्याला काही उत्तरच सुचले नाही. आता हवेत जास्त गारवा होता, व अंग आवळून बाकावर बसल्याने त्याला .अवघडल्यासारखे वाटत होते. रात्र अगदी नीरव होती. इतका पूर्णपणे नीरव अंधार त्याने पूर्वी कधी पाहिला नव्हता. पाखराची फडफड, फांद्यांची हालचाल, रातकिडयांचा आवाज, काहीच नसले तर वाऱ्याची पाऊले, तरी वाजत असत. पण हा अंधार शांत गडद डोहाप्रमाणे होता, व त्यावर कसलाच ओरखडा नव्हता.

दूर कोठेतरी बैलगाडयांच्या चाकांचा आवाज ऐकू येऊ लागला. त्यावर रांगोळीच्या ठिपक्याप्रमाणे घटांची मंद किणकिण ठिपकत होती. म्हाताऱ्याने हात पसरून अंग सैल केले, व त्याचा चेहरा उजळला.

'आली माझी वाजंत्री. आता मी झोपणार, त्याने चुटकी वाजवत म्हटले, नंतर हवे तर दिवा थोडा बारीक करा. त्यालाही विश्रांती हवी. पण तो विझवून मात्र टाकू नका. कारण जर काही लागले तर तो पुन्हा पेटवायला येथे काडयांची पेटी नाही.'

पाय सैल करावेत म्हणून तो बाकावरून उतरला, व तेवढया जागेतच त्याने दोन तीन फेऱ्या घातल्या. त्याचे मन विसकटलेल्या वारुळासारखे झाले होते. कोठे जायचे ? आपले नाव काय ? की या म्हाताऱ्याची बत्तिशी बोलली त्याप्रमाणे सगळेच विरून गेले आहे, आपली सावलीच गेली आहे ? आपण कोण हे स्वतःला माहीत नाही, आपणाला कोणी ओळखत नाही. येण्याजाण्याची गावे तर आपल्या ध्यानातून पूर्णपणे निसटली आहेत. मग हे सारे असे घडले आहे म्हणून हताश झालेला, येरझाऱ्या घालत असलेला हा कोण ? म्हाताऱ्याकडे पहाणारा कोण ? मी म्हाताऱ्याकडे पहात आहे, हे पहाणारा कोण ? आणि ते पहाणारा आणि ते पहाणारा......

एकदम त्याला अंग पसरून शांतपणे झोपलेल्या म्हाताऱ्याचा विलक्षण संताप आला व त्याने त्याला डिवचून उठवले. म्हातारा लगबगीने उठून बसला, व डोळे चोळत म्हणाला, 'हा, तुम्ही होय ? मी तुमच्याविषयी सगळे विसरूनच गेलो होतो. मला वाटले, मला बोलवायला मालकच आला आहे.'

'त्याविषयीच काही सांगायला मी तुम्हाला उठवले,' तो चिडून म्हणाला, 'तुमच्या मालकाने तुम्हाला येथे टाकले त्याला फार दिवस होऊन गेले, नाही ?'

म्हातारा अंगावरील उपरणे बाजूला सारत बोचक्याकडे जाऊ लागताच त्याने त्यास उतावीळपणे थांबवले, व म्हटले, 'त्या माळा आता राहू द्यात बाजूला !'

□ □

## लेखकांना विनंती

साहित्य कागदाच्या एका बाजूला, सुवाच्य अक्षरात
मराठी साहित्य महामंडळाच्या शुद्धलेखनाच्या नियमांनुसार असावे.
नापसंत साहित्य परत पाहिजे असल्यास
सोबत पुरेसे टपालहशील असणे आवश्यक आहे.

# अ पॅसेज टु इंडिया (शेवटचा लेखांक)

## विलायती वाण

श्रीनिवास नारायण बनहट्टी

### ३. मंदिर

चंद्रपुरापासून शेकडो मैल पश्चिमेला आणि सुमारे दोन वर्षांनंतर प्रोफेसर गोडबले ईश्वराच्या समोर उभे राहून तन्मयतेने गात होते. गोकुळ अष्टमीचा दिवस, रात्रीची वेळ. कृष्णजन्म व्हावयाच्या अगोदर अर्धा एक तास त्यांनी कीर्तनाला सुरवात केली होती. "तुकाराम तुकाराम"

तूच माझी माता तूच माझी पिता तूच माझे सर्व काही

तुकाराम तुकाराम अशी सुरवात करून त्यांनी जन्माष्टमीच्या कीर्तनाचा आरंभ केला होता. त्यांच्या साथीचे लोक मागे उभे होते. टाळ चिपळयांच्या गजरात कीर्तन रंगात येत चालले होते. संस्थानाच्या राजवाडयाच्या सोप्यावर हे कीर्तन चालले होते. राजवाडयाचा तो भाग म्हणजे देवालय असून एका टोकाला देव्हारा आणि समोरच्या बाजूला जाजमे टाकून त्यावर कीर्तनाचा फड उभा राहिला होता. दोन्ही बाजूंना मंडळी बसली होती. अर्थात सगळे हिंदु. गोडबोले कीर्तनाच्या रंगात पुढे मागे जात येत नाचत होते.

देवाची मूर्ती चांदीची, सुमारे सहा इंच उंचीची, पण देव्हाऱ्यात फुले पाने पत्री यांनी ती झाकून गेली होती. कीर्तन चालले आहे इतक्यात, त्या सोप्याच्या बाजूच्या दालनातून एक पालखी आली. पालखीमधून राजेसाहेब आले. अगदी वृद्ध आणि गलितगात्र देव्हाऱ्याच्या समोरच कृष्णजन्माच्या पाळणा बांधलेला होता. त्याच्या जवळच त्यांना उचलून सेवकाने बसविले. कृष्णजन्माची वेळ झाली, तेव्हा एक तांबडा रेशमी रुमाल गोडबोल्यांनी घेतला. त्याला लहान बालकाचा आकार आणला आणि तो राजेसाहेबांच्या जवळ दिला. प्रत्यक्ष जन्माची वेळ झाली तेव्हा राजेसाहेबांनी त्याला पाळण्यात घातले. इतर सेवकांनी देव्हाऱ्याच्या समोर एका मोठ्या पाटावर तयार केलेले मातीचे गोकुळ आणून ठेवले. नाचणे-गाणे अधिकच जोराने होऊ लागले. नामस्मरणाचा घोष, टाळमृदंगांचा गजर, बाजाच्या पेटीचे सूर यांचा एकच गोंगाट चालू झाला.

गावातल्या लोकांचा जमाव मूर्तीच्या दर्शनासाठी आत घुसत होता. सगळयांच्या चेहेऱ्यावर भक्तिभावाचे तेज विलसत होते. प्रोफेसर नारायण गोडबोले हे तेथले शिक्षणाधिकारी होते म्हणून त्यांना कृष्णजन्माच्या दिवशी कीर्तन करण्याचा मान मिळाला होता. ते गात आणि नाचत पुढे जात येत, मागे ताल धरणाऱ्यांना सूचना देत, जन्मोत्सवाची गाणी म्हणत होते. विजेची रोशनाई भरपूर होती, मळकटलेल्या रंगीत तसबिरी, काही साधुसंतांची वचने, वेडीवाकडी भिंतीला टांगलेली होती. दिवाणखान्याच्या बाहेर इंग्रजी बँड वाजत होता, त्याचा आवाज आतल्या गोंगाटात मिसळून एकच एक गोंधळ झाला होता. रात्रो बरोबर बारा वाजता जगत्तारक श्रीकृष्णाचा जन्म शख वाजवून उद्घोषित करण्यात आला. हत्तीवरून शिंगे, तुताऱ्या फुंकण्यात आल्या. लोक आनंदाने नाचू बागडू लागले. एकमेकांना कवटाळू लागले. लोटांगणे घालू लागले. आधिव्याधि सर्व पळून गेल्या. पडद्याच्या आतून स्त्रियांनी टाळया वाजवल्या, उंच सुरात गाणी म्हटली.

गाण्या नाचण्याच्या भरात गोडबोल्यांचे भान हरपले. त्याच्या अंतश्चक्षूंना एका स्त्रीचे दर्शन झाले.

आत्मबलाने त्यांनी तिला पूर्णावस्थेला नेऊन पोचविले. तशीच गांधीलमाशी तिलाही प्रेमाने पाहून तशीच गति दिली.

राजेसाहेब अत्यंत वृद्ध व विकलांग होते. रेशमी वस्त्राचे ते बालक पाळण्यात ठेवल्यानंतर त्यांना आतल्या खोलीत नेण्यात आले. संस्थानचा सहायक वैद्यकीय अधिकारी डॉ. अझीझ याने त्याला उपचार केले. इकडे संस्थानचे मानकरी, सरदार यांनी खेळ सुरू केले. एकाच्या डोक्यावर लोण्याचा गोळा ठेवण्यात आला, तो कपाळावर घसरू लागला, तोच दुसऱ्याने घेऊन मटकावला. टिपऱ्यांचे फेर धरण्यात आले; चेंडू फेकण्यात आले. दहीहंडी व गोपाळकाला झाला. गोडबोल्यांना पुन्हा एकदा कष्टी मिसेस मूरचे दर्शन झाले. तो खरा आत्मिक संदेश होता की निवळ त्याच्या मनाचा खेळ होता ? कसेही असले तरी स्वतःच्या अल्पशक्तीनुसार तिला ईश्वराच्या सान्निध्यात नेण्याचा प्रयत्न करणे त्याचे कर्तव्य होते.

* * *

हे मध्य हिंदुस्थानातील माऊ नावाचे संस्थान. गोडबोले तेथे शिक्षणाधिकारी म्हणून आले होते. त्यांनी डॉ. अझीझला संस्थानचा दुय्यम डॉक्टर म्हणून आणले होते. भोवताली बागबगीचा असलेला बंगला त्याला राहायला मिळाला होता. त्याने आपली तीन मुले व बायको साक्षात लग्नाची नव्हे—तिथे आणली होती. योगायोग असाकी याच सुमारास फील्डिंगही तिथे आला होता. इंग्लिश शिक्षणाच्या बाबतीत मध्यहिंदुस्थानातली दूरवरची संस्थाने काय करीत आहेत हे पाहण्याकरिता सरकारने त्याला दौऱ्यावर पाठविले होते. पण अझीझला त्याला भेटण्याची इच्छा नव्हती. इंग्रजांची त्याने कायमची धास्ती घेतली होती. फील्डिगने सुद्धा इंग्लंडात गेल्यावर विश्वासघात केला. आपण लग्न केले असे पत्रातून त्याने कळविले होते. पत्रे धड त्याने वाचलीही नव्हती. इथे मारे गप्पा मारून अखेर त्याने क्रेस्टेडशी, त्या कुब्जेशी, लग्न केले हे पाहून तो भयंकर चिडला होता.

आतल्या खोलीत नेल्यावरोबर राजेसाहेबांची प्राणज्योती मालवली होती पण हे बाहेर कोणास कळू दिले नव्हते. कारण सकाळी राजवाड्यापासून देवाची मिरवणूक निघून तो गेस्ट हाऊसजवळ असलेल्या मोठ्या तळ्यापर्यंत येऊन विसर्जित व्हावयाची होती. दुसऱ्या बाजूला उंचवट्यावर गढी होती, तिकडे सकाळच्या प्रहरी करीम आणि अहमद या आपल्या मुलांना घेऊन अझीझ फिरायला गेला. खालच्या बाजूला दोन साहेबांच्या टोप्या दिसल्या.

ते दोघे टोपीवाले खाली असलेल्या मशिदीत शिरत होते. त्यांच्यावर मधमाशांनी हल्ला केला. तेव्हा अझीझ त्यांच्याजवळ गेला. पाहतो तो फील्डिग आणि मुलगेलासा गोरा साहेब. तो त्याचा मेव्हणा होता. अझीझने त्याला 'मिस्टर क्वेस्टेड' म्हणून हाक मारली. फील्डिग म्हणाला 'कोण मिस्टर क्वेस्टेड, क्वेस्टेडचा इथे काय संबंध ?' तेव्हा अझीझ चमत्कारला. फील्डिग म्हणाला, 'मी कोणाशी लग्न केले अशी तुझी समजूत आहे ? मिसेस मूरची मुलगी स्टेला हिच्याशी. तिचा भाऊ हा राल्फ हे मी तुला पत्रातून कळविलेही होते.' अझीझ तिरसटपणाने उत्तरला 'तू कुणाशी लग्न केलेस, याच्याशी मला काय करायचे आहे ? मला तुझ्याशी काही कर्तव्य नाही. मी तुझी पत्रे वाचली नाहीत माझा पैसा तू प्रत्यक्ष लुबाडला नसलास तरी लुबाडल्यासारखाच आहे. इथून पुढे माझे अंतःकरण माझ्या लोकांना वाहिले आहे. कोणाही इंग्रजाशी मैत्री जुळावी अशी माझी इच्छा नाही.'

दरवर्षी संस्थानामध्ये कृष्णलीलेतील निरनिराळ्या प्रसंगाची सोंगे होत असत. यंदा राजेसाहेबांच्या मृत्यूमुळे त्यांना रजा देण्यात आली होती. पालखीची मिरवणूक मात्र निघाली होती. त्यांत अनेक देवदेवता ठेवलेल्या होत्या. त्यामोवत पाटावर रचलेले मातीचे गोकुळ होते. अझीझला या गोष्टींची माहिती नव्हती आणि त्याला त्यात रस नव्हता. तो घोड्यावर बसून फेरफटका करावयास निघला होता. फिरत फिरत गेस्ट हाऊसमध्ये गेला. तिथे पियानो होता. त्याच्यावर दोन पत्रे पडलेली होती. दुसऱ्याची पत्रे वाचू नयेत हा सभ्यतेचा नियम झुगारून देऊन दोन्ही पत्रे त्याने वाचली. पहिले हिस्लॉपने फील्डिगला लिहिलेले होते. त्यात राल्फ हा जरा अर्धवट आहे, त्याची काळजी घेण्याबद्दल लिहिले होते. आणि पुढे 'तुम्ही आमच्या प्रमाणे हिंदुस्थानावर जुलूम करणाऱ्यांच्या मालिकेत येऊ पाहात आहे, याबद्दल मला समाधान वाटते. जेवढे

आमच्यात येऊन मिळतील तेवढे पाहिजेच आहेत. आईच्या मृत्यूनंतर माझ्या बहिणीशी तुम्ही लग्न केले तेव्हा मी अस्वस्थ झालो होतो. पण आता आपण एक होवू या. तुम्ही जेव्हा मॅडेलाला पत्र लिहाल तेव्हा तिला माझे नमस्कार कळवा. मला तिच्याशीही चांगले संबंध ठेवावयाचे आहेत. तुम्ही ब्रिटीश, हिंदुस्थानाच्या बाहेर आहात हे तुमचे सुदैव. इथे चळवळीमुळे नित्य काहींना काही घटना घडत आहेत. त्यातले अंतर्गत सूत्र हाती सापडत नाही.' दुसरे पत्र क्वेस्टेडने लिहिलेले होते. फार समंजसपणाचे आणि स्नेहभावनेचे. अजीजला वाटले, ह्या पाच व्यक्ती आपसातले मतभेद मिटवून परकीयांच्या विरुद्ध सहजरीतीने एक होतात. हेच इंग्लडचे खरे बळ आहे.

भावनेच्या भरात त्याने पियानोच्या पट्टीवर हात आपटला. त्याच्या आवाजासरशी शेजारच्या खोलीत निजलेला राल्फ उठून तिथे आला.

'तू मिसेस मूरचा मुलगा आहेस. तुला काही तरी वस्तू भेट दिली पाहिजे. सध्या माझ्याजवळ दुसरे काही नाही.' असे म्हणून त्याने आपल्या जवळची मलमाची डबी राल्फला दिली. 'तुझी आई माझी सर्वोत्तम मित्र होती,' अझीझ पुढे म्हणाला. अंतःकरण उमलून बाहेर पडणाऱ्या कृतज्ञतेचे त्याचे त्यालाच नवल वाटले. वास्तविक मिसेस मूरने त्याच्याकरिता काय केले होते ? त्याच्या बाजूने ती साक्षीला उभी राहिली नव्हती, त्याला तुरुंगात भेटायला गेली नव्हती. तरी देखील त्याच्या अंतःकरणात ती खोल जाऊन बसली होती.

त्याला वाटले, मिसेस मूरच्या या मुलाकरिता काहीतरी करावे. खाली पसरलेल्या तलावात एक होडी होती, तिच्यामध्ये तो त्याला घेवून बसला. फिल्डिंग आणि त्याची बायको स्टेला ही दोघे अगोदरच होडीतून गेली होती. तलावाच्या दुसऱ्या बाजूने जन्माष्टमीची मोठी मिरवणूक येत होती. मध्यभागी देवाची पालखी, सोवत मातीच्या गोकुळाचा पाट, वरती अबदागिऱ्या धरलेल्या, मोरचेले ढाळली जात असलेली, मागे हत्ती घोडे इत्यादी लवाजमा, अशी ही राजेशाही मिरवणूक तलावाच्या काठापर्यंत आली.

इकडे एका होडीमधून फिल्डिंग आणि स्टेला आणि दुसऱ्या होडीमधून अझीझ आणि राल्फ काठावरची मिरवणुकीची गम्मत पहात होते. इतक्यात वादळ उठले. जोराच्या वाऱ्याने होडया वहात वहात, गोकुळ शिरविले जात होते त्या घाटाजवळ आल्या. दोघींची वल्ही एकमेकात अडकली. गोकुळाच्या पाटाचा बोटीला धक्का लागला, तेव्हा स्टेला प्रथम फिल्डिंगच्या आणि नंतर अझीझच्या अंगावर पडली. दोन्ही बोटी उलटल्या. चारहीजण पाण्यात पडले. तिथे पाणी फार खोल नव्हते. कुणावरही बुडण्याचा प्रसंग आला नाही. एकमेकांच्या मदतीने चौघेही पाण्यातून बाहेर पडले. रथोत्सवाची मिरवणूक समाप्त होवून लोक पांगत होते. उत्सवमूर्ती परत नेण्यात येवून देव्हाऱ्यात आली. समोर पडदा टाकण्यात आला.

* * *

पुन्हा परस्परांचे मित्र बनलेले अझीझ आणि फिल्डिंग माऊच्या जंगलामध्ये घोडयावरून रपेट करायला निघाले होते. नुकताच पाऊस पडून गेला असल्यामुळे जिकडे तिकडे हिरवेगार व प्रसन्न होते. अझीझ मनाने बदलला होता. सर्वांशी स्नेह राखण्याची त्याची इच्छा होती. क्वेस्टेडने केवढे धैर्य दाखविले हे प्रत्ययास येऊन त्याने तिला आभारप्रदर्शक पत्र लिहिले होते. फिल्डिंग आपले लग्नानंतरचे अनुभव सांगू लागला. त्यानंतर राजकारणाविषयी गोष्टी निघाल्या. 'इंग्रजांनी हिंदुस्थानातून निघून गेले पाहिजे; टर्टन, बर्टन सगळे चालते व्हा. परके लोक मुळीच नकोत; म्हणजेच हिंदु-मुसलमान शीख सगळे एक होतील हिंदुस्थान एक राष्ट्र होईल.' फिल्डिंगने या आशावादाची चेष्टाच केली. अझीझ चिडलेल्या स्वरात गरजला, 'काहीही असले तरी इंग्रजांचा नक्षा उतरविलाच पाहिजे. तुम्ही चालते व्हा ! आम्ही एकमेकांचा द्वेष करीत असू, पण तुमचा सर्वात जास्त करतो. एकूण एक इंग्रजाला आम्ही घालवून लावू, त्यानंतरच तू आणि मी मित्र होऊ.'

'आपण आताच का मित्र होऊ नये ? आपण दोघांनाही हे पाहिजे आहे.' फिल्डिंग म्हणाला. पण घोडयांना ते नको होते. ते अलग झाले. खडकांच्या बाजूने एकटयानेच जाण्याजोगी वाट होती. आजूबाजूच्या सृष्टीलाही ते नको होते. शेकडो आवाजांनी ती म्हणत होती. 'नाही, इतक्यात नाही.'

* *

### ४. साहेब वाट चुकले !

प्रस्तुत कादंबरी अनेक कारणास्त इंग्रजी वाङ्मयामध्ये नावाजली गेली आहे. हिंदुस्थानावर

इंग्रजी लेखकाने लिहिलेल्या कादंबऱ्या अगदी थोड्या. त्यात अगोदर उत्कृष्ट कादंबरीकार म्हणून नाव मिळविलेल्या लेखकांनी लिहिलेल्या आणखी थोड्या. त्यांतही हिंदुस्थानात प्रवास करून काही दिवस राहून निरीक्षण करून लिहिलेल्या त्याहून कमी. कदाचित् अशा प्रकारची ही एकच कादंबरी असेल. या अपूर्व वैशिष्ट्यामुळे हिचा पुष्कळ बोलबाला झाला. हिंदी परिस्थितीचे प्रतिनिधीभूत दिग्दर्शन करणारी कादंबरी म्हणून हिला मान्यता प्राप्त झाली. उच्च दर्जाची कलाकृती म्हणून होणाऱ्या गुणवर्णनांत या मान्यतेची भर पडली. हिंदुस्थानाविषयी आणि हिंदी लोकांविषयी प्रेम आणि आपुलकी बाळगणारा लेखक म्हणून फॉर्स्टरची ख्याती झाली. दोन वर्षांपूर्वी त्याच्या या कादंबरीला नाट्यरूप देऊन तिचा अमेरिकेत काही हिंदी लोकांनी प्रयोग केला. त्यावेळी फॉर्स्टरचे आशीर्वाद मागण्यात आले होते. इंग्रजी वाङ्मयाचे रसिक म्हणविणाऱ्या उच्चभ्रू भारतीय मंडळींमध्ये याला केवढी मान्यता आहे याची कल्पना या गोष्टीवरून करता येण्याजोगी आहे.

कादंबरीच्या कथानकाचा सारांश वर दिला आहे. सर्वसाधारण इंग्रज किंवा अमेरिकन किंवा पाश्चात्यदेशांतील वाचकांचे हिंदुस्थानाविषयीचे ज्ञान फार अल्प आणि अंधुक असते. प्रत्यक्ष अनुभव तर त्याला नसतोच. तेव्हा प्रत्यक्ष अनुभवाचे संस्कार जिच्यात परावर्तित झाले आहेत, अशा कलाकृतीचे महत्त्व त्यांना विशेष वाटणार हे उघड आहे. त्यातील व्यक्तिचित्रे कितपत उठावदार, व्यक्तित्वसंपन्न आहेत हे तो पाहील. आणि कथानकाचा थाट, शैलीची वेधकता, इत्यादि गुणांचा विचार करून कादंबरीची योग्यता ठरवील. तिऱ्हाईतपणे केलेले रसग्रहण असेच असणार. लेखक प्रत्यक्ष अनुभवाने हिंदुस्थानाचे चित्र रेखाटतो आहे. तेव्हा कलाकृतीत जितकी अवश्य आहे तितकी यथार्थता त्यात असणार असे तिऱ्हाईत वाचक गृहीत धरून चालेल. ज्यास्त खोलात तो शिरणार नाही.

प्रस्तुत कादंबरीचा बोलबाला अशाच तिऱ्हाईत वृत्तीच्या वाचकांकडून आतापर्यंत झाला आहे, असे म्हटले पाहिजे. पण असली तिऱ्हाईत वृत्ती अशा तऱ्हेच्या कादंबऱ्यांचे यथातथ्य मूल्यमापन करण्यास सर्वांशी उपयुक्त ठरणार नाही. विशिष्ट काळातील राजकीय आणि सामाजिक परिस्थिती गृहीत धरून तिच्या आधारावर जी कादंबरी लिहिली, जिच्यामध्ये त्या परिस्थितीच्या गुणदोषांचे उद्घाटन करण्याचा हेतू स्पष्ट आहे, अशा कादंबरीचे मूल्यमापन करताना तिचे यथार्थत्व, प्रातिनिधिकत्व आणि प्रमाणबद्धत्व पारखून पाहणे हे समीक्षेचे मुख्य अंग ठरते, आणि ठरले पाहिजे.

हा विचार लक्षात ठेवून या कादंबरीकडे पाहिले तर सहजच लक्षात येते, की इथे हिंदुस्थानातल्या ज्या समाजाचे चित्र रेखाटले आहे तो मुस्लिम समाज आहे. त्यात हिंदूंचा शिरकाव झाला आहे, पण तो गालबोटापुरता आणि गालबोटासारखा. 'इतका' आणि 'सारखा' हे दोन्ही शब्द वापरले आहेत, ते कसे सकारण आहेत, हे पुढे स्पष्ट होईल. ज्या काळात ही कादंबरी लिहिली त्या काळात या अखंड हिंदुस्थानात शेकडा पंच्याहत्तरपेक्षा जास्त हिंदू लोक होते. आणि ज्या प्रदेशांचे वर्णन कादंबरीत आले आहे त्यात तर शेकडा पंचाऐंशीपेक्षा जास्त होते. असे असता या कादंबरीमध्ये हिंदी समाज आणि व्यक्ती म्हणून ज्यांचे वर्णन आहे ते बहुतेक सर्व मुसलमान आहेत. हा या कादंबरीचा फार मोठा दोष आहे. कादंबरी वाचताना याची सदोदित जाणीव होत राहते. कादंबरीतील चित्र India चे चित्र या नात्याने पूर्णपणे अवास्तव आहे असे असणे कादंबरीच्या एकंदर परिणामाला बाधक ठरते सुस्पष्ट अशी एकच हिंदू व्यक्ती दाखविली आहे, ती म्हणजे प्रो. नारायण गोडबोले. दुसरी व्यक्ती पन्नालाल हा हॉस्पिटल असिस्टंट आहे. हा अगदी ओझरता एक दोन ठिकाणी येतो. पण तेवढ्यात कादंबरीकाराने डंख मारण्यास सोडले नाही.

प्रस्तुत कादंबरीमध्ये हिंदी (म्हणजे मुस्लिम) समाज आणि हिंदुस्थानातील इंग्रज राज्यकर्ते यांच्यामधील संघर्ष वर्णन केला आहे. परकीय राज्यकर्ते आणि त्याच्या अमलाखालील देशी प्रजा यांच्यामध्ये अप्रेम, अविश्वास आणि संघर्ष सदोदित राहणार. त्यांच्यामधील भेदभावना नष्ट होऊन एकोपा प्रस्थापित होणे, सर्वथैव अशक्य आहे. हा या कादंबरीतील मुख्य प्रतिपाद्य विचार आहे. फील्डिंगसारखी एखादी व्यक्ती समतेच्या भावनेने प्रेरित होऊन एकोपा साधू पहात असली तरी तिचे प्रयत्न विफल होतात. आणि अखेरीस तिला राज्यकर्त्यांच्या पक्षात सामील व्हावे लागते.

उलटपक्षी डॉ. अझीझसारख्या सुशिक्षित देशी माणसाने नम्रपणा किंबहुना लाचारी दाखवून गोऱ्या राज्यकर्त्यांच्या समाजात मिसळण्याचा प्रयत्न केला तर तो सिद्धीला न जाता तो माणूस बाहेर फेकला जातो. उलट बाजूने राज्यकर्त्यांच्या समाजातल्या ॲडेलासारख्या स्त्रीने हिंदी समजात मिसळून त्याला समजून घेण्याचा प्रयत्न केला, तर तो तिच्या अंगावर उलटतो, असे दाखविले आहे.

अगदी शेवटी अझीझ आणि फिल्डिंग स्नेहभावनेने एकत्र येतात, तरी त्यांच्यामधील दरी कायम असते. तात्पर्य, 'राज्यकर्ते ते राज्यकर्ते आणि दास ते दास' हे सूत्र अबाधित असल्याचे कादंबरीकाराने सूचित केले आहे. त्याला त्याची मान्यता आहे असे नव्हे. तो तटस्थ आहे. पण हे तत्त्व अटळ आहे, सर्वंकष आहे, असे त्याला म्हणावयाचे आहे.

कादंबरीच्या कथानकाचा काळ लेखकाने प्रत्यक्ष निर्देशिलेला नाही. तथापि तो निश्चित करता येईल अशी गमके आपणाला कादंबरीत आढळतात. चंद्रपूरचे हॉस्पिटल 'मिंटो' हॉस्पिटल आहे. लॉर्ड मिंटो हा १९०५ ते १९१० हिंदुस्थानाचा व्हाइसरॉय होता. व्हाइसरायांच्या नावाची स्मारके ते विलायतेला परत गेल्यानंतर करण्यात येत असत. तो गेल्यानंतर वर्गणी जमवून स्मारक प्रत्यक्ष उभारायचे याला दोन तीन वर्षे तरी लागली असणार. या गणनेने कादंबरीचा काळ १९१२ च्या सुमारचा असला पाहिजे, हे उघड आहे. दुसरे गमक गोडबोल्याच्या बोलण्यातून गवसते. तो फिल्डिंगला नोकरी सोडून संस्थानात जाणार असल्याचे सांगतो, त्या वेळेस पाचवे जॉर्ज राजे यांच्या नावाने त्या संस्थानात हायस्कूल काढण्याचा आपला बेत निवेदन करतो. पाचवा जॉर्ज १९११ साली गादीवर आला. कादंबरीचा काळ त्याच्या नंतरचा असला पाहिजे. हा काळ आणखी पुढे ओढता येणार नाही. कारण मिंटोनंतर हार्डिन्ज व्हाईसराय होऊन आला, तो १९१६ पर्यंत होता. व्हाईसरायच्या नावे स्मारके व्हावयाची ती त्याची कारकीर्द संपल्यानंतर २, ४ वर्षांत होत असत. त्याच्याही नंतरच्या व्हाईसरायाची कारकीर्द संपून जाईपर्यंत लांबत नसत. अगदी शेवटी रॉनी फिल्डिंगला लिहिलेल्या पत्रात म्हणतो की, इकडच्या बाजूला चळवळीमुळे एकासारखे गुन्हे घडत आहेत, परंतु त्यांचे अंतर्गत सूत्र सापडत नाही; हे लिहिणे सूचक आहे. क्रांतिकारकांची चळवळ आणि इंग्रज राज्यकर्त्यांच्या विरुद्ध त्यांनी केलेली कृत्ये यांचा जोर १९११-१९१२ पर्यंत फार होता. त्यानंतर एका बाजूने सरकारने केलेल्या निष्ठुर दडपशाहीमुळे आणि दुसऱ्या बाजूने बादशहाने वंग भंग रद्द केल्याची घोषणा केल्यामुळे तो कमी होत गेला. याच सुमारास म्हणजे १९१२-१३ साली फॉर्स्टर हिंदुस्थानात येऊन बराच दीर्घ प्रवास करून परत गेला होता. यावेळी तो देवासला जाऊन तेथून दिल्लीला गेला. आणि दिल्लीहून उत्तर हिंदुस्थानात त्यावेळचा संयुक्त प्रांत आणि बिहार. बंगाल येथपर्यंत पूर्वेकडे भटकला. त्यावेळी त्याने जी परिस्थिती अनुभवली आणि जे काही पाहिले ऐकले त्याच्या मनावर झालेल्या संस्कारांचे कलात्मक परिवर्तन करून त्याने आपली ही कादंबरी सजविली.

या त्रिखंडात्मक कादंबरीचा तिसरा खंड Temple म्हणजे मंदिर या नावाचा, एकंदर कादंबरीचा सुमारे अष्टमांश भरेल इतका आहे. पहिले दोन खंड अनुक्रमे Mosque म्हणजे मशीद आणि Caves म्हणजे गुंफा किंवा लेणी या नावांचे आहेत. ते दोन्ही मिळून मंदिर खंडाच्या सात पटीने मोठे आहेत. ते स्थळ आणि काळ यांच्या दृष्टीने सलग आहेत. त्यांच्या कथानकाचा काळ १९१२ च्या सुमाराचा आहे, हे वर आलेच आहे. त्यांचे स्थळ चंद्रपूर आणि त्याच्या जवळची मरबार लेणी ही दोन्ही काल्पनिक आहेत, हे उघड आहे. पण ही नावे काल्पनिक असली तरी तशीच परिस्थिती असलेले भागलपूर किंवा त्यासारखे बिहार प्रांतातील गंगातटाकीचे जिल्ह्याचे शहर फॉर्स्टरला अभिप्रेत असावे. फॉर्स्टरच्या ग्रंथांवर टीका टिप्पणी करणारे जे वाङ्मय प्रसिद्ध झाले, त्याच्या लेखकांनी हे दाखवून दिले आहे की, भागलपूरच्या दक्षिणेस काही मैलांवर ठेंगण्या टेकड्यांच्या रांगा असून त्यात काही गुहा कोरलेल्या आहेत. या वस्तुस्थितीचा फॉर्स्टरने मोठ्या कुशलतेने उपयोग करून घेतला आहे. बिहार प्रांत त्यावेळी मागसलेला होता. त्यातले जिल्ह्याचे शहर फॉर्स्टर म्हणतो त्याप्रमाणे गलिच्छ व कळकटलेले असावे, यात अनपेक्षित काही नाही. त्याने चंद्रपूरचे जे वर्णन केले आहे ते इंग्रजी राजवटीतील साधारणपणे कोणत्याही जिल्ह्याच्या शहराला लागू पडेल असे आहे.

जिल्ह्याच्या शहरी गोऱ्या लोकांनाच प्रवेश असलेला असा क्लब बहुतकरून असावयाचा तसा तो चंद्रपुरात आहे हेही ठीकच आहे

तिसरा लहानसा खंड मंदिर नावाचा, त्याचा काळ पूर्वीच्या खंडातील घटनांनंतर दोन वर्षांचा. त्याचे स्थळ 'माऊ' असे कादंबरीकार सांगतो. माऊ म्हणजे वास्तवातले देवास होय. फॉर्स्टर देवासच्या महाराजांचा सन १९२१ मध्ये सुमारे सहा महिने प्रायव्हेट सेक्रेटरी होता.

फॉर्स्टरने पहिल्या दोन खंडात मुसलमान समाजाला आपले मुख्य लक्ष्य बनविले आहे आणि तिसऱ्या 'मंदिर' खंडाचे स्थळमध्ये हिंदुस्थानातील एक हिंदु संस्थान कल्पिले आहे, हे त्याने आपल्या अनुभवास अनुसरून केले आहे. आपल्या अनुभवाशी तो प्रामाणिक राहिला आहे हे खरे. पण त्यामुळे कथानकाला कृत्रिमता आली आहे. बिहार प्रांतातील प्रोफेसर नारायण गोडबोले आणि डॉ. अझीझ यांनी एकदम तेथून निघून शेकडो मैल पश्चिमेस असलेल्या एका हिंदु संस्थानात जावे, याला कोणतेही समर्पक कारण नाही. आपले मर्यादित आणि तुटक अनुभव कसेतरी कादंबरीत गुंफून देण्याची लेखकाची इच्छा, दुसरे काही नाही. 'मंदिर' खंडामध्ये जो अनुभव वर्णिला आहे तो त्याच्या The Hill of Devi या पत्रसंग्रहाच्या पुस्तकात पूर्वी अंतर्भूत झाला आहे. जन्माष्टमीच्या उत्सवाचे विस्तृत वर्णन फॉर्स्टरने पूर्वी आपल्या पत्रात जे केले होते त्याचाच अनुवाद या कादंबरीत केला आहे. सारखेपणा लपविण्याकरिता अर्थात काही कलात्मक बदल केले आहेत.

कादंबरीत मुसलमान समाज जो वर्णिला आहे, तो मनातून इंग्रज राज्यकर्त्यांचा द्वेष करणारा दाखविला आहे डॉ. अझीझ, हमीदुल्ला, महमूद अली इ. सर्व प्रतिष्ठित मुसलमान तशा प्रवृत्तीचे आहेत. हे त्या समाजाचे अवास्तव दर्शन आहे. इंग्रज राज्यकर्त्यांच्या प्रेरणेने सर सय्यद अहमद प्रभृति मुस्लिम नेत्यांनी हिंदूंशी वैर करून इंग्रजांशी निष्ठावंत राहण्याचे जे राजकारण सुरू केले होते ते १९१२ च्या सुमारास चांगले भरास आले होते. इंग्रजद्वेषाची भावना हिंदूंमध्ये होती; मुसलमानांमध्ये नव्हे. लोकमान्य टिळकांची आणि बंगाल्यातल्या जहाल पक्षाची तीव्र स्वदेशी बहिष्काराची चळवळ त्यावेळी होऊन गेली होती. पण त्याची काही जाणीव न दाखविता प्रस्तुत कादंबरीत हिंदू जे दाखविले आहेत ते खुशामतखोर, बढाईखोर, लांगूलचालक आणि खऱ्याखोट्याची पर्वा न करणारे असे दाखविले आहेत. प्रो. नारायण गोडबोले हा चांगले काय, वाईट काय सगळे एकच परब्रह्म आहे अशा वेदान्ती गप्पा मारणारा आणि व्यवहारतः लटपटचा, खुशामतखोर असा रंगविला आहे. हे काय प्रोफेसरीच्या दर्जाच्या हिंदु मनुष्याचे प्रातिनिधिक दर्शन आहे ? दुसरा हिंदू म्हणजे डॉ. पन्नालाल. हा तर अतिक्षुद्र, हीन वृत्तीचा माणूस आहे.

मुख्यतः चित्र रेखाटले आहे ते मुसलमानांचे. हिंदूंना पृष्ठभूमीसारखे वापरले आहे. डॉ. अझीझचे चित्र फार सूक्ष्मपणाने, सर्व खाचांखोचांसह रेखाटले आहे. मनातून इंग्रजांचा द्वेष करणारा, पण बाह्यात्कारी त्यांच्या पुढे गोंडा घोळणारा, स्वधर्माचा अभिमान बाळगून इतर धर्मीयांना मुख्यत्वेकरून हिंदूंना तुच्छ समजणारा, स्नेहशील आणि अतिभावनाप्रधान, बराचसा विषयी आणि सत्यासत्याची चाड न बाळगणारा असा हा माणूस आरंभापासून अखेरपर्यंत आपले लक्ष वेधून घेतो, तसाच दुसरा फिल्डिंग. हिंदी लोकांविषयी खरे प्रेम बाळगून त्यांच्याशी समानतेने वागू पाहणारा हा इंग्रज हिंदी ( म्ह. मुस्लिम ) समाजात सामावू शकला नाही आणि स्वतःच्या समाजाकडून मात्र बहिष्कारला गेला. अखेर त्याला स्वतःच्या समाजाच्या आश्रयाला जावे लागले. इंग्रज जोपर्यंत राज्यकर्ते म्हणून हिंदुस्थानात आहेत तोपर्यंत त्यांच्यामध्ये आणि हिंदी लोकांमध्ये समानता व एकता नांदणे कधी शक्य नाही, हाच सिद्धान्त येथे कादंबरीकाराने ध्वनित केला आहे.

टर्टन, मिसेस टर्टन, मेजर कॅलेंडर इत्यादि इंग्रज राज्यकर्त्यांचे जे नमुने उभे केले आहेत त्यांच्याद्वारा याच सिद्धान्ताचे प्राबल्य ठळकपणे जाणविले आहे. प्रत्येक हिंदी माणसाला चाबकाने बडवून काढावे असे टर्टनला मनात वाटते, तर मिसेस टर्टन बोलून दाखविते. या समाजाच्या भावभावना आणि वर्तन–रीती लेखकाने सिद्धप्रज्ञेने रेखाटल्या आहेत. त्यात यथार्थता पुरेपूर उतरली आहे.

त्यांच्याच समाजातली, पण हिंदी लोकांत मिसळून त्यांना समजून घेऊ इच्छिणारी भाबडी अॅडेला ही कादंबरीकाराची एक विशिष्ट निर्मिती आहे. ती

उपवर आहे आणि लग्नाकरिता इकडे आलेली आहे. तिच्या मनात रॉनीविषयी खरे प्रेम उत्पन्न झाले नाही, हे कादंबरीकाराने मोठ्या कौशल्याने सूचित केले आहे. ती मरबार लेण्यामध्ये शिरली, त्यावेळी 'लव्ह' म्हणजे प्रेमाचाच विचार करीत होती आणि अझीझला त्यासंबंधी प्रश्न विचारीत होती. खटल्याच्या विपरीत निकालानंतर रॉनीने लग्नाचा संकल्प रद्द केला, याचे वाचकाला आश्चर्य वाटत नाही. हिन्दुस्थानाला जाणून घ्यावयाच्या उद्देशाने आलेल्या या मुलीने स्वत:ला नीट जाणले नव्हते. फिल्डिंगने तिला आसरा दिला तथापि त्याच्या मनात ती प्रेम उत्पन्न करू शकली नाही, याला कारण ती रूपाने अगदी सामान्य होती, हेच केवळ नव्हे; तर तिचा स्वभाव तार्किक बुद्धिप्रधान होता; त्यांत भावनेचा अंश कमी. त्यांत लेण्यातील प्रसंगाने फार मोठे परिवर्तन झाले. ती हळवी बनली. पण हृदयस्फूर्त प्रेमाने इतरांची मने ओढून घेऊ शकली नाही. खटल्याच्या प्रसंगी तिच्यात दिसून आलेली सत्यप्रियता अत्यंत उदात्त आहे, यात शंका नाही. सत्यासाठी आपले सुखमय भविष्य पणाला टाकले आणि गमावले.

अझीझ आणि अॅडेला या परस्परविरुद्ध स्वभावाच्या व्यक्ती रेखाटल्या आहेत. अझीझ हा खऱ्याखोटयाची क्षिती न बाळगणारा; तर अॅडेला सत्याचा शोध घेण्यासाठी जीव पाखडणारी, अझीझ अत्यंत विषयी, तर अॅडेला 'लव्ह'लपारखी असलेली, बुद्धिप्रधान मुलगी, अझीझ आतून इंग्रजद्वेष्टा असून बाहेरून नम्रतेचे सोंग करणारा, तर अॅडेला अंतर्बाह्य सरळ, सर्वांशी सारखे वागू पाहणारी. ही मांडणी तम:प्रकाशवत् झाली असून त्यात अॅडेला सर्व बाबतीत अझीझपेक्षा उमाप उजळ ठरते. म्हणजे इथेही हिंदी माणूस नीच आणि इंग्रज उच्च हाच निष्कर्ष !

याप्रमाणे सामाजिक आशयाच्या दृष्टीने ही कादंबरी अत्यंत पक्षपाती, विकृत, पूर्वग्रहदूषित आहे. हिंदी लोक अगदी अनियमित, सर्व बाबतीत घोटाळा माजविणारे, थापेबाज, घायकुते, लावालावी करणारे आणि लांगूलचालक, असा ग्रह ही कादंबरी वाचून व्हावा, असे चित्र कादंबरीकाराने रेखाटले आहे.

राज्यकर्त्या इंग्रजांच्या समाजाचे चित्र अत्यंत मार्मिक व यथातथ्य रेखाटले आहे. त्या समाजाचे प्रत्यक्ष, निकटचे ज्ञान त्याला असल्यामुळे त्याच्या तलस्पर्शी प्रतिभेने येथे उत्तम साथ केली आहे. हिंदी लोकांची चित्रे पक्षपाती लेखणीने रेखाटली असली तरी त्यात जिवंतपणा आहे. हा सिद्धहस्त कादंबरीकार असल्यामुळे व्यक्तिनिर्मितीकौशल्य त्याच्या अंगी भरपूर आहे. त्याचा पक्षपात दुष्ट असला तरी त्याच्या या कौशल्यामुळे त्याच्या व्यक्तिहृदयात खोल प्रवेश करून वाचकाला वेध लावतात. पाश्चात्य देशातील वाचकाला या पक्षपाताचे सोयरसुतक नसल्यामुळे त्याला ही कादंबरी अतिमात्र ग्राह्य वाटावी हे साहजिक होय.

प्रस्तुत कादंबरीत एक प्रकारचे गूढतेचे वातावरण आणण्याचा प्रयत्न केला आहे. पाश्चात्य टीकाकारांनी त्याचे मोठे कौतुक केले आहे. पण मला स्वत:ला ते कृत्रिम ओढून ताणून आणलेले वाटते. गूढतेचे वातावरण अनेक मार्गांनी कादंबरीमध्ये खेळविले आहे. प्रो. नारायण गोडबोले हे पात्र गूढतावादी हिंदुधर्मी व्यक्तीचे प्रतीक म्हणून कल्पिलेले दिसते असे करण्यात कादंबरीकाराने हिंदुधर्मावर मोठा अन्याय केला आहे. गोडबोले भगवद्भक्त आहे. तो पहिल्या भेटीत कृष्ण गवळणीचे गाणे म्हणून दाखवितो. पुढे मरबार लेण्यांमध्ये जायचे ठरल्यावर आपल्या पूजेमध्ये जास्त वेळ दवडून आपल्या बरोबर फिल्डिंगची गाडी चुकवितो. पुढे मरबार लेण्यातील घटना झाल्यानंतर फिल्डिंग अझीझवर कोसळलेल्या अनर्थाबद्दल तळतळून सांगतो, तेव्हा त्याला काही वाटत नाही; "चांगले आणि वाईट हे दोन्ही परमेश्वराचे अंश आहेत, म्हणून आपण त्याला 'ये ये' असे आळवीत असतो," असे काही तरी गूढवेदांती उत्तर देऊन वेळ मारून नेतो आणि मरबार टेकड्यांवरील तळ्यासंबंधी दंतकथा फिल्डिंगला ऐकवितो. कॉलेजात प्रोफेसर असलेला हा गृहस्थ अनियमित, अप्रयोजक, हृदयशून्य आणि गूढवेदांती गप्पा मारणारा आहे, असा या प्रसंगांच्या वर्णनावरून वाचकाचा ग्रह होतो. फिल्डिंगच्या किंवा जार्जबादशहाच्या नावाने हायस्कूल काढणार म्हणून तो सांगतो, त्यावरून त्याचा खुशामतखोरपणा सूचित होतो. खरा साक्षात्कारवादी माणूस असा असणे शक्य नाही. हा गोडबोले पुढे माऊ येथे गोकुळअष्टमीच्या दिवशी कीर्तनात रंगलेला दाखविला आहे. या एकंदर वर्णनावरून कादंबरीकाराने हे पात्र कुचेष्टेखोरपणाने निर्माण केले असावे की काय, असा संशय वाचकाच्या मनात उद्भवतो. अर्थात गूढतेचे वातावरण निर्माण करण्याचा त्याचा हेतू सिद्धीला जात नाही.

गूढता निर्माण करणारी दुसरी व्यक्ती म्हणजे मिसेस मूर. हिंदुस्थानात आल्यानंतर पहिल्या सलामीला तिला अझीझ भेटतो तेव्हा तिचे त्याच्याविषयी फार चांगले मत होते. पुढे क्लबात गेल्यावर सर्व इंग्रज पुरुष व बायका हिंदी लोकांविषयी तुच्छतेने आणि निष्ठुरपणाने बोलतात, 'हिंदी लोकांना मरू देणे म्हणजेच त्यांना अधिकात अधिक दया दाखविणे' असे कॅलेंडरबाई म्हणते तेव्हा तिला फार चमत्कारिक वाटते. क्लबातून परत येताना अझीझवरून तिचा व रॉनीचा वाद होतो. हिंदी माणूस काहीही बोलला तरी त्यातून सरळ अर्थ न काढता, कुटिल अर्थच काढला पाहिजे, ही त्याची प्रवृत्ती पाहून ती अस्वस्थ होते. अशा स्थितीत ती निजायला जात असता खुंटीवर बसलेली गांधिलमाशी तिला दिसते. ही गांधिलमाशी म्हणजे हिंदुस्थानात आलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांच्या मनात हिंदी लोकांविषयी असलेला विषारी पूर्वग्रह.

पुढे फिल्डिंगच्या घरी गोडबोले गवळण म्हणतो तेव्हा तिला विशेष कुतूहल वाटते. हिंदी लोकांच्या सर्व गोष्टी समंजसपणाने आणि प्रेमाने समजून घेतल्या पाहिजेत. नंतर मरबार लेण्यांची यात्रा; त्या लेण्यात भयंकर अनुभव आल्यामुळे ती घाबरून बाहेर पडते आणि अशक्तपणात मानसिक ताण पडल्यामुळे ती खचून जाते. तिची पाठवणी होते, पण वाटेत तिचा अंत होतो. राल्फ आणि स्टेला यांच्या रूपाने ती पुन्हा हिंदुस्थानात येते असे सुचविले आहे.

मिसेस मूर हिंदी लोकांकरिता प्रत्यक्ष काही करीत नाही. खटल्यात साक्ष देण्याचे देखील नाकारते. तथापि हिंदी लोकांविषयी तिला प्रेम आहे; ती मानवतावादी आहे. सर्व मानव तिला सारखे आहेत, म्हणून अझीझ व गोडबोले यांच्याशी ती समरस होऊ शकते. कीर्तनप्रेमात रंगलेल्या गोडबोल्यांच्या अंतश्चक्षूसमोर ती येते, अझीझ अखेरपर्यंत कृतज्ञतेने तिचे स्मरण करतो. तिचा आत्मा हिंदुस्थानाशी एकरूप झाला आहे. आरंभापासून अखेरपर्यंत कादंबरीला ती व्यापून राहते. तिच्या रूपाने हिंदुस्थान व इंग्लंड यांच्यामधील दुवा यशस्वी कसा होऊ शकेल हे प्रतीकरूपाने लेखकाने दाखविले आहे.

टीकाकारांचे म्हणणे असे की सबंध कादंबरीच गूढ स्वरूपाची, रूपकात्मक आहे. हृदय आणि मस्तक (heart and head) मिसेस मूर आणि अॅडेला यांच्या रूपाने अवतरली आहेत हिंदुस्थानाला हृदयाने, म्हणजे सहजस्फूर्तप्रेमाने समजून घेता येईल; त्याच्या अंतर्यामात शिरता येईल. त्याप्रमाणे मिसेस मूरची वृत्ती होती. ती शरीराने मेली तरी आत्मरूपाने या देशातील लोकांच्या मनात राहिली, कीर्तनात गोडबोल्याला तिचा भास झाला. अशा रीतीने सर्व कादंबरीभर तिचे अस्तित्व जाणवत राहावे अशी सूचकता कादंबरीकाराने साधली आहे. याच्या उलट अॅडेला हिंदुस्थानाला जाणून घेण्याचा उद्देश उघड घोषित करीत देशात पाऊल ठेवते, पण तिचा मार्ग केवळ बुद्धीचा असल्यामुळे तो फसतो मरबार लेणी हे जडता अभाव (negation) यांचे प्रतीक आहे. मिसेस मूर पहिल्याच क्षणी त्यातून बाहेर पडते; पण अॅडेला त्यात अधिकच गुरफटली जाते आणि भ्रम, आभास यांच्या भोवऱ्यात सापडून वैफल्य तिच्या पदरी येते. मरबार लेणी हे फार मोठे गूढ लेखकाच्या प्रतिभेतून अवतरले आहे. लेण्यांमधील असंख्य गुहा, त्यातील अंधार, वर्तुळाकृती गुळगुळीत भिंती आणि सर्वात भयानक त्यातून उठणारा 'भम, भम' असा ध्वनी या सर्व गोष्टी गूढतेचे पोषण करतात. त्या गुहेत अॅडेलाला काय दिसले, कशामुळे ती भ्याली, याविषयी अनेक कल्पनातरंग उठले आहेत. तेही धूसरतेचे वातावरण पसरविण्यास सहायभूत होतात.

हे सर्व हिंदुस्थानाचे प्रतीक म्हणून लेखकाने उभे केले असावे. हिंदुस्थान हा जडमूढ असा देश आहे. त्याची संस्कृती, त्याचा धर्म, त्याचे एकंदर रूप अनादि अनंत, अनाकलनीय आहे, जशी ही मरबार लेणी! असे कादंबरीकाराला सुचवावयाचे आहे येथील निसर्गाचे वर्णन तो करतो. अथांग अनंत आकाश आणि रूक्ष, रखरखीत जड अशी पृथ्वी; आकाश, प्रसंगी प्रखर सूर्य प्रकाशाने तापविणारे, तर अन्यथा चंद्रप्रकाशाने शीतविणारे, हिंदुस्थान देश देखील असाच अथांग, केव्हा केव्हा प्रखर तर केव्हा केव्हा सौम्य. पृथ्वी जशी सपाट, जड, त्याप्रमाणे इंग्रजी सत्ता जड आणि कल्पनाशून्य; ती या अथांग कल्पनातरल देशाबरोबर कसे साहचर्य करणार, कशी एकरूप होणार, असे काही तरी साम्य सुचवावयाचे लेखकाच्या मनात असावे. हे काही अलंकारशास्त्राच्या व्याख्येत बसणारे रूपक नव्हे; लेखकाच्या शैलीची सूचकता आहे. वाचकांच्या

[पुढील मजकूर पान २४४ वर]

## ‘ मींती तीन्मी ’

पद्मजा फाटक

आपण कुणाला पत्र लिहीत असताना कुणी आपल्या खांद्यावरून वाकून, टांचा उंचावून आपला अर्धामुर्धा मजकूर, वाक्य, शब्द वाचू लागलं तर कसं वाटतं ? जवळपास तसा ती माझ्या प्रत्येक विचाराचा, शब्दाचा, मनाच्या व्यापाराचा पाठलाग करत असते. उद्धटतेनं, ठामपणानं, कमरेवर हात ठेवून, विनासंकोच. ( छे, संकोचावं पाहिजे तर मी, ती दिवसेंदिवस फुगतच चालली आहे... )

तिला जन्माला घातली मीच तशी. भातासाठी फुलत ठेवलेल्या शेगडीतल्या धम्मक निखाऱ्यांचा रंग मी पहिल्यांदा पाहिला लग्नानंतर, सासरी, संध्याकाळी. ( तोवर पाटी घासतांना गालावर फराटा ओढून घेण्यापुरता कोळश्याशी संबंध आलेला—म्हणूनही असेल.)

स्वयंपाकघरातल्या त्या मावळत्या दिवसात तो फुलत्या, कोळशाचा रसरसता गडद, केशरी, अति जिवंत रंग पाहून मी हरखून म्हटलं, ‘ वा, फुलत्या फुलानंही लाजावं इतका कोळसा दिमाखदार जळतो ?—तरुण दिसतो ! ’

—त्याच क्षणी ती झोपडपट्टीतल्या मुलासारखी सराईतपणानं जन्माला आली. मी बाळंतीण झाले.

पुण्याला आमच्या ज्ञानेश्वर पादुकांच्या चौकाजवळ एक विलक्षण गोडगबाळी नि नाकीडोळी ग्रीक मुलगी फाटक्या परकरात बसून बोरंबिरं विकत असे. एकीकडे भावाशी खेळायची, व्यापार दुर्लक्षायची, बटा सांवरायची.

‘ हिच्यावर कांहीतरी लिहायलाच हवं, लेख, कथा, शब्दचित्र......’ हे तिचं पहिलं विधान आणि शेवटचं बोबडं वाक्य. ( त्यानंतर कधी ती अडखळली, बिचकली नाहीच. )

‘ चेहरे ’ नावाचा माझा पहिला लेख ( नि लेक ) मी त्या कोपऱ्यावरच्या यमीवरून, तिच्या सांगण्यावरून लिहिला आणि तेव्हापासून माझ्यातली ती लेखिका या नामाभिधानाला पात्र झाली. मी लग्नाच्या बायकोसारखी तिला किंवा ती नावामागच्या सौ. इतकी मला—चिकटली.

( त्यापूर्वीच एक उखाण्यावरचा—भलत्याच विषयावर रिसर्च केल्यासारखा—माझा लेख त्याच मासिकात छापून आला होता. )

आणि तेव्हांपासून कधी माझ्या कळत कधी नकळत ती माझ्या प्रत्येक क्षणावर, कणावर उद्धट अधिकारानं बसत आली आहे. घोडा घोडा करून, चमकत्या डोळ्यांनी, केस पिंजारून......तेव्हापासून मी आणि माझ्या सावलीचं जे नातं, तेवढी ती माझ्या घट्ट नात्याची झाली आहे.

छे, तिच्या सांगण्यावरून मी लिहिलंय फार थोडं. तिला दाद दिली फक्त तीसेक कथांची. (आता जुन्या पटकुरावर वाळत घातलेल्या सांडग्यासारख्या—) तेवढ्याच लेखांची, दहाबारा कविताही. एक कादंबरी अनुवादली. बाळकथांची एक साखरवाटी पुस्तकरूपानं काउंटरवरून पुढे सारली. आकाशवाणीवर बारा—बारा मिनिटं लांबीची सुमारे पाव शतकभर भाषणं लिहिली—वाचली. इंदू—साक्रीकरचं बक्षिस, एवढा एकच जरा चमकता बिल्ला.

कथासंग्रह निघावा हा मुलगा व्हावा या इच्छेइतकी स्वाभाविक इच्छा घेऊन प्रकाशन नि प्रकाश दिसला अशा दोनतीन दारी वणवणले. ( मुलगी सांगून गेल्यासारखी—)आणि तुमचं आडनांव भावे किंवा गोखले असतं तर काम सोपं होतं. निदान कथा तरी

कॅलिबरच्या हव्यात......त्यापेक्षा कादंबरी लिहा... ( अहो लघुकथा जरा ताणली की कादंबरी—आहे काय न् नाही काय ! ) 'नक्की छापतो.' हे उत्तर घेऊन परतले.

बस्, एवढंच माझं पाप—किंवा पुण्य...आजमितीस एवढंच तिचं वय किंवा व्याप्ती.

पण एवढ्या मांडवलावरच कधीपासून जोखड बनून ती मानेवर बसली आहे ना !

माणसात जी काय खरी—खोटी, चिमटभर—मणवारी कला असते, ती अशी त्याच्या काना—मनाला विळखा घालून बसते ? लस बनून अंगभर भिनते ? सबंध जगणं ग्रासते ?

तिनं जन्म घेतल्यापासून एकही विचार मी खाजगीत, स्वतंत्र, एकटीने असा केलेला नाही. मी एखादी सुंदर वस्तू बघावी, चीज ऐकावी, पदार्थ खावा, झुळूक अंगावर घ्यावी—हिनं लगेच ती शब्दबद्ध करून रोजनिशीत उतरवून टाकावी.

तिला कळायला लागल्यापासून आजवर एकाही व्यक्तीशी मी निर्भेळ नजरेनं पाहिलेलं—बोललेलं नाही. म्हणजे तशी उघड दटावत, धमकावतही नाही—पण माझ्या नकळत माणसं कनवटीला लावत असते. त्याला काय करणार ? निखळ माणसं ती मला भेटूच देत नाही. जवळ आली की ती 'कॅरॅक्टर्स' बनतात. ज्या पैलूनं मला दिसतात तो स्वभावविशेष ती पटकन् उचलून पुष्कळदा माझ्याही नकळत पडशीत टाकते. अडीअडचणीला कधी जाणीवपूर्वक, मी ती व्यक्ती, तो पैलू काढून एखाद्या कथेत, उपमेत, विनोदी लेखात वापरून टाकते केव्हापासून जवळ जवळ ती ओणवीच, वेचणारीच. पहाणारी मी, अनुमानं काढणारी मी आणि ती अनुमानं हातोहात लंपास करून 'रॉ मटिरियल' जमवणारी ती.

कधी कुंभाराच्या चाकावरचा खुजा घेतो तशी माझ्या हातातली कथा घाट घेत असते. कुठेतरी आकार बिघडत असतो, वाळल्यावर तडा न जाईल अशी खात्री वाटत नसते. या सुबकाकारावर थोडी पानाफुलांची वेलबुट्टीही हवी का, या विचारात मी असते आणि अशावेळी नेमकं कुणाचं, केव्हातरी ऐकलेलं वाक्य, चपखल शब्द, कुणा व्यक्तीची अशाच परिस्थितीमधली स्वाभाविक प्रतिक्रिया ती पोतडीतून काढून अचानक, अलगद माझ्याकडे फेकते. मीही झेलते.

पण मला रुसायलही होतं. माझ्या नकळत माझ्याशी बोललेल्या, ( माझ्या ) माणसांची वाक्यं उतरवून ठेवणारी ही कोण ? माझ्या कानावरही हिची का हुकमत ? मनाच्या प्रत्येक व्यापारात हिची का ढवळाढवळ ?

हिनं का कोलंबीच्या वाटचांसारखे वाटे घालून असावं—माझ्या उपयोगासाठी ? इतर माणसं कशी पिक्चर—गॅलरीत वावरावं तशी खुशालपणानं हिंडत असतात. तसबिरी दुरून—हव्या तितक्या जवळून—बघत असतात. मला मात्र तिने माणसं मोरपिसांसारखी निरुद्देश पुस्तकात ठेवावयचा हक्कच ठेवलेला नाही. मी

---

[पान २४२ वरून]

मनोभावानुसार तिच्यातून भिन्न भिन्न अर्थ निघू शकतील. टीकाकारांनी तसे काढलेही आहेत.

ही गूढता आणि सूचकता लक्षात घेतली म्हणजे कादंबरीला काही एक निराळा अर्थ प्राप्त होतो. तथापि मूलभूत अपूर्णतेचे असमाधान कायमच राहते. सूचकतेला वास्तवाचा भक्कम आधार हवा. तो नसेल तर ती प्रत्ययकारी होणार नाही. आपल्या स्वतःच्या देशाहून वंश, धर्म, संस्कृती या सर्व बाबतीत अत्यंत भिन्न अशा या प्राचीन आणि विशाल देशाचा धावत प्रवास आणि किंचित रहिवास करून मिळविलेल्या चुटपुटत्या ज्ञानावर आणि अवलोकनावर उभारलेले या कादंबरीतील वास्तव अत्यंत अपुरे, विकृत आणि मनोगंडदूषित आहे हे मागे निवेदिले आहेच. त्या संदर्भात विचार करता या कादंबरीची प्रत्ययकारिता अल्प आहे, यश मर्यादित आहे असाच अभिप्राय हिंदी वाचकाचा होईल यात संशय नाही.

□ □

काय लक्षात ठेवायचं? कुणाला विसरायचं? कुणा। भोवती लेणं बांधायचं, हेही ठरवणार हीच. म्हणजे एका दृष्टीनं मी हिची कठपुतळीच. अल्बम माझा, त्यात फोटो चिकटवत जाणार माझ्यातली ती. 'लॅब' माझ्या मनाची, रसायनं तयार करणारी ही. नजर माझी, बघणं चोरायचं तिनं.

एखादं सुंदर पुस्तक वाचावं, सिनेमा पहावा, बाळगाणं ऐकावं 'बघ किती साधी कल्पना, कशी सुंदर फुलवलीय–तुला आलं नसतं ! /आलं असतं ?' लगेच तीं माझी खरडपट्टी काढणार.

मला खूपदा वाटतं, कुठल्याही क्षेत्रातले (उदा. नाट्य) जाणकार–विशेष गम्यवाले, साध्यासुध्या, भाबड्या प्रेक्षकांपेक्षा कमी (च) सुदैवी जरा अभोगीच ! गुबगुबीत खुर्चीत, चिकणी सुपारी खात पात्रांशी समरसून जाण्याचा भाबडा हक्क त्यांना नाहीच.

'नेपथ्य' तपासताना, दिग्दर्शकाच्या चुका हुडकताना, नव्या कल्पना, युक्त्या टिपून घेताना ह्या माणसातला 'तो' (नट /दिग्दर्शक /नेपथ्यकार /समीक्षक /लेखकही) त्याला खिजवत, शिकवत, दटावत, कौतुकत असतोच. (हें ह्यांच्यापेक्षा चांगला 'शो' करू शकला पाहिजेस तू !) त्या नादा–व्यापात 'कित्ती छान काम करतात नाही लागू ?' म्हणत किंवा पोट धरधरून हसत किंवा पाणावलेले डोळे पुसणाऱ्या रुमालाने बाहेर येण्याचं कसब त्यांच्या हातून नकळत केव्हातरी गळून पडलेलं असतं त्या ऐवजी 'तो'चं जोखड त्याच्यावर चढलेलं असतं ना !

दुपारची, एखादं सुंदर प्रकाशन मी आज केवळ 'पुस्तक' म्हणून वाचू शकत नाही. आपल्याला असं लिहिता यायला पाहिजे ही महत्वाकांक्षा दहा वेळा 'हट्, आपल्याला असं कधी जमणारे ?' ही प्रतिक्रिया नव्वद वेळा आपल्या लिखाणाच्या संदर्भात त्या पुस्तकाचं मूल्यमापन अत्यंत स्वमय, सब्जेक्टिव्ह, लडबलेलं-स्वार्थी समीक्षण.

पहिल्या पानावरचा आवृत्ती कितवी, केव्हाची, लेखक /लेखिका कोण, कोणत्या दर्जाची, माझ्या संदर्भात कुठल्या पातळीची (हिचा कथासंग्रह निघाला वाटतं आधीच ! –असंही कधी.), कॉपीराईट कुणाचा, लेखनकाल...(बघ, असं एकटाकी जमलं पाहिजे, कण्हत–कुंथत नव्हे...)...खस्‌दिशी माझ्या हातातलं पुस्तक ओढून घेऊन ती बनियाच्या व्यवहारी दृष्टीनं हे सगळं अजमावून घेईल तेव्हा कुठे मला मग आतला मजकूर वाचता येईल. वाचतानाही ही–अर्थात्–मध्ये मध्ये बोलणार, कॉमेन्टस् टाकणार, नाकं मुरडणार, खरडपट्या काढणार हे अपरिहार्यच.

आता दुर्गा भागवतांसारखं भाव–बुद्धिचं मिश्रण मला येत्या सात जन्मात जमेल कां ?

ग. दि. मां. सारखी असते मी तर एव्हाना माझ्या एखाद्या गोष्टीवर पिक्चर (हँ हँ हँ) नसतं निघालं ?

आता काव्य तर माझ्या कणगीतच नाही तरी आपले दर वेळा मंगेश पाडगांवकर भेटले (मासिकात !) की पद्मजा फाटकला धारेवर धरायचं ?

–पण माझ्यातली ती अशीच अचरट, मूर्ख–महत्वाकांक्षी, दुर्दम्य झॅगटवाली (पहा–आता Stupidly-ambicias स्वतःच हा शब्द स्वतःला सुचवला–मी फक्त अनुवादला.)

साधी लायब्ररीतली पुस्तकं मला सुखानं निवडू देईल ? 'मला काही शिकवेल असं उचल !' लगेच खिसखिसेल. सदा सेन्सिबल पण नको असलेले सल्ले ! काऊंटरवर पडलेली कुठलीही दोन चांगली पुस्तकं उचलून भाजीच्या पिशवीत टाकायचा स्कोप हिनं मला ठेवलेलाच नाही. लेखिका झाले म्हणून आम्ही कधी निव्वळ, निखळ वाचनाकरता पुन्हा एकदा फडक्यांची दौलत उचलू नयेच ? तिच्या मते, नये. रसरंग, फिल्मफेयर एखादवेळी उचलायला एवढी हिची परवानगी कशाला ? पण नाही, ही पदर ओढणारच, बहुधा मी तिचं ऐकणारही.

पाऊस–वाऱ्याचं मिक्श्चर मला फार आवडतं. दुपारी दीड–दोन वाजता घरात कुणी नसतं. अख्खी सोसायटी झोपलेली असते. अशा वेळी माझ्या खाजगी गॅलरीत विश्वबिंदू होऊन पावसाचे तुरे नि वाऱ्याची फुलं अंगभर घेत उभं राहिलं की सगळं जग गजाआड, मी सुद्धा संपूर्ण ऐलतीरावर नाही, असं होतं. पण तेव्हाही ती नकोइतकी माझी असतेच.

मण्यांसारखे ओंजळभर शब्द पुढे टाकते आणि तो अनुभव शब्दात बांधायला लावते.

वाटतं शब्दांच्या परिभाषेत अनुवादित न करता एखादा सूक्ष्मसा जीवनानुभव घेण्याची, सूर ऐकण्याची,

एखादं वेगळं 'वाटणं' वाटून घेण्याची मुभा ही मला कधी देईल ?

गोवंसुद्धा हिनं मला निव्वळ प्रवासी म्हणून दिलखुलासपणे बघू दिलं नाही. 'बघ, बघ, बा. भ. बोरकारांचा, काकोडकरांचा, सुभाष भेंड्यांचा, मधु-मंगेशांचा गोवा...अगं, प्रवासात तुझ्यासारख्या लेखिकेनं टिपकागद बनून असावं. फडक्यांनी आपल्या प्रवासाचा उपयोग नुसता बाह्यवर्णनासाठी, वरवरचा केलाय—असा तुझा आरोप ना ! मग आता जमेल तेवढी खोल बुडी मार. बेभराची भाषा ऐक—मांडवीच्या काठावरचं वातावरण श्वासागणिक आत ओढून घर—मडगाव, मंगेशी-पणजीच्या पुलावरचे नम्र वाकलेले दिवे—ओळीनं उभे...निसर्गाइतकाच हा ताटवा सुंदर नाही ? नोंद करून ठेव !

हिच्या नोंदीतनं मला कधी सुटकाच नाही. निवांत शहाळ्याचं पाणी काही पिऊ द्यायची नाही.

एक विचार आहे. अर्थात तिनं तो खांद्यावरून वाचून ठेवलाच आहे ! तीन चतुर्थांशाच्या आयुष्यावर थांबून जायचं, रिटायर व्हायचं, बंद पडायचं ! टिपणं फाडायची, नोंदी करायच्या नाहीत. शब्द जमवणं थांब-वायचं, आविर्भाव उतरवून न ठेवायला शिकायचं.

'अग, कोरडी पडशील, लेखिका ना तू, How will you grow ?'

न का वाढो मी. कुणाचं ओलं दुःख स्वतःच्या (नसलेल्या) दुःखाइतकं उराशी धरलेलं असताना एकीकडे त्याला 'थीम' समजून कथा बेतायला घेतलीच पाहिजेस तू, असं नको. मग मी माझा प्रत्येक अनुभव तुला द्यायला बांधलेली नाही. मला दिसलेल्या प्रत्येक छटेत सहभागी व्हायला तू माझी (कुणीच) लागणार नाहीस. खुशाल दुसऱ्या कुणाला घोसळ. सांडगे घालणं सोडून मी तर सुखानं—हो दुपारी अर्नाळ-करसुद्धा—वाचणार आहे. स्मृतिचित्रांची हव्वी तेवढी पारायणं करीन—कशाची म्हणून पुरचुंडी बांधणार नाही...

...पण एक प्रश्न आहे. तिच्या उच्छ्वासाशिवाय मला तेव्हा श्वास घेता येईल ? ती माझी साधना, माझी छंदा, माझा दुसरा स्वभाव. तो वजा केला तर मी (मेणबत्तीच्या मेणाइतकी तरी) नक्की उरेन ?... सावलीशिवाय माणसाला जगता येतं ?

माझ्या प्रत्येक विचारासारखाच हा प्रश्नही माझ्यातल्या तिनं वाचला आहे, खांद्यावरून !

□ □

# संस्कृतीचे आकारबंध : रूथ बेनेडिक्ट

अनुवाद : दुर्गा भागवत

## आचारशास्त्र

जोवर आम्ही—म्हणजेच पाश्चात्य ख्रिस्ती मानव आणि आदिम जन, आम्ही आणि वन्य जन, आम्ही आणि मूर्तिपूजक ह्या दोहोंमधला तरतमभाव आम्हा पाश्चात्य लोकांच्या मनात घर करून होता, तोवर मानवशास्त्राची व्याख्या करणे अशक्यच होते. आमचा तोच काय तो धर्म आणि आमच्या शेजाऱ्याचा तेवढा लोकभ्रम, अशी, समजूत खोडून काढून काही अंशी एक प्रकारची शिष्ट वृत्ती निर्माण करणे प्रारंभी तरी आवश्यकच असते. एका समान अधिष्ठानावर, म्हणजेच आधिभौतिक तत्त्वावर ज्यांची प्रतिष्ठापना झालेली आहे अशा ह्या साऱ्या संस्थांना—आमच्याही संस्थांचा त्यात अंतर्भाव करून—मान्यता प्राप्त करून देणे प्रारंभी आवश्यकच होते. एकोणिसाव्या शतकाच्या प्रथमार्धात मानवशास्त्राचे हे प्राथमिक विधेयक पाश्चात्य संस्कृतीतल्या सर्वश्रेष्ठ विचारवंतांनाही जाणवले नाही. मानवजातीच्या प्रारंभापासून तो आजवरच्या इतिहासापर्यंत मानवाने आपल्या अनन्यसाधारणांचे एखाद्या प्रतिष्ठेप्रमाणे समर्थन केलेले आहे. कोपर्निकसच्या काळी मानवाने सर्वश्रेष्ठत्वावर आपला जो हक्क प्रस्थापित केला तो इतका समावेशक होता, की त्यात ज्या पृथ्वीवर आपण राहातो, तिचाही अंतर्भाव करण्यात आला होता. ह्या पृथ्वीरूप ग्रहाचे सूर्यमालेतले स्थान दुय्यम दर्जाचे आहे, ही गोष्ट चौदावे शतक अट्टाहासाने चक्क नाकबूल करीत असे. डार्विनच्या काळापर्यंत मानवाने सूर्यमाला शत्रूच्या स्वाधीन करून टाकली आणि मग तो आपल्या सर्व आयुधानिशी आत्म्याच्या अनन्य अशा सार्वभौम आधिपत्यासाठी झगडू लागला; तो आत्मा म्हणजे काय तर ईश्वराने मानवाला दिलेली एक अगम्य गुणवत्ता; ती गुणवत्ता अशी की तिच्या योगाने मानवाची पशुकोटीतली आनुवंशिकता संपूर्णपणे अमान्य ठरावी. उत्क्रांतिवादाने मानवाच्या अनन्यसाधारणतेच्या कल्पनेला जो अवमान किंवा हलकेपणा आणू घातला होता, त्याने इतकी खळबळ माजली, इतका क्षोभ निर्माण झाला की तिथे कुठल्याही वास्तव गोष्टीची काही तमाच राहिली नाही. एवढेच काय पण एकोणिसाव्या शतकाने कुठल्याही विजातीयांच्या समूहाशी आपल्या सोदरत्वाच्या नात्याचे मुळीसुद्धा समर्थन केले नाही; जो आत्मा म्हणून वर सांगितला त्या आत्म्याच्या स्वरूपाबद्दल शंकाच उत्पन्न झाली नाही, किंवा जे वादविवाद झाले, त्यात खळ म्हणून कधीच पडला नाही; अशा ह्या साऱ्या वास्तव गोष्टी उत्क्रांतिवादाने झालेल्या अव्वल क्षोभापुढे य:कश्चित् ठराव्या.

ह्या दोन्ही लढाया तत्काळ नाही तरी थोड्या अवधीत, जवळ जवळ जिंकल्यासारख्याच होत्या; परंतु तरीही हे प्रकरण तिथेच संपले नाही. युद्धाला दुसऱ्याच आघाडीवर तोंड फुटले. पृथ्वीचे सूर्याभोवती परिभ्रमण किंवा मानवाची पशूपासून झालेली उत्पत्ती ह्यांचा आमच्या वैयक्तिक कर्तृत्वाशी काहीही संबंध नाही, हे मान्य करायची आता आपली तयारी आहे. कोट्यवधी सूर्यमालांपैकी एका ग्रहावर आपण यदृच्छया वसती केली असली तरी आपले हे यश आणखीच उज्ज्वल ठरते; आणि सारे बरेवाईट वर्गीकृत मानववंश जर उत्क्रांतिवादाने पशूशी जोडले गेले तर आम्ही व इतर ह्यांच्यातले सिद्ध करण्यासारखे भेद आणखीच उत्कटपणे, ठळकपणे प्रगट होतात ह्यात शंका नाही; आणि त्याचबरोबर आम्हा मानवांच्या संस्थांचा अनन्यसाधारण मोठेपणा अगदी उठूनच दिसतो. पण आमच्या संस्था आणि आमचे कर्तृत्व खरोखच अद्वितीय आहे. नीचकोटीतल्यांच्या पेक्षा आमच्या संस्था वेगळ्या पद्धतीवर आधारलोक असून, काय वाटेल ते



अनुक्रमणिका

झाले तरी त्यांचे रक्षण करणे आपले कर्तव्यच आहे. म्हणूनच सध्या प्रश्न साम्राज्यशाहीचा असो, वांशिक दुरभिनिवेशाचा असो, की ख्रिस्तीधर्म व मूर्तिपूजा यांतील तुलनेचा असो; आम्ही आताही आमच्या अनन्यसाधारणपणाच्या वेडाने पछाडलेले आहोत. जगभर पसरलेल्या मानवी संस्थांच्या अद्वितीयतेबद्दल कोणीच कधी कदर केली नाही. आम्ही आपले कर्तृत्व, आमच्या संस्था, आणि संस्कृती ह्यांच्या मोठेपणातच दंग आहोत.

पाश्चात्य संस्कृतीचा, सुदैवी ऐतिहासिक परिस्थितीमुळे, दुसऱ्या कोणत्याही स्थानिक समूहाच्या संस्कृतीपेक्षा अधिक दूरवर विस्तार झालेला आहे. जगभर या संस्कृतीचे एकच मूल्य व स्वरूप प्रस्थापित झाले आहे. तिने जगभर आपली समनता प्रस्थापित केलेली आहे. आणि त्यामुळे मानवी वागणूक सर्व ठिकाणी सारखीच असते असा एक समज आपसात दृढमूल झाला आहे. आमच्या संस्कृतीत सर्व ठिकाणी सारखेपणा असता तर असे होते ना! अगदी आदिम जातीतल्या लोकांना देखील कधी कधी सांस्कृतिक वैशिष्टयांची आमच्याहूनही फार जाण असते, आणि त्याला कारणही तसेच सबळ आहे; ते असे का? त्यांना वेगवेगळया संस्कृतींचा साक्षात व अगदी निकटचा अनुभव असतो. आपला धर्म; आपली आर्थिक व्यवस्था आपले विवाह–निषेध हे गोऱ्या माणसाच्या त्या त्या विशेषापुढे निष्प्रभ होत चाललेले ते प्रत्यही पाहात असतात. एका पद्धतीचा त्यांनी आपण होऊन त्याग केलेला असून दुसरीचा त्यांनी स्वेच्छेने स्वीकार केलेला असतो; पण आपण असे का करतो, ते त्यांनाच पुरेसे कळत नाही. पण एवढे मात्र त्यांना नीटपणे माहीत असते की मानवी जीवनात वैकल्पिक किंवा विविध योजना अस्तित्वात आहेत. कधी कधी ते स्वतःच गोऱ्या माणसाचा वरचढ वैशिष्टयाचे कारण त्याच्या व्यापारी–स्पर्धांत व त्याच्या युद्ध–संस्थांत आहे, हे ते एखाद्या मानवशास्त्रज्ञाप्रमाणे ओळखतात. गोऱ्या माणसाला वेगळाच अनुभव आलेला असतो. त्याने युरोपीय बनलेल्या बाह्याखेरीज, खरा बाह्य असा कधी बघितलेलाच नसतो. प्रवास केला; तर तो बहुधा पृथ्वी-प्रदक्षिणा करून येतो. पण त्यातही सार्वजनीन हॉटेलाबाहेर तो कधीच मुक्काम करीत नाही. स्वतःखेरीज बाकीच्या जीवनातले विविध मार्ग त्याला फारसे परिचित नसतात. आपल्या सभोवार आचार व दृष्टिकोण ह्यांच्या बाबतीत सतत आढळून येणारा एकसारखेपणा पाहिला की त्यामुळें त्या आचारांच्या खात्रीलायकपणाबद्दल त्याची समजूत पटते. पण त्यामुळे ह्या साऱ्या गोष्टी म्हणजे केवळ ऐतिहासिक योगायोग आहेत, हे सत्य मात्र त्याला अज्ञातच राहाते; गुप्त राहाते. मग विशेष गाजावाजा न करता तो मानवी स्वभावातला सारखेपणा व स्व–संस्कृतीतला मोठेपणा गृहीत धरून चालतो.

[क्रमशः]

□ □

---

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी विदर्भ साहित्य संघ, संपादक व सल्लागार मंडळ सहमत असतीलच असे नाही.

वि. सा. सं. च्या सभासदांना 'युगवाणी'चा अंक पाठविला जातो. ज्या महिन्यापासून सभासदत्व स्वीकारले जाईल त्या महिन्यापासून पुढील उरलेल्या आर्थिक वर्षाच्या काळात निघणारे अंक पाठविले जातील.

केवळ 'युगवाणी'चे वर्गणीदारांकरिता वार्षिक वर्गणी रु. १० फक्त. एका अंकाची किंमत दीड रुपया.

---

# जी. ए. कुलकर्णी यांच्या रूपककथा : २

वसंत आबाजी डहाके

" अदृश्य विलक्षण नगाऱ्यावर अदृष्य हातांचा इलकाच ठेका..."

१

'प्रवासी' या कथेत अनंत अरण्ये तुडवून प्रवासी एका शहरात येतो. हे शहर विलक्षण आहे. जी. एं. च्या काही कथांतून प्राचीन आणि उद्ध्वस्त शहरांचे उल्लेख येतात. 'गुलाम'मधला मुशाफीर, 'रत्न'मधला नायक, 'वहाणा' कथेतला विक्रेता, ही माणसे अशा शहरांतून भटकलेली आहेत. शहर हे माणसाच्या सभ्यतेचे आणि विकसनशीलतेचे प्रतीक असते. रानावनात गुहांतून राहाणाऱ्या माणसाने विटेवर वीट जोडून अवाढव्य शहरे उभी केली. तैग्रीस, उफ्राजीस आणि नील यांच्या किनाऱ्यावर उंच आणि विशाल इमारतींची शहरे होती. काळाने त्या रस्त्यांवरून हिंडणाऱ्या माणसांना नाहीसे केले पण त्यांच्या बांधकामाचा पुरावा मात्र संपूर्णपणे नष्ट होऊ शकला नाही. अशा स्मृतिशेष झालेल्या भव्य शहरांतून जी. ए. आपल्याला फिरवतात. 'प्रवासी' आता आला आहे तो एका विलक्षण शहरात. या शहराच्या वेशीला दोन दरवाजे आहेत. एका दरवाजावर महाकाल पहारा करतो. आणि दुसऱ्या दरवाजावर अकाल. महाकालाच्या वेशीतून कोणालाच बाहेर जाता येत नाही. तर अकालाच्या वेशीतून कुणी आत येऊ शकत नाही. मध्ये हे शहर आहे. त्यातल्या माणसांचे जीवन आहे. तेथे राहाणारी माणसे सतत धास्तावलेली भीतिग्रस्त. महाकालाच्या क्रूर स्वामित्वाखाली त्या माणसांचे आयुष्य चिरडून गेलेले आहे. प्रवासी जेव्हा शहरात येतो तेव्हा कोणीही दार उघडत नाही. जणू तिथे कोणी राहातच नाही. शहरात प्रवेश केलेल्या माणसाला कोणी दार उघडून घरात घेतले तर एका नागरिकाचा मृत्यु आणि आपल्या हाताने त्याला काही दिले तर तो हात गमवावा लागेल अशी तेथे शिक्षा आहे. या दोघांच्याही मृत्यूचा एक उपाय प्रवाशाने स्वतःच नष्ट केलेला. तो म्हणजे हिरव्या रत्नाच्या पोकळीतून निघणारा सर्प. दुसरा उपाय, हे सगळे ज्या वृद्धाकडून कळते त्याचा मृत्यू. ते अशक्य आहे. त्या वृद्धाचीच अकाल व महाकाल ही मुले आहेत आणि त्यांना आपल्या मृत्यूचे रहस्य ठाऊक आहे. म्हणजे हा जुलूम अनंत चालणारा आहे. त्या दोन दारांच्या मध्ये अडकलेली माणसे कधीच सुटका मिळवू शकणार नाहीत. सतत धास्तावलेले हे जगणे कसे आहे तेही थोड्याच काळात प्रवाशाला कळते. प्रवाशाजवळच्या हिरव्या रत्नाच्या बदल्यात एक संपूर्ण कुटुंब सुटका मिळवू शकते. हे कळल्यानंतर समोरच्या घरातले लोक त्याचा कबजा घेतात. पण जेव्हा त्याला घरात घेतल्याबद्दल एका माणसाला मृत्यू स्वीकारावा लागेल हे कळते तेव्हा ते सगळे कुटुंब उसवून जाते. प्रत्येकजण दुसऱ्याचे आयुष्य किती निरर्थक आहे हे सांगून स्वतःचे समर्थन करतो. येथे माणसांना जोडणारे नाते किती भोंगळ आहे आणि मरणेच जगत असलेल्या माणसांना मृत्यू समोर फक्त स्वतःचीच आठवण व्हावी या क्रूर सत्याच्या दर्शनाने प्रवाशाला ते सगळेच असह्य होते. ती माणसे नसून आतून सडत चाललेली प्रेते आहेत असे त्याला वाटते. जन्म आणि मृत्यूच्या मध्ये अडकलेली सगळीच माणसे अशीच असतात हे त्याला एकदम कळते आणि तो त्या शहरातच राहू इच्छितो. स्वतःच्या मुक्ततेची त्याची इच्छाच नष्ट होते. ज्ञान झाल्यानंतरही त्याच माणसात राहाणे असह्य जरूर आहे पण ज्ञान झाल्यानंतर चांगल्या माणसांच्या शोधात भटकत राहून वंचना करीत राहाणे जास्त भयानक आहे हे त्याला पटले असावे म्हणून तो तिथेच राहातो. आता महाकालाच्या हातून मरण येईल असे त्याला वाटते.



अनुक्रमणिका

पण तसे होत नाही. महाकाल त्याला जिवंत राहाण्याची शिक्षा देतो. महाकाल सर्वशक्तिमान आहे. प्रवाशाची त्यानेच निवड केली होती. स्वत:ची सुटका करून घेण्यासाठी कालीच्या मंदिरात महाकालाला प्रवेश नव्हता म्हणून त्याने नाविकाचे रूप घेऊन त्या हिरव्या रत्नाविषयी प्रवाशाची आसक्ती जागविली होती. ते हिरवे रत्नही महाकालच नष्ट होऊ देतो. कारण तो रत्नाचा प्रकाश पाहिला तर अकाल मुक्त होणार असतो. पण कोणत्याही रत्नावर दृष्टी गेली की त्यातले रंगच विरून जातात आणि अकाल कधीच मुक्त होऊ शकत नाही. त्याची शिलावस्था नष्ट करणारे हिरवे रत्न भिरकावले जाऊन नदीच्या गाळात रुतून पडते. अकाल मुक्त होत नाही, यातच महाकालाच्या सत्तेची शाश्वती आहे. प्रवाशाकडून सर्पाचा मृत्यू होणे व या शहरातील कुटुंबाने दिलेले हिरवे रत्न अकालाकडून फेकून दिले जाणे यामुळे महाकाल अजरामर आहे. आता महाकालच जन्म आहे. मृत्यू आहे. शाश्वत सत्ता आहे. हा ईश्वर असेल किंवा नियती. माणसांसाठी मात्र तो भयानक आहे. ही सत्ता इतरांना बद्ध ठेवून, इतरांचा वापर करून स्वत:ला मुक्त ठेवते. जन्माच्या दारातून आता येणारी माणसे मृत्यूच्या दारातून बाहेर जातात. मृत्यू कधीच मुक्त नाही. तोपर्यंत जन्म स्वतंत्र आहे. आणि जन्म म्हणजे तिसऱ्याच कुणाच्या मुक्तीसाठी स्वत: धास्तावलेले जिणे पत्करणे. त्या तसल्या जीवनातही जगण्याची आसक्ती टिकवून ठेवणे. मृत्यू आहे म्हणूनच जन्मसातत्य आहे. या चक्रातून सुटका नाही.

हेच रूपक 'रत्न' या कथेत अधिक विस्तारते. सुवर्ण गरुड आणि कृष्ण गरुड हे दोन विराट पक्षी, कृष्ण गरुडाची शीळ ऐकली की मानवी जीवन खंडित होते. आणि सुवर्ण गरुडाच्या मधुर स्वराने मानवी आयुष्य सुरू होते. हे दोनही पक्षी अदृश्य चक्रास चिरंतन बांधलेले आहेत. हे चक्र कधीच थांबणारे नाही. या गरुडांच्या जीवनक्रमात देखील कधी खंड नाही. फक्त 'एकच उ:शापाचा ओलावा' आहे. कृष्णगरुडाला एक दिवस विषहीन स्वर स्फुरतो, तर सुवर्णगरुडाला एकाच उ:शापाच्या दिवशी निर्मितीच्या शापातून सुटका मिळते. पण ही सुटका म्हणजे मुक्ती नव्हे. रत्नाचा वेडा ध्यास काळजात वाळगून वणावणा हिंडणारा माणूस जितका स्वतंत्र, तेवढेच या गरुडांचे स्वातंत्र्य. आपल्या शीळेने प्राण्यांचे आयुष्य तोडून टाकणारा कृष्णगरुड खिन्नतेने म्हणतो, 'अनेकदा तर वेडघा आशेने वाटते, त्या गरुडाचा शेवटचा सुवर्णबिंदू, माझा कृष्णरंग नाहीसा झाला तर साऱ्याचाच एकदा अंत होऊन जाईल. परंतु हे सारे अशक्य आहे, व ती आशाही अर्थहीन आहे.' माणसाला हे समजत नाही आणि तो ज्याला स्वातंत्र्य समजतो ते स्वातंत्र्य नसून बंदिवास असतो. कर्मचक्र अविरत फिरत राहणारच आहे. ते थांबवण्याचे सामर्थ्य तर कृष्णगरुडात नाहीच पण तो स्वत:ची शीळ कशी आहे तेही ऐकू शकत नाही. मृत्यू ही एक संकल्पना किंवा एक घटित एवढेच स्वरूप न राहता शोकात्मव्यक्तिरेखेचे रूप आकारते. त्यामुळे रूपकात्मतेचा विस्तार होऊन मिथचे परिमाण लाभते देवता, सुवर्णगरुड, कृष्णगरुड या व्यक्ती भव्य आणि उदात्त आहेत, पण त्यांनाही मर्यादा आहे, त्यांच्याही सामर्थ्याला माणसाप्रमाणे सीमा आहे हे जाणवते. मग सर्वंकष सत्ता कोणती आहे? कर्मचक्र हीच ती सत्ता आहे का?

: २

'अस्तिस्तोत्र'मधला समुद्र केवळ एक अमर्याद जलाशय नाही. ती एक व्यक्ती आहे. सत्ता आहे. समुद्राच्या अस्तिवात या दोन्ही गोष्टी अंतर्भूत आहेत. शेवटी फक्त त्याचे अस्तित्व उरते. अगदी प्रारंभी 'समुद्र केवळ शांत आहे.' नंतर 'समुद्र केवळ स्तब्ध आहे.' त्यानंतर : 'समुद्र केवळ निर्मम आहे.' 'समुद्र केवळ निरीक्षक आहे.' शेवटी : 'आता समुद्र केवळ आहे.' या पाच वाक्यातून दिसणारा समुद्र विलक्षण आहे. समुद्र होता. आहे. त्याचे अस्तित्व सतत आहे. शांत, स्तब्ध, निर्मम, निरीक्षक. तो कशातच भाग घेत नाही, गुंतत नाही. असतो फक्त पण ते असणेही भाग घेण्यासारखेच होते. म्हणजे तो असूनही नव्हता. शेवटी तो नसूनही आहे. तो भरती ओहोटी नसलेला, जन्माचा स्फोट आणि मरणाचे विसर्जन नसलेला असा आहे. त्याच्या किनाऱ्यावर जन्म आहे, मृत्यू आहे. त्या चक्रातून जाणाऱ्यांना समुद्राच्या अस्तित्वाची कल्पनाही नाही. समुद्रावर मात्र त्यांच्या जगण्यामरण्याचा काही परिणाम नाही. झळझळीत उन्हात तडकणाऱ्या कवटचा, त्या कवटयात आश्रय घेणाऱ्या जीवांच्या तडकणाऱ्या कवटया. किनाऱ्यावर जन्म आणि मृत्यू अविरत आणि या जगण्यामरण्याविषयी समुद्राला कसलीच आस्था नाही.

अनुक्रमणिका

'गुलाम' या कथेतील एमराला देखील मुशाफिराविषयी काहीच आस्था नाही. तो सदैव एकाच ठिकाणी बसलेला आणि खिडकीतून बाहेरच्या रस्त्याने चाललेल्या कारवांकडे पाहात राहाणारा असा आहे. त्याच्याकडे गुलाम मिळेल म्हणून मुशाफिर आलेला आहे. एवढेच निमित्त आणि गुलाम देऊ शकण्यापेक्षा काही अधिक सामर्थ्य एमरात आहे की नाही हे मुशाफिराला समजू शकत नाही. अनेक प्रवाशांप्रमाणेच हाही एक मुशाफिर. त्याचेही भवितव्य एमराच्याच घरात ठरलेले असते. ते मुशाफिराला शेवटी कळते. एमराला मात्र त्याच्या या भवितव्याविषयी काहीच कर्तव्य नाही. प्रवास संपवून मुशाफिर परत या रस्त्याने जाणार नाही हे त्याला माहिती आहे. तरी तो त्याच्या प्रवासाच्या बेतापासून त्याला परावृत्त करीत नाही. आणि तसे करण्याचा काही उपयोग नसतो. नंतर वाळवंटातून प्रवास करणारा प्रवासी जितका स्वतंत्र आहे तितकाच गुलामही आहे. तो आपल्या बंदिवासातच वाटचाल करीत असतो. आपली कशावरच सत्ता नाही, सारे काही तिसऱ्याच कुठल्यातरी सत्तेच्या इच्छेप्रमाणे घडते हे त्याला उशीरा कळते. 'जे लिहिले आहे ते लिहिले आहे–' या उद्गारातील हताशता, त्या अतिसमर्थ अशा सत्तेच्या जाणीवेचेच चिन्ह आहे. एक कपटी चक्र सतत फिरत आहे. त्याच्याबरोबरच सगळी माणसे फिरविली जाताहेत. माणसे नम्र होतात, त्या सत्तेविषयी आनंद प्रकट करतात, संतप्त होतात, ती सत्ता मात्र त्याविषयी पूर्ण तटस्थ असते. ती अबाधित राहाणे, कशानेही कधीच खंडित न होणे हेच एक शाश्वत सत्य आहे. ती सत्ता सर्व ठिकाणी आहे. ती सत्ताच सर्व काही आहे, या सर्व काही सत्तेविषयी माणसे विचार करतात. वेडा ध्यास घेऊन ती सत्ता काय आहे याचा शोध घेत भटकतात, यातूनच त्या माणसांच्या जीवनात सर्वव्यापी दुःख निर्माण होते. त्या दुःखाचा अतिशय प्रभावी आविष्कार या रूपककथांतून झालेला आहे.

३ :

जी. एं.च्या या कथांमधले प्रवासी अतिशय भीषण निर्मनुष्यतेतून प्रवास करताना दिसतात. 'सांगाती'चा नायक सर्वस्वी अपरिचित अशा प्रदेशातून जातो, तेथे असंख्य गिधाडे आणि स्वच्छ केलेले सांगाडे असतात. पृथ्वीवरील हे भयानक गिधाडपण जी. एं.च्या यापूर्वीच्याही काही कथांतून व्यक्त झालेले आहे. "प्रत्येकाच्या खांद्यावर एक अदृश्य गिधाड आयुष्यभर शांतपणे बसलेले असते आणि योग्य त्या क्षणी त्याचे जड पंख पसरतात." ही जाणीव त्या नायकाला होते हेच त्याच्या प्रवासाचे फलित. लोभ, मोह, शारीरवासना, आणि या सगळ्यांचाच अनिवार्य शेवट यांचे हे गिधाड प्रतीक आहे. पुढे तर ही गिधाडांचीही सोबत लाभत नाही. 'प्रवासी' या कथेतील न संपणारे रान पूर्णपणे निर्मनुष्य आहे. "एवढे गडद रान, पण त्यात कुठे पाखराचा शब्द नव्हता, की कोठे रंगीत पंखांची क्षणभर दिसणारी हालचाल नव्हती." अमर्याद हिरव्या पसाऱ्यातून तो जवळ हिरवे रत्न वाळगणारा प्रवासी वाट तुडवीत जात आहे. 'गुलाम'मधल्या मुशाफिराचा प्रवास वाळवंटातून होतो. "या ठिकाणी मात्र एक जनावर नाही, एक पक्षी नाही, पंखाचा एक किडादेखील नाही मुशाफिराला वाटले, गिधाडांनी देखील टाकलेला असला प्रदेश साऱ्या जगात दुसरीकडे आढळणार नाही." असे हे भीषण आणि कधी संपणारच नाही असे वाटणारे वाळवंट. 'ठिपका' कथेतील रामण्णाचा प्रवास "सगळीकडे जळून गेल्याप्रमाणे दिसणारे ओबडधोबड, राक्षसांनी मांडलेल्या चुलीप्रमाणे दिसणारे खडक, लालसर माती" यातून होतो. हे अमर्याद रान, वाळवंट, टेकड्यांचे प्रदेश यातून होणारा खडतर एकाकी प्रवास. हा कोणता प्रदेश आहे, कशासाठी आपण पावलं झिजवत आहोत असे प्रश्न पडतात पण प्रवासाची जिद्द संपत नाही. कारण हे सारे स्वीकारलेलेच असते. 'अंत आहे तो माणसाला, या वेड्या भटकंतीला नाही.' हे सारे स्वीकारलेले असते म्हणूनच तो प्रवास सह्य होतो असे म्हणता येतील, एरवी ते प्रदेश विलक्षण क्रूर आहेत. ते कशातही भाग न घेणारे, न गुंतणारे असे आहेत. निबीड अरण्याचा जीवघेणा ताण, वाळवंटाचे तहानलेले भीषण वर्तुळ, वेड्यावाकड्या दातांप्रमाणे दिसणारे टेकड्यांचे कंगोरे—हे सारेच माणसाच्या हाताबाहेरचे, अमानुष आणि सर्वव्यापी वातावरण. मनातल्या, मेंदूला अत्यंत कठीण अशा गूढ एकांतासारखे. किंबहुना हा सगळा प्रवासच मनातला आहे. तोही दोन अर्थांनी ज्ञानासाठी तडफडणाऱ्या जीवाचा हा प्रवास त्याच्या मनात सुरू आहे. योग्यांच्या समाधीअवस्थेप्रमाणे. येथे ती काळीठार रात्र, प्रवाशाला भयभीत करणारी, भेटते. हा काळोखच हिरव्या रानाच्या, वाळवंटाच्या, रखरखीत टेकड्यांच्या रूपाने

व्यक्त होतो. यातून बाहेर पडण्यापूर्वीच आयुष्य संपून जावे, ज्ञान म्हणून भ्रम हाती यावा हेच दुःख आहे. दुसऱ्या अर्थानेही हा प्रवास मनातला आहे. हे मन कुणा अज्ञात सत्तेचे आहे. त्या मतातला हा प्रवास सुरू आहे. त्या सत्तेने डोळे उघडले की हा प्रवास संपणार, म्हणजे हा प्रवास खरोखर मुक्त अशा प्रदेशात नाहीच. 'गुलाम'मधला प्रवासी "एखाद्या मृत जनावराच्या सडत चाललेल्या आतड्यात पुढे सरकत जावे, त्याप्रमाणे त्या कुंद, अरुंद गल्यांतून भटकत" असतो. तिथली घरे 'प्रेतांच्या ताठर बोटां-प्रमाणे', वाटतात. जी. एं. च्या रूपककथांमधील वास्तव हे असे अज्ञात सत्तेच्या मनातले आहे. 'स्वप्न'मधल्या सदानंदला वाटते की, "सारी माणसे आपल्या स्वप्नात जगत आहेत, आपण डोळे उघडले की ती काळ्या पटावरून पुसली जातील. पण मग त्याचप्रमाणे, कोणास ठाऊक, आपण देखील त्या प्रत्येकाच्या स्वप्नात जगत असू !...त्यांच्यातील कोणी डोळे उघडले, कोणी जागे झाले, की कोणास ठाऊक आपण आपला एक भाग मृत होऊन नाहीसा होऊन जाईल, आणि मग अगदी शेवटी कोणाच्या तरी अखेर जागे होण्याने आपण पूर्णपणे नाहीसे होऊन जाऊ..." 'अस्तिस्तोत्र'मधील प्राण्यांचे सारे जीवित आधीच्या प्राण्याच्या कवटीत आश्रय घेते. कवटी तडकते. तिच्यातील आश्रित कीटकाचे जीवित संपते. पुन्हा एक नवीन प्राणी नव्या कवटीत शिरतो. प्राण्याच्या या छोटयाशा विश्वाबाहेर रखरखीत वाळूचा, उद्दाम उन्हाचा, अतृप्त हिंडणाऱ्या वाऱ्याचा, प्रदेश "काहीतरी विलक्षण घडणार असल्या-प्रमाणे सतत, स्थिर, ताणल्यासारखा" आहे. वाळवंटात, उन्हात तापत असलेल्या कवटीत पावलांचा प्रवास सुरू आहे.

: ४ :

या प्रवासात अनेक घटनाप्रसंगांतून जावे लागते. तसेच निरनिराळ्या टप्प्यांवर निरनिराळी माणसेही भेटतात. ती माणसे म्हणजे अनुभवांचे आणखी काही बिंदू. ही पात्रे अपरिहार्यपणे येत नाहीत व मुख्य पात्राच्या व्यक्तिमत्वावर काही संस्कार करीत नाहीत असे प्रथमदर्शनी वाटते. परंतु एकूण अनुभवाची जातच अशी आहे की या मार्गावरून जाताना आणखी इतरही यात्रेकरू भेटणे हे अटळच असते. 'प्रवासी' या कथे-तील प्रवाशाला बैरागी, जटाधारी आणि आंधळा शिकारी अशी तीन माणसे भेटतात. हा बैरागी ज्ञानाच्या मार्गावरील एक प्रवासीच आहे. तो अजून अंतिम ठिकाणी पोचलेला नाही. 'गाव किती दूर आहे ?' या प्रवाशाच्या प्रश्नाचे उत्तर तो देतो की, "गाव किती दूर आहे, याचाच शोध घेत मी जन्म घालवला, पावलं झिजवली, पण अद्याप मला बोध झाला नाही !" मात्र त्याने मार्ग बराच आक्रमिला आहे हे दिसते. स्वतःच्या पत्नीच्या चितेवर तो कणकेचे गोळे भाजून खाऊ शकतो आणि तिच्याविषयी "आयुष्यभर तिनं आपल्या शरीरानं अनेकांना अनिर्बंध सौख्य दिलं" असे तो निर्विकारपणे म्हणू शकतो. त्याच्या अनुभवाचे सार पुढील शब्दांत व्यक्त होते : "दिसलं पुष्कळ, पण पाहाता आलं नाही; घडलं पुष्कळ, पण जाणता आलं नाही; केलं, पण फारसं उमगलं नाही." हा बैरागी अनुभवांनी शहाणा झालेला आणि जीवनाविषयी विरक्ती असलेला असा आहे. त्याच्या मते प्राणिमात्र म्हणजे किडे. काही शरीर पोखरत आत जाणारे आणि काही वरच्या वस्त्रातच कसर निर्माण करणारे. तो स्वतः पहिल्या प्रकारचा आहे. आणि त्याच्या मते प्रवास हा दुसऱ्या प्रकारचा आहे.

काही काळानंतर जटाधारी भेटतो. तो एक कवी आहे. आजूबाजूच्या गावात कोणी मृत्यू पावले, जन्म झाला किंवा काही आनंददायक प्रसंग घडला तर लोक त्याच्याकडे येतात आणि गीत घेऊन जातात पूर्वी तो गावात राहात असे. त्यावेळी लोकांचे अनुभव ऐकून नव्हे तर स्वतःच्या अंतःप्रेरणेनुसार तो गीते लिहीत असे आणि गात असे. परंतु त्या गीतांतील आनंद आणि दुःख तिथल्या माणसांना सहन होत नसे. लोकांना कमी दिसते, पण जटाधारी कवीचे दुःख निराळेच होते. त्याला अति दिसत होते. त्याच्या छाती-वर कमरेपर्यंत पापण्या नसलेले अनेक डोळे आहेत. हे डोळे सर्वत्र पाहातात. त्यामुळे आनंद आणि दुःख भोगणाऱ्या माणसांपेक्षा त्याला अधिक उत्कटतेने त्यांचे आनंद आणि त्यांची दुःखे भोगावी लागतात. आता लोकांनी त्याला इथे जंगलात आणून टाकले आहे. पूर्वी ती माणसे येत. अलीकडे मात्र त्यांनाही कळले असावे की हे डोळे विझू लागले आहेत.

अनेक अनुभवांतून गेलेला आणि आता विरक्त व विक्षिप्त बनलेला बैरागी आणि लोकांच्या सुख-दुःखाची गाणी गाऊन संपलेला जटाधारी कवी. ही

वळणे मागे सारत प्रवासी पुढे जातो. वैराग्याच्या बोलण्याने प्रवासी अस्वस्थ होतो तर जटाधाऱ्याच्या सहवासात त्याच्या आतडयाला पीळ पडतो. पुढच्या टप्प्यावर त्याला आंधळा शिकारी भेटतो. सगळे पचवू पाहाणारा निर्वेद आणि गीतांमध्ये जगूनही उरलेली बीराची भूक यानंतर भेटलेला हा आंधळा शिकारी. त्याला प्रवाशाचे डोळे हवे असतात. तो त्याचा शंभरावा अतिथी आहे. सरकणाऱ्या आरशांच्या दालनात प्रवाशाला बंद करून तो शिकारी अदृश्य जागेवरून प्रवाशाशी बोलतो. त्याच्या मते डोळे काढणे म्हणजे विशेष काही त्रास नव्हे. उलट आनंदाचीच गोष्ट आहे. हजार फसवी प्रतिबिंबे या डोळ्यांनी पाहण्यापेक्षा डोळे काढून घेऊन जास्त खऱ्या गाभ्याकडे त्याने यावे. डोळे काढून टाकल्याने प्रवासी खरा मुक्त होणार आहे.

आंधळा शिकारी जवळच कुठेतरी आहे, पण दिसत नाही. भोवताली असंख्य आरसे. त्यात प्रतिबिंबे. या प्रतिबिंबात प्रतिबिंबे. आंधळ्या शिकाऱ्याचा सतत कानांवर पडणारा आवाज. प्रवाशाला डोळे काढणे मान्य नाही. मग सुरू होणारी जीव वाचवण्याची आत्यंतिक धडपड. अज्ञात ठिकाणाहून येणारे धारदार सुरे चुकवण्यासाठी करावी लागणारी आंधळी हालचाल. डोळे काढण्याचे तत्त्वज्ञान सांगणारा शिकारी अधिकाधिक क्रूर झालेला आहे. प्रवासी त्या आरशांच्या तुरुंगात अगदी हताश होऊन जातो. मग अचानकपणे कुत्र्याच्या दोरीच्या साह्याने होणारी सुटका. आता शिकाऱ्याचे दुसरे रूप दिसते. केवळ माणसांचे जग गृहीत धरून बनवलेल्या त्या सापळयाला अनेक हेलकावे बसू लागतात. मग ऐकू येणारे शिकाऱ्याचे हुंदके. " इतकी वर्षं हाडं झिजवल्यावर हलाहल मिळालं काय—तर आपलं सर्वस्वी चुकलं, हे विषारी ज्ञान ! मी सगळं माणसांचंच जग गृहीत धरलं... पण विश्वात मानव हा काही एकटाच जीव नाही हे मला सुचलं नाही..." शिकारी पूर्णपणे उसवून गेला आहे. त्यानंतर प्रवाशाला त्याचा अंतही पाहायला मिळतो. पिसाळल्याप्रमाणे सर्वच वेडयावाकडया सुऱ्या भिरकावून तो शेवटची सुरी स्वतःच्या गळयात खुपसून घेतो. आंधळे तत्त्वज्ञान, आंधळे क्रौर्य आणि आंधळा आत्मघात. प्रवासातला एक लहानसा तुकडा त्याने व्यापला होता. पण सुऱ्यांच्या रूपाने मृत्यू अंगावर येताना सगळेच निरर्थक होऊन जाते. आणि त्या सुऱ्यांमागले सामर्थ्य दुबळे पडलेले दिसले की सगळयाच गोष्टी तुच्छ होऊन जातात. सगळेच अज्ञात सत्तेला शरण गेलेले दुबळे जीव, त्या सत्तेशी लढण्याची ताकद नसलेले, बाहुल्यांसारखे कळसूत्री जीव. हे सगळे टप्पे ओलांडून प्रवासी पुढे जातो आहे.

: ५ :

'ठिपका' या कथेतील रामण्णालाही वाटेत काही माणसे भेटतात. डबा सिणेमावाला गारुडी, संन्यासी, भुत्या आणि एक मुलगा. रामण्णा दुरून दिसणाऱ्या ठिपक्याच्या कुतूहलाने टेकडीची वाट चढतो आहे. आता करण्यासारखे काहीच उरले नाही म्हणून तो ठिपका कसला आहे ते बघून यावे, इतका सहज साधा उद्देश. प्रत्यक्ष वाटचाल करू लागल्यावर त्या वाटेचे विकटपण त्याला कळते. त्या वैराण टेकडयांवर डबासिनेमा घेऊन बसलेला गारुडी त्याला प्रथम भेटतो. तो मूळचा गारुडी. नंतर हा सिनेमाचा डबा. पण आता त्या कशातच काही लक्ष नाही त्याला सोन्याचा साप पकडायचा आहे. डोळयांत पाचू आणि पाठीवरच्या चौकोनांत हिरे जडवलेला. त्या सुवर्णसर्पाच्या मागे त्याचे आयुष्य वणवणत आहे. केव्हातरी त्याला तो साप दिसला होता आणि तेव्हापासून त्याला पकडण्याचा ध्यास त्याच्या मनाने घेतला. गारुडयाची हकीकत मनात वागवून रामण्णा पुढे जातो. तेव्हा त्याला संन्याशी भेटतो. कवटया आणि राख गोळा करून ठेवणारा. गारुडयाला ध्यास लावणारा सोन्याचा साप संन्याशाने मारून पिंपात कुजत ठेवलेला आहे. त्याच्या मते प्रत्यक्ष नागापेक्षा हा जास्त सत्य नाग आहे. गारुडी प्रत्यक्षाचा ध्यास घेतलेला तर हा संन्यासी सत्याचा वेडा. त्याच्या गोऱ्यापान मुलाचेही सत्य रूप त्याच्यापाशी होते. गारुडी आणि संन्यासी एकमेकांशी नकळत बांधले गेले आहेत. तसेच संन्यासी आणि भुत्या एका लहानशा मुलाशी जखडले आहेत. पुढच्या टप्प्यावर जगदंबेच्या देवळातला भुत्या भेटतो. तो आंधळा आहे. त्याच्या अंगरख्यावर बसवलेल्या कवडया मात्र बिनपापणीच्या डोळयांप्रमाणे वाटतात. भुत्या रामण्णासमोर द्वंद्व निर्माण करतो. संन्याशाने आधीच पाण्यातले प्रतिबिंब दाखवून कुठच्या पांढऱ्या देवळाकडे जायचे आहे असे रामण्णाला विचारले होते रामण्णाही त्याच सुरात भुत्याला प्रश्न करतो की ते जगदंबेचे देऊळ आहे हे कशावरून ? पण या प्रश्नाचे उत्तर



अनुक्रमणिका

म्हणून पुन्हा प्रश्नच येईल याची कल्पना रामण्णाला नव्हती. भुत्या त्याला भंडारा देतो. तो काळा की पिवळा हे आणखी एक द्वंद्व. दिसतो काळा पण मूठ उघडताच हात पिवळाधमक झालेला. या निर्मनुष्य टेकड्यांवर अशी प्रत्यक्ष, सत्य आणि द्वंद्वात्मक भूमिकेत अडकलेली ही माणसे, एकमेकांशी बांधलेली आहेतच. रामण्णाही अडकतो तो पुढे भेटलेल्या लहान मुलाच्या मायेत. लाकडाच्या वखारीत माळ्यावर पडलेला पांगळा मुलगा. भुत्या तिथे खायलाप्यायला ठेवून जातो. तर संन्यासी त्या मुलाकडे येतो त्याच्या डोक्यासाठी. मसणवटीतली ती लाकडाची वखार, त्यात अत्यंत एकाकी असे पांगळे मूल. आढ्याचे पोखरत गेलेले लाकूड. या स्थितीतून त्या मुलाची सुटका नाही. कोणी-तरी मागे सांगितले होते की देवळात मूर्ती कसली आहे ते समजले की हलायला येईल आणि मग धडपडत वर गेले की पाय बरे होतील. पण ती मूर्ती कसली आहे हे कोणीतरी सांगायला हवे. येथे कसलेच द्वंद्व नाही. प्रत्यक्षाचा भुलावा नाही की सत्याची नशा नाही. पांगळेपणाच्या बंदिवासातून सुटण्याची विकल आस मात्र आहे. रखरखीत टेकडीवरील प्रेतांचा जाळ आणि आढ्याचे पोखरलेले लाकूड यात पिजून गेलेली चिमुकली आशा. ती मूर्ती कसली आहे हे कोणीतरी सांगायला हवे, आजपर्यंत कोणी तिकडे गेलेच नसेल किंवा गेलेले परतले नसतील. रामण्णा मात्र परत येवून त्याला सांगणार आहे. तो स्वतःच्या खांद्यावर त्या मुलाला नेवू शकत नाही. कारण तो म्हातारपणामुळे थकला आहे. मात्र मूर्ती कसली आहे. एवढे तो नक्कीच सांगणार आहे.

: ६ :

जी. एं.च्या रूपककथांमधली प्रवाशाला भेटणारी रामण्णाला भेटणारी सगळीच माणसे आपला आपला प्रवासच करीत आहेत. त्या प्रवासाला अंत नाही. त्या सगळ्यांनीच 'अदृश्य विलक्षण नगाऱ्यावरील अदृश्य हाताचा हलकाच ठेका' ऐकलेला आहे. तो ध्वनि त्यांना ऐकू येतो. पण त्याचे स्वरूप समजत नाही. त्या विलक्षण नादाचा त्यांना वेध लागला आहे. त्यापायी आयुष्य वणव-णत चाललेले आहे. सुखाची, तृप्तीची, आनंदाची एक कणभरही प्राप्ती नाही. हाडाहाडात जळत राहणारे दुःखच केवळ मिळत राहते. इतरांचे अनुभव पचवून स्वतःची वेगळी दिशा धरणारा प्रवासीही शेवटी आपण कळसूत्री बाहुलेच होत ही जाणीव करून घेतो; रणरणते वाळवंट तुडवून शेवटी सिद्धीच्या प्रदेशात अटळ अस-लेला स्वतःचा अंत पाहणारा मुशाफिर आणि रखरखीत टेकड्या चढून गरगरत्या मंदिरात डोकावून पाहणारा आणि ओरडून सांगू पाहणारा पण अवाक् झालेला रामण्णा. हे आणि यांच्या प्रवासातील बैरागी, जटा-धारी, शिकारी, गारूडी, संन्यासी, भुत्या, मुलगा ही माणसे—या सगळ्यांचीच आयुष्ये गूढ शोकात्म अशी आहेत. यांची दुःखे व्यावहारिक पातळीवरची नाहीत, सामाजिक संदर्भही या दुःखाला नाही. तरीही ती मर्त्य माणसांची अत्यंत खरी आणि खोल दुःखे आहेत.

□ □

तात्या : थट्टा करू नका शास्त्रीबुवा; हा खरोखर फार गंभीर अपराध आहे. या दोघांनी असे भलभलते काहीतरी सांगून सबंध राष्ट्राचे पौरुष खच्ची केले आहे! शून्य-मिथ्या जग आणि संसाराच्या खातेऱ्यात गुंतवणारे मांसपिंड स्त्रीपुत्र-बांधव, असे ठरल्यावर पौरुषाचा बीजकोशच नष्ट झाला म्हणायचा! खोटघातून आणि घाणे-रड्यातून कुणाला कधी पराक्रमाची स्फूर्ती मिळणे शक्य तरी आहे काय?

शास्त्रीबुवा : संपले आपले म्हणणे? आता ऐका. शंकराचार्यांनी ढीग सांगितले, ते ऐकणे-न-ऐकणे लोकांच्या मनावरच होते ना? त्यांच्यावर आचार्यांनी सक्ती तर केली नव्हती ना? आणि करायची म्हटली, तरी त्यांच्यासारखा फटिंग संन्यासी सक्ती काय करणार आणि लोक ती काय करून घेणार! अहो, हे सर्व विचाराचे सामर्थ्य आहे. शक्तिवाद लुळा पडतो, तिथे बुद्धिवाद प्रभावी होतो. तुम्ही बुद्धिवाद करून आपला विचार का नाही लोकांच्या गळी उतरवत?

तात्या : बुद्धिवाद केव्हा कोणाशी करायचा, ते आमचे आम्ही ठरवू. पण स्त्रीपुत्रांना तुच्छ, तिरस्कार्य ठरवण्यात कसला बुद्धिवाद आहे, ते कळू दे की आम्हाला!

शास्त्रीबुवा : पाहतो, कळतो का. तात्यासाहेब, आपण मुक्ती मानता?

तात्या : अलबत.

शास्त्रीबुवा : ठीक. मुक्तीत स्त्रीपुत्र बांधवासह राहण्याची सोय असते? म्हणजे, 'फॅमिली क्वार्टर्स?'

तात्या : नसेल. पण म्हणून मुक्तीत प्रवेश करण्याच्या पूर्वी स्त्रीपुत्रबांधवाचा तिरस्कार काय म्हणून?

शास्त्रीबुवा : हे पहा, तुमचा प्रश्न मला कळला आहे; आणि त्याचे उत्तर मी देणार आहे. आपण जरा धीराने घ्या. मुक्तीत स्त्रीपुत्रादी नाहीत, हे खरे ना? बरे, आता असे पहा, मुक्ती म्हणजे सुटका ती कशापासून?

तात्या : यात काय कठीण? दुःखापासून, दुःखकारणापासून.

शास्त्रीबुवा : होय ना? आता स्त्रीपुत्रादी हे या दुःखकारणात, संसारात मोडतात, असे दाखवून दिले तर? आपण स्त्रीपुत्रांच्या उल्लेखावर जाऊ नका. स्त्री मुमुक्षू असेल, तेव्हा पतिपुत्रादी हे दुःखकारण; पुत्र मुमुक्षू असेल, तेव्हा मातापिते हे दुःखकारण, असे वेगवेगळे समजून घ्यायचे आहे. आत्म्याला अशी काही वास्तविक नाती-गोती नसतात, हे आपणाला मान्य आहे ना?— थांबा! हे आपणाला कुठे खटकते, ते माझ्या ध्यानात आले आहे. अशी सगळी नातीगोती झुगारून दिल्यावर राष्ट्राचे कसे होणार, ही आपणाला चिंता आहे.

तात्या : होय, आहे.

शास्त्रीबुवा : असू दे. काही वाईट नाही. पण आत्म्याला नातीगोती नाहीत हे मान्य केल्यास आत्म्याला राष्ट्र तरी कुठे उरते?

तात्या : हे ज्ञान्याच्या दृष्टीने ठीक आहे. पण अज्ञान्यांचे काय?

शास्त्रीबुवा : ते सोपे आहे. त्यांना राष्ट्र आहे, माता-पिते आहेत, स्त्रीपुत्र आहेत, म्हणजे ज्यांना नाती आहेत, त्यांना सगळीच आहेत; नाहीत, त्यांना काहीच नाही, जे आहेत ते राष्ट्राची सेवा करतील, ज्यांना नाहीत ते मुक्ती मिळवतील. यात घोटाळा कुठे झाला?

तात्या : घोटाळा नाही कसा? ज्ञान्याने नातीगोती गुंडाळून ठेवल्यावर अज्ञही तसेच करू पाहतो. म्हणून स्वतःसाठी नव्हे, तरी इतरांसाठी ज्ञान्याने व्यवहाराची कदर करायलाच हवी.

शास्त्रीबुवा : अहो, ज्याच्या हिशेबी स्त्री, पुत्र ही अशी जवळात जवळचीसुद्धा नाती नाहीत, किंबहुना स्वदेहाचेही नाते नाही, त्याच्या हिशेबी काय इतरेजनांची नाती राहू शकतील? हे सारे जर ज्ञान्याच्या दृष्टीने असत्य आहे, अविद्यानिर्मित आहे, तर त्याची कदर तो करील कसा?

तात्या : बस् बस्. हेच सर्व अनर्थांचे मूळ आहे. म्हणे जग मिथ्या आहे! आभास आहे! पलीकडे ते मानस सरोवर आहे ना, त्याच्या थंड पाण्यात एकदा बुडी मारून या, आणि सांगा मग ते सत्य आहे की असत्य आहे ते!

शास्त्रीबुवा (हसून) अहो, चिडता काय असे ? मानस सरोवराचे पाणी थंड असू दे ना ! पण आपण असे सांगा की, आपण 'सत्य' कशाला म्हणता, आणि 'असत्य' कशाला म्हणता ?

तात्या : हे एखादे शेंबडे पोरसुद्धा सांगू शकेल. यात काय विचारलेत !

शास्त्रीबुवा : हा, म्हणजे शेंबड्या पोराच्या ज्या सत्य–असत्य–विषयक कल्पना असतात, त्याच आपल्याही आहेत, असेच समजायचे ना ? हेच मला सगळ्या घोटाळ्याचे मूळ दिसते.

तात्या : बरे सांगितलेत ! आता आपल्या काय कल्पना आहेत सांगा.

शास्त्रीबुवा : अहो, माझ्या पदरचे यातले काहीच नाही. जे श्रुती सांगते—

तात्या : काय सांगते तुमची श्रुती ?

शास्त्रीबुवा : 'तुमची श्रुती' ! वा–! श्रुती सांगते कीं, 'वाचारम्भणं विकारो नामधेयम्, मृत्तिकेत्येव सत्यम्' अभिप्राय हा की, ज्याचे स्वरूप पालटत नाही, ते सत्य; बाकीचे असत्य. घट असतो तेव्हा काय, नसतो तेव्हा काय, माती आहे तशी आहेच. म्हणून या दोहोत माती सत्य, घट असत्य. यावरून निघणारा निष्कर्ष असा की, घट असतो म्हणजे सुद्धा मातीच असते.

तात्या : तुम्ही म्हणता ते तत्त्वतः खरे असेलही. पण घट मागण्याकरिता जेव्हा गिऱ्हाईक कुंभाराकडे येते, तेव्हा 'घट म्हणजे वस्तुतः मातीच आहे,' असे म्हणून त्याला माती देता येत नाही.

शास्त्रीबुवा : (त्रासून) हे काय आचार्यांना कळत नाही ? पण त्यांनी तत्त्व सांगितले, ते काही कुंभाराच्या गिऱ्हाईकासाठी नाही ! गिऱ्हाइकाशी कसे वागावे, ते कुंभाराला सांगायला तुमचीसुद्धा गरज नाही. तात्यासाहेब, तुम्हाला तत्वविचार करायचा आहे, की गाडग्या–मडक्यांची खरेदी करायची आहे, ते एकदा नक्की ठरवा; म्हणजे बोलणे सोपे होईल.

तात्या : तुम्हीही परिणाम की विवर्त. ते नक्की ठरवा, म्हणजे मलाही बोलणे सोपे होईल. परिणाम, विवर्त आम्हालाही कळते, बरे का ? सांगायचा विवर्त, दृष्टान्त द्यायचा परिणामाचा ! ही काय रीत झाली ?

शास्त्रीबुवा : कोण परिणामाचा दृष्टान्त देतो ?

तात्या : दुसरे कोण ? तुम्हीच. मृद्‌घट–दृष्टान्त हा परिणामवादातला आहे.

शास्त्रीबुवा : चूक. आम्ही म्हणतो, सर्व कार्ये ही आपापल्या कारणांचे विवर्त आहेत. घट हा मातीचा विवर्त आहे, साप हा रज्जूचा.

तात्या : (आ करून) काय, म्हणता काय ? घट आणि सर्प या दोहोत तुम्हाला काहीच फरक वाटत नाही ? अहो, हा वैद्यकातला घटसर्प नव्हे !

शास्त्रीबुवा : आपण या दोहोंत काय फरक करिता ?

तात्या : पहिला फरक हा की, सर्प उत्पन्न झाल्याने रज्जूमध्ये काहीच बदल होत नाही; घट उत्पन्न झाल्याने मातीत बदल होतो.

शास्त्रीबुवा : आणि दुसरा ?

तात्या : दुसरा हा की, घटाचा पाणी भरून आणायला उपयोग होतो; सर्पाचा चावायला होत नाही,— आभासच तो.

शास्त्रीबुवा : समजा, एखादा साप काठीला भिऊन दंश न करिता पळून गेला, तर त्याला आभास म्हणाल ?

तात्या : कोण म्हणेल ? चावला नाही, तरी चावू शकतो तो.

शास्त्रीबुवा : सध्या, तो चावला नाही एवढेच समजू. कारण तो म्हातारा असू शकेल, दातपडका असू शकेल, आणि म्हणून चावू न शकणाराही असू शकेल. आता पहा की, खरा सर्प माणसाला भिऊन न चावता पळून गेला आहे, आणि रज्जुसर्पाला भिऊन माणूस पळून गेला आहे. या दोन सर्पांमध्ये या दोन माणसांच्या दृष्टीने कोणता फरक आहे ? काहीच नाही. फरक केव्हा पडेल ? रज्जू उघडकीला आल्यावर.

तात्या : तुम्हाला काय म्हणायचे आहे ?

शास्त्रीबुवा : असे म्हणायचे आहे की, असत्य असाही पदार्थ कार्य घडवून आणू शकतो; आणि तो

पदार्थ ज्या अनुभवाला यथार्थ म्हणून गोचर होतो, त्या अनुभवाच्या कक्षेत, आणि क्वचित् तिच्या बाहेरही, ते कार्य खरेही ठरते. स्वप्नातल्या शस्त्राने स्वप्नास मृत्यू घडतो. शस्त्र आणि मृत्यू—स्वप्नापुरत्या दोन्ही खऱ्याच घटना. त्या दोन्ही अयथार्थ ठरतात, त्या अनुभवाची कक्षा बदलल्यावर, म्हणजे जागृतीत त्याप्रमाणे व्यावहारिक अनुभवकक्षेतून कोणी पारमार्थिक अनुभवकक्षेत गेला, की त्याच्या दृष्टीने घट काय, पाणी काय, अयथार्थच. म्हणजे, घट आणि सर्प यांच्यामध्ये फरक दाखवण्याला कार्याचा—उपयोगाचा—निकष निरुपयोगी ठरला.

**तात्या** : आणि कारणात होणाऱ्या बदलाचे काय ?

**शास्त्रीबुवा** : कोण म्हणतो बदल होतो ? सिद्ध करा.

**तात्या** : मातीच्या गोळचाला विशिष्ट आकार आला; हा बदल नव्हे ?

**शास्त्रीबुवा** : आकार म्हणजे काय ?

**तात्या** : आकार म्हणजे, आकार म्हणजे,—म्हणजे मातीचे कण विशिष्ट क्रमाने, पौर्वापर्याने एकमेकांच्या आजूबाजूला, वरखाली ठेवले—

**शास्त्रीबुवा** : ठेवले. यामुळे मातीत काय बदल झाला ? माती ही आधी माती होती, मगही मातीच राहिली; घट फुटून गेल्यावरही मातीच, घट असतानासुद्धा मातीच. तसेच रज्जुसर्पाचे. तेच ब्रह्म आणि जगत् यांचे ज्या अर्थाने पाणी भरून आणायला वापरला जाणारा घट मृत्तिकेकडे पाहता असत्य, त्याच अर्थाने हे जगत् ब्रह्माकडे पाहता असत्य,— म्हणजे दिसते त्या रूपाने न टिकणारे, बदलणारे. असत्य म्हणजे कार्य न करणारे नव्हे, पण हे कार्य ही असत्याच्याच कक्षेतले, तेव्हा 'जगत् मिथ्या' म्हटल्यावर तहानभूक लागणार नाही किंवा अन्नपाण्याने शमणार नाही, दगड लागला तर खोक पडणार नाही, असले काही नाही. तहान—भूक वगैरे हे देहाचे धर्मच आहेत; ते देहाला सोडून कुठे जाणार ? देह पडला, की ते आपोआपच नाहीसे होतील,—सगळ्यांचेच होतात. फरक एवढाच की, या धर्मांमुळे अज्ञानी सुखी—दुःखी होतो, ज्ञानी होत नाही.

**तात्या** : का हो, तुमचा ज्ञानी सुखी—दुःखी जर होत नाही, तर देहासाठी भिक्षा तरी कशाला मागतो ? आणि जर भिक्षेसाठी त्याला समाजावर अवलंबून राहावे लागते, तर त्याने समाजासाठी काही करायला हवे असे म्हटले, तर चुकले कुठे ? समाजाने त्याला फुकट काय म्हणून पोसावे ?

**शास्त्रीबुवा** : का हो, समाजाने अनाथ—अपंगांना फुकट काय म्हणून पोसावे ? फार कशाला, मुलाने म्हाताऱ्या आईबापांना तरी फुकट काय म्हणून पोसावे ? (थांबून) तुम्ही काय वाटेल ते ठरवा. समाजाने संन्याशाला पोसू नये म्हणून ठरवले, तरी खरा संन्यासी तक्रार करायला येणार नाही. तो म्हणेल, 'चीराणि किं पथि न सन्ति ? दिशन्ति भिक्षां नैवाङ्घ्रिपाः ? परभृतः सरितोऽप्यशुष्यन् ?' 'आम्ही काय कुणाचे खातो रे।...' हा साधा माणुसकीचा प्रश्न आहे !

**तात्या** : पण खऱ्या संन्याशाला भीक घातली, की बोके संन्यासी बोकाळतात, त्याचे काय ?

**शास्त्रीबुवा** : (आवेशाने) कुठल्या चांगल्या गोष्टीचे सोंग होत नाही ? म्हणून काय सगळ्या चांगल्या वृत्तींना बंदी करणार ? जग आहे, तोवर हे असेच चालणार. जगात अस्सल असणार, बनावटही असणार. त्यात संन्याशांचा असा खास अपराध काय आहे ?......... थांबा, आचार्य काय ?......लोकमान्यही वाटते !

(दोघेही सामोरे जातात. धुक्यात अस्पष्ट दिसणाऱ्या दोन आकृती हळूहळू कुटीजवळ येतात. अभिवादाने प्रवेश. आसनपरिग्रह. शास्त्रीबुवा आचार्यांच्या बाजूला विनीतपणे बसले आहेत. तात्या लोकमान्यांच्या बाजूला.)

**शास्त्रीबुवा** : आचार्य, लोकमान्यांचे संध्यावंदनादी कर्म उरकताच आपणाला सूचना द्यायला येणार होतो. आपण आधीच येऊन आम्हाला लज्जित केले. चर्चा आपली योजली होती; पण आधी आम्हीच वाद करून घेतला.

**आचार्य** : तात्या-(तात्यासाहेब चमकून पाहतात)

**शास्त्रीबुवा** : मला म्हणाले आचार्य. मलाही 'तात्या'च म्हणतात.

**आचार्य** : तात्या, तुमचा आवाज आम्ही दूरवरून ऐकला. वाद होता की विवाद ?

**शास्त्रीबुवा** : आपण काय ते समजा. पण तात्यासाहेब आपल्या मुद्यावर पाय रोवून उभे आहेत. ज्ञान्याला भोजनव्यवहार सुटत नाही, तर कर्मव्यवहार का सुटावा, असे त्यांचे म्हणणे आहे.

**लोकमान्य** : आमचेही तेच म्हणणे आहे; आणि आम्हाला वाटते, गीतेचेही म्हणणे तसेच आहे. आपण या विषयावर काही प्रकाश टाकल ?

**आचार्य** : अवश्य. प्रथम असे पहा की, ज्ञान्याने अमुक एक केले पाहिजे, किंवा अमुक एक न केले पाहिजे, असे विधिनिषेध त्याला उपपन्न होण्यासाठी तो शिष्यशासितृभावाच्या कक्षेत आला पाहिजे.—जसे, एखाद्या देशाचा कायदा एखाद्या माणसाला लागू होण्यासाठी तो माणूस त्या देशाच्या हद्दीत असला पाहिजे. आता शिष्यशासितृभाव कशावर अधिष्ठित असतो ? भेददृष्टीवर, अर्थात् हा शास्ता, हा शासनाचा विषयभूत पुरुष, अशा पृथक्त्वाच्या जाणिवेवर तो अधिष्ठित असतो. जिथे भेददृष्टी तिथे कर्तृत्वभोक्तृत्वाचा अभिमान असतो. अशी दृष्टी आणि अशी अभिमानवृत्ती याचाच मुळी म्हणजे ज्ञानी पुरुषाच्या ठिकाणी दुष्काळ असतो, त्याच्या ठिकाणी कर्मनिष्पत्तीची सामग्रीच उपलब्ध नसते. तेव्हा चक्षुरिंद्रियाच्या अभावी जसे रूपदर्शन अशक्य, तसे या सामग्रीच्या अभावी ज्ञान्याकडून कर्म होणेच अशक्य. अशा परिस्थितीत 'त्याने कर्म केले पाहिजे,' असा ठराव करून काय उपयोग ?

**लोकमान्य** : नाही नाही, असे नाही. आपण म्हणता, तसे अभेददर्शी, निरहंकार ज्ञान्याकडून सकाम कर्म होणे नाही, हे एकदम मान्य. पण निष्काम कर्म व्हायला काय हरकत आहे ?

**आचार्य** : निष्काम कर्माचा त्याला उपयोग ?

**लोकमान्य** : नसेल. लोकांना आहे की नाही ? 'यद्यदाचरति श्रेष्ठः, तत्तदेवेतरो जनः' ज्ञानी कर्म करतो, हे पाहून अज्ञही कर्म करीत राहतील; आणि जगच्चक्र सुरळीत चालू राहील. आपले नुकसान नसताना जर जगाचा फायदा करून देता येत असला, तर तो ज्ञान्याने का करून देऊ नये ? ज्ञान्याचे यात काही नुकसान नाही हे उघडच आहे; कारण निष्काम कर्माने त्याच्या मुक्तीत काही अंतराय येणार नाही. ज्ञान्याने कर्म केले नाही, तर मात्र अज्ञांचा बुद्धिभेद होईल, अज्ञलोकही कर्म सोडून देतील. याचा विचार ज्ञानी पुरुषाने केला पाहिजे. 'एते सत्पुरुषाः परार्थघटकाः स्वार्थं परित्यज्य ये ।'

**आचार्य** : (हसून) ज्ञानी पुरुषाला या मानपत्राचा काय उपयोग ? त्याला लोकमान्यता थोडीच मिळवायची आहे ? लोकमान्य, आपण ही 'पाहिजे'-ची भाषा प्रथम सोडून द्या. ज्याच्यावर वेदांचीही हुकमत चालत नाही, त्याच्यावर तुम्हाआम्हासारख्यांची काय चालणार ! मला हे मान्य आहे की, ज्ञानप्राप्तीपूर्वीच्या सवयीनुसार ज्ञानोत्तर काळीही एकादा ज्ञानी निष्काम कर्म करीत राहाणे शक्य आहे. तो तसा कर्म करीत राहिला, तर आपण म्हणता तसा लोकसंग्रहही होईल. पण लोकसंग्रहाची सक्ती काय म्हणून ? समजा, त्याने लोकसंग्रहार्थ कर्म केले नाही, तर काय होईल ? तो मोक्षाला मुकेल ? पातकी ठरेल ? नरकात जाईल ?

**लोकमान्य** : (विचार करीत)...हं...तो मोक्षाला मुकेल असे काही म्हणवत नाही. कारण ज्ञान आहे, तर मोक्ष मिळालाच पाहिजे.

**आचार्य** : हां, ठीक. म्हणजे असे की, ज्ञानोत्तर लोकसंग्रह न केल्यास ज्ञानी पुरुष अपराधी ठरत नाही, त्याला शिक्षाही होत नाही, असे जर आहे, तर जे न केल्याने काही प्रत्यवाय नाही, ते 'आवश्यक' कसे म्हणता येईल ? आवश्यक कर्म न केल्याने प्रत्यवाय उत्पन्न होत असतो. जो मोडल्याबद्दल काहीच शिक्षा होत नाही, तो कायदा कसला ?

**लोकमान्य** : ही या प्रश्नाची कायदेशीर बाजू झाली. पण आपण दुसऱ्या—माणुसकीच्या—बाजूने का नाही विचार करीत ? कर्म न केल्याने ज्ञानी पुरुषाचे काही नुकसान न झाले तर न होवो; पण केल्याने लाभ केवढा होईल !

**आचार्य** : लाभ ? कोणाचा ? ज्ञानी पुरुषाचा, की इतरेजनांचा ? ज्ञानी पुरुषाचा लाभ होत

असेल, तर त्याचे स्वरूप काय? त्याला यामुळे वरच्या दर्जाचा मोक्षवीक्ष मिळतो काय? हे पहा, ज्यांनी कोणी मोक्ष मान्य केला आहे, त्यांपैकी कोणीही मोक्षात असले तारतम्य–ग्रेडेशन–असल्याचे सांगितलेले नाही.

तात्या : समजा कोणी सांगितले; तर?

शास्त्रीबुवा : तर स्वर्गादी पुण्यलोक आणि मोक्ष यांमध्ये काहीच फरक राहणार नाही! मग मोक्षाला गेलेले लोक परतही येऊ लागतील, 'क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति' असे होईल. पण हे कदाचित आपणाला कोणाला मान्य झाले, तरी गीतेला मान्य होणार नाही; लोकमान्य झाले, तरी शास्त्रमान्य होणार नाही. गीता तर पदोपदी सांगते, 'यद्गत्वा न निवर्तन्ते', 'गच्छन्त्यपुनरावृत्ति', 'पुनर्जन्म न विद्यते.'

लोकमान्य : छे छे, मोक्षातून माघार नाही चालणार. पण काय हो, ज्ञानी पुरुषाने कर्म केल्याने त्याचा काही लाभ न झाला, तरी इतरेजनांचा जो लाभ होतो, त्याचा त्याने काहीच का विचार करू नये? त्याने कर्म सोडले, तर अज्ञ लोकांचा बुद्धिभेद नाही का होणार? आणि अज्ञांनी कर्म सोडल्यावर जगाच्या व्यवहारावरच घाव बसेल, 'उत्सीदेयुरिमे लोका:' असे काही होऊ नये, म्हणून तर भगवान कृष्ण, ज्ञानियांचा राजा जनक हेही कर्म करीत राहतात. आणि कृष्णाच्या उपदेशाने अर्जुनाचा मोहनिरास झाल्यावर तोही युद्धाला, म्हणजे कर्म करायलाच प्रवृत्त झाला आहे ना? म्हणजे गीतेचा अभिप्राय हा की, कृतार्थता मिळाली तरी ज्ञान्याने आमरणांत लोकोपकारार्थ कर्म केलेच पाहिजे.

आचार्य हा गीतेच्या अभिप्रायाचा खरोखर विपर्यास आहे. लोकमान्य आपणाला माझी अशी विनंती आहे की, 'केलेच पाहिजे' हे आपण सोडून द्या; निदान 'करावे' म्हणा! खरे म्हणजे ज्ञानी पुरुषावर जशी कसलीही सक्ती चालत नाही, तशी शिफारसही चालत नाही. पण आता वादापुरती ही शिफारस चालवून घेऊ. तरी प्रश्न असा की, ज्ञानी पुरुषाला लोकव्यवहाराची चिंता लागून राहणे कसे शक्य आहे? जागृतीत स्वप्नव्यवहाराची चिंता कोणी करील काय? त्यातूनही जनकाप्रमाणे जो कोणी निष्काम कर्मयोगाच्या वाटेने ज्ञानापर्यंत पोचतो, त्याच्या हातून केवळ पूर्वीची सवय म्हणून कर्म होत राहते. आपली जशी कर्म न करण्याला हरकत आहे. तशी काही आमची या कर्म न करण्याला हरकत नाही. पण अंगी वैराग्य बाणल्यामुळे कर्मसंन्यास करून, विविक्तदेशी ध्यानधारणा करून जो ज्ञानी झाला असेल, तो ज्ञानानंतर मुद्दाम लोकसंग्रहार्थ पुन्हा व्यवहारात उतरेल, हे शक्य तरी कसे आहे?

तात्या : गीतेला असला कर्मसंन्यास मुळीच पसंत नाही. ती तर ठिकठिकाणी सांगते की, कर्म, टाकू नये. तर कर्माचे फल टाकावे. एका ठिकाणी तर कर्मसंन्यासाला चक्क 'मिथ्याचार' म्हटले आहे,

शास्त्रीबुवा : काय वाटेल ते बोलू नका. गीता 'मिथ्याचार' म्हणते, ती विरक्त कर्मसंन्याशाला नव्हे, तर सक्त म्हणजे आसक्त कर्मसंन्याशाला आणि गीतेतली संन्यासानुकूल वचने म्हणाल, तर किती काढून देऊ बोला! 'यस्त्वात्मरतिरेव स्यात्...तस्य कार्यं न विद्यते।' (३.१७), 'न च संन्यसनादेव सिद्धिं समधिगच्छति' (३.४,) 'योगारूढस्य तस्यैव शम: कारणमुच्यते' (६.३), 'सर्वारम्भपरित्यागी' (१२ १६) सहाव्या अध्यायातला 'योग' हा व्यवहार सांभाळून फावल्या वेळी करायचा उद्योग नव्हे; 'योगी युञ्जीत सततम्...' (६ १०) असे त्याला वाहून घ्यावे लागते. म्हणूनच पुढे योगभ्रष्टाला 'उभयविभ्रष्ट' म्हटले आहे. कर्म सुटले नसेल, तर तो एकभ्रष्टच राहणार, आणि मग 'छिन्नाभ्रमिव' नष्टही होणार नाही. गीतेतल्या आदर्श भक्तीचीही कल्पना अशीच आहे; 'अनन्याश्चिन्तयन्तो माम्...' (९.२२) अशी आहे. स्थितप्रज्ञ, योगी, भक्त, गुणातीत यांची वर्णने पहा एकदा तपासून. हे लोक 'समलोष्टाश्मकञ्चन' आहेत. शत्रुमित्रांच्या बाबतीत 'समदृष्टि' आहेत, 'ब्रह्मचारिव्रते स्थित:' आहेत, 'मौनी' आहेत, 'अनिकेत' आहेत, 'जन्ममृत्युजरा व्याधि दु:खदोषानुदर्शनम्' करणारे आहेत, 'विविक्तसेवी' आहेत,

'ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः' आहेत, आणखी असे बरेच काहीतरी आहेत. या सर्वांचे काय करणार आहात बोला! शिवाय भगवंतांनी स्वतःच म्हटले आहे. 'लोकेऽस्मिन् द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ,'—यातले 'मया' पाहून ठेवा, संन्यासनिष्ठा हीही भगवंतांनीच सांगितली आहे. ती गीतेला अप्रमाण कशी? 'संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ' याचे काय करणार आहात?

**तात्या :** पण त्याच्याच पुढे म्हटले आहे की, 'कर्म संन्यासात् कर्मयोगो विशिष्यते।'

**शास्त्रीबुवा :** ते अर्जुनापुरते म्हटले आहे.

**तात्या :** असे. मग बाकीची गीता कोणाला उद्देशून रचली आहे?

**शास्त्रीबुवा :** कोणाला म्हणजे? मुमुक्षूंना. गीता हे मोक्षशास्त्र आहे.

**तात्या :** खोटी गोष्ट. गीता हे कर्मयोगशास्त्र आहे. सबंध गीता ऐकल्यावर अर्जुन युद्धाला म्हणजे कर्मयोगालाच सज्ज झाला आहे.

**शास्त्रीबुवा :** अर्जुनाचे सांगू नका. गीतोपदेशापूर्वी काय, किंवा नंतर काय, तो अज्ञानीच असल्याची लक्षणे आहेत.

**लोकमान्य :** शास्त्रीबुवा, आपण हे म्हणता तरी काय? प्रत्यक्ष भगवंतांच्या मुखाने उपदेश श्रवण करून 'नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा' अशी पावती देणारा अर्जुन अज्ञानी? भगवंताचे अनन्य भक्तिमात्र-लभ्य असे ऐश्वर रूप साक्षात पाहिलेला अर्जुन अज्ञानी? मग ज्ञानी कोण? आचार्य, आपण तरी ज्ञानी आहा ना?

**आचार्य :** लोकमान्य, आपण असे क्षुब्ध होऊ नका! अर्जुनाला अज्ञानी म्हणण्याची कारणे तर ऐका. गीतोपदेशापूर्वी अर्जुन ज्ञानी नव्हता, हे तर स्पष्ट आहे. तो ज्ञानी असता, तर त्याला शोकमोह झाले नसते. कृष्णानेही त्याला 'अपंडित'च म्हटले आहे. पुढे अठराव्या अध्यायाच्या प्रारंभा-पर्यंत तो प्रश्न विचारीत राहिला आहे. म्हणजेच त्याच्या मनातले संशय–विपर्यय अजून सरलेले नाहीत. असे असताना अठराव्या अध्यायाच्या अखेरी तो एकदम ज्ञानी व्हावा, हे सुसंगत नाही. भगवंताच्या ऐश्वर रूपाचे दर्शन, ही काही ज्ञान-प्राप्तीची हमी नव्हे; कारण हे ऐश्वर रूप मायिकच होय, पारमार्थिक नव्हे. महाभारतात पुढे 'उत्तरगीता' म्हणून एक भाग आहे; त्यावरूनही गीता ऐकल्यानंतरसुद्धा अर्जुन अज्ञानी राहिला होता, हे स्पष्ट होते. आता माझ्या स्वतःच्या ज्ञानाबद्दल मलाच कसे काय सांगता येईल? आपल्याला असे काही सांगणे शक्य होईल काय? ज्ञानीपणा ही काही अशी शपथेवर किंवा प्रमाणपत्रावर सिद्ध किंवा असिद्ध होणारी गोष्ट नव्हे!

**टिळक :** ( घोगऱ्या आवाजात ) अर्जुन अज्ञानी, ही कल्पनाच किती भयंकर आहे! ज्याला कृष्णा-सारखा गुरू लाभला, त्यालाही ज्ञानप्राप्ती झाली नसेल, तर इतरेजनांनी ज्ञानप्राप्तीची आशाच सोडावी, हे बरे!

**आचार्य :** असे निराश होण्याचे मला तरी काही कारण दिसत नाही. गुरू कितीही मोठा असला, तरी शिष्याच्या बुद्धीचा परिपाक झाल्यावाचून तो ज्ञानी कसा होणार? शिवाय, ज्ञान ही चीज मुळातच फार दुर्मीळ आहे,—अगदी रेडियमसारखी. 'मनुष्याणां सहस्रेषु......' हे खुद्द भगवंताचेच वचन आहे. तेव्हा परिपाकाची प्रतीक्षा करीत श्रवणमननादी साधनांत व्यापृत असणे हे ज्ञानाला अपरिहार्य आहे. ज्ञानाला जवळचा, सवलतीचा असा मार्ग नाही; 'अनेक जन्म संसिद्धस्ततो याति परां गतिम्!'

**टिळक :** आचार्य, आपल्या या सगळ्या बोलण्यावरून मला एक विलक्षण कुतूहल वाटू लागले आहे. आपली ज्ञानासंबंधी कल्पना तरी काय आहे?

**आचार्य :** अर्थात जी तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात सर्वत्र प्रसिद्ध आहे ती घटपटादी पदार्थांच्या ज्ञानाला काही कोणी या क्षेत्रात मोक्षसाधनभूत ज्ञान मानीत नाही. ज्ञान म्हणजे जीवब्रह्मैक्यज्ञान.

**टिळक :** हे तर ज्ञान कृष्णाने आपल्या भाषणात अर्जु-नाला कितीतरी वेळा दिले आहे. ते त्याला कळले नसेल काय?

आचार्य : असेल. पण केवळ शब्दार्थबोध हा काही मोक्षहेतू होत नाही. जीवब्रह्मैक्याचा अनुभव यावयास हवा. शाब्दिक ज्ञान पुष्कळांना असते; साक्षात्कार क्वचितच कोणाला होतो. शाब्दिक अथवा बौद्धिक ज्ञान लोपूही शकते पण साक्षात्कारात्मक ज्ञान एकदा झाले की कायमचे. किंबहुना, ज्याला साक्षात्कार झाला आहे, तो मुक्तच असतो. मग त्याचा देह पुढे किती का काळ चालू राहीना ! 'तस्मात् मिथ्या प्रत्ययनिमित्तत्वात् सशरीरत्वस्य, सिद्धं जीवतोऽपि विदुषः अशरीरत्वम् ।'

टिळक : ज्ञानापासून जर कधी च्युती होत नसेल, तर मग गीतेत योगभ्रष्टाविषयी विवेचन आहे, त्याचे काय ? शिवाय, मुक्तीसाठी अंतकाली ईश्वरचिंतनाची जी आवश्यकता सांगितली आहे ('स्थित्वास्यामन्तकालेऽपि......' 'अन्तकालेच मामेव स्मरन्......'), ती व्यर्थच म्हणायची ! कारण जे कधी हरवतच नाही, ते जपण्याचा उपदेश कशाला ?

आचार्य : खरेच कशाला ? तेव्हा माझ्या मते अंतकाली स्मरणाची शिफारस गीतेत आहे; ती सगुणोपासकांसाठी आहे. ब्राह्मी स्थितीच्या संदर्भात आलेल्या 'स्थित्वास्यामन्तकालेऽपि......' या वचनाचा अर्थ माझ्या मते वेगळा आहे : जीवनभर ही अवस्था लाभलेली नसताना अंतसमयी सुद्धा अर्थात अत्यंत अल्पकाळ ती लाभली, तरी तिने मोक्षप्राप्ती होते, असा या वचनाचा अर्थ आहे; 'ही अवस्था अंतकाळीही टिकून राहिली तर 'मोक्षप्राप्ती' असा नव्हे. योगभ्रष्ट तर उघड-उघड साधक आहे; सिद्ध नव्हे. म्हटलेच आहे : 'अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम्...'

टिळक : आपल्या मते जर याप्रमाणे ज्ञानोत्तर कर्म आवश्यक नसेल, तर मग गीतेत जो ठिकठिकाणी कर्म करण्यावर भर दिलेला आहे, त्याचा अर्थ काय ? 'न हि देहभृता शक्य त्यक्तुं कर्माण्यशेषतः' याचा अर्थ काय ?

आचार्य : याचा अर्थ एवढाच की, देहपतन होईपर्यंत 'पश्यन्, स्पृशन्, श्वसन्, जिघ्रन्......' हे देहधर्म नको म्हटले तरी चालू राहणार.

लोकमान्य : (अधीरपणे) दॅटस् राईट ! मग कर्म सोडण्याचा आग्रह काय म्हणून ?

आचार्य : असे पहा की, जेव्हा गीता निष्कामकर्म आचरायला सांगते, तेव्हा ती कोणत्या कर्मांना अनुलक्षून सांगते ?

लोकमान्य : अर्थात् वर्णाश्रमविहित कर्मांना.

आचार्य : 'पश्यन्, शृण्वन्, स्पृशन्...' या कर्मांना अनुलक्षून नव्हे ना ? मग आपण कर्मसंन्यासाच्या प्रश्नात ही कर्मे का आणता ? जे निष्काम कर्मयोगात गैरलागू, ते कर्मसंन्यासातसुद्धा गैरलागू. 'यश्चोभयोः समो दोषः परिहारोऽपि वा समः । नैकः पर्यनुयोक्तव्यस्तादृगर्थ विचारणे ।।'

लोकमान्य : ही कर्मे कर्मसंन्यासाच्या प्रश्नात आणणारे आम्ही कोण ? स्वतः गीताच तर म्हणते, 'न हि कश्चित् क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्'

आचार्य : तो अर्जुनासाठी युक्तिवाद आहे.

लोकमान्य : गीता तर सर्वच अर्जुनासाठी आहे !

आचार्य : चुकता आहात आपण. अर्जुनाला युद्धोन्मुख करण्यात ज्या गीतांशाचे पर्यवसान आहे, गीताग्रंथाचे केवळ बीज आहे. शेषांश सर्व मुमुक्षूंसाठी आहे. बीजगीता ही आपण म्हणता तशी 'युद्धगीता' असेल, पण गीताग्रंथ मात्र निश्चयाने 'मोक्षगीता'च आहे. मोक्षगीतेत अर्जुन, युद्ध, कुरुक्षेत्र ही केवळ निमित्तमात्र आहेत, कथा ही केवळ चौकट आहे. अशा कथा तत्त्वविवेचनात्मक ग्रंथात केवळ प्ररोचना म्हणून येत असतात; आणि पुष्कळदा त्यांचा तत्त्वाशी संबंधही कृत्रिम आणि काल्पनिकच असतो. तेव्हा शास्त्रशुद्ध मार्ग हा की, ग्रंथतात्पर्य ठरवताना त्यात कथांश येऊ द्यावयाचा नाही. असे न करिता कथांशाला निर्णायक महत्त्व दिले तर, लोकमान्य ! आपण मांडता तेही तात्पर्य गीतेतून निघणे दुष्कर होईल. मग गीतेचे तात्पर्य 'प्रत्येकाने हातात खरे शस्त्र घेऊन—धनुष्यबाणच म्हटले पाहिजे—आप्तेष्ट, गुरुजन यांच्याशी लढण्याकरिता रणांगणात उतरले पाहिजे' इतक्यापुरतेच मर्यादित करावे लागेल. आहे तयारी आपली ?

[पुढील मजकूर पान २६७ वर]

# ज्ञानदेव आणि मुकुंदराज

हरिहर चंद्रशेखर घोंगे

## विवेकसिंधूचा कालखंड

मराठी भाषेतील आदिकवीचा मान मुकुंदराजांना दिला जातो. अर्थात मुकुंदराज आदिकवी नसावेत अशा तऱ्हेचे विधान कै. आजगावकरांनी आपल्या कवीचरित्रविषयक ग्रंथात केले होते. पण विवेकसिंधूचे प्रतीत कालनिर्देशक ओव्या आहेत. काही प्रतीत त्या नाहीत. विवेकसिंधूच्या प्रतीतील कालनिर्देश असणाऱ्या ओवीचा समग्र अभ्यास करून प्रो. डोळके ह्यांनी विवेकसिंधूचे लेखनकालावर प्रकाश टाकलेला आहे. विवेकसिंधूचा काल सांगणारी ती ओवी अशी आहे; शके अकराशे दाहोत्तरु । साधारण संवत्सरू । राजा शारंगधरु । राज्यकरी[1] ।। श्री. बाबाजी बोबडे आणि प्रो. डोळके संपादित पोथीत कालखंड दर्शविणाऱ्या पानाची प्रतिमा छापलेली आहे. तीत ११११० असे अंकान्वित शककाल निर्देशन आहे.[2] याचाच अर्थ असा की पोथीची प्रत तयार करतेवेळी मूळ संहिता कुणी तरी वाचत असावा आणि प्रतलेखक ती उतरून घेत-असावेत. म्हणजे एकाच वेळी अनेक प्रती तयार होऊ शकत असत. त्यामुळे एकाच कालखंडातील निरनिराळ्या पोथ्यांतील अक्षरात, वळणात फरक पडतो. निरनिराळ्या पोथीप्रतीत शुद्ध आणि अबद्ध पाठ सापडतात त्याचे कारण लेखनिकाच्या भाषासंस्कारात आणि शब्दग्रहणदोषात असू शकते.

विवेकसिंधूचा विचार करता प्रो. डोळके ह्यांनी शके अकराशे दहामध्ये साधारण संवत्सर येते हे काढून दाखविले आहे.[3] बार्हस्पत्य रीतीप्रमाणे ते कीलक येते. पण अलिकडे त्यांनी संपादित केलेल्या 'रुक्मिणी-स्वयंवर' या काव्याच्या प्रस्तावनेत त्यांनी कालगणनेच्या निरनिराळ्या रीतींचा अभ्यास करून व काही शीलालेखांचे आधार देऊन शक आणि संवत्सरांत दोन अंकाचा फरक कसा पडतो तेही विशद केले आहे. त्या दृष्टीने 'अकराशे दहा' शकात साधारण संवत्सर येते. वराहमिहिराच्या गणिताने त्यांनी ते निराळ्या पद्धतीने सिद्ध करून दाखविले आहे. एकाच कालखंडातील शक आणि संवत्सराचा मेळ कधी कधी जुळत नाही ह्याचे कारण स्पष्ट आहे. पोथी-लेखक शक अथवा विक्रम-संवत ह्यांचे अनुरोधाने निरनिराळ्या पद्धतींपैकी, लेखकाला अवगत असलेल्या गणिताप्रमाणे शेषांक काढून त्यावरून संवत्सर ठरवितो. 'शके अकराशे बाहोत्तरी' या ओळीचे वाचन होत असता श्रवणदोषामुळे 'शके अकराशे दाहोत्तरी' असेही प्रतलेखकाने उतरवून घेतले असण्याची शक्यता आहे. कारण ११७२ शकातही साधारण संवत्सर येते. विवेकसिंधूच्या पोथीच्या लेखनाचा काळ प्रो. डोळके ह्यांनी ठरविलेल्या कालखंडानंतर ६० वर्षांनी पुढे रेटता येतो. विवेकसिंधूच्या प्रतीवर तिथी, वार आणि मास नाहीत त्याअर्थी तो शक १११०, किंवा ११७२ अथवा अगदी अलिकडचा म्हणजे १७१० चा असू शकतो. कारण बाबाजी बोबडे ह्यांनी ज्या सोप्या रीतीने १११० शकात साधारण संवत्सर होता हे सिद्ध केलेले आहे, त्याच रीतीने–(१७१० + १३४ = १८४४ ÷ ६० = शेष ४४ साधारण सवंत्सर) सतराशे दहात साधारण संवत येतो. विवेकसिंधूची भाषाशैली जर तपासली तर लेखनिकाने सतराशे दहाचे ऐवजी चुकून १११० शकाचा अंक लिहिला असावा असे वाटते. कारण बोबडे आणि डोळके प्रतीतील भाषाशैली अलिकडच्या काल-खंडातील आहे असे दिसते. यादवकालीन मराठी रूपे

---

१. विवेकसिंधु, बोबडे व डोळके प्रत. निवेदन पान ३.

२. तत्रैव; ११ । १४०.

३. तत्रैव पान; २०–२१.

पेशवाईपर्यंत चालू होती. तात्पर्य ज्याअर्थी विवेकसिंधूच्या मोजक्या प्रतींवरच कालनिर्देशाच्या ओव्या आहेत आणि काही प्रतींत ते प्रकरणही नाही हे लक्षात घेता ज्ञानेश्वरीच्या प्रत-लेखनाच्या कालखंडाच्या तुलनेत विवेकसिंधूचा कालखंड प्रामाणिक नसावा आणि ती ओवी प्रक्षिप्त असावी. हा तर्काचा प्रपंच मांडण्याचे कारण राजवाडे प्रतीत मुकुंद, सद्गुरु आणि त्यांचा कुणी विद्याधर शिष्य ह्यांचा उल्लेख असून ती ज्ञानेश्वरीची प्रत मुकुंदराजाने आपल्या विद्याधर शिष्याला दिली असा उल्लेख आहे. म्हणजेच ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरीची रचना मुकुंदराजाचे कालखंडाचे अगोदर झाली असे म्हणावे लागते. पण परंपरागत कालगणनेनुसार ज्ञानेश्वरीच्या निर्मितीचा कालखंड १२१२ शकातील आहे. विवेकसिंधु ते ज्ञानेश्वरीचे अंतर बोवडे प्रतीप्रमाणे एकशे दोन वर्षांचे आहे.

## कै. राजवाडे यांची ज्ञानेश्वरीची प्रत

सद्गुरुमुकुंदराज आणि विद्याधर यांचा उल्लेख असणाऱ्या श्लोकाने समाप्त होणारी ज्ञानेश्वरीची एक प्रत कै. राजवाडे ह्यांना पाटांगण देवस्थानातील पोथ्यांच्या गर्दीत आढळली. तीच राजवाडे प्रत होय. ही प्रत संशोधकांत वादाचा विषय ठरलेली आहे. या प्रतीत ज्ञानेश्वरीच्या ओव्या संपल्यानंतर 'गुरुकृपाळु नारायण पातु मां' अशा ओळी आहेत. त्यानंतर शके बाराशे बारा कालखंडाचा निर्देश करणारी 'सच्चिदानंदो ओवी' आहे. नंतर विश्वनाथ कोनेर ह्यांचे नाव असून ते खोडलेले आहे. तदनंतर तो श्लोक आहे

> श्री सद्गुरुमुकुंदेन दत्ता ज्ञानेश्वरी शुभा।
> विद्याधराय शिष्याय स्वीये स्वत्वं न शोभते ॥[४]

या ओव्या कुणीतरी शाईने पुन्हा गिरविल्या आहेत आणि निरनिराळ्या अक्षरांत लिहिलेल्या आहेत. राजवाडेंना आढळलेली प्रत प्राचीन आहे हे सिद्ध करण्याच्या खटाटोपात कै. राजवाडे यांनी निरनिराळ्या प्रमाणांची, अनुमानांची गुंतावळ केली. आणि तीत ते स्वत: अडकून पडलेत. राजवाड्यांच्या अनुमानातील दोषस्थळे रा. ग. हर्षे ह्यांनी ज्ञानदेवी नावाच्या संशोधन ग्रंथात दाखविलेली आहेत.[५]

## शके बाराशेबारा

ज्ञानेश्वरीच्या अनेक प्रतीत ज्ञानेश्वरीच्या लेखनकाळाचा निर्देश असणारी ओवी असते. 'शके बाराशे बारोत्तरी । तै टीका केली ज्ञानेश्वरी । सच्चिदानंदबाबा आदरे। लेखकु झाला ॥' काही प्रतीत कालनिर्देशांक असतो पण सच्चिदानंदाचे नाव नसते.[६] याचा

४. ज्ञानेश्वरी, राजवाडे प्रत, प्रस्तावना ६६–६७. शके. १८३१.
५. ज्ञानदेवी, रा. ग. हर्षे, १९४७. पाने ४–९.
६. ज्ञानेश्वरी संशोधन, प्रा. म. रा. जोशी, पान १३.

---

[पान २६५ वरून]

**लोकमान्य :** हा शुद्ध शब्दच्छल आहे.

**आचार्य :** आपल्याशी आम्ही पूर्ण सहमत आहो. हा शब्दच्छलच आहे. आम्ही तो एवढ्यासाठीच मांडला की कथांशावर भर देऊन आपण गीतेचे तात्पर्य ठरविता तोही ग्रंथाचा छलच आहे हे आपल्या ध्यानी आणून द्यावे. छलाचा अधिकार स्वत: वापरून दुसऱ्याला कसा नाकारता येईल? (थांबून) आम्हाला उत्तराची घाई नाही. विचार करा, सावकाश उत्तर द्या. उत्तर दिले नाही तरी प्रत्यवाय नाही. आपण विचार करू लागला यातही आम्हाला संतोष आहे. यथाकाल आपणाला तत्त्व उमगेल. 'पाद: कालेन पच्यते' अध्यात्मात मनन यासाठीच सांगितले आहे: 'आत्मा वा अरे द्रष्टव्य:, श्रोतव्य:, मन्तव्य:, निदिध्यासितव्य: ।'

(धुके विरले आहे. उन्हे पसरत आहेत. फक्त सूर्यावर एक अभ्रखंड आहे.)

□ □

अर्थ असा की निरनिराळ्या कालखंडात ज्ञानेश्वरीच्या सांप्रदायिक आवृत्यांचे प्रत–लेखन होत असता गुरु-परंपरेला अनुसरून आधीचे कालखंडात व्यक्तीचे नाम ठेवणे वा गाळणे सर्वस्वी प्रतलेखकाच्या मर्जीवर अवलंबून असे. या श्रद्धेच्या पोटीच काही प्रतींवर सच्चिदानंदाचे नाव नाही. काही प्रतींत एकनाथांचाही निर्देश नाही. उदा. भांडारकर प्रत, भारदे प्रत, राजवाडे संशोधन मंडळ प्रत २, इत्यादी प्रतींत एकनाथी ओव्या नाहीत.[७] याच नियमानुसार काही प्रतींत विद्याधर मुकुंदाचे निर्देश असणारा श्लोक गाळला जाऊन त्या जागी एकनाथी ओव्या वा इतर ओव्या रचल्या गेल्या आहेत असे दिसते. ज्ञानेश्वरीची प्रत शके बाराशे बारोत्तरी लिहिली गेली याविषयी मतभेद असण्याचे कारण नसावे. कारण ती ओवी बहुधा ज्ञानेश्वरीत असते. पण या ओवीचा संबंध ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरी कथनाशी वा त्यांच्या स्वलेखनाशी नसून सच्चिदानंदांनी त्या प्रतीचे लेखन वा पुनर्लेखन शके १२१२ मध्ये हातावेगळे केले असे म्हणता येते. ओवीमागचा रामदेवरायांचा इतिहास ज्ञानेश्वरीच्या काळाशी संबंधित नसून ज्ञानेश्वरीच्या निर्माणस्थलाशी आहे एवढे मात्र खरे की शके १२१२ मध्ये रामदेवराय राजे गादीवर आरूढ होते. आणि रा. चिं. ढेरे ह्यांनी ज्ञानेश्वर शिष्यांची जी वंशावळ दिली आहे तीवरून सच्चिदानंद व रामचंद्रनृप गुरुबंधु असून ते दोघेही ज्ञानदेवशिष्य होते.[८] ज्ञानदेवांच्या शिष्यांत सच्चिदानंदबाबा नावाचे सद्‌गृहस्थ होते असा शोध भक्तितत्वामृतातील ओव्यांतून मिळतो. या ग्रंथाचा उल्लेख, आणि त्यातील काही ओव्या श्री. रा. ग. हर्षे यांनी ज्ञानदेवीत तळटीपेत छापल्या आहेत. तेवढ्याच आणि तशाच प्रा. वाबगावकरांनी 'संशोधन व चिंतन' नावाच्या ग्रंथात उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्यांत 'ज्ञानेशाशिष्य प्रसिद्ध । महायोगी सच्चिदानंद ।' असा निर्देश आहे. पण हे सच्चिदानंद ज्ञानेश्वराचे शिष्य होते असे म्हणावयास निश्चित आधार नाही. कारण हर्षे यांनी ज्ञानदेवीत दुसऱ्या एका ज्ञानदेवाचा निर्देश केला आहे. ज्ञानदेव सच्चिदानंद ही गुरुशिष्य परंपरा सांगताना सावध असण्याची गरज आहे.

राजवाडे प्रत अधिक पुरातन वा सिद्धप्रत अधिक पुरातन या वादात तसा अर्थ नाही. कारण रा. ग. हर्षे संशोधित सिद्धप्रतीतील शक अस्पष्ट आहे. तो रा. ग. हर्षे म्हणतात त्याप्रमाणे शके १२७२ चा असू शकतो वा १५७२ चा असू शकतो. कारण बार्हस्पत्यरीतीने दोनही शकाचे 'विकृतीनाम' संवत्सर आहेत. १५७२ शकाप्रमाने तिथी, मासाचे गणित मांडून रा. ग. हर्षे यांनी सिद्धप्रतीत १५७२ शकात शुक्रवार येतो असे ठरविले आहे. पण प्रतीत मात्र भानुवाराचा निर्देश आहे. प्रत्यक्षात एखादी तिथी गळते आणि एखादी तिथी दुसऱ्या दिवशीचा सूर्य पाहाते त्यामुळे तिथी आणि वाराचा मेळ घालणे तसे प्रत्यक्षात अशक्य आहे. गणिताने १२७२ शकात भानुवार असेल पण प्रत्यक्षात तो सोमवार वा मंगळवार असू शकतो. सध्या तरी असा संशयात्मा म्हणून वावरण्यापेक्षा रा. ग. हर्षे म्हणतात त्याप्रमाणे सिद्धप्रतीचा कालखंड १२७२ शकांचा असावा असे मान्य करण्यास प्रत्यवाय नसावा.

## विद्याधर कोण होता ?

राजवाडे प्रतीवर शक संवत्सर वा तिथीचा उल्लेख नसल्यामुळे मुकुंदराज विद्याधराच्या कालखंडावरून राजवाडे प्रतीची प्राचीनता वा अर्वाचीनता ठरविता येईल. तसा शोध प्रा. वि वा कुळकर्णी आणि प्रा. म. रा. जोशी ह्या प्राध्यापकद्वयांनी घेतलेला आहे. त्यासाठी त्यांनी पाटांगण परंपरेतील निरनिराळ्या शिष्यावळी जमा केल्यात. स्तुतीपर संस्कृत वा मराठी कवने तपासून पाहिलीत आणि त्यांत त्यांना एका विद्याधराचा शोध लागला. विद्याधराचे नाव असणारी एक शिष्यमालिका प्रा. म. रा जोशी यांनी उपलब्ध करून दिली आहे[९] तीच परंपरा प्रा. वि. वा. कुळकर्णी यांनी देखील तत्पूर्वी शोधून काढली होती.[१०] जनी-जनार्दनाच्या शिष्यमंडळांत कुणी गोविंदाचा पुत्र विद्याधर होता असे या वंशावळीवरून दिसते. पण

७. ज्ञानदेवी, रा. ग. हर्षे संशोधन साहित्य, पाने, २१–२५.

८. गुरु मोरखनाथ, रा. चिं. ढेरे, पान, १५५.

९. ज्ञानेश्वरी संशोधन–पाटांगण परंपरा–प्रा. म. रा. जोशी, १९७३, पान. ३०.

१०. विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक, १९७२, प्रा. वि. वा. कुळकर्णींचा लेख, पान, १८०.

राजवाडे प्रतीत विद्याधरांच्या गुरूचे नाव सद्गुरू मुकुंद असे आहे. त्या मुकुंदाचे नाव या शिष्यमंडळीत अंतर्भूत झालेले नाही. तरी पण प्रा. वि. वा. कुळकर्णींचे प्रयत्न मुकुंदांना शोधून काढण्यासाठी चालूच होते. ज्या सद्-गृहस्थांनी जनीजनार्दन महाराजांची वंशावळ व त्यातील विद्याधर यांची नावे सांगितली त्यांचे स्वतःचे मत असे की 'मुकुंद नावाचे कोणी पुरुष त्यांच्या वंशजात होऊन गेलेले नसावेत.'[११] तरीपण कुळकर्णींनी एक श्लोकपंचक मिळविले.[१२] ते मराठीत असून त्यात गोविंद नावाच्या एका गुरुमहाराजाची प्रसंशा आहे. ते श्लोक-पंचक गोविंदाच्या शिष्याने रचलेले आहे. पण शिष्याचे नाव अनुल्लेखित आहे.

## मुकुंदगुरूची वाङमयीन प्रमाणे

श्लोकपंचकातील प्रथम श्लोकात 'सच्चिदानंद गुरु प्रकाश' ह्यांचे नाव आहे. नंतरच्या तीन श्लोकांत गोविंदचरणस्मरण आहे. पाचव्यातील उल्लेख महत्त्व-पूर्ण आहे. 'श्रीमन्मुकुंदाख्य गुरुस्वभावे। ज्याची कृपा त्यासि अखंड लाभे ।।' या श्लोकाचा अर्थ सांगताना प्रा. कुळकर्णी म्हणतात की 'एवंच मुकुंद हेच नाव गोविंदा या अभिधानाचा पर्याय म्हणून रूढ असावे.'[१३] श्लोकपंचकातील मुकुंदांचा विचार करणे आवश्यक आहे. मुकुंदराजाशिवाय कोणा अन्य मुकुंदाची रचना पाटांगण परंपरेत उपलब्ध नाही. ते नाव गुरुपरंपरेत अंतर्भूत नाही. सच्चिदानंद नावाचे गुरूचे अभिधानही पाटांगण परंपरेत सुचविले जात नाही. त्याअर्थी सच्चिदानंद आणि गोविंद ही वेगळी परंपरा पाटांगण देवालयात शिरली असे दिसते. श्लोकपंचकातील गोविंद मुकुंदाचा; पाटांगणातील शिष्यपरंपरेतील गोविंद विद्याधराचा सुतराम संबंध नसावा. 'श्री मुकुंदाख्य गुरुस्वभावे। ज्याची कृपा त्यासी अखंड लाभे।। या ओळींचा अर्थही प्रा. कुळकर्णी सांगतात तसा नसून वेगळ्या प्रकारेही सांगता येतो. मुकुंद नावाच्या कुणा गुरूची ज्यांना स्वभावताच कृपा लाभली होती त्या गोविंद चरणाला कुणा शिष्याने वंदन केले होते. म्हणजे मुकुंद हे गोविंदमुनीच्या गुरुपरंपरेतील एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीचे नाव असावे. कारण पाटांगण परंपरा कुणा मुकुंदाच्या छायेत वावरत होती असे दुसऱ्या एका संस्कृत काव्यपंक्तीवरून दिसून येते. या काव्यपंक्ती शार्दूलविक्रीडितात असून ते एकूण सात श्लोक आहेत.[१४]

पहिल्या श्लोकात 'श्रीमद्वेदान्तसारोद्ग्रथितविधु-सुधासिंधु' आणि अनेकांना वंदनीय असणाऱ्या मुकुंदांना नमस्कार आहे. त्या अर्थी मुकुंद हे आद्य गुरू आहेत. तदनंतर जनार्दन गुरूच्या नावाने मंत्रपुष्पांजली समर्पित केलेली असून, तिसऱ्या श्लोकात जनार्दनाचे गुरू श्री ढुंढीराज यांना वंदन आहे. तदनतर जनार्दनशिष्य नारायण (बहुधा) यांचा उल्लेख असून पुढील श्लोकात राघवांचा निर्देश आहे. पाचव्या श्लोकात देवस्वामीचा निर्देश असून सहाव्या श्लोकात पुन्हा मुकुंदांचा गौरव आहे. 'पुढे विनायकाला वंदन असून हे संस्कृत काव्य रामकृष्णाचे पुत्र वामन ह्यांचे असावे अशी नोंद वर्तमान वंशजांनी ठेवलेली आहे.' हे जर खरे असेल तर या संस्कृत श्लोकांतून दोन वंशावळींचे ज्ञान होते. पहिल्या परंपरेत मुकुंद–ढुंढिराज–जनार्दन–नारायण—राघव–देवस्वामी असा बोध होतो. दुसऱ्या परंपरेत नारायण–राघव–देवस्वामी–विनायक–वामन असा शोध घेता येतो. या दोन वंशावळींचा ऐतिहासिक शोध घेणे अगत्याचे आहे. संस्कृत श्लोकातील गुरुपरंपरा पूर्वापार आणि सलग नसून ज्याचे नाव जसे स्मरणात आले तशी त्याचे नावावर काव्यरचना केली गेली असावी. किंवा ज्याने ही परंपरा लिहून घेतली त्याने ती क्रमावर उतरवून घेतली नसावी. संस्कृत श्लोक आहेत तसाच जर अर्थ घेतला तर पहिल्या श्लोकातील मुकुंद आणि सहाव्यात गौरविलेले मुकुंद असे दोन मुकुंद पाटांगण परंपरेत होऊन गेले असे म्हणावे लागते. त्यात अडचण वाढते. कारण पाटांगण परंपरेत एकाच मुकुंदाचे नाव आढळणे कठीण झाले आहे. या संस्कृत श्लोकांत एकाच मुकुंदाचा गौरव आहे असे म्हटले तर सहाव्या क्रमांकावर असणारा मुकुंदाच्या गौरवपर श्लोक दुसऱ्या क्रमांकावर ठेवावा लागतो. अशा रीतीने पाटांगण परंपरेत ढुंढीराजांचे आधी मुकुंदराजाचा गौरव प्राप्त होतो. हे मुकुंदराज वा मुकुंदमहोदय कोण होते याचा शोध घेणे आवश्यक आहे. तथाकथित वामन नावाच्या शिष्याने संस्कृत काव्यात जो गुरुपरंपरा दिली ती त्याच्या निकटवर्ती पूर्वजांची असावी असेही म्हणता

११. वि. वा. कुळकर्णी पूर्वोक्त ग्रंथ, पान, १८०.
१२. तत्रैव पान, १८२.
१३. तत्रैव पान, १८६.

१४. तत्रैव पान, १८४.

येते. कारण पाटांगण परंपरेत वामनाच्या अगोदरच राघव, विनायक ही त्यांच्या पूर्वजांची नावे असून नारायण हे त्यांचे आजेगुरू होते असे दिसते. पण या परंपरेतून मुकुंदांचा परिचय होण्यासारखा नाहीच. संस्कृत श्लोकांत जनार्दन आणि ढुंढिराजांची नावे असणे अपरिहार्य आहे. कारण त्या सत्पुरुषांपासूनच पाटांगणच्या देवालयाला वा देवघराण्याला प्रारंभ होतो. पण जनार्दनानंतर नारायण हे पाटांगणपरंपरेतील गुरुस्थानी आरूढ होतात. तदनंतर पाटांगणपरंपरेत दोन शिष्यसंप्रदाय सुरू होतात असे दिसते. ही वेगळीक नारायणानंतर राघवस्वामी आणि देवस्वामी यांचे काळात होते. म्हणूनच उपलब्ध असणाऱ्या संस्कृत श्लोकांत पाटांगणपरंपरेचा मूळ इतिहास सापडतो असे म्हणणे सुसंगत ठरते. तात्पर्य प्रा. कुळकर्णींना जे संस्कृत श्लोकांचे चोपडे सापडले त्यात मुकुंद–ढुंढीराज–जनार्दन–नारायण–राघव आणि देवस्वामी असा पूर्वइतिहास वर्णन केलेला आहे. पाटांगणपरंपरेतून ज्ञात होणारे मुकुंद हे जनार्दनापूर्वीचे ढुंढीराजपूर्वीचे मुकुंद असल्यामुळे त्यांचा आणि विद्याधराचा संबंध प्रस्थापित होऊ शकत नाही. कारण विद्याधराचा समय शके १७०० चे दरम्यानचा ठरतो तर मुकुंदगुरूचा काळ शके १४५० ते १४७० असा ठरविता येतो.

मराठी श्लोकांतील सच्चिदानंद आणि गोविंदस्वामी ही परंपरा देखील मुकुंदराजाच्या शिष्यमंडळीत आढळते.[१५] औषधसंग्रहातील प्रतीत ज्ञानदेव–निवृत्त–सोपान–एकनाथ आणि मुकुंदनाथ अशी परंपरा आढळते.[१६] पण पाटांगण परंपरेतील विद्याधराच्या गुरुमालिकेत एकनाथांचे नाव आढळत नाही. आणि एकनाथासारख्या महान पुरुषाला मराठी श्लोकपंचकात वा संस्कृत शार्दूलविक्रीडितात अंतर्भाव का नसावा हे देखील कळत नाही. एकनाथाच्या शिष्यापरंपरेत मुकुंदाचा निर्देश आहे हे खरे. रा. ग. हर्षे यांचे मताप्रमाणे तो एकनाथाचा चरित्रकार होता. श्री. रा. चिं. ढेरे यांनी सोपानोत्तर परंपरेत दोन मुकुंदांचा निर्देश केला आहे. त्यांपैकी एक मुकुंद जनार्दनाचे आधीचे कालखंडात असून दुसरे जनार्दनांपासून काही अंतरावर आहेत. ते त्र्यंबकनाथांचे शिष्य आहेत.[१७] पण पाटांगण परंपरेत त्र्यंबकनाथांचेही नाव नाही. म्हणूनच जनार्दनांच्या गुरुपरंपरेत ज्या मुकुंदाचे नाव आहे तेच मुकुंद संस्कृत काव्यातील प्रथम श्लोकातील मुकुंद असावे. कारण त्यांचेनंतर जनार्दनांना वंदन आहे. अशा रीतीने मुकुंदाचा शोध घेण्यासाठी जनार्दनानंतरची पाटांगण परंपरा फलद्रूप होत नाही हे सिद्ध होते. रा. ग. हर्षेनी ज्या अनेक ज्ञानेश्वरीच्या पोथ्यांचा परिचय करून दिलेला आहे त्यात त्यांनी ॐ नम श्री आदिगुरु दत्तात्रय, जनार्दन, येकनाथश्चिदानंद स्वानंद गोविदमूर्ति आनादी परमगुरवे नमः । अशी शिष्यपरंपरा उल्लेखित असणारी एक प्रत उल्लेखित केली असून त्याच प्रतीत पहिल्या अध्यायात 'आदिनाथं गुरुं वन्दे दत्तात्रय जनार्दन । जगन्नाथं चिदानंदं श्वास्वानंदवर्धनम् ।।१।। गोविंदसद्गरुं वंदे आन्वयेण परंपरा ।।[१८]' असा श्लोक उद्धृत केलेला आहे. या श्लोकातून शिष्यपरंपरेतून दुसऱ्या एका सच्चिदानंद आणि गोविंद गुरुशिष्याचा परिचय होतो. त्यावरून दत्तात्रय, जनार्दन, एकनाथ सच्चिदानंद आणि गोविंद अशा गुरुपरंपरेचा बोध होतो. श्लोकाच्या ओळीतून मात्र दत्तात्रय, जनार्दन, जगन्नाथ, चिदानंद आणि गोविंद असा बोध होतो. पण पाटांगण परंपरेत सच्चिदानंद वा चिदानंदाचे नाव नाही. पाटांगण परंपरा ही आनंद सांप्रदायी नाही हे विशेषेकरून नमूद करावेसे वाटते. पण जनार्दन, एकनाथ परंपरा मात्र मुकुंद नावाच्या आदि कवीपर्यंत नेता येते. कारण विवेकसिंधूच्या काही पोथ्यांवर 'जनार्दन गुरवे नमः' असाही नमनपर उल्लेख येतो.[१९] राजवाडेंची प्रत पाटांगणात त्यांना आढळली होती. त्यावरून पाटांगणचे केंद्र हे वेन्दात आणि भागवत या दोन परंपरा जोपासून ठेवणारे महत्वाचे केंद्र होते. नारायणानंतर पाटांगणात ज्या दोन शाखा दिसतात त्यांपैकी एकीने बहुधा वेदान्त सांभाळला असून दुसरीने गीताध्ययन वा भागवताचा प्रसार केला असावा असे दिसते. हे नुसते अनुमान आहे. वरील विचारांच्या गोतावळ्याचा निष्कर्ष असा देता येईल. (१) गोविंदपुत्र विद्याधर यांचा आणि मुकुंदाचा कालखंड तौलनिक प्रमाणाच्या आधारे ज्ञाने-

---

१५. गुरू गोरखनाथ, रा. चिं ढेरे–पान १८५

१६. ज्ञानदेवी, रा. ग. हर्षे, संशोधन साहित्य, पान ११.

१७. रा. चिं. ढेरे, पूर्वोक्त ग्रंथ, पान १५५.

१८. ज्ञानदेवी, रा. ग. हर्षे, पान, १३.

१९. वि. सं. मं. वार्षिक. १९७१, पान १७६.

श्वरीचे हस्तांतर व्हावे इतका जवळचा नाही. ज्या मुकुंदाने विद्याधराला स्वतः ज्ञानेश्वरी दिली ते मुकुंद एकनाथांचे शिष्य असावे असे गृहित धरले तरी त्या मुकुंदाचा जीवनक्रम शके १६०० च्या पुढे रेटता येत नाही. आणि त्या संदर्भात विद्याधर व मुकुंद यांत निदान शतकाची खाई पडते. (२) श्लोकपंचकातील मुकुंद आणि गोविंद यांच्या गुरुशिष्य संबंधावर प्रकाश टाकणारी माहिती उपलब्ध नाही. अनुमानाच्या आधारावर मुकुंद नावाचे सद्‌गुरु जनार्दनाच्या आधीचे कालखंडात ठेवावे लागतात. मागे उल्लेखिलेल्या एका श्लोकावरून त्यांची परंपरा नरसिंहभारती उर्फ सच्चिदानंद आणि जगन्नाथ ह्यांचे जीवनमार्गाने मुकुंदराजापर्यंतच जाते. जशी साखरेमहाराजांची परंपरा त्यांनी ज्ञानेश्वरापासून सांगितलेली आहे.[20] पण मुळात ज्ञानेश्वर ते अच्युतापर्यंत अनेक शिष्यांच्या पिढ्या वगळल्या आहेत तसेच काहीसे पाटांगणपरंपरेत झाले असावे. मुकुंदराज ते जनार्दन या परंपरेतील शिष्यमंडळीची नावे स्मरणात नसावी. किंवा जनार्दन या संस्थापक गुरुघराण्याचे मूळ तेवढे स्मरणात ठेवले गेले असावे. (३) मुकुंदराजाची प्रसिद्ध शिष्यमंडळी बीड पाटांगणाच्या परिसराला प्रभावित करून गेलेली होती म्हणूनच मुकुंद हे नाव त्या परिसरातील ग्रंथांत आदराने अंतर्भूत झाले असते.

ह्या संपूर्ण विवेचनानंतर विद्याधर आणि मुकुंदाचा शोध पूर्ण होत नाही. प्रा म. रा. जोशी ह्यांची नुकतीच प्रसिद्ध झालेली शोधपुस्तिका, वा प्रा. कुळकर्णीचे विदर्भ संशोधन मंडळ वार्षिकातील लेख अन्य संदर्भात अतिशय मौल्यवान ठरणारी आहेत.* पण ती राजवाडेंना अन्यायकारक आहेत. म्हणून विद्याधर आणि मुकुंद यांचा शोध घेण्यासाठी प्रा. कुळकर्णीच्या एका लेखाकडे वळावे लागते.[21] या लेखात एक मराठी भाषेतील अशुद्ध अवतरण त्यांनी उद्धृत केले आहे. त्यात 'सच्चिदानंद मूर्ति स्मरा नरसिंह्य भारती । शब्दरुपणे वेदोक्ति दशनाम प्रतिपाठिती ।।१।। विद्याशं (क) र भारती' असा उल्लेख आहे. मुकुंदराजांच्या आदिशिष्यांत नरसिंहभारतीचे नाव येते. त्यांचे अध्यात्मिक नाव सच्चिदानंद असावे असेही दिसते. या नृसिंहभारतीचा आणि विद्याधराचा संबंध लेखात स्पष्ट नाही, बहुधा हे दोघे गुरुबंधू वाटतात. अशा रीतीने नृसिंहभारतीची कोणी संबंधी विद्याशंकर (विद्याधर) मुकुंदराजाचे कालखंडात अस्तित्वात होता असे दिसते. ज्ञानेश्वरशिष्य सच्चिदानंद आणि मुकुंदराजशिष्य नृसिंहभारती ही दोन व्यक्तिनामे एकाच गृहस्थाची असतील तर राजवाडे प्रतीचा पूर्ण अर्थच लागून जातो. मुकुंदराजाने ज्ञानेश्वरीची प्रत विद्याशंकर ऊर्फ विद्याधराला दिली अशा अर्थाचा श्लोक असणाऱ्या काही हस्तलिखित पोथ्या अस्तित्वात असाव्यात. हा मुकुंदराज ज्ञानेश्वर काळातील असावा. नृसिंहभारती उर्फ सच्चिदानंद यांच्या मध्यस्थीने या दोन महापुरुषांचे जीवन सांधले जाते. मुकुंदराजाचा तो प्रसिद्ध असणारा श्लोक एकनाथांनी गाळला असावा. एकनाथकाळापूर्वी विवेकसिंधूची प्रत आणि मुकुंदराजाचे जीवन या विषयी लोकांना फारशी माहिती नसावी. कारण एकनाथकाळापर्यंत त्या परिसरात भक्तीचा आणि नाथपंथीयांचा विशेष जोर दिसून येतो. विप्रप्रत १५७२ शकातील होय हे डॉ. कोलतेंचे संशोधन मान्य केले तर ही एकनाथानंतरची एकनाथी प्रतीची नक्कल होती असे ठरते. म्हणूनच कोनेर नावाच्या गृहस्थाने आपल्या पाटांगण परंपरेत एकनाथी गाळून नारायण नावाच्या गुरूचा उल्लेख केला त्यावेळी त्यांचेसमोर एकनाथी ओव्या नसणारी विप्रप्रत. असावी पाटांगणपरंपरेत एकनाथांचे नाव येत नाही हे ध्यानात घेण्यासारखे आहे. त्याअर्थी पाटांगणी परंपरेला नाथ संप्रदायाचे मूळात वावडे असावे असे दिसते. त्या १५७२ शकाच्या पोथीवरून कोनेरांनी 'नारायण प्रत' तयार केली. कोनेरानंतर कुणाला तरी मुकुंदराज आणि विद्याधराच्या श्लोकबद्ध आणि सच्चिदानंदी ओवीच्या प्रती गवसल्या असतील त्यांनी कोनेरांचे नाव खोडून मूळ ज्ञानेश्वरी उपलब्ध करून दिली. हे कार्य नारायण शिष्यसांप्रदायातील कोणी तरी केले असावे. तीच ही कै. राजवाडे प्रत होय. राजवाडे प्रतीची शाई, कागद, लेखन, संशोधक सुचवितात त्याप्रमाणे ते अलीकडचे असले; विप्रप्रतीपेक्षा आधुनिक असले तरी त्या

२०. अमृतानुभव, साखरे सांप्रदायिक, प्रस्तावना पान ७

* प्रस्तुत लेखकाचा या प्राध्यापकद्वयांच्या निष्कर्षांशी मतभेद असला तरी त्यांच्या शोधनिबंधाचा या लेखासाठी भरपूर उपयोग करून घेतला आहे. त्यांचे ऋण आम्हाला मान्य आहेच.

२१. वि. सं. मं. वार्षिक, १९७०, वि. वा. कुळकर्णी, पान ८४.

प्रतीतील मुकुंदराजाचा इतिहास महत्त्वाचा आहे. त्या इतिहासाचा शोध घेण्यासाठी कै. राजवाडे प्रतीला पोथीत गुंडाळून–मुकुंदाचा शोध १६ व्या शतकात घेण्याच्या प्रयत्नाची दिशा चूक आहे.

## मुकुंदराजाचा कालखंड

प्रो. डोळके ह्यांनी गणिताने ठरवून दिलेली ओवी प्रक्षिप्त आहे हे जोपर्यंत जैत्रपाळ, सारंगधर इत्यादी नृपांच्या इतिहासाचा सोळाव्या शतकात वा सतराव्या शतकात शोध घेऊन सिद्ध करता येत नाही तोपर्यंत ते म्हणतात त्या प्रमाणे शके १११० हाच विवेकसिंधूचा कालखड असावा असे मानावे लागते. पण या काळात प्रो. डोळके म्हणतात त्याप्रमाणे मुकुंदराज वृद्ध असावेत असे म्हणता येणार नाही. कारण 'मज स्वासोस्वासाचा श्रमु। तेथ कासया ग्रंथाचा उद्यमु।।'[२२] असे ज्यावेळी मुकुंदराज म्हणतात त्यावेळी त्यांना दम्याचा विकार जडला होता असे दिसते. या रोगामुळे काहीशी हतबल झालेली त्यांची अभिव्यक्ति प्रगट होते. कारण वृद्धत्वाचाच निर्देश करावयाचा असता वर 'मज वार्धक्याची जरा। तेथ कासया ग्रंथाचा पसारा।' अशा अर्थाच्या अनेक ओव्या त्यांना रचता आल्या असत्या. विवेकसिंधूची रचना मुकुंदराजांच्या उमेदीच्या काळखंडात झाली असावी असे दिसते. म्हणजेच मुकुंदाची जन्मतिथी शके १०७५ च्या दरम्यान ठरविता येते. पण या कालखंडात मुकुंदराज आणि ज्ञानेश्वरी यांचा संबंध प्रस्थापित करण्यासाठी शके १२१२ पर्यंत मुकुंदराजांना एकशे सदतीस वर्षांच्या आयुर्मर्यादेचा आशीर्वाद द्यावा लागतो. हे आयुर्मान श्रद्धेला मान्य असले तरी इतिहासाला मात्र मान्य नसते. म्हणून मुकुंदराजांची हयात शंभरीच्या आंत संपविणे आवश्यक असते. त्यासाठी ज्ञानदेवांच्या काळाचा विचार करणे आवश्यक ठरते.

## ज्ञानदेवांचा काळ

निरनिराळ्या ऐतिहासिक साधनांची तुलना करून ज्ञानदेवाचा कालखंड ठरविण्याचा प्रपंच हा स्वतंत्र आणि विस्तृत लेखाचा विषय होतो. त्यांपैकी काही संशयास्पद मुद्यांचे दिग्दर्शन यापूर्वीच युगवाणीच्या अंकात प्रस्तुत लेखकाने प्रयत्नपूर्वक केले आहे.[२३] ज्ञानदेवाच्या कालखंडासंबंधी आतापर्यंतच्या संशोधनाची साक्ष काढणे आवश्यक आहे. ते कठीण कार्य असून, केवळ अनुमान प्रमाणांवर आधारित असून, श्रद्धेलाही आव्हान देणारे ठरेल. तूर्त या जंजाळात न पडता ज्ञानदेवाच्या कालखंडासंबधी उपलब्ध असणारी उद्बोधनाथांची ओवी लक्षात घेण्यासारखी आहे. 'दुजा पद्मनाथ। ज्ञानदेव मूर्ती। एक सहस्त्रवर्ती। त्याण्णवीचे। श्रावण अष्टमी। कृष्णपक्ष बरा। नंदन वासरा माजी जन्म।'[२४] उद्बोधनाथ ज्ञानदेवांच्या शिष्यमालिकेत होते. सत्यामळनाथ सच्चिदानंदाच्या नावावर असणाऱ्या ज्ञानदेव चरित्रातील कालविसंगत ठरू पाहणाऱ्या प्रमाणांपेक्षा उद्बोधनाथांची ही ओवी लक्षात घेतली तर ज्ञानदेव शके १०९३ मध्ये जन्माला आलेत असे दिसते. शके १०९३ मध्ये मात्र नंदन संवत्सर येत नाही. ते १०९४ शकात येते. पण एकाच शकात अनुक्रमाने दोन सवंत्सर असणारे काही शकांची नोंद प्रो. डोळके ह्यांनी ऋक्मिणीस्वयंवराच्या प्रस्तावनेत केलेली आहे. उद्बोधनाथांच्या काळात शकावरून सवंत्सर काढण्यासाठी बार्हस्पत्य पद्धती रूढ झाली होती. 'क्षय सवंत्सराचा' मुद्दा मान्य करता, शके १०९३ मध्ये नंदन संवत्सर येत असावे. त्यावरून हा कालखंड चुकीचा आहे असे म्हणता येत नाही. ज्ञानदेवांचा जन्म कृष्णाष्टमीला झाला हे परंपरेलाही ज्ञात आहे. ज्ञानदेवांचा जन्म शके १०९३ त झाला असे एकदा गृहित धरले की शके १२१२ ही ज्ञानेश्वरी लेखनाची मर्यादा सच्चिदानंदांच्या जीवनाशी मर्यादित होते. म्हणजेच ज्ञानदेवाचा निर्वाण शक ज्ञात नाही. दुर्मुख संवत्सरात त्यांचे निर्वाण झाले असे ठरविले तर शके ११५८ वा ११५७ मध्ये त्यांचे निर्वाण झाले असे म्हणता येते. या कालखंडात मुकुंदराजांना ज्ञानेश्वरी प्राप्त होऊ शकते. वयाच्या तिसाव्या वर्षी ज्ञानदेवांनी ज्ञानदेवी प्रवचनाचा पाया घातला असे जरी म्हटले तरी शके ११२३ ते शके ११२८ च्या एकादशीपर्यंत मुकुंदांना ज्ञानेश्वरी प्राप्त होऊ शकते. कारण ज्ञानदेव अल्पवयीन समाधिस्थ झाले असे म्हटले तर दुर्मुख संवत्सर ११२८ मध्ये येतो. अभंगकारांनी १०९३ चे ऐवजी ११९३ आणि ११२८ ऐवजी

---

२२. विवेकसिंधु, पूर्वार्धं,–७।१५४।।

२३. ज्ञानदेव चरि., युगवाणी, एप्रिल–मे १९७३,

२४. उद्बोधनाथांची ओवी, महाराष्ट्र सारस्वत, तळटीप, पान १०८.

१२१८ असा अंकांचा फेरफार करून बालवयात भाविकांच्या श्रद्धेने ज्ञानदेवांचा बळी घेतला असावा.

उद्बोधनाथांच्या ओवीवरून ज्ञानदेव, मुकुंदांचा कालखंड परस्परांना समांतर आहे. त्यांचे जीवन प्रत्यक्षात परस्परांना छेदून जाणारे होते वा नाही ह्याची साक्ष पुराणग्रंथात नाही. पण तशा प्रकारची नोंद परंपरेने ठेवलेली होती. अशा तऱ्हेचे निवेदन 'संतकवी चरित्रा'त कै. आजगावकरांनी केलेले आहे. ज्ञानदेव मुकुंदराजांच्या आधी समाधिस्थ झाले म्हणून त्यांची ग्रंथरचना मुकुंदराजांना करावी लागली असे काहीसे वाचल्याचे स्मरणात आहे. या परंपरागत नोंदीला उद्बोधनाथांच्या ओवीतील कालखंड पाठबळ देणारा आहे. अशा रीतीने ज्ञानदेवांनी सांगितलेल्या ज्ञानदेवीची पोथी मुकुंदराजांकडून नृसिंहभारतीला मिळाली. नृसिंह सरस्वतीचे अभिधान सच्चिदानंद असावे असे जर मान्य केले तर सच्चिदानंदांनी ज्ञानदेवीचा ग्रंथ म्हाळसेच्या देवळात प्रथम उतरवून घेतला. तोच ग्रंथ विद्याधराला प्राप्त झाला. मुकुंदराज आणि विद्याधर या गुरुशिष्यांचा शोध घेण्यात राजवाडे प्रतीची प्राचीनता सिद्ध होणार नसेलही पण ज्ञानदेवांच्या आणि मुकुंदराजांच्या काळावर प्रकाश टाकणारा तो श्लोक आहे. त्या दृष्टीने राजवाडे प्रत महत्त्वाची आहे. असे असता मुकुंदराजाचा नावनिर्देश जनार्दनानंतरचे परंपरेत पाटांगणातील शिष्यमंडळीत वा आद्यगुरूत का नव्हता याचे कारण शोधता येण्यासारखे आहे.

## मुकुंदराज नाथसंप्रदायी नव्हते

एकनाथापर्यंतची संतपरंपरा प्रामुख्याने भागवती होती. एकनाथाच्या आधीचे कालखंडात होऊन गेलेले संत भागवती होते. ज्ञानेश्वराचे गीताभाष्य ह्याच त्यांच्या पठणातील एकुलता एक ग्रंथ. या ग्रंथाबरोबरच ज्ञानदेवादि संताचे अभंग कीर्तनासाठी योजिले जात असत. निरनिराळे लेखक आपल्या गुरूंची काव्ये उतरून घेत व जतन करून ठेवत. ज्ञानेश्वर परंपरेत वेदान्ताला थारा नव्हता. ज्ञानेश्वराने आपल्या गुरुपरंपरेत शंकराचार्यांना वंदन केलेले नाही. तसेच अभंगातून कोणत्याही आचार्य परंपरेचा बोध होत नसून केवळ सिद्ध परंपरेचाच बोध होतो. त्याअर्थी ज्ञानदेवांची परंपरा सिद्धनाथांची, बौद्धाकडून शून्यवादाच्या मार्गाने आलेली, सहजयानी परंपरा होती असे दिसते. याच परंपरेत मच्छिंद्र, गोरख, कबीर अशा सकृतदर्शनी वेदान्ती वाटणाऱ्या सिद्धांचा वा सहजियांचा अंतर्भाव होता. या परंपरेत योगाचे महत्त्वाचे स्थान असून षट्चक्रादि भेदाचे विशेष महात्म्य होते. विवेकसिंधूचा मार्ग शांकरी होता. 'शांकरोक्तिवरी ।। मी बोलिलो वैखरी ।।' असे मुकुंदराजांचे कथन आहे.

पण मुकुंदराजांना षड्चक्रे वा कुंडलिनीचा प्रवास या कल्पना वाटतात. 'एक तत्त्व व्यापक म्हणति । देहामध्ये एक स्थानी कल्पिती । ते एक काहीच नेणती । खंड ज्ञानीजे ।।४७।।' असे मुकुंदराज म्हणतात आणि पुढे सांगतात 'सप्तचक्रांचे अंतराळ । तेचि परमतत्त्वाचे निर्मळ । ऐसे बोलती बरळ । ते ज्ञानहीन ।।५६।। एक आधारी बंद घालिती । प्रसुप्त कुंडलिनीने पवने चेतविती । षड्चक्रे भेदुनि नेती । ब्रह्मरंध्रासी ।।५७।। तू मेरू ना त्रिकुट । तीन ग्रंथी ना श्री हट्ट । भ्रमरी गुंफा ना कोल्हाट । कैसेनी तू ।।६१।।' असा विवेकसिंधूचा पक्ष असून. 'इडा पिंगळा एकवटती । गाठी तिन्ही सुटती । साही पदर फुटती । चक्रांचे हे ।।६।।४।। असा ज्ञानदेवांचा दावा आहे. 'गोल्हाट त्रिकूट ब्रह्मरंध्री वस्तु । तुर्येचि ऐसि मातु याची ज्ञाने ।।' असे अभंगातही वर्णन आहे. एके ठिकाणी ज्ञानदेव म्हणतात, 'त्रिकुटगिरीचे शिखरी । क्रीडा करी नानापरि गे ।।' 'भ्रमरी गुंफा' हे नाथपंथीयांचे आवडते रूपक आहे. नाथपंथीयांचा योगमार्ग मुकुंदराजांना संमत नाही. पण मुकुंदराजांचा वेदान्त आणि नाथपंथीयांचे तत्वज्ञान यांचे साम्य दिसते; ह्याचे कारण नागार्जुनाचा शून्यवाद गौडपादाचार्यांच्या वेदान्तापासून शांकर वेदान्ताच्या मार्गाने मुकुंदराजाकडे गेला आणि तोच शून्यवाद, सरहपाद, लुईपा, ( मीनपा ) मच्छेन्द्रनाथ इत्यादींच्या तत्वसरितांच्या वाटेने वज्रयान, शून्ययान, विज्ञान, आणि सहजयान इत्यादि निरनिराळ्या धारा घेऊन गोरखनाथांच्या कावडीतून इंद्रायणीच्या जीवनाने परिप्लुत झालेल्या ज्ञानदेवांच्या गीतेत आणि विशेषतः अभंगाचे मुळाशी जीवनाच्या रूपाने संचित झाला. एकनाथाच्या कालखंडापर्यंत सर्वसाधारण संतांत आणि समाजात शांकरी वेदान्ताविषयी प्रीती नसावी. ज्ञानेश्वरी आणि विवेकसिंधु यांची पारायणे कदाचित उच्चवर्णीयांत होत असतीलही. शांकर वेदान्ताचा प्रभाव महाराष्ट्रात कोणत्या कालखंडापासून मूळ धरू लागला

याचा शोध घेणे अगत्याचे आहे. शांकर वेदान्त हा संस्कृत असल्यामुळे त्याची चर्चा केवळ संस्कृताचे ज्ञान असणाऱ्या भटा पंडितात चालू असावी. पण सर्वसामान्य जनांना ज्ञानेश्वरीशिवाय आणि महानुभावीयांच्या काव्याशिवाय फारसे रुचणारे, आवडणारे, मनोरंजन करणारे नसावे. एकनाथपूर्वकालीन अभंगांवर वा काव्यावर संस्कृतची छापही नाही. असे असता महाराष्ट्रात शांकर वेदांताचा कर्मठपणा झिरपू लागला तो एकनाथाचे कालखंडापासून असावा. कारण मुकुंदराजानंतर शंकराचार्यांचा सन्मानपूर्वक निर्देश करणारे दुसरे संत एकनाथ होत. 'वंदू आचार्य शंकरू। जो ग्रंथार्थ विवेकचतुरु ॥' असे एकनाथाने त्यांना वंदन केलेच आहे. पण त्यातील कर्मठतेचा विचार आपण दूर सारला आहे असेही एकनाथ म्हणतात. 'सारुनी कर्मठतेचा विचारु। प्रबोधदिनकरु प्रकाशला।' शांकरवेदान्ती आणि भागवती परंपरा नाथांच्या काळापासून महाराष्ट्रात एकत्र नांदू लागली. नाथांच्या काळानंतर वेदान्ती प्रभाव वाढू लागला. आणि संतपरंपरा लुप्त झाली असे दिसते. वेदान्ती प्रभाव आणि मुकुंदराजाच्या विवेकसिंधु इत्यादि ग्रंथांचे पठण, मनन, यामुळे मूळ संस्कृत ग्रंथ तपासण्याची वा मराठीचे ग्रंथ संस्कृतात अनुबद्ध करण्याची वृत्ती उफाळून आली. याच पार्श्वभूमीतून पुढे पंतकवींचा उदय झाला. हे विषयांतर झाले असेल. पण ज्ञानेश्वरी आणि विवेकसिंधु यांच्या एकत्र अभ्यासाला जी चालना प्राप्त झाली ती एकनाथ कालखंडात झालेली दिसते. एकनाथ फारसे वृत्तीने सोवळे वा कर्मठ नसावेत असे त्यांच्या अभंगातून जाणवते. प्रत्यक्षात त्यांचे आचरण कसे होते हे सांगता येणार नाही. पण नाथांपर्यंतच ही सहिष्णुवृत्ती महाराष्ट्रात असावी असे दिसते. पाटांगण परंपरा कर्मठ परंपरा असावी असे वाटते. तीवर पाटांगण परंपरेचे अभ्यासक प्रकाश टाकू शकतील. जनार्दनापासून प्रारंभित होणारी परंपरा एकनाथाला दूर ठेवते कारण ती नाथपंथीय संतांची परंपरा नसून कर्मठांची परंपरा आहे. याच पाटांगण देवस्थानात शंकराचार्यांच्या तत्वज्ञानासाठी विवेकसिंधु आणि गीताभाष्यासाठी ज्ञानेश्वरी यांचे अखंड पारायण, वाचन, प्रवचन होत असावे.

मुकुंदराजांचे गुरुघराणे नाथपंथीय होते असा एक तर्क रा. चिं. ढेरे ह्यांनी मांडला आहे.[३५] हरिनाथ हे मुकुंदराजांचे आदि गुरु होत. केवळ नाथ ह्या अभिधानाशिवाय हरिनाथांना नाथ म्हणावे असे काहीच नाही उलट 'मग आपुले इच्छावशे। अनुष्ठानाचेनि दशांशे हवन आरंभिले परेशे। हरीने महाकुंडी।' इत्यादि ओवींवरून हरीनाथ हे श्रौतस्मार्त धर्मीय असावे. होमहवनादी विधीशी नाथपंथीयांशी नाते नसते. मुकुंदराजांचे कालखंडात नाथपंथीयांत व्रतबंध होत असावा असेही वाटत नाही. हे नुसते अनुमान आहे. पण याज्ञिक क्रियेचे संपादन ज्या अर्थी हरिनाथांनी केले त्याअर्थी त्यांचा आणि नाथपंथीयाचा नाथ ह्या विशेषणापलीकडे संबंध नसावा असे दिसते. तात्पर्य मुकुंदपरंपरा ही शांकर परंपरा असून ती एकनाथाच्या काळात फोकावुन आली आणि ज्ञानदेवांची परंपरा असून नाथपंथीय परंपरा ती मात्र वारकऱ्याच्या हरिकीर्तनात सदैव अमर राहिली. वेदान्तातील ब्रह्म आणि मायेच्या अगम्य तत्वज्ञानापेक्षा, नामसंकीर्तनाच्या परंपरेनेच महाराष्ट्राचे आध्यात्मिक जीवन अधिकांश घडलेले आहे.

---

३५. गुरु गोरखनाथ, पान १४२

□ □

# विप्रलंभा

पद्मिनी बिनीवाले

आज तो खूप दिवसांनी आला होता. त्याच्या गळयात हात टाकून ती म्हणाली, " आता आपण चार दिवस खूप छान निवांत घालवायचे."

" हो हो !'' तो म्हणाला. काय काय करायचं बोल !

" एक दिवस पिक्चरला जायचं. खूप दिवसांत पिक्चर पाहलला नाहीयाय. एक संबंध दिवस नुसतं भटकायचं. एक दिवस साधंच पण छानसं जेवण करून घालणार मी तुला ! खूप दिवसांत माझ्या हातचं जेवला नाहीयास. आणि तुला कापड घ्यायला जायचं. माझ्या लक्षात आलाय तुझे सगळेच बुशकोट जुने झाले आहेत. कुठं जायचं म्हटलं तर तुझ्याजवळ चांगलासा बुशकोट नाहीयाय... मला एक स्वेटर घ्यायचा आहे तुझ्या पसंतीनं. सकाळी लवकर कामावर जावं लागतं मला, तेव्हा अंगात काहीतरी ऊबदार असावसं वाटतं. अलीकडे फार थंडी पडते."

" हो ! हो ! सगळं करू. " तो तिला जवळ घेत म्हणाला पण हे बघ राणी. " आता मी काय सांगतो आहे तिकडं जरा लक्ष दे बरं. विषयांतर करू नको." त्यानं तिला एक पत्र दिलं. म्हणाला, " हे बघ मला पत्र आलंय. वाच ते. "

" अय्या " पत्र वाचता वाचताच ती म्हणाली " तुला बोलावणं आलं आहे. प्रदर्शनाच्या उद्घाटनाला. सुजालपूरला म्हणजे बंगालमध्ये ना रे ? म्हणजे माझ्या आवडत्या साईडला ! तुझ्या चित्रांचं प्रदर्शनही भरवणार आहेत की रे. तू किती लांब पोहोचला आहेस नाही." तिला आनंदाची एक उसळी आली. " पण काय रे तुला सुजालपूरला जाऊन यायला किती दिवस लागतील रे " तिनं लहान मुलीसारखा प्रश्न विचारला.

' हं !' ती उसासा टाकत म्हणाली " म्हणजे परत आठ दिवस आम्ही एकटचा." तोंड चिमणीएवढं झालं.

" मग नको का जाऊ राणी " तिचा चेहरा आपल्या दोन हातांच्या तळव्यात पकडत तो म्हणाला " तुला फार एकटं वाटणार असेल तर नाही जात."

अवसान गोळा करत ती म्हणाली, " नाही नाही. जाच तू. तू जायलाच हवं. एवढी छान संधी आली आहे प्रदर्शनाच्या उद्घाटनाची, ती वाया नाही घालवयायची. त्या निमित्तानं इतर चित्रकारांच्याही ओळखी होतील. तुझ्या मनातले विचार इतरांपुढे मांडता येतील, जायलाच हवं तू ! आपल्या माणसापासून लांब जाण्यात आपल्या माणसाला दूर पाठविण्यातसुद्धा एक वेगळी गंमत असते."

तिनं हाताच्या बोटांवर त्याच्या जाण्याच्या तारखा मोजल्या. पण तिला माहीत होतं हे दिवस असे पंखा-सारखे मिटणार नाहीत. ते एऽऽक, दोऽऽन, तीऽऽऽन, चाऽऽर, असेच जाणार.

योगायोग तरी कसा ! त्याच दिवशी तिनं भिंतीवर एका विप्रलंभेचं चित्र लावलं होतं. नुसतेच तोडे घातलेले दोन सुरेख पाय, त्यावर घागऱ्याचा थोडासा भाग, आजुबाजूला गवत, गवतात रंगीबेरंगी रानफुलं. पुढं पाण्याचं तळं आणि वरच्या ओसाडीत एक एकाकी चिमणं पाखरू......हे चित्रही त्यानंच केव्हातरी दिलेलं......

स्टेशन

श्री

शुभास्ते पंथानः सन्तु ।। शुभास्ते पंथानः सन्तु.

प्रिय—

जपून. जा तिकडे थंडी असेल. बॅगेत स्वटर आहेच. व्हिक्सची बाटली आहे रुमालांच्या घडयांत तुझं आवडतं सेंट आहे. आणि खास तुझी माझी अशी चार चाफ्याची फुलं. चार दिवस घालायचे कपड्याचे सेटवेगवेगळे ठेवले आहेत. कंटाळा येऊ नये म्हणून मासिके आहेत. तुला नेहमी बरोबर लागतं ते स्केचबुक पायजम्याच्या घडीखाली आहे. शिवाय रंग कुंचले आहेतच. फराळाचे डबे रिकामे करून आणायचे आहेत.

शुभास्ते पंथानः सन्तु

शुभास्ते पंथानः सन्तु

शुभास्ते पंथानः सन्तु

प्रिय– माझा मेंदीनं रंगलेला हात
तुम्ही प्रथम हातात घेतलात,
तेव्हाच माझ्या हातावरील भाग्यरेषा
तुमच्या हातावर उमटल्या आहेत.
आज तुम्ही दूर चालला आहात म्हणून या
गोष्टीची आठवण करून द्यावोशी वाटते—

प्रिय—तुम्ही माझ्या माहेरच्याच गावाला जात आहात
मला काळजी करण्याचे काहीच कारण नाही
पण माझी धाकटी बहीण फार खटयाळ आहे
व लहानपणापासून माझ्या मालकीच्या गोष्टीत
भागीदारी करण्याची तिला वाईट खोड आहे.

प्रिय—

प्रवासात आजचे क्षण आठवा
येतांना मात्र प्रवासात घडलेले सारे विसरून या

* * *

मन–सुजालपूर
मुक्काम–पुष्करनगर

तुझ्याआधी तू पोहोचण्याआधी माझं हे पत्र पोहोचलेलं पाहून तुला आश्चर्य वाटलं असेल ना ? पण मुद्दामच आले अशी स्वागताला ! मला माहिताय एकदम परक्या प्रांतात, परक्या लोकांत तुला बावरल्यासारखं होतं. मागं राहिलेल्या सगळ्यांसाठी तुझं मन भरून येतं म्हणून हा अगोचरपणा...आणि आता मला असंच इथल्या लोकांच्यात एक होऊन राहयचंय नेहमीसारखंच...तू स्टेजवर, मी खाली... लोकांच्यात जसा काही तुझामाझा काही संबंधच नाही...पण हे आपलं लोकांपुरतं...

* * *

हस्तिदंती कांतीचा मोर
आपला पिसारा विकलपणे पसरून बसला आहे...

मोरपिसाऱ्यावरील डोळ्यांची निरर्थकता नव्याने जाणवते आहे.

* * *

म–नसुजालपूर
मुक्काम–पुष्करनगर

तू उतरला आहेस ती खोली म्हणजे एक कॉट. गादीवर शुभ्र चादर. पांघरायला खास 'बोंगाली शॉल'. एका कोपऱ्यात टेबलखुर्ची...टेबलावर छानसा टेबलक्लॉथ–एक इञ्जिचेअर. एक कपाट. भिंतीतलं... दरवाज्याजवळ एका आरशाचा हॅटस्टॅन्ड–खिडकीतून काही नारळीची झाडे दिसत असतील. रस्त्यावरची वर्दळही...अशीच ना ?

जेवायला निघाला आहेस ना ×××× कडे जाताना पैसे वगैरे व्यवस्थित ठेवून जा, बॅगला चांगलंस कुलूप लावून जा. आणि खोलीचं कुलूपही नीट लावलं आहेस का बघ हं...

आज तुझं व्याख्यान आहे ना ! कशावर बोलणार आहेस ! 'कलावंताचे विश्व' मग काय तुझ्या आवडीचा विषय. लोक खूष होणार...आणखीसुद्धा आमंत्रणं येतील—

तुझं भाषण चालू असताना मी आहेच तिथं टेबलावरील फुलदाणीतील एका फुलात—तुला आवडणाऱ्या—

* * *

हेमंतातील या सुन्न दुपारी
फिकट ऊन पसरले आहे
पानझडीमुळे वृक्षांच्या फांद्या निष्पर्ण झाल्या
आहेत.

ही नगरी आज,

म्लानवदन, मुक्तकेशा, प्रोषितभर्तृकेसारखी उदास दिसते आहे.

* * *

मन–सुजालपूर
मुक्काम–पुष्करनगर
पडद्यावरील मोराजवळ

सगळे खूष ना कालच्या व्याख्यानावर? मग मी काय म्हटले होतं... पण हे बघ काल रात्रभर कालच्या व्याख्यानाचं खूप कौतुक ऐकलं हं...कोणी कसं बघितलं कोण काय म्हणालं...व्याख्यान झाल्यावर कोणीकोणी जातीनं अभिनंदन केलं...वगैरे. पण आता बोलण्यात वेळ घालवायचा नाही हं. आजचं चित्रांचं प्रदर्शन खूप आवडलं पाहिजे लोकांना... पेंटिंग्ज कशी कुठं ठेवायची ते ठरव बरं आता. ते चांदण्या-रात्रीचं चित्र आणि ते रणभूमीचं चित्र लोकांना पटकन दिसतील अशी ठेव. ते वादळाचं चित्र जरासं अंधारात ठेव म्हणजे त्याची डेप्थ चांगली जाणवेल. आणि ते न्यूडचं चित्र...त्याच्यावर तर उड्या पडतील–नक्की मागणी येणार त्याला–देणार का तू ते? माझ्या ते फार आवडीचं आहे–खरं सांगू तो चेहरा आणि ते भाव तुझेच आहेत.

* * *

आज आकाशात शुक्र–चंद्र युति पाहिली,
तुझ्यामाझ्यातले अंतर जाणवताच
उरात धस्स झाले

* * *

मन–सुजालपूर
मुक्काम–पुष्करनगर, सतारीजवळ.

आज तुझ्या चित्रांचं प्रात्यक्षिक आहे. ना? रेखाचित्र काढून दाखविणार आहेस ना? वातावरणातून माणसांच्या फिगर्स दाखविण्याची तुझी कल्पना तिथल्या लोकांना फारच आवडेल.

बरोबर काही पेंटिंग्ज घेतली आहेस ना... त्यातली प्रेझेंट म्हणून दे कुणाकुणाला...त्यांच्याकडे उतरला आहेस त्यांना ते 'Image'चं पेंटिंग दे–तुझी एक छानशी–कायमची आठवण राहील त्यांच्या-जवळ. आणि ते बंगाली गृहस्थ आहेत ना, तुला मासे खायला येण्याचा आग्रह करणारे, त्यांनाही एक दे... रुजू दे तुझी कला बंगभूमीत–तो प्रांत माझा फार आवडता आहे हं.

शांतिनिकेतनाला भेट देणार आहेस ना? कुठं माझी आठवण काढली नाहीत तरी तिथं काढ हं–रवींद्रांच्या शांतिनिकेतनाचं मला फार आकर्षण आहे. तिथल्या झाडाची निदान एक आम्रपाली माझ्या-साठी आण...नाही तर तिथलं एखादं फूल, पान–गवतसुद्धा चालेल.

बंगाली मिठाई खाताना माझी आठवण येणारच. कारण ती माझी नेहमीची खास फर्माइश–शरश्चंद्राची कमल, बंकीमचंद्राची मृणालिनी चौधुराणी, दिसतील कुठेकुठे. तशीच कमळांची तळीही...पण जपून हं... कमळं फार खोल असतात म्हणे.

* * *

उन्हे ओलीस ठेवून गेलास,
जातांना म्हणालास
आत्ता येतो ही समोरची कमळे मिटायच्या आत,
पाकळ्या घट्ट मिटलेली कमळे हरवून गेली.
तळ्यातळ्या पाण्यावर पसरणाऱ्या अंधारात,
कानावर येणाऱ्या
कमळात अडकलेल्या
भुंग्यांच्या गुंजारवाने,
माझे मन पोखरून निघते आहे.

* * *

मन––सुजालपूर
मुक्काम––पुष्करनगर, आरशासमोर

तू निघालास तेव्हा मी मला काहीतरी आणच असा *हट्ट धरला होता. त्या हट्टाचा अर्थ (......) असा होता. तो तुला कळलाच नाही. मला माहिताय असं कुठं कामासाठी जायचं असलं की एरवी गोड वाटणाऱ्या अशा हट्टाचा तुला राग येतो.

आता अगदी परक्यासारखं सांगते. अहो! श्री. अमुक, अमुल आपल्याला जमल्यास येताना माझ्या-साठी एखादी सुंदरशी हस्तिदंती वस्तू नाहीतर, एखादा बांबूचा वॉलपीस घेऊन याल का?

पण खरं सांगू का मला आता मिठाई, वॉलपीस काही काहीच नको. फक्त तूच आणि रवीन्द्रांच्या शांतिनिकेतनातलं एक आंब्याचं पान.

ता. क.–तुझ्या मनाला उगीच हुरहूर नको म्हणून कंसातल्या ठिपक्यांचा अर्थ देत आहे.

* (आपल्यासाठी इतक्या दूर आपली आठवण घेऊन आपलं माणूस हिंडणार याचा आनंद)

* * *

ती आरशासमोर बसली आहे,
सखा परतून येताना
तिच्यासाठी आणणार असणारी साडी
ती नेसून बघते आहे.
हातात (सखा आणणारी) काकणे चढवते आहे,
तो आणणार असणारा गजरा माळण्यासाठी
आपल्या मोकळ्या केसांची वेणी माळते आहे
पण......हे सारे मनात
ती नुसतीच आरशापुढे बसून
त्याची वाट पाहते आहे.

आता पत्र नाहीच. आता तूच या दिशेनं येणार–तुझ्यामाझ्यातलं अंतर स्टेशनास्टेशनानं कमी होणार––आणि आता मी तरी 'मी' कुठं उरल्याय......मी आहे एक स्टेशन, पाय उंच करून आतुर डोळ्यांनी दुरून येणारी गाडी न्याहाळणारं ! तुझी गाडी खूपच बिफोर–टाईम येणार......कारण तिच्या गतीत तुझी गती माझ्या मनाची गती मिसळणार......आता तुझी गाडी येणार ती थेट मी या स्टेशनवर थांबणार.

*

आज काहीही सणवार नसताना,
तिने आपल्या दारांना पानाफुलांची तोरणे
बांधली आहेत. दारापुढे रंगावली रेखली आहे.
घरापुढील सज्जात एका पणतीवर दुसरी पेटवताना

ती मनातल्या मनात लाजते आहे......
बहुतेक गावाला गेलेला तिचा प्रियकर
आज परतून येणार असावा......

□ □

## ॥ प त्रे ॥

### 'पुन्हा एकदा मृणालिनीचे लावण्य'

कुमुद करकरे

'मृणालिनीचे लावण्य' या जुन्या कथेवरील परीक्षण चांगले आहे. अशाच तऱ्हेने आणखी काही कथांचा आढावा युगवाणीने घ्यावा.

काही वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेली "श्रीशिल्लक" ही शरश्चंद्र चिरमुले यांची कथाही अशीच भेदक आहे. एखाद्या जाणत्या, तरल बुद्धीच्या लेखिकेला तिचे परीक्षण लिहिण्यास सांगावे. कारण एखादी स्त्रीच त्या कथेला अधिक चांगला न्याय देऊ शकेल असे वाटते.

□ □

### 'नारायण सुर्व्यांची कविता'

शांताराम पारपिल्लेवार

श्री. गांडगीळ ह्यांचा मागच्या युगवाणीमधील सुर्वे ह्यांच्या कवितांसंबंधीचा लेख विस्कळित आणि मनात आकस ठेवून लिहिलेला वाटला. त्यातील विधानं पूर्वदूषित ग्रह असल्यासारखी वाटली. लेखक कुठेही खोलात शिरलेलाच नाही. सारीच विधानं वरवरची, विपर्यस्त, वरपांगी आणि भ्रामक आहेत.

',कलेने सबंध समाजाचे आकलन' करण्यास समर्थ असावे म्हणजे नेमके काय ? कोणत्याही लेखकाला किंवा कलाकाराला समाजाचे 'पूर्ण' चित्रण दाखवणे कसे शक्य आहे ? लेखक जे पाहील, भोगील तेच तो इमानदारपणे लिहू शकेल. त्या अर्थाने लेखकाचा आवाका मर्यादित आहे. परंतु ही मर्यादाच त्याची शक्ती ठरते. त्याच्या आत कुठेतरी मुरलेले हे जीवन शब्दात साकार होऊ पाहाते, तेव्हा तो एक साक्षात्कार असतो. लेखक आणि वाचक दोघांनाही. कवी किंवा लेखक हे केवळ बातमीदार नव्हेत की थेट गल्लीगटारापासून तो चंद्रावर पाऊल ठेवणाऱ्या चांद्रवीरापर्यंत ह्यांनी रिपोर्ट लिहून द्यावा. गाडगीळांच्या मताप्रमाणे फक्त बातमीदारच 'समाजाचे पूर्ण चित्रण' करण्यास समर्थ म्हणवले जावेत. पूर्ण चित्रण कोणताच कलाकार केव्हाही करू शकणार नाही. चित्रण फक्त आतल्या बंदिस्त केलेल्या विश्वाचा एक अंशमात्र तुकडा असेल. आणि त्या तुकड्याची ताकद बिंदूने सिंधू दाखवावा एवढी भव्य असेल.

'कामगार सुर्व्यांची कविता डोक्यावर घेवून नाचले तर त्यात आश्चर्यजनक काहीच नाही–' हेही एक असेच गलथान विधान. कामगारांना सुर्व्यांची कविता कितपत कळते ते एक कामगारच जाणोत. पण मला प्रामाणिकपणे असे वाटते की कामगार रोजीरोटीच्या मागे धडपडत असताना कविताबिविता वाचायला त्याला वेळ कुठे आहे अन् वेळ असला तरी ती त्याच्या पचनी पडते काय ? त्याच्यासाठी कविताबिविता भंकस आहे. त्याने पोट भरते का ? अन् कविता खरंच कुणी वाचतं का हो ? राबर्ट ग्रेव्ह म्हणाल्याचं आठवतं–पोएट राईटस् फॉर पोएटस् ओन्ली.

गाडगीळ एक प्रश्न विचारतात–' क्रांतीला प्रवृत्त करणे हा सुर्व्यांच्या काव्याचा हेतू आहे काय ?' थोडं पुढं जाऊन ते म्हणतात–, 'त्यांची कविता आत्मकेंद्री, स्वानुभवाधिष्ठित आणि तरीही प्रचारक आहे.'

आता कविता 'आत्मकेंद्री' म्हटली की ती सब्जेक्टिव्ह झाली. तिला हेतू जोडला की ती ऑब्जेक्टिव्ह झाली. म्हणजे गाडगीळांना नेमके म्हणायचे तरी काय ! आत्मकेंद्री आणि स्वानुभवाधिष्ठित कविता फार तर चिंतनशील होईल. तिला हेतू चिकटणार नाही. तिला प्रचाराकरिता राबवणे म्हणजे बुद्ध्याच एक आरोप करणे आहे. आणि सुर्व्यांना ह्याची नेमकी जाण आहे. म्हणून त्यांच्या एका कवितेत ते म्हणतात—'बेअब्रू खूपच झाली; अब्रूदारांच्या जगात.'

सुर्व्यांचे जीवन, तत्वज्ञान, निष्ठा, श्रद्धा, सारे सारेच त्यांच्या कवितांत आलेले आहे. त्यांनी जे भोगले तेच शब्दांत ओतले आहे म्हणून त्यांच्या शब्दांना वजन प्राप्त झाले आहे. रोजचा उगवणारा सूर्य त्यांच्याकरिता फक्त भाकरीपुरता सोयरा होता, नाल ठोकण्यापासून तो गोदीत वाधिणी भरताभरता कवी अक्षरं गिरवायला लागला. त्याची धूळपाटी म्हणजे उघड्या जगाचं दालन होतं. खांब मोजून बाराखडी शिकायला लागला. ही त्याच्यासाठी, त्याच्यापुरती जागृती होती. एक क्रांती होती. आणि जेव्हा त्याने त्याच्या आत्म्याचा हुंकार, शब्दात ओतला ते शब्द शब्द राहिले नाहीत; ते स्वयंभू झालेत. शब्दात एक जीवन आकारलं–असं जीवन ज्यात धडपड आहे, उत्थान आहे. भविष्याची एक तळमळ आणि जाणीवपूर्वक जोपासलेली आशा आहे. त्या साऱ्याला आम्ही अलगद नाकारलं. फक्त एक लेबल लावून–कॅम्युनिस्ट असे म्हटल्याने एक तर झालं म्हणजे आम्ही तथाकथित उच्चभ्रू जीवन जाम लोण्यासारखं चघळत जगणारे, बूर्ज्वा, पंख्याखाली सोफ्यावर लोळत किंवा कॉफी हाऊसमधे वा बारमधे सिगारेटच्या धुरात जीवन, कला, संस्कृती ह्याचे संदर्भ देत एका बिनडोक घोळक्यापुढे एका वजनदार कवीला सुळावर चढवून दिले. पण त्याने होते काय ? सुळी जाणारा नेहमीच 'ग्रेट' होत असतो.

मराठी वाङ्मयाच्या संपूर्ण संदर्भात सुर्वेंचे स्थान कुठे आहे ते एक काळच ठरविणार. आज कलेचे सारेच निकष पुन: तपासून घ्यायची वेळ आलेली आहे. कलेचे कोणतेच मानदंड स्थायी राहिलेले नाहीत. अशा वेळी सगळ्यात जास्त अनुकरण अर्थात नवीन पिढीकडून कुणाचे होत असेल तर नारायण सुर्व्यांचे. आज लिहिल्या जात असलेल्या अर्ध्याहून जास्त कवितांचा तोंडवळा नारायण सुर्व्यांच्या कवितांसारखा आहे. ह्यापेक्षा मोठी आणि गौरवाची गोष्ट कोणती आहे ?

श्री. गाडगीळ आणि अशाच 'हुन्नरी' लोकांसंबंधी सुर्वेंची एक कविता उद्धृत करण्याचा मोह टाळता येत नाही.

'–तर हे हरहुन्नरी लोक
शब्द गिरवणारेही त्यात
शब्द वितळवल्याची घोषणा करतात
तेव्हा हंसू येते; वाटते,
उभ्या उमरीत त्यांना एवढेच जमले
शब्द जगवताही आला नाही
जगताही आले नाही.'

□ □

---

## वर्गणीदारांसाठी

ज्यांची वर्गणी संपली आहे अशा वर्गणीदारांनाही 'युगवाणी' चा अंक आम्ही पाठविलेला आहे. कृपया पुढील वर्षाची वर्गणी त्यांनी त्वरित पाठवून 'युगवाणी' वरचा लोभ कायम ठेवावा ही विनंती.



अनुक्रमणिका

# अंधार

अशोक दातार

' मग काय या महिन्यातसुद्धा दुष्काळ मागील अंकावरून पुढे चालू ठेवायचा का ? '

माझ्या स्वतःलाच मोठ्याने विचारलेल्या प्रश्नावर फिरोझा खुदखुदली. माझ्याबरोबर सहा महिने काम केल्यानंतर तिला माझा उपहास थोडा फार समजायला लागला होता आणि अशावेळी पावती दिलेली मला आवडते हेही त्या चतुर मुलीने ओळखले होते.

' बरं मग लिहा, लागोपाठ दुसऱ्या महिन्यात पश्चिम हिन्दुस्थानात पावसाने दगा दिला. परिणामतः जुलै-ऑगस्ट या दोन महिन्यांत सर्व खोकल्याच्या औषधांची विक्री गेल्या वर्षीच्या तुलनेने ३० टक्क्यांनी कमी झाली. मात्र आपल्या कफेक्सची विक्री फक्त १० टक्क्यांनीच घटली ' आता तुम्ही म्हणाल, हा महान चमत्कार कसा काय घडला ? खरं म्हणजे मला हे का झालं काही कळत नाही. शक्यता एवढीच आहे की आमच्या मार्केट रिसर्चच्या आकड्यात अंदाजांचे फरक झाले असतील. असो. पण माझ्या म्हणण्यापेक्षा रिपोर्टमध्ये पार्टी लाइन जास्त महत्त्वाची......... गेल्या वर्षीच्या मार्केट रिसर्चवर आधारित आपली नवी १०० फुटांची रंगीत फिल्म जिथे जिथे प्रसृत झाली तिथे तिथे विक्रीचे उत्साहवर्धक रिपोर्टस् आले आहेत. मार्केट रिसर्च मॅनेजरचो जय. आणि शिवाय, मुंबईच्या सर्व प्रमुख वर्तमानपत्रांत पहिल्या पानावरील पगाराच्या पहिल्या आठवड्यात दिलेल्या जाहिरातींनी दुष्काळाच्या आणि कोरड्या हवेच्या महिन्यात सेल खेचला. मला वाटतं आपल्या जाहिरातीचा नवा सुधारलेला मजकूर अधिक परिणामकारक ठरला आहे. मार्केटिंग मॅनेजरच्या सूचनांचा जय. मात्र सप्टेंबर ऑक्टोबर सुद्धा कोरडे गेले तर आपल्या विक्रीवर अतिशय परिणाम होईल-खोकल्याचा दमट सीझनमध्ये वर्षाची निम्मी विक्री होते त्यामुळे विक्रीतील घटीचा आपल्या वार्षिक उद्दिष्टांवर फार महत्त्वाचा परिणाम होईल... आनंद आहे. दुष्काळाचा आणि आमचा एवढाच संबंध आहे. आणि सखूबाई तुमचा ? त्याहून साला कमी, आमचे उदात्त शब्द तुमच्या कानातून आणि बोटांतून कागदावर उतरल्यावर तुम्हाला कशाचेच सोयरसुतक नाही... ......त्यांतून पुन्हा लोकांच्या कमी झालेल्या क्रयशक्तीचे परिणाम......म्हणजे काय की गरीब, म्हातारे पेन्शनर्स वगैरे अधिक रात्री खोकल्याच्या मंत्रजागराने जागवतील......वार्षिक विक्री अंदाजापेक्षा कमी व्हायची शक्यता लक्षात घेऊन नफ्याचे रक्षण करण्याकरिता दुष्काळग्रस्त भागात ताबडतोड सिनेमा जाहिरात बंद करण्यात येत आहे, तसेच दुसऱ्या व तिसऱ्या दर्जाच्या वृत्तपत्रांतील जाहिरातींचे प्रमाणही कमी करण्यात येत आहे. अर्थात हिवाळा अनुकूल असला तर पुन्हा जाहिरातीतील कपात कमी करता येईल. अमेरिकेचे अध्यक्ष आपल्या सोयीप्रमाणे गरीब बिचाऱ्या देशांना मदतीचा झरा कमी जास्त प्रमाणात सोडतात. इकडे आम्ही आपल्या जाहिरातींचे झरे निरनिराळ्या दुष्काळग्रस्त प्रदेशांत कमी जास्त प्रमाणात सोडतो आहोत. रिपोर्ट लिहिण्याची मासिक पाळी संपली होती. बरं फिरोझा, परत एकदा वाचून दाखव मला सगळा रिपोर्ट...आणि ताबडतोब सगळ्या स्टेन्सिली बडव-दुपारी चारच्या आत रिपोर्ट तयार पाहिजे बरं का ?

फिरोझा माझा महान रिपोर्ट मला पुन्हा सुनवायला लागली. रिपोर्ट डिक्टेट करण्यात माझे जेवढे मन होते, जेवढा उत्साह होता तितक्याच उत्साहाने तिचे वाचन चालू होते. फक्त वाक्यांची तोडमोड भलभलत्या

ठिकाणी करून अर्थात त्यामुळे मजा येत होती. ती रिपोर्ट वाचताना माझे फक्त कानच त्या रिपोर्टात होते–डोळे तिला निरखीत होते. सुरुवातीसुरुवातीला मिनी स्कर्टमधील तिचे तांबूस गोरेपण मला खूप उत्तेजित आणि अस्वस्थ करायचे–वाटायचे–या थंडगार खोलीत मी माझ्या नकळत तिला कचाकच खाऊन टाकले तर आरामात बाहेर पडता येईल का? पण आता इतक्या दिवसांच्या संवयीने मला तिच्या शरीराची सर्व वळणे परिचित झाली होती–त्यांचे अपरुप संपले होते. त्याच्या उलट तिच्या चेहऱ्यावर झळकणाऱ्या पारशी बावळेपणाची मला जास्त आवड निर्माण झाली होती.

दुपारी चार वाजता सर्व थोर थोर मंडळी कॉन्फरन्स रूममध्ये जमा झाली. जे काही २।३ रिपोर्ट चर्चिले जाणार होते त्याच्या प्रती, तासलेल्या पेन्सिली आणि अगदी in case कोणाला अफलातून कल्पना सुचली तर वाया जायला नको म्हणून पॅड सुद्धा प्रत्येकाच्या खुर्चीसमोर ठेवली होती. लांबट टेबलावर हिरवी चादर फिट्ट केली होती. आणि तिच्यावरून पुन्हा एक महिन्यानंतर एकाहून एक क्रिएटिव्ह कल्पनांचे चेंडू एकमेकांवर फेकले जाणार होते.

नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे मार्केटिंग डिरेक्टरने आपले तोंड उघडले. वय फक्त ३२–पण पाइपच्या साह्याने तोंडाचा एकंदर आकार व वजन वाढवायचा प्रयत्न. सुदैवाने विरळ होत जाणाऱ्या केसांची त्यांत मदत. 'राजिन्दर आजचा ताजा आंकडा काय?' '१३ लाख.' एक कोरडे आणि मुद्याला धरून उत्तर. 'म्हणजे अगदी काही वाईट नाही. मला वाटतं या महिना अखेरीस विक्री ४० लाखांपर्यंत पोचावी.' आपल्याहून वयाने व अनुभवाने १० वर्षे मोठ्या असलेल्या अकौण्ट्स मॅनेजरला बरोबर घेऊन जायचा प्रयत्न. त्याच्या खवचट स्वभावाला थोडे चुचकारण्याचा प्रयत्न पण शेवटी नेता मीच आहे हे इतरांना सांगण्याची त्याची स्टाइल आमच्या चांगलीच परिचयाची झाली होती. ४० लाखांचे या महिन्याचे लक्ष्य पुरे होईल पण त्यासाठी तुमचे सेलसमेन ज्या रीतीने ऑर्डरी नोंदवत आहेत त्यावरून असे वाटते आहे की मालाच्या थप्प्या फक्त फॅक्टरीतून हलून स्टॉकिस्टांच्या गोडाउनमध्ये लागतील आणि कंपनीचे आउटस्टॅंडिंग मात्र वाढेल. अकौण्टस मॅनेजरचा फिरकी घ्यायचा प्रयत्न. मार्केटिंग झिन्दाबाद. आपल्या डिपार्टमेन्टवर हल्ला होतो आहे असे पाहून मी एखाद्या इमानी कुत्र्यासारखा मध्ये पडलो.

'पण मी आता बडोदा, अहमदाबाद, जयपूर वगैरे हिंडून आलो आणि तिथे जी परिस्थिती पाहिली त्यावरून मला तर वाटतंय की आपल्या नव्या जाहिरातीनंतर मालाचा उठाव वाढला आहे. उलट जयपूर व उदयपूर येथे तर मालाचा तुटवडा आहे.' आता मुंबईच्या बाहेर माझ्याशिवाय कोणीच गेले नसल्यामुळे मी योग्य ती 'निवडक' उदाहरणे देऊन बाकीच्या थोर मंडळींना निरुत्तर करू शकत होतो.

'आता हेच बघा ना, एक एक डझन मेटाकुटीने घेणारे केमिस्ट एकदम तीन तीन डझन घ्यायला लागले आहेत.'

संध्याकाळी चित्रा माझी ताजमध्ये वाट पहाणार होती. तिची ड्यूटी सहा वाजता संपायची होती. ही आमची पाचवी किंवा सहावी भेट असेल. चित्रा एक भयंकर गोड मुलगी होती. दिसायला, हंसायला, वागायला आणि मनानेसुद्धा! तिच्या नेटक्या कापलेल्या केसांच्या महिरपीतील तिचा चेहरा...पण चित्राच्या बाबतीत गोड याखेरीज दुसरे विशेषणच योग्य वाटत नाही. चांगले आणि कौतुक करणारे आई–वडील, चांगले आणि कौतुक करणारे शिक्षण आणि चांगली व कौतुक करणारी गोड नोकरी...नोकरी हा शेवटचा शब्द मात्र खटकतो जरा चित्रा हॉटेलमधील निरनिराळ्या समारंभासाठी आणि खोल्यांसाठी पुष्परचना करण्याचे काम करते. तिचा चपळपणा, गोडवा आणि सुबक हालचाली तिच्याशी झालेल्या पहिल्या भेटीतच माझ्या लक्षात आल्या. आमच्या कंपनीची पार्टी आखताना ती मला प्रथम भेटली. त्यानंतर आम्ही ४–५ वेळा भेटलो. नाटकांना–सिनेमांना बरोबर गेलो. आज प्रथमच काही कार्यक्रमाशिवाय भेटणार होतो. मला तुझ्याविषयी काहीतरी वाटतं हे तिला सुचवावे की काय अशा विचारात मी होतो.

रिसेप्शनवर चित्रा नव्हती. पण तिच्या मैत्रिणीने मला निरोप कळवला, 'सॉरी हं, पण तिचे आजोबा एकदम सीरियस झाल्याने तिला घरून दुपारी फोन आला आणि लगेचच ती घरी गेली आहे. ती तुम्हाला उद्या दुपारी फोन करेल.'

मी तडक हॉटेलच्या बाहेर पडलो आणि अगदी परक्या व आपल्यातच बुडून गेलेल्या गर्दीत मिसळून गेलो. चालत चालत फ्लोरा फाऊंटनपर्यंत आलो. गर्दी नेहमीइतकी भीषण नव्हती. पण फाऊंटनपर्यंत पोचेतो. गर्दीचे अवघडलेपण माझ्यात भिनून गेले वाटले, बरे झाले ही चित्रा भेटली नाही ते. समजा मी तिच्या गोड आणि निष्पाप हास्यात विरघळून तिला काही तरी विचारले असते आणि तिने...एकवेळ सरळ नाही म्हटले असते तरी चालले असते, पण जर तिने तिच्या सहजसुलभ आणि कोमट गोडव्याने हुंकार दिला असता तर मी लटकलो असतो की नाही मधांतरी कितीक काळपर्यंत...आणि खरं म्हणजे शक्यता तशीच होती.

माझ्या नकळत मी ८४ नंबरच्या बसच्या क्युमध्ये गुंफला गेलो. एक प्रकारच्या अपरिहार्यतेने वरच्या मजल्यावर पोचलो. वाटलं की प्रेम, इमानी कुत्र्यासारखी नोकरी किंवा त्यापूर्वी जपलेली ध्येये आणि या सगळ्यांना लागणारी कमिटमेंट यांच्यात सारे आयुष्य किंवा बरीच वर्षे लटकण्यापेक्षा बसमधल्या तासाभराच्या संध्याकाळला लटकलेले काय वाईट ! कमिटमेंट नसली तर फक्त ४० पैशाचे तिकिट घ्यायचे आणि बसमधून उत्तरेपर्यंत ते हरवायचे नाही. बाकी सर्व शरीर व मन यांना फुरफुरणाऱ्या बसच्या तालावर सैरभैर सोडून ! मग करा एक एक मिनिटांच्या जाहिरातीच्या फिल्मसारखे एकमेकांशी काहीही संबंध नसलेली विचारस्वप्ने किंवा हिशेब ! आणि त्याचाही कंटाळा आला तर दुथडी भरून वहाणाऱ्या फरफटत्या आवाजाच्या नदीत गुदमरून जा. कंडक्टरने तिकिट विचारेपर्यंत मी कुठेच जायचे ठरविले नव्हते पण त्याला घाई होती म्हणून फारसा विचार वगैरे करायच्या भानगडीत न पडता प्रभादेवीला रहाणाऱ्या विद्या-मावशीकडे जायचे ठरविले.

बस स्टॉपपासून तिचे घर जवळच होते. चालत जायलासुद्धा ५ मिनिटे पुरेशी होती. पण तेवढ्यात उजेड एकदम आक्रसून गेला आणि संध्याकाळ एकदम एकाकी झाली—ऑफिस आणि काम, चित्रा आणि इतर सगळ्याच जाणीवा एकदम परक्या झाल्या.

समुद्रकिनाऱ्यावरचे मावशीचे घर जवळजवळ तिच्याच वयाचे—पस्तिशीचे होते. तिच्या वडिलांनी पूर्वी हौसेने बांधलेले पण आता ऐसपैस, काहीसे जुनाट आणि गूढ भासणारे. त्या घराला मजले तीन—प्रत्येक मजल्यावर दोन दोन ब्लॉक्स आणि मधून झिजून चकचकीत आणि गुळगुळीत कठडा असलेला काळोखी जिना. तिसऱ्या मजल्यावर मावशी एकटी रहायची. तिच्या बरोबर खूप वर्षांची जुनी मोलकरीण—२४ तास रहाणारी आणि एक मांजर. पण ते फक्त दिवसा रहायचे...रात्री आजूबाजूला भटकायचे. दारावरची घंटा वाजल्यावर सावकाशीने मावशीने दार उघडले. ती पण ऑफिसातून नुकतीच आली असावी—तिच्या चेहऱ्यावर खूपसे पाणी आणि हातात टॉवेल. चेहऱ्यावरच्या पाण्यामुळे त्यामागच्या सुरकुत्या लपल्या होत्या आणि कदाचित् त्यामुळेच ती एकदम छान आणि तरुण वाटली. त्यांत तिचे तोंड भरून आणि उबदार हास्य.

मग पाचेक मिनिटे गेल्या महिन्याचा फेरफटका. 'किती दिवसांत फिरला नाहीस, मी आज तुला ऑफिसात फोनच करणार होते, कालच ताईचे पत्र आले होते, तू इकडे कधी येतोस की नाही विचारीत होती; ऑफिस काय म्हणते ? आता पुन्हा कधी दौरा आहे बंगलोर—मद्रासचा ?' एक ना दोन.

'मावशीचा दर दोन प्रश्नांना माझे होकारार्थी किंवा नकारार्थी उत्तर. तिचा जिवंत आणि लसलसणारा आवाज ऐकण्यातच मला खूप बरं वाटत होतं.

'आता कुठे घाई नाही ना जायची ? जेवायलाच थांब.'

'मग पण मला आत तर येऊ देशील की नाही. नाही, मागच्या वेळी तुला तुझ्या त्या नव्या मैत्रिणीला घेऊन नाटकाला जायचे होते. आता कुठवर प्रगती केली. महिना झाला असेल ना ?' 'जाऊ दे ग, मला चित्राचा कंटाळा आलाय.' 'का, आता परत कोणी नवी मैत्रीण भेटली आहे का ?' 'बास झाले, आपण पण तुझ्यासारखंच एकटं रहायचं ठरवलं आहे.'

मावशीने विषय बदलला. स्वतःच्या आयुष्याविषयी जास्त चर्चा होऊ देणे तिला आवडत नाही. बरं तुझ्या ऑफिसबद्दल सांग—तुझ्या प्रमोशनची प्रगती कुठवर आली आहे ?'

'विषय बदलून फारसा फरक होणार नाही—मला ऑफिसचाच कंटाळा आलाय—काही अर्थच उरला नाही. दररोज ७ तास थंड हवेत सुंदर स्टेशनरीवर

आणि सुंदर कॉन्फरन्स रूममध्ये चाललेल्या खुळेपणाची चीड यायला लागलीय, मीटिंगमध्ये चर्चा करण्यासाठी रिपोर्ट आणि रिपोर्ट लिहिण्यासाठी चाललेली आकड्यांची झटपट...कशाचाच आपल्या जीवनाशी, अस्तित्वाशी, समाजाशी संबंध नाही. आज आम्ही दुष्काळाची ४ वाक्यात वासलात लावली. आता जणू तो प्रश्नच उरला नाही आमच्यापुरता...एखाद्या काचेच्या निर्वात प्रदेशात बटणे दाबून आम्ही लुटुपुटीचे प्रश्न निर्माण करून त्यांची लुटुपुटीची उत्तरे देत असतो...जणू आमच्या मीटिंगातून आणि रिपोर्टातून शाईचे, आवाजाचे व बुद्धीचे एक रसायन तयार होते आहे आणि ते रसायन बटणे दाबल्यावर लोकांच्या घशात वाहायला लागलंय आणि लोकांचे खोकले वगैरे दूर होऊन सर्वजण गाणी म्हणून आमचा जयजयकार करताहेत.' माझ्या घशाच्या शिरा एव्हाना खूप ताणल्या गेल्या होत्या. मी थांबलो; मावशी हुंकारही देत नव्हती पण तिचे डोळे लकाकत होते.

'तू अजून दारू वगैरे घरात ठेवायला सुरुवात केली नाहीस ना ?'

'अं हूं ! पण खरंच दारू पिऊन समाधान, आनंद, फायदा काही होतं का ?'

'नाही ना, दारू आपली स्वत:चा खास नवा असा गोंधळ तयार करते...नो मुक्ती !'

तुला शांती हवी ? थांब तुझ्याकरिता एक खास रेकॉर्ड लावते ती ऐक...पाश्चिमात्य सिंफनी संगीताची...

रेकॉर्ड लावून तिने कॉफी करून आणली. सूर अपरिचित पण शरीराच्या निरनिराळ्या रंध्रांना एकाच वेळी निरनिराळ्या प्रकारांनी फुलविणाऱ्या सुरांनी माझ्या कानांचा आणि चिडचिडीचा ताबा घेतला. कडक कॉफीमध्ये माझा कडवटपणा विरघळायला लागला. तिने दिवे बंद केले आणि मागील बाल्कनीतून पसरलेल्या समुद्रावरील अंधार आत शिरला. त्या अंधारावर संगीताच्या अनेकपदरी अपरिचित सुरांनी आणि मावशीच्या अंगाच्या व केसांच्या वासाने कलम केले.

'मला आणखी अंधार हवा आहे, दे ना ?' ती स्तब्धच राहिली...फक्त डोळ्यात चमक...माझ्या शरीरातील जणू जन्मापासून दबा धरून बसलेली ओढ जणू एकदम सजीव आणि विद्युत झाली...सगळ्या आठवणी, जाणीवा, जबाबदाऱ्या आणि चीड या कपड्यांबरोबर गळून पडल्या. विजेचे एक सर्किट पूर्ण झाले आणि त्या सर्किटमध्ये मला अंधाराने पूर्ण वेढले. सर्व अवयवांच्या आणि मेंदूच्या रंध्रारंध्रांत अंधाराची आणि उत्कटतेची पातळी एक झाली.......पूर्ण समतोल...मुक्ती...

'Thank you'...काही वेळानंतर.

'अं हूं काही बोलू नकोस'

'का ?'

'आता पुन्हा चिडायला आणि रडायला सुरुवात करायची.'

'म्हणजे ?'

'गर्भातून बाहेर पडल्यावर नव्हता का रडलास जन्मल्यानंतर !'

□ □

## वारविलासिनी

देशबंधू चित्तरंजन दास / अनुवाद : दुर्गा भागवत

[देशबंधू चित्तरंजन दास यांचे नाव एक कमालीचा त्यागी स्वातंत्र्यवीर, फार मोठा दाता म्हणून मुख्यतः आपल्यास परिचित आहे पण चित्तरंजन दास हे कवीही होते. १८९६ साली त्यांचा 'मालंच' (म्हणजे उद्यान) हा कवितासंग्रह प्रथम प्रकाशित झाला. त्याची दुसरी आवृत्ती १९०५ मध्ये निघाली. त्यात 'वारविलासिनी' ही कविता आढळते. दासबाबूंच्या कन्येने 'कविचित्त' हा त्यांच्या समग्र काव्याचा संग्रह १९६८ साली प्रसिद्ध केला. त्यातूनच ही कविता मी घेतली. १९७० साली दासबाबूंची जन्मशताब्दी झाली. 'वारविलासिनी' ही वेश्येवर लिहिलेली कविता प्रसिद्ध झाल्यावर बंगालमध्ये फार प्रक्षोभ माजला दासबाबूंची कन्या अपर्णादेवी म्हणतात की "ही कविता लिहिल्यामुळे ब्राह्म-समाजाचे काही प्रचारक बाबाच्या विवाहप्रसंगी उपस्थित राहिले नाहीत. त्या काळी ब्राह्मसमाजात या कवितेमुळे तुमुळ वादविवाद झाले" देशबंधू दास हे प्रथम ब्राह्मसमाजी होते, नंतर ते वैष्णव झाले.

मला ही कविता फार आवडली. दासबाबूंचे 'सागर-संगीत' अनुवादून हातावेगळे केल्यानंतर या कवितेचा अनुवाद करण्याची इच्छा मला झाली. ती आज पूर्ण होत आहे.]

१

शुन आमि वारविलासिनी !
निशीथे पिपासाहरा,
प्राणहीन प्रेमभरा :
पदतले उन्माद धरणी,—
लालसा चंचल हिया, उन्मादधरणी !
आमि शुधु वारविलासिनी !

१

ऐका, मी वारविलासिनी !
रात्रीस तृषा हरणारी,
प्राणहीन प्रेमळ नारी,
उन्मादाची पायी धरणी,
लालसा–चंचल चित्त, उन्मादधरणी
मी केवळ वारविलासिनी.

२

रंजियाछि अधर आमार !
कोमल विचित्र रागे
आमार अधरे जागे
रक्त आभा; केशे पुष्पसार—
चंचल कुन्तले मिशे—मधु पुष्पसार !
रमणीय अधर आमार

२

रंगविते मी अधर मनोहर
नाजुकशा रंगाने सुंदर
लाल उमटली छटा तयावर;
केसांना मी लावी अत्तर
कुरळ कुंतलीं सुगंध सुंदर
रम्य असे मम अधर खरोखर.

३

मधु अङ्ग,' परे नीलवास
नील गगनेर मत,
नील स्वप्न बिजडित
उडाइया पुडाइछे आश—
चंचल अंचल पुराइछे आश,
आबरिछे तनु नीलबास.

४

शुभ्र रक्त चरण दुखानि !
कनक किंकिणी हाते,
कनक किरीट माथे,
रजनीर राज्ये आमि राणी !
पुष्पसम चरण दुखानि

५

एस पान्थ । भ्रमिया धरणी
चरणे लेँगेछे पङ्क,
प्राणे काँपिछे कलङ्क :
एस पान्थ ! आँधिरा रजनी—
अवगाह प्रेमे मोर आजि ए रजनी !
एले पान्थ भ्रमिया धरणी

६

अधर–चुंबन कर पान !
तरंगित तनु भ'रे,
सब मधु लओ ह'रे,
आछे यत पुष्प हासि गान ।
तृषाहीन निशा कर अवसान,
अधर चुंबन करि पान

७

अङ्गेर परश लओ टानि,
करिया वसन तव
पाओ सुख नव नव :

३

नीलवसन सुंदर देहावर
स्वप्न निळे जणु नील नभावर.
अंचल उडता आस चेतवी
चंचल पल्लव आशा निववी
नीलवसन लपटे देहावर.

४

चरण लाल गोरे मम दोन्ही
कनक-कंकणे हाती भरली
सुवर्ण-बिंदी भांगामधली
राज्यी रात्रीच्या मी राणी
अंध निशेच्या राज्यी राणी,
चरण फुलासम मम दोन्ही.

५

ये रे पथिका, फिरुनी धरणी,
चिखल चिकटला चरणां दोन्ही
प्राण कांपती कलंक लागुनी
ये पथिका, अंधारी रजनी;
मत्प्रणयी घे स्नान करोनी
येत पथिक हा फिरुनी धरणी.

६

पान करी अधराचे चुंबुन
तनू तरंगत जावो बहरुन,
मधु सगळा तू घे रे काढुन—
जोंवर हास्य, फुले अन् गान.
इथे पार कर रात्र तृषेविण
पान करीं अधराचे चुंबन.

७

अंगाचा घे स्पर्श ओढुनी
वस्त्र तयाला तुझे करूनी
सुखे नवनवी घे मिळवूनी



अनुक्रमणिका

लाजहीन प्रेमभरा वाणी,
आँधारे शुनिओ मोर प्रेम-भरा वाणी ! —
अङ्गेर परश निओ टानि।

८

जाहा आछे सब लओ तुले !
रेखे जाओ रक्त-ज्वाला,
तुले निओ पुष्प-माला;
रजनी प्रभाते जेओ भुले—
अन्ध निशि शेष हले सब जेओ भुले.
आमार सकलि लेओ तुले

९

किवा भय ? रजनी आँधार !
कलङ्क कंपित देहे,
अधीर प्रमत्त गेहे,
काटिवे गो रजनी तोमार ! –
दुरन्त आनन्दे जावे रजनी तोमार :
कोथा भय ! सकलि आँधार.

१०

तुमि जेओ एले उषाराणी
पुण्य देहे शुभ्र हासे
पशिओ पवित्र बासे :
रजनीर कलङ्केर वाणी–
भुले जेओ रजनीर कलङ्ककाहिनी
शुधु आमि र'व कलङ्किनी।

११

ए धरार कलङ्क तुलिया
परेछि पुष्पित शिरे !
एस पान्थ धीरे धीरे,
मर्महीन आवेगे लइया—
तोमार कम्पित तनु – आवेग लइया !
आमि रव कलङ्क धरिया

लाजहीन प्रेमाची वाणी;
श्रव अंधारी माजी वाणी
अंगाचा घे स्पर्श काढुनी.

८

असेल ते ते घेउन जारे !
ठेवुन जा रक्ताची ज्वाला,
घेउन जा पुष्पाची माला
रात्र सकाळी विसरून जारे.
सरता रजनी विसरच सारे.
सर्वस्वा मम लुटुनी ने रे.

९

भय कसले ? रजनी काळोखी
कलंके कांपत्या देही
अंवीऱ्या प्रमत्त गृही
घालव पथिका रात्र तव अशी.
जाय रात्र मग उत्कट हर्षी.
भय कुठले ? सगळी काळोखी

१०

जाई तू रे पांथा येता उषाराणी
शुभ्रहास्यी पुण्य देही
पवित्र अपुल्या जा तू गेही.
रात्रीची कलंक-वाणी—
विसर रात्रीची काळी कहाणी.
राहीन एकटी मीच कलंकिनी.

११

या धरणीचा कलंक उचलुन
मी वाही पुष्पित शिरी
ये, पथिका, ये, हळू पावली.
हृदयहीन आवेग घेउनी—
कंपित तव तनु, आवेग घेउनी;
रहाते मी अन् कलंक घेउन.



अनुक्रमणिका

१२

चारिदिके शत पुष्पराशि,
करि गन्ध वितरण,—
मोहितेछे विश्वजन !
अमि जे सबारे विलासि
अङ्गे अङ्गे अनङ्ग विकाशि

१३

नाहि प्राण, मधु देह मोर !
नाहि सुख. नाहि लज्जा,
जीवन विलास सज्जा
काजल नयने, घूम घोर—
चाओ पान्थ आँखि पाने, लओ घूम घोर !
मोह–भरा, मधु देह मोर

१४

नाहि स्मृति, जीवन व्यापिया,
नाहि कोन अनुताप :
प्राणमय परिताप
यदि आसे, फिराइ हासिया—
दिवस रजनी आमि, हासिया हासिया !
कोथा स्मृति जीवन व्यापिया !

१५

आछे रूप विश्व–विमोहन
पूर्ण रक्त शतदल
प्रस्फुटित ढल ढल,
गन्ध तार कर आहरण,
लओ रूप विश्व–विमोहन

१६

आमिजेन चिरदिन ऋणी !
अपार ऐश्वर्य लये
विलाइ भिखारी ह'ये,

१२

चौफेर फुलांच्या राशी अगणित
करिती त्या गंधाची उधळण
मोहुन जाती बघ सगळेजण
सकळांशी मी होत विलासी
आणिते मंद सुगंध विलासी
अंगी अंगी अनंग विकसत.

१३

नसे प्राण, पण देह मधुर मम
नसे सौख्य पथिका नच लज्जा
विलास जीवन साजत सज्जा
नयनी काजळ, गाढ नीज रे
नजर पिऊनी गाढ नीज रे.
मोहें भरला, देह मधुर मम.

१४

स्मृति नच कुठली जीवनव्यापक
नसे जरा अनुताप
जीवा होता ताप
घालविले मी त्याला हसुनी
रात्रंदिन रे हसुनी हसुनी
कुठली स्मृति मग जीवन–व्यापक

१५

स्वरूप संमोहन विश्वाचे
पूर्ण कमळ आरक्त लाल ते
फुलुनी फुलुनी डोलडोलते.
सुगंध त्याचा घे तू लुटुनी
मत्त भ्रमरासम घे लुटुनी.
लूट रूप संमोहन विश्वाचे.

१६

जणु मी झाले चिरकाल ऋणी
अपार ऐश्वर्याला भोगुन,
रडले अन् होऊन भिकारिण ।

वासनाविहीन उदासिनी ! —
लालसा उल्लासहीन, पूर्ण उदासिनी
के करेछे मोर चिरऋणी !

नुरे वासना, होय उदासिन
पहा लालसा उल्हासाविण
झाले झाले पूर्ण उदासिन;
करतो कोण मला चिरऋणी ?

१७

ए गो आमि यौवने योगिनी !
ए विश्व लालसा छाइ,
सर्वाङ्गे माखिया ताइ,
चलियाछि कलङ्कवाहिनी !
चिरदिन यौवने योगिनी

१७

यौवनात रे झाले जोगिण
विश्व लालसा राख खाक ही
सर्वांगी मी माखुन घेई,
कलंक घेउन चालतसे मी
हृदयहीन मी, कर्महीन मी,
सतत चालते कलंक घेउन
यौवनात मी चिरदिन जोगिण.

१८

कार अभिशापे नाहि जानि !
कोन महाप्राणे व्यथा
दिया छिनु, ताइ हेथा
प्राणहीन प्रेम–विलासिनी
सबारे विलासि ताइ वारविलासिनी
तारि शापे चिर–कलङ्किनी

१८

मला कळेना शाप दिला कुणी
कुणास दिधली मी प्राणकथा
म्हणून आले हे फळ आता.
प्राणहीन मी प्रेमविलासिनी
विलास सकाळांशी रात्रंदिनी
त्या शापे मी वारविलासिनी
त्या शापे मी नित्य कलंकिनी

□ □

---

दुरुस्ती : १ एप्रिल–मे ७३, पृष्ठ ११६–साहित्य अकादमीच्या जाहिरातीत 'गोरा' पुस्तकाची किमत १२–५० वाचावी. 'आपले कवी' या पुस्तकाचे शीर्षक 'आपले कवि' असे वाचावे.

२. जून–जुलै–७३, पृष्ठ १९९ (पाच कविता ? विश्वास कानडे) चवथी कविता–'हसवारा' ऐवजी 'हलणारा' असे वाचावे. पाचवी कविता दुसरी ओळ 'दिसतो' ऐवजी 'दिसते' असे वाचावे.

---



अनुक्रमणिका

# टिपणे

द. भि. कुळकर्णी

## काजळ आणि माया

'काजळमाया' हा जी. ए. कुलकर्णी यांचा अलीकडचा संग्रह. 'निळासावळा' ते 'रक्तचंदन' जे सौंदर्यबल जी. एं. नी जोडले होते ते सारे एकवटून 'काजळमाया'मध्ये आविष्कृत झाले आहे. या संग्रहातील कथांचे दोन स्पष्ट गट पडतात : रूपककथा आणि प्रतीककथा. 'विदूषक', 'गुलाम', 'कळसूत्र' इत्यादी कथा रूपककथा आहेत; 'भोवरे', 'प्रदक्षिणा', 'कसाब' इत्यादी कथा प्रतीककथा आहेत. जिला आपण नुसतीच कथा किंवा लघुकथा म्हणतो तिच्यात आणि रूपककथा–प्रतीककथा यांच्यात काय भेद आहे ? या संदर्भात जी. ए. आणि जातेगावकर यांची तुलना करता येईल. 'मुखवटे', 'गुलमोहर' इत्यादी जातेगावकरांच्या कथा सुंदर आहेत; पण त्यांना रूपककथा किंवा प्रतीककथा म्हणता येणार नाही. उलट, 'काजळमाया' बाह्य उदाहरणे घ्यायची तर, 'चंद्रावळ' ही प्रतीककथा आहे, 'भेट' ही रूपककथा आहे; मुख्यत: 'पारवा' मधील काही कथांचा अपवाद वगळता जी. एं. च्या जवळजवळ सर्वच कथा या दोन गटात बसणाऱ्या कथा आहेत प्रतीककथा–रूपककथा यांचे एक खास वैशिष्टय म्हणजे त्यातील ज्ञानात्मक तादात्म्य. जी. एं. नी मराठी कथेला ज्या अनेक अंगांनी संपन्न केले त्यात ज्ञानात्मक तादात्म्य हा एक महत्त्वाचा घटक आहे. ज्या कथानुभवात ज्ञानात्मक तादात्म्य नसेल तो कथानुभव रूपककथा–प्रतीककथा होऊच शकणार नाही. 'चंद्रावळ', 'गुंतवळ', 'बळी', 'सोडवण' इत्यादी जी. एं. च्या 'काजळमाया'पूर्व सर्व मोलाच्या कथा ज्ञानात्मक तादात्म्याने परिपूर्ण आहेत. 'काजळमाया'मध्ये तर हा ज्ञानात्मक तादात्म्याचा घटक पूर्वीपेक्षा कितीतरी पटीने वाढला आहे. ज्ञानात्मक तादात्म्य म्हणजे काय ? कथेतील अनुभवात केवळ वैचारिक घटक प्रविष्ट झाल्याने ज्ञानात्मक तादात्म्य साधत नाही. प्रचारकथेमध्ये एखाद्या राजकीय पक्षाचे किंवा सामाजिक दृष्टीचे खंडनमंडन करणारे विचार असतातच. पण ते काही ज्ञानात्मक तादात्म्य नव्हे; ती एका स्थिर विचारघटकाची कथेतील उपस्थिती होय. उलट ज्ञानात्मक तादात्म्यामध्ये कलावंताची वैश्विक जाणीव आणि कथेतील विशिष्ट अनुभव यांच्यात निर्मितिसमकाल क्रिया–प्रतिक्रिया अभिप्रेत असते. हा विशिष्ट अनुभव आपल्या विश्वकल्पनेस सुसंगत आहे की विसंगत ? हा विशिष्ट अनुभव आपल्या विश्वकल्पनेची लघु–प्रतिकृती आहे का ? नसेल तर त्यानुसार आपली विश्वकल्पना बदलावयास हवी का ? वस्तू, व्यक्ती, प्रसंग या साऱ्यांचे मूलस्वरूप कसे आहे ? या स्वरूपाची ही क्रिया–प्रतिक्रिया असते. म्हणजे कथेतील ज्ञानात्मक तादात्म्य केवळ तार्किक स्वरूपाचे नसते; ती खऱ्या अर्थाने एक आध्यात्मिक प्रक्रिया असते; तो एक सौंदर्यपूर्ण आध्यात्मिक अनुभव असतो. प्राचीन मराठी संतकवींनी रूपकात्मक–प्रतीकात्मक काव्ये प्राचुर्याने का लिहिली त्याचे रहस्यही हेच आहे. इतर कुठल्याही गोष्टीप्रमाणे हे ज्ञानात्मक तादात्म्य असली अथवा नकली दोन्ही प्रकारचे असते. वाङ्मयीन फॅशन, अपक्व व्यक्तित्व, निर्मितिप्रेरणेविनाच झालेले लेखन इत्यादी अनेक कारणांमुळे प्रतीककथा–रूपककथा यांतील ज्ञानात्मक तादात्म्य नकली होऊ शकते. 'काजळमाये'ला या नकलीपणाचा स्पर्शही नाही. परंतु प्रतीककथा–रूपककथा यांच्यातील साम्य येथेच संपते; यापुढे त्यांच्यातील महत्त्वपूर्ण भेद सुरू होतात : दोहोतील ज्ञानात्मक तादात्म्य सच्चे असूनही जिथे या तादात्म्याला साध्याचे आणि कथेतील पात्रप्रसंगादिकांना साधनाचे स्वरूप प्राप्त होते तिथे रूपककथा अवतरते. 'विदूषक', 'ठिपका', 'कळसूत्र' इत्यादी 'काजळ-माया'तील कथा अशा रूपककथा आहेत. मानवाचे कर्तृत्व कसे थिटे आणि अपेक्षेच्या नेमके विरुद्ध घडवून आणणारे आहे, विश्वगती कशी आंधळी आणि प्रचंड आहे, मानवाचे ज्ञान हाही कसा अज्ञानाचाच एक सूक्ष्म प्रकार आहे, माणसे किती स्वार्थी आणि क्षुद्र आहेत, कला–तत्वज्ञान–धर्म–व्यवहार अशी कोणतीच शक्ती कशी मानवाला

वेदना आणि मरण यापासून वाचवू शकत नाही अशी विश्वकल्पना ज्ञानात्मक तादात्म्याने या कथांत अभिव्यक्त झाली आहे. आणि या विश्वकल्पनेच्या केवळ आविष्कारासाठीच पंडित विष्णुशर्मा, चंचला, लाला गरुड, रामण्णा, गारुडी, संन्यासी, भुत्या इत्यादी पात्रे व त्यांच्या जीवनांतील प्रसंग अवतरले आहे. सऱ्या निर्मितीप्रक्रियेत आशय-अभिव्यक्ती यांचे जे अखंड अद्वैत असावे लागते ते या साध्य-साधनवृत्तीमुळे खंडित होते. 'शब्द अर्थाआधी यावा' ही अस्सल निर्मितीची खूण शबल होऊन 'अर्थ शब्दाआधी आला' असा प्रकार रूपककथेत घडत असतो. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर रूपककथा ही मिश्र ललितकृती असते; तिच्यात तार्किक संघटनेत लालित्य आणावयाचा प्रयत्न असतो. उलट प्रतीककथेमध्ये ललित संघटनेमध्ये तार्किकता हा घटक समाविष्ट झालेला असतो. प्रतीककथेमध्ये पात्र, प्रसंग, भावना, तर्क या साऱ्या घटकांची ललित संघटना साधलेली असते. 'भोवरे', 'कसाब', 'प्रदक्षिणा' या अशा कथा आहेत. या कथांतील व विदूषकादी कथांतील अध्यात्म एकरूप असूनही निर्मिति-प्रक्रियेमुळे या दोन गटात असाच महत्त्वाचा फरक पडला आहे. तार्किक संघटनेतून ललीत संघटना निर्माण करण्याच्या प्रयत्नातून जेव्हा कथेत तार्किक संघटनाच उरते तेव्हा ती रूपककथा ही निव्वळ कारागिरी होते. 'काजळमाया'मध्ये अशी कारागिरी कुठेही नाही. उलट प्रतीककथेतील तार्किक घटक विश्वकल्पनेशी निगडित नसले म्हणजे त्या कथेला वैचारिक भूमिकेतूनच विकारवशता येते. य. गो. जोशी यांच्या काही कथांमध्ये असे घडले आहे. 'काजळमाया' या मर्यादेपासूनही दूर आहे. 'काजळमाया'तील प्रत्येक प्रसंग आणि प्रत्येक पात्र प्रतीक तरी आहे किंवा रूपक तरी आहे. एवढेच नव्हे तर प्रत्येक कथेत येणारी उपमाने आणि प्रतिमा याही प्रतीकात्मक-किंवा-रूपकात्मकच आहेत. जी. एं. ची अशी आवडती उपमाने-प्रतिमा म्हणजे प्रवास व आळी व सोंग. लाल गरुड सोंगाड्या आहे. विदूषकही अनेक अर्थाने सोंगाड्या आहे. आणि आपला सारा संसार हे एक सोंगच होते हे शांताक्कांना क्रमाने जाणवत आहे. आपण पुष्ट आळीसारखे जगत आहोत असे लाल गरुडाला वाटते. आणि कोणी रत्नाच्या, कोणी मंदिराच्या आणि कोणी पोटाच्या भुकेपायी मुसाफीर झालेले आहेत. हे जग हे एक सोंग आहे, हे जगणे हा एक निरर्थक प्रवास आहे आणि यातील प्रत्येक व्यक्ती आपोआपच आळीचे जीवन जगत आहे असा अर्थ या उपमान-प्रतिमांतून व्यक्त होतो. पण याला एक अपवाद आहे. तो रक्ताच्या नात्याचा आणि त्यातून निर्माण होणाऱ्या आपुलकीचा, माणुसकीचा. रूपककथांमध्ये नव्हे पण प्रतीककथांमध्ये हा माणुसकीचा गुप्त झरा वाहत आहे. आईची पोटच्या पोरांसाठी निरपेक्षपणे तुटणारी आतडी. भावाचा बहिणीवरील लोभ आणि या रक्तनात्याला पर्याय म्हणून येणारी पाळीव प्राण्यांवरील माया. इतरत्र सर्वत्र स्वार्थासाठी आणि सुखा-साठी रणकंदन सुरू आहे. त्यातून स्वार्थ कुणाचाही साधत नाही आणि सुख कुणालाही मिळत नाही, सारेच हताश आणि कष्टी होतात हे खरे; तरी इतरत्र अखंड स्वार्थ-आणि-सुख यांसाठी जीवघेणी धडपड सुरू आहे. फक्त या प्रत्यक्ष आणि पर्यायी रक्तमाणुसकीच्या नात्यांमध्ये स्वार्थ सांडून दुःख घेण्याची तयारी आहे. इथे एखादा भाऊ आपल्या बायको-मुलीकडे आणि स्वतःकडे दुर्लक्ष करून वडील बहिणीच्या सुखासाठी जीवाचे रान करतो. याचाही अंतिम परिणाम निरर्थकता आणि वेदना हाच असतो. तरीही अशा माणसांचे आयुष्य प्रवास नसते, आळीसारखे नसते, आणि सोंगही नसते; त्यांना आपला मुक्काम सापडलेला असतो, ते फुलासारखे आपल्या माणसांसाठी फुलून आलेले असतात आणि ते सच्चे असतात. 'काजळमाया' मधील सर्व कथा शोकात्मिका आहेत पण त्यातील रूपककथा हताश करणाऱ्या काळघाठार शोकात्मिका आहेत; प्रतीककथा रक्तमाणुसकीचे दर्शन घडविणाऱ्या काळ्या-निळ्या कथा आहेत; रूपककथा या काजळकथा आहेत आणि प्रतीककथा या मायाकथा आहेत. हा रक्तमाणुसकीचा धागा 'निळा सावळा'पासून अखंड आहे. पण त्यात कधी संभाव्य भावविवशता आली नाही; ती इथेही नाही. वहिनीने 'घरात पाऊल टाकू नका' असे वीसेक वर्षांपूर्वी म्हटले म्हणून दाराशीच थांबणारा, तिने आठवणीने लिंबाच्या लोणच्याची फोड वाढली होती, लखलखीत ताब्स पंचपात्र दिलं होतं हे आयुष्यभर आठ-वणारा दीर इथे आहे. बायकोने आपल्या आईबहिणीचा उद्धार केला म्हणून मोडून जाणारा, बहिणीची हालहवाल काय हे आतड्याच्या ओढीने पहावयास जाणारा व तिने पानपट्टीचे दुकान लावले आहे हे पाहून तोंडात पाणी न टाकता परतणारा रंगसफेदीवाला इथे आहे आणि बहिणीच्या पांगळ्या, अर्धमेल्या मुलासाठी उंची बूट आणणारा मामाही येथे आहे. ही काळ्या जगातील माया-हे रक्तचंदन अस्तित्वशून्यातील माणसाचा केविलवाणे-पणाही दाखविते आणि एक सुटकेचे भुयारही दाखविते. मात्र त्या भुयारातून पुढे जाण्यासाठी तात्त्विक जाणिवेसह प्रगल्भ सामाजिक जाणिवेची गरज आहे. ☐ ☐

# 'गोष्ट साधी सरळ सोपी'

वीणा आलासे

साधारणत: नव्या लेखकांचे साहित्य समोर आले, तर आपली प्रतिक्रिया काय होते ? कुतूहल म्हणून चाळणे, बरं वाटलं तर वाचणे. यंदाचे दिवाळी अंक चाळत असतांना अशीच एक 'लाराची गोष्ट' नावाची कथा वाचायला घेतली. नव्या धर्तीचा विषय, सामर्थ्यपूर्ण सूक्ष्म मनोवगाहन व सहजसुंदर भाषाशैली त्यामुळे एका दमात गोष्ट वाचून टाकली. पान उलटून मुद्दाम लेखकाचं नाव पाहिलं—'छाया दातार.' परवा लायब्ररीत नव्यानेच आलेला सुबक कथासंग्रह दिसला 'गोष्ट साधी, सरळ, सोपी' नावाचा. लेखिकेचं नाव तेच—'छाया दातार.'

निरनिराळ्या विषयांवरील ह्या तेरा गोष्टी. वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिरेखा. त्यांची दु:खेही सामान्यांपेक्षा वेगळी. बुद्धिमत्ता आणि संवेदनशीलता ह्यामुळे निर्माण झालेली. बहुतेक सर्व व्यक्तिरेखा 'मॅच्युअर्ड'. त्यांच्या मुखातून लेखिकेची चिंतनप्रक्रिया चालू असते. सहाजिकच कथाबंध गौण ठरतो आणि चिंतनालाच प्राधान्य मिळते.. म्हणूनच ह्या कथा ललित निबंधाच्या जास्त जवळ सरकतात.

प्रत्येक युगाचा स्वत:चा युगधर्म असतो. तो ओळखून साहित्यात संक्रांत करणं म्हणजेच साहित्यिक वास्तवता. छायाताईंच्या कथांमधून असा वास्तवाचा स्पर्श आहे. विचार नवे आहेत पण नुमता नवीनतेचा हव्यास नाही. 'Women's Lib' हे नुसतं पाश्चात्य खूळ नव्हे तर ती एक परिस्थितिजन्य समस्या आहे. ही परिस्थिती छायाताई अतिशय समंजसपणे आपल्यापुढे उभी करतात. म्हणूनच त्यांच्या सुखवस्तु, उच्चशिक्षणयुक्त अशा नायिकांना, पतीची कार्यमग्नता आणि मुले अंगावेगळी झाल्याने येणारा सुटवंगपणा ह्यामुळे निष्क्रीयतेची जाणीव सारखी झपाटत असते. एवढ्यासाठीच का अट्टाहास केला होता असं वाटत रहातं. तिचं दु:ख वेगळंच असतं. साचेबंदपणा, सरळपणा तिला सहन होत नाही. 'घटस्फोट' या शब्दाने तिला हल्ली तेवढं बावरूनही जायला होत नाही ( रात्र ). "पुरुषाच्या कतृत्त्वावर भाबडेपणाने विश्वास ठेऊन त्याची पूजा करणं तिला असह्य होतं" ( कासवाची पाठ ). कुठेकुठे त्यांच्या नायिकेची अस्मिता इतकी प्रखर असते की नायकाच्या आयुष्यावर आपल्या आयुष्याचे कलम करून ती सगळं मिळवते. त्याचा जीवनरस शोषते. स्वत:ची महत्त्वाकांक्षा पोसते आणि निघून जाते, त्याचे आयुष्य वठवून '......( कलम ).

एक प्रेमळ, हळवी आई स्वत:च्या मुलीचा प्रेमातला व्यवहारीपणा बघून ढवळून निघते. कळवळून म्हणते 'हेच ते. या पिढीला निष्ठा नाही. प्रेमाचं पावित्र्य नाही......ह्यांच्याजवळ खोल, गहिरं मन नाही. या पिढीबद्दल हेच माझं दु:ख आहे......( दु:ख ).

निर्भीड, निरोगी, आधुनिक स्त्रीमनाचं वस्तुनिष्ठ चित्र उभं करणाऱ्या ह्या कथा मुळातूनच वाचायला हव्या.

'तिघी' ह्या कथेमधे तर एक उज्ज्वल भूतकाळात रमणारी, एक भविष्याची स्वप्न बघणारी एक वर्तमानात जगणारी आणि एक तिन्ही काळ हरवून बसलेली......अशा चार स्त्रिया छायाताईंनी मोठ्या ताकदीने उभ्या केल्या आहेत.

प्रेम, लग्न व मैत्री ह्यांत छायाताईंनी नेहमीच भेद ठेवलेला आहे. ह्या भेदांमधूनच समतोल राखून मित्र म्हणून आवडणारा पण नवऱ्याच्या व्याख्येत न बसणारा पुरुष, आणि मैत्रीण म्हणून आवडणारी पण पत्नीच्या

व्याख्येत न बसणारी स्त्री, त्या साकार करतात. त्यांच्या 'आऊटसायडर' या कथेतील नायिकेचा मित्र, "ही वासना नाही राणी. अवघी तू मला हवी असतेस..........तुझ्यातील सेक्स, तुझ्यापासून वेगळा मी पाहूच शकत नाही." असे म्हणतो. विवाहित मैत्रिण, सुखाच्या संसारात संवेदनाक्षीण झालेली पाहून कोसळतो.

'स्फुल्लिंग'ही या संग्रहांतली एक छान गोष्ट आहे. विवाहबाह्य मैत्री करणाऱ्या नायिकेच्या मित्रा-कडूनही खूप अपेक्षा असतात. तो कलंदरच असायला हवा असतो. बेपर्वाच हवा असतो,......मग कधीतरी तो परिस्थितीशी शरण होऊन तडजोड करू लागला की तिच्या मनातली त्याची प्रतिमाच भंगून जाते. वाटायला लागतं "जीवन अजगरासारखं आहे. थंड, मठ्ठ, कावेबाज. चाहूल न लागता येणारं आणि बघता बघता घास घेणारं......" 'संवाद,' व 'हा कोंभ उदरीचा' ह्या अनुक्रमे एका मुलगी नसलेल्या पित्याची व एका गर्भपाताला उद्युक्त झालेल्या जोडप्याची अशा भावसंकुल कथा आहेत.

शेवटची 'गोष्ट साधी, सरळ सोपी.' ही हल्लीच्या अस्तित्ववादी परंपरेला साजेशी कथा आहे. शेवटच्या तीन ओळींमधून विफलता समर्थपणे ध्वनित केलेली आहे. चाकोरीबद्ध आयुष्य जगणारा अजय देशपांडे शेवटी वडिलांनी पसंत केलेल्या मुलीशी लग्न करायला तयार होतो. पहिला वहिला आवेग, अपेक्षा सगळ्या विरून गेलेल्या असतात. छायाताई लिहितात—

> अजय देशपांडे केअर्स लिट्ल फॉर प्रमोशन.
> ही हॅज गॉट वाईफ टु केअर फॉर.
> ही हॅज गॉट समथिंग बेटर टु गेट इनव्हाल्वड इन्.

—हा कथासंग्रह मला आवडला. "प्रेयसीची गोष्ट" आणि "पाऊस माझा सखा" ह्या गोष्टी या संग्रहात नसत्या तर जास्त बरं झालं असतं. इतर कथांच्या मानाने त्या पोरकट आहेत. सत्य ही पण एक अशीच स्वतःचं वेगळेपण नसलेली कथा.

साधे सरळ, सोपे वाटणारे मानवी मनोव्यापार छायाताई कुशलतेने हाताळू शकतात. सदैव जागृत, चिकित्सक आणि चिंतनशील असं त्यांचं मन आहे. "गोष्ट साधी, सरळ, सोपी" मधून हे सारखं जाणवत राहातं. आणि साहाजिकच त्यांच्या पुढे येणाऱ्या संग्रहाबद्दलच्या अपेक्षा उंचावतात. □ □

भा. ज. कविमंडन

## माणूस आणि उत्क्रांती

माणूस एकटा असतो. माणसाला बोलता येत नाही. माणसाला काहीच सांधता येत नाही.

प्रेम करून करून माणसे जवळ येऊ शकतात. हाती हात घेऊन भटकतात. रस्ते, वाटा पायाखालून सरकत जातात. वाटा कधीच संपत नाहीत. पण आता हातात हातही नसतात.

माणूस परत त्याच त्या वाटा चालण्याचा प्रयत्न करतो. हातात हात होता, हा भास नव्हता, हे समजून घेण्याचा मोठा समंजस प्रयत्न करतो. मागे जात जात, जिथून चालायला निघाला ती जागा शोधू लागतो...ती जागा आता नसते...

...एका एकीकडे पडलेल्या लहान खेड्यात तो एकदा गेला. कोण नवीन आलंय्, म्हणून शेजारी पाजारी येऊन गेले. संध्याकाळी तो कंटाळून पडला...दारातून एका तिला येताना पाहताच मात्र तो खडबडून जागा झाला. फार स्वाभाविक सुंदरपणाने ती हसत आली...

...नंतर एकदा त्याने तिला जवळ घेतले. ओठांजवळ ओठ नेताच तिने मान वळवली...माझ्याशी लग्न कराल ?...तो थांबला... हवे ते स्पर्श इथे घडत नसतात...

माणसाचें अवयव त्याचे नसतात. सर्वांची यादी करून प्रत्येक अवयवाचा उपयोग काय आहे, ते नोंदून ठेवता येते. हे सारे उपयुक्त अवयव एकत्र येऊनही त्यांचा काहीच उपयोग होत नाही. ही गंमतच आहे. ही गंमत पुन्हा पुन्हा घडणे ही एकाच प्रकारची घटना आयुष्यात घडते.

माणसाला स्वतःची आकृती दिसत नाही, म्हणून जवळपास अनेक माणसे जमा करावी लागतात. त्या माणसांच्या महान गोंधळात जे तुकडे हाती लागतात, त्या तुकड्यांना जोडले की स्वतःची आकृती जाणवल्याचा भास कधी कधी होतो. या अशा जवळपासच्या माणसांना मित्र म्हणतात. त्या माणसांना कधीकधी शत्रू पण म्हणतात.

तुकडे जोडून तयार केलेली आकृती ही एका विदूषकाची असते. याच आकृतीला माणसाचे संमिश्र व्यक्तित्व वगैरे सहनीय शब्दांनी ओळखले जाते.

नंतर माणूस शब्द उच्चारणारा प्राणी होतो. माणूस स्वतःचे काही बोलू शकत नाही. माणूस शब्द उच्चारतो. हे शब्द त्याच्या बापाचे असतात. मूळ बाप कोणता, हे समजत नाही...म्हणूनच शब्दांना अर्थ नसतो असे काहीजण म्हणतात. लोक त्यांना मूर्ख म्हणतात.

एखाद्या वेळी माणसाला काही तरी सापडल्यासारखे वाटते. एकही अवयव ते सापडलेले क्षणभरही सांभाळू शकत नाही. अशा वेळी माणसाला लाभलेल्या अनेक अवयवांपैकी एकच अवयव थोडी फार मदत करतो. माणसाला अनेक भोके असतात, त्यातून दरदरून आलेला घाम अशा वेळी बाहेर पडतो. काहीतरी जाणवले हे सांगावे म्हणून ओरडण्यास माणूस तोंड उघडतो. तो पर्यंत जर त्याला सापडलेले ते थांबले असेल तर त्याची वाचा नष्ट होते. याळाच वाचानाश म्हणतात. नवीन जाणीव व वाचानाश नेहमीच एकत्र सापडतात...तोपर्यंत जर त्याला सापडलेले

निखळून नाहीसे झाले असेल, तर माणूस ओरडून ओरडून खूपच सांगत सुटतो. लोक ते एकत–ऐकत ऐकत नाहीत, हे असे ओरडणे नेहमी ऐकायला मिळते. अशा वेळी माणूस त्याचे जीवनविषयक तत्त्वज्ञान सांगतोय्, असे म्हणतात.

माणूस एकटा असतो. पण माणून त्याच्या खासगी मालकीचा नसतो. माणसाला एक जाणवून देणारे अस्तित्व असते. ही आकृती कशी वाढते न् पाहता पाहता कशी थकते हे त्याचे त्यालाच समजत नाही. माणसाची दुसरी खासगी गोष्ट म्हणजे त्याची बायको किंवा तिचा नवरा या होत. हे प्राणी त्याचे कधीच नसतात. माणसाची तिसरी खासगी गोष्ट म्हणजे त्याची झोप होय. नको नको ती स्वप्ने त्याची झोप घेऊन जातात...

...जो स्वप्ने पाहू शकत नाही तो करंटा असतो. जो स्वप्नाच्या मागे जातो, तो गाढव असतो. माणूस हा माणूस कधीच नसतो......माणूस हा एक पोरकट प्राणी आहे. तो सतत शंका घेतो. कधी याला फालतूपणा म्हणतात. कधी याला जिज्ञासा म्हणतात. थंडीच्या सकाळी सिंह जसा नुसते ऊन खात बसतो, तसे माणसाला जमत नाही. प्रकाश म्हणजे काय, तो शंका घेतो......

......माणसाने अनेक शोध लावलेत. त्याचा सर्वांत मोठा शोध कधीच लागलेला आहे. तो म्हणजे— शब्द ! पण अजून माणसाचे शोधन चालूच आहे. भयंकर पोकळ गोष्टींना शब्दांचे हार घालून, त्या भरदार भासवण्याचा सतत उद्योग म्हणजे मानवी–जीवन होय...

......हॉलमध्ये चालू असलेल्या तत्त्वज्ञान नावाच्या बडबडीचा त्याला कंटाळा आला. तो बाहेर आला. लांब व्हरांड्याच्या टोकाला असलेल्या एका खुर्चीवर तो बसला. एका बाजूला पावसाने माजवून दिलेल्या गवताचे पट्टे वाऱ्याने दबत होते, पुन्हा उभे राहात होते. त्या कुरळ्या लहरींकडे पाहात त्याने सिगरेट पेटवली. दुसऱ्या बाजूला दाट उंच अशोकाची त्रिकोणी झाडे रांगेने उभी होती. हलका निळा रंग घेऊन निघालेला सिगरेटचा धूर दाट हिरव्या वातावरणाशी जुळला......अन् व्हरांड्याच्या दुसऱ्या टोकाकडून ती हळूहळू मोठी मोठी होत येऊ लागली......

......परदेशी दिसली. पण साडी वगैरे सुरेख जमलेली होती. त्याच्या जवळ येत येत तिने टक द्यायला सुरुवात केली. थेट त्याच्या पुढे उभी राहिली. पाहू लागली...बराच वेळ गेला... हसली...

लेक्चरसाठी आलात ?–ती.

हं......कंटाळा आला......पण तुम्ही जा.....नाही...नाही...चला आपण बाहेर फिरू...

चला......त्याला सारेच जुळल्यासारखे झाले. तिने सिगरेट काढून हळूच पेटवली, तिच्याकडे पाहात तो म्हणाला, तुम्ही...

मी ग्रीक्...

ओ ! मग......मग हे असं चालणं, हळूच मोठं मोठं होणं, हळूच हसणं, हे नेसणं...

हे इंडिअन !

छान !

एक–दोन बरेच दिवस आले......कसे गेले कळले नाही......

उद्या हा समर–कोर्स संपणार......ती

संपू दे......

मी...मी परत जाणार...

अं !......

चल...चल दूर जाऊ......

हं !

रे...आज आपण एकत्र झोपू...त्याने वर पाहिले...ती तशीच हसत होती...त्याचे डोळे ओलसर होऊ लागले.....

उद्या तू जाणार ?...तो

हं.....

तुझ्या देशात ?

हं......

पुन्हा......पुन्हा......

रे हे बोलू नकोस...चल आज आपण दूर जाऊ......

हं ! तू इंडियात रहा...माझी हो...

तू युरोपमध्ये चल......माझा हो.....

आणि......आणि काहीच निरोप न घेता तो तिथून नाहीसा झाला. इथे आवडती माणसे एकत्र झोपू शकत नाहीत.....शरीर असते......किती सुंदर निसर्ग !.....पण इतर सारेच दूर दूर निघून जाणारे...

माणूस एकटा असतो. माणसाला बोलता येत नाही. त्याला काहीच सांधता येत नाही.

*    *    *    *

माणूस स्वतःला गाडून घेणारा प्राणी आहे. एकदा एक कथा ऐकली. एका माणसाला चांडाळ ठरविण्यात आले. पण त्याला मारून टाकले नाही. मानेपर्यंत त्याला लोकांनी गाडले व रोज सारी माणसे आपली घाण पिछाडी त्याच्या नाकाला पुसत जाऊ लागले. एकदाचे मला मारून टाका. तो रोज बोंब ठोकायचा. एकदाचा तो मेलाच. पण तो असा मेला...ही एक कथा नाही...ही माणूस-कथा आहे.

जन्मताना माणसाला दोन मोकळे पाय असतात. या योजनेतील हेतू अजून कोणासही समजला नाही. या दोन मोकळ्या पायांना बांधत, खुपसत माणूस एका ठिकाणी उभा राहतो. उभा माणूस वीर म्हटला जातो.

मोकळ्या पायांनी वाहता केलेला माणूस या सृष्टीत दिसत नाही.

माणूस स्वतःच्या हातांनी अनेक कण भोवती जमा करतो. या कणांना काय काय म्हणतात ! प्रेम. नाती. संस्कृती, असे असे पुढे पुढे...पण कण हे कणच असतात. ते जमा होतात. खूप मोठ्या आकाराचे ढीग तयार होतात. एकही ढीग स्पंदन करू शकत नाही.

त्याने तिच्यावर प्रेम केले. तिने त्याच्यावर प्रेम केले. प्रेम करताना फारच त्रास झाला. नंतर प्रेमभंग झाला. हा तर फारच फार त्रास...किंवा नंतर लग्न झाले...म्हणजे कोण कुठे गाडले गेले, याचा पत्ताच लागला नाही. पण गाडून घेणारा माणूस मोठा मानला जातो...

माणूस हा उडू न शकणारा प्राणी आहे !...

माणूस काहीच विसरत नाही. त्या शक्तीला स्मृती म्हणतात. स्मृती ही दैवी देणगी आहे. ज्याला लाभते तो आयुष्यात ठाम उभा राहतो. या स्मृति-स्तंभाला लोक शेंदूर लावतात. नमस्कार करतात. माणूस हा संपत्ती मिळवणारा प्राणी आहे. तो मिळवलेली संपत्ती खर्च करतो. संपत्ती न मिळाल्यास एक तो उद्योग होऊन बसतो. संपत्ती मिळाल्यास एक हा उद्योग होऊन बसतो. माणूस राजकारण खेळणारा प्राणी आहे. घरात किंवा बाहेर माणूस सारखे हातवारे करीत डावपेच करीत असतो. अशी मुत्सद्दी माणसे फारच भानगडी करून ठेवतात. त्या सर्वांच्या लक्षात राहाव्यात म्हणून इतिहास लिहिले जातात. इतिहासात नवीन फुलत्या क्षणांना प्रवेश देता येत नाही...इतिहास लिहिण्यापेक्षा इतिहास घडवणे महत्त्वाचे आहे, असे काही लोक म्हणतात..एकूण एकच...

फार मोठ्या शहरी रस्त्याने प्रेक्षणीय माणसांची गर्दी होती. बाजूला कार्पोरेशनची मोठी इमारत उभी. समोर बस–स्टँड. या बस–स्टँडवर अनंतात विलीन झालेली प्रेक्षणीय माणसांची रांग होती. या रांगेतील सारेच कसे मस्त न् गंभीर वाटत होते.


एक भिकारीण स्वत:ची हाडं सांभाळीत हात पसरून त्या रांगेसमोरून फिरत होती. तिच्या कमरेवर जाड कातरीने केस भादरलेले आणि शुद्ध–त्रेशुद्धतेच्या सीमेवर रेंगाळणारे एक पोर होते. ती फिरत होती.

पण रांगेतील माणसे उत्क्रांतीच्या वेगळ्याच टप्प्यावर गेली असल्यामुळे तिच्याकडे अपरिचयाने पाहात होती. रात्रीचे नऊ वाजले. समोर एक रेल्वे लाईनवरून जाणारा मोठा पूल होता. रात्रीचे बारा वाजले. सारे सामसूम झाले. त्या पुलाच्या अनेक पायऱ्यांपैकी एका पायरीवर ती भिकारीण मांडी घालून बसली होती. व कमरेत मोडून तशीच डोकं टेकवून झोपली होती. समोर ते एक वर्षाचे पोर अगदी त्याच स्थितीत तिच्यापुढे बसून मोडले होते. बेशुद्ध झाले होते. किंवा झोपले होते...माते, तू या जगात आणलेस तुला आमचे प्रमाण असोत... दोघांच्यामध्ये पैसे गोळा करण्यास एक लक्तर अांथरले होते. त्यावर पैसे नव्हते...पोराची लाळ त्यावर पडत होती...आजूबाजूने दुसऱ्या शोवरून सुटलेली उत्क्रांत माणसे जात येत होती...

इतिहास लिहावा काय ? इतिहास घडवावा काय ? पण...

...पण एकूण एकच...

□ □

|| कविता ||  || कविता ||

## आठ सपाट उघड्या कविता

उत्तम क्षीरसागर

: १ :

आकाश

सावकाश कायम डोक्यावर ढग
पर्वतमाथ्यावरून सरकणारे थवेच थवे
झाडांचे मुळघा रोवून सर्वांगात नद्या
सागर शोधणाऱ्या पोरी बिलोरी
झाडांच्या रांगांतून पांगणाऱ्या दुपारी
कायम खायला उठणाऱ्या म्हाताऱ्या
ऊठसूठ खायला मागणाऱ्या ओळी
झाडाझुडपांच्या माणसाकणसांच्या नियमित मुळे
एकमेकांच्या अवघड ठिकाणी लाथ हाणणारे म्हातारे
कायम बुद्धिबळ खेळणारे डुक्कर
राकेशच्या बंद कमऱ्यातले संभोग
रस्त्यारस्त्यावरचे मानसिक घडघाळ
कायम बंद पडलेले श्रीकृष्ण
युगे युगे तसेच बासरी वाजवणारे गंध
पावसानंतर उकरलेल्या मातीचे ऊन
सावलीत घट्ट रुतून बसलेले चर्च
कायम पर्वतपायथ्याशी पायऱ्यापायऱ्यावर कुणी एक
छातीभर केसांचा समुद्र खाजवणारा वारा
सतत छातीत असणारा पर्वत
नद्याच नद्या सांडणारा डोळा
कुणाचाही स्वच्छ सरळ पवित्र रस्ता
झाडाझाडातून नागमोडी कविता
पोस्टर पोस्टरवर रडणारी शाळा
पोपट दुकाने दवाखाने पंचायती
चौकाचौकातून गरजेच्या वस्तू कॅंडल्स
कायम विझलेल्या येशूच्या बंद दारासमोर गाणी
ओळीओळीतून जीव गुदमरवणारी झाडे
अर्ध्यात मोडलेली मुळासकट उपटलेली घरे माणसे
बंद करण्यास योग्य क्षितिज
कधीच न दिसणारे.........

●

: २ :

घुसू शकलो नाही कुठल्याच गोष्टीत
कायम टॅंजंट प्रत्येक गोष्टीस
की बाहेर फेकलो गेलो प्रत्येक गोष्टीतून
समजत नाही
आता कायम तमाम गोष्टींच्या
किनाऱ्याकिनाऱ्याने प्रवास
वाईट नाही हेही पण
काळजी फक्त एकाच गोष्टीची
आपल्या डोळ्यातील अंधार
नकळत एकदम गळून गेले तर ?

●

: ३ :

पाऊस पडून गेल्यानंतरच्या दिवाभर दुपारी
स्वच्छ उन्हे बाहेर दिव्यांच्या तारेवर संथ
थेंबांचे खेळ जीवघणे ढग वरखाली बाहेर आत
आपल्या नुस्तेच पाणी हवावगैरे अनेक जंतूसहित
मला धमाल सडवायच्यात सर्व सिर्यस गोष्टी
त्यांच्या म्हंजे माणसांच्या तमाम
दोन हात कशासाठी, दोन पाय कशासाठी
काही ओठ थोडे केस थोडा फेस कशासाठी
आपण गप्प कशासाठी धबधब्यासमोर
सर्व चिमण्या उडून गेल्यावर हा वास
बाहेरचा की आपल्याच शरीरातून येतोय
मिळणाऱ्या प्रत्येक गोष्टीवर तो थुंकलेलाच असतो
असे का कशासाठी ?

●

: ४ :

सर्वांचे चेहरे उतरतात एकदम कुणा एका-
ची आई मरून तार येते आजच नाही
ना जाणार तुम्ही उतरलेल्या चेहऱ्याला
सांभाळीत हुडकतात पैशे बरेचजण हा
गाणे म्हणतो टेबलावर मान पसरून
हसतो खिन्नभिन्न मान उचलून
गुलमोहराच्या झाडाजवळ पायऱ्या संपतात
तिकडे अडचणीत खूप गरजते
तो कोंडतो कपाटात मांजराला
मागचा धब्धबा पुढची नदी समोरचे धुमारे
परदेशी वारे आणि चक्क ऊन बाहेर
आपण आजच का नाही जात ?

●

: ५ :

समोर सर्वांत वर एक निळा दिवा खाली
क्रॉस आणि त्याही खाली भिन्ती उजेडात त्या
खाली अंधार सह्याद्रीचा उंचवटा लागूनच
पेरियारचं पात्र अंधार पाणी खडक
हत्तीचं साम्राज्य संपून सुरू झालेलं माणसांचं राज्य
तेव्हापासून पात्रात पेरियारच्या
बांबूच्या टोकावर युनियनचे झेंडे
चर्चमधून सामुदायिक विव्हळणं नियमित
संपवण्याचे प्रयत्न होऊनही नियमित मध्यमवर्गीयांना
न सोसवेल एवढा निसर्ग आज मला
झोप येईल का लोर्काच्या
ब्राइडनं सांगितलीय माझ्याच रक्ताची जात मला
बाई थोर आहेस दोनच काय
इथं हजार डगरी आहेत
ये ना हजार हातांची होऊन
पण आज नको इथं नको हे चर्च हे पात्र
पेरियारचं हे जंगल तुझ्या जन्माच्या खुणा मागच्या
अशी नको पूर्वीसारखं काही नको
तुझ्या रक्ताचे ढग होऊ देत अनंतात पसरू देत
चंद्रसूर्य प्रथ्वीमृत्यू सर्व झाकून जाऊ देत
आमचं काहीच नाही सर्वप्रूफ आम्ही
फक्त अंधारात गळतात डोळ्यातून डिझायर्स आमच्या
त्याचीच थोरवी आम्हास
पेरियारच्या बायांनो
तुमच्या उघड यानांच्या रानात
घामाबरोबर गळून जाऊ देत आमच्या विकृत माना.

●

: ६ :

तो भेटला हा भेटला ती भेटली ते भेटले
सीलबंद शब्दांचे थवे एकमेकांवर सोडले
अगदी सर्वांनीच सर्व ठिकाणी मग नाचू लागले
टिरी बडवीत गाणे म्हणले :

> बथ्थड बोथरट हिजडेनाच ।
> फतडाक फतडाक चालू लाग ॥
> काळ किराटी काळ किराटी ।
> एकतिस बत्तिस चाळिससाठी ॥

यथावकाश सारेच सडून गेले
खाली माना घालून विझून गेले
आपले आपले अस्थित्व सांभाळीत.

●

## कमकुवत पुलावरच्या
## लांबच लांब रस्त्याची अर्धवट कविता

: ७ :

ऐन मध्यावर दोन उंचच उंच मनोरे
एक चमेली के
काहीच घडत नाही ऐन तिन्हीसांजा
नुस्ता भदाभदा पाऊस पडतोय
लेकाचे मिरवणुका काढतात त्यात
पंताच्या कोटात चंद्र
आणि एक खोलच खोल विहीर
त्यात मूत नकट्या रावळाचं
वाळव्याच्या यल्लूने त्याचे पाय पुसलेले पण न पुसलेले
कारण काहीच तिच्या अंगावर नव्हते पण
काका तुम्हाला गोष्ट सांगू
एक होता राजा एक होती राणी
दोनों मर गये माय् गॉड
हो गयी कहाणी
मला ढगात पोचवा नाऽऽ
अस्तो ना वर स्वर्ग
मग खाली काय
तर पाताळ
नाही नाही खाली निसर्ग
वा
मला किनी नाहीच वाटत करावा अभ्यास
खेळावं पण नाही वाटत
नुस्तं बसून असावं
पाहिजे पाहिजे पाहिजे
धर्म कला संस्कृती वगैरेच्या वर्मावर बोट ठेवणारा
पाहिजे
आमच्या घराजवळ आहे धर्मशाळा ऐतीच
झालंच तर चौकसुद्धा आहे
ऐन तिन्हीसांजा वरचे सर्व खाली खोल खोल
कृष्णा कृष्णा तुझ्या पाण्याला डाग किती
कृष्णा कृष्णा तुझ्या नाण्याला नीतिनीति नाग किती
एके दिवशी
चौकात
जमले सारे
वरे बघू लागले
कुजुबुजू लागले
मनोरे कलले
मनोरे कलले
पण तेही शेवटी खोटेच निघाले
तर काय बोम्बलावे
हे रायंद्रा तू पोटात तलवार खुपसून घरोघर हिंड
आणि हे बाई तू घरीच उवा मारत बैस
हे भिकारणी तू मरून जा रात्री
तुझे प्रेत नगरपालिकेच्या गाडीतून नेले जाईल सन्मानाने
हे कारागिरा तू कापसाचे मोर बदक वगैरे कर
हे धर्मशाळेतील लोकांनो रात्र होताच तुम्ही भांडा
अंधारात
करा काहीही एकदा चक्क यात्रा भरल्यावर
त्याने
बोट नसलेल्या हाताने चक्क सर्वांग खाजवले
सर्व जखमा सजवल्या व्यवस्थित
सजवल्या व्यवस्थित
डोक्यास देवानंदची टोपी घातली
सर्व यात्रेतून ढुंगणावर चालत तिच्यासह
गाणे म्हणत तिच्यासह तिच्यासह मिळवले पैसे
धर्म पांडवाऽऽने केला त्यांनी देव लांबऽऽविला
चला बरेच झाले
माझ्याकडे आला तो ऐन मध्यरात्री
म्हणाला देव कुठाय
मी मेला असे म्हणालो तरी पण
त्याने दोन्ही हाताने धरून हालवले
जिवाच्या आकांताने मी वारलो
बगा बगा बगा
घा पैशात बघा
मोटर आली बगा
मोटरवाली बगा
मारामारी बघा
इंद्रा गांधी बगा
यस्वन्तराव बगा
चिची लाडाई बगा
आग लागली बगा



अनुक्रमणिका

देवानंद बघा
घेवानंद बघा
राणी आली बघा
राजा मेला बघा
बांब फुटला बगा
बांबू उटला बघा
काका काका तर मग लोक चोरी का कर्तात हो
तर आता झोप
ज्यांच्याकडे असतात उत्तरं सगळचा प्रश्नांची त्यांना
करा नागडे
प्रश्नच नसतात ज्यांच्याकडे त्यांच्या पायाखालची वाळू
सरकवा
हे म्हारोग्या मृत देवालयास शान्ती वे देव मेला आहे
कारण एकदा चौकातच त्या उंच काळ्याने सुरा काढला
म्हणाला मारतो सर्वाला
लहान मुले रडू लागली
त्यांना काय कळले
मलाही कळेनासे झाले आहे काहीच
नाहीच.

●

: ८ :

तर आपण गच्चीच्या कठड्यावरील आब्ज्ञवंर
वर चंद्र खाली उकिरडा समोरच्या खिडकीत रात्री
बाराचा प्रकाश तो पायजम्यात ती पर्करात त्याचा हात
खिशात आणि आपल्यासमोर ही वहापंधरा मराठी
ओळीनं विचारतात तालासुरात कुणाला तरी
की कोण हा विठ्ठल कोणत्या गावचा
उकिर्ड्यावर कुत्र्यांचा कल्लोळ आता
आणि सकाळी भिकाड्या उकिडव्या पोरी
काय हुडकतात उन्हं पडलेली नसताना
खाली जावं तर सारं बंद आणि दारात दोन साधू
आणि कुणी तरी त्यांना सांगणारा
की सब बंद हो गया चायवाय कुछ नही
तर चलो पानी पी के सो जाएंगे
रंग काळा गळ्यात माळा केसाच्या पारंब्या हातात
तांब्या
तांब्यास दोरी कमरेस कपडा आणि
दुसऱ्या/पहिल्या हातात त्रिशूळ
बस्
तर एक बंगाली बांबू त्यांची विचारपूस
तर नेपालसे आये
तर अघोरीबाबा के गुरु को जानते होगे
तर हां हां आत्मलिंग बाबा
त्याच्या डोळ्यात काय इतक्या रात्री इथे साबर्मतीच्या
तीरावर
तर अघोरीबाबा हमारे जैसा है खाता है पीता है इ०
इधर आया था मेले मे हमे जादू कर के चला गया
उसकी विद्या असूद है
तर ना बेटा ना वो तो सूद है
तर बिडी पी के चले जाव
जवळून
नाजुक सुखवस्तू गुजराथ्यांच्या बायका शिणमावरून
जाताना हसतो आपल्याकडं पाहून खूप ओळखीचं
तर काही तरी विचित्र असावं आपल्या चेहऱ्यात
तमाम भिकाऱ्यांना अपील होणारं
तर त्याला रस पाजवायला हवा होता आपण
वर जावं तर चालूच निलाजरेपण कटिस नेसले...
तो आजही तिथं बाकावर त्याच्या तोंडावर
काळे काळे दात पांढरे नाक किती धारदार
तर हा वेडा बशीत चहा ओतून अर्धा कप
आपल्या समोर : लो
तर आपण गुपचुप चहा गुडुप
तर मग तो सद्गृहस्थ आणि पोरीसोरींकडं हातवारे
करीत
बोलतो त्या वाक्यात कर्ता कर्म सर्व शिव्याच
ती फेंगडत चालते रस्त्यानं तिच्या हातात
मोगरीच्या फुलांचे गुच्छ
तर एकाला आवर्जून हाक मारते खूप हस्ते
आणि एक गुच्छ देते त्याला
आपण तिथं रस्त्यानं काळूपूर खूपखूप माणसं
एका अनंत रांगेत अंधारात आपण उभे केव्हापास्नं
ती रस्त्यावर पडू पडू रडतेय आणि दुसरी तिला
धरण्याचा प्रयत्न करतेय तर प्रवाहात
लहानसा सवरा आणि डाळिम्बाचे दाणे
बळे बळे तोंडात आणिक मित्र सांगतोय की

अरे, रात्री दुकानं बंद झाल्यावर मी रस्त्यानं
तर एक बाओ काही गुजराथीत म्हणत्येय
तर आपण एकदम पळत सुटलोत
मूर्ख साला काय पण भंपक सांगतो बिगतो
मी चिडलोय
साबर्मतीच्या वाळूत एक खड्डा वर आपण
आणि खाली सुकलेल्या झेंडूच्या माळा
तुटकी फणी आणि तडा गेलेला बूट
आपण वाळूत बोट फिरवतो तर पान
पुन्हा फिरवतो तर डोळे मग आपण डोळे बंद
आपण गल्ल्यावर झाल्या दिवसांचा हिशोब करण्यासाठी
तर टाळचा टाळचा
वळून पहावं तर उंचच उंच हिजडा पांढरे पांढरे केस
खूप काळा आणि पर्कर नेसलेला
तर राम्राम राम्राम पैसा दो मालिक
पुन्हा टाळी आणि गर्कन् फेरी स्वताभोवतीच
तर मालकाच्या शिव्या
तर शेवटी हा चक्क एका पायावर
सर्व पर्कर वर करून निऱ्याचा प्रयत्न
तर छे
मग निघून जातो तो आणि आपणहि ही
साबर्मती सोडून चक्क अम्दाबादी......
अम्दाबादेत पाच पैशाचं थंड पाणी
तर बाईनं ग्लास भरून स्वताच्या कपाळास लावून
दिला मग
तर आपण भयानक चरकलोत
दूध प्यावयास गेलोत तर दूध देणारा मुलगा
एका लिबास भोक पाडून त्याच्या दोन्ही बाजूस
मिर्च्या बांधत......
एक उशीत रडला
तर एक मित्राच्या ऑफिसात त्याच्यासमोर छोटचा
खुर्चीत
एकानं प्रश्न टाकला की औरंगबादची लोकसंख्या काय
तर त्याचं उत्तर आपण देऊ शकलो नाहीत अजून
या साऱ्याचा निष्कर्ष काय तर निष्कर्षवाल्यांना
महत्त्वाच्या गोष्टी समजत नाहीत कधीच
ते शास्त्रज्ञ वगैरे बनतात
शेवटी तर तो म्हणाला की
किल् मी आद'वाइज् यू आर अ मर्डरर !
●

## एखाद्या सहज संध्याकाळी

चंद्रकांत प्रभाकर देशपांडे

एखाद्या सहज संध्याकाळी
हे सुकोमल मुलांनो
पहा
एखाद्या निसटल्या क्षणी
दिसेल
आकाशातून संथपणे खाली पडत येणारे पान
लक्ष नका ठेवू

मजकूर वाचण्याचा प्रयत्न कराल
तर नरकात जाल
संदेश आणि सही मागाल
तर संपूर्ण आयुष्य करून घ्याल
एका मृत सत्याचे वाहक
आणि मान झुकवाल
तर भोगाल सर्वात् कडक प्रायश्चित्त
आपल्या नम्रतेच्या कर्तेपणाचे

ही तुमच्या आयुष्यातली पहिली संध्याकाळ
आणि हा पहिला क्षण
सदासर्वदा फक्त पहिलीच असू शकेल
अशी ही कौमार्यभंगाची घनगंभीर पहाट
तेजस्वी पहाट
असंख्य पक्ष्यांच्या कलकलाटाहून भरगच्च पहाट
रिकामी, उदासीन आणि निव्वळ पहाट

माणसाचे आयुष्य ही एक सत्य घटना
... सर्व जीवांचे अन् वस्तूंचे आयुष्य !
सर्वयुक्त अव्याहत सत्य घटना
आणि सर्व सत्यांना कलंकभूत आपण
जर नाही पाहिले आपण हे पान
अन् झालो इतिहासजमा ... निश्चयपूर्वक
... लक्ष नका ठेवू

अज्ञान परमपवित्र
एखाद्या हरणाच्या बछड्याच्या लुसलुशीत मांसाइतके
अन् तितकेच कोमल, गतिहीन अन् निष्ठुर

जपलेत
खूप जपलेत आजवर तुम्ही आपले उनाड खेळ
राहिलात अजिंक्य
. . . पण हे बच्छड्यांनो
हळूच एखादे दिवशी उगवते ही संध्याकाळ
आणि करते तुमचा पावित्र्यभंग
तुमच्या संपूर्ण अस्तित्वाला
अमोघ जखम करून
निसटून जातो एखादा क्षण

हा क्षण ढळू द्या. . .
तुमचे नामोनिशाण रोवले जाईल
तुमची लांबीरुंदी वाढेल
तुमचे उपयोग वाढतील. तापदायकताही वाढेल
तुम्ही गाल, रुसाल, चिडाल, हसाल
आणि प्रेमही कराल
प्रेम !
. . .ढळला जर हा क्षण
. . .अजिंक्य आहात
अजिंक्य राहाल . . .
पण मग तुमची तुम्हालाही दया येऊन काही उपयोग
होणार नाही
पुरुषांनो परस्त्रियांना उपभोगा
स्त्रियांनो परपुरुषांच्या खाली जा
तुम्ही कोणते पावित्र्य जपताहात ?
तुम्ही काय मस्तकी धारण केले आहे ?
फितूर व्हा, विश्वासघात करा,
आणि वाटेल त्यांचे मृत्यू घडवून आणा . . .
स्वतः जिवंत रहा . . .
तुम्ही त्याग कसले करता . . .

हा क्षण !
हा कोणता कुठला क्षण ?
हा वेगळा आहे.
वेगळाच !
पण आता निर्णय नको.
घाईने आहारी जाणे नको.
उद्याचे सर्व भरंवसे निश्चित् असतील
तरच हे फंद परवडतील
अन्यथा रस्ता खूपच काटायचा आहे . . .

सुख जपावं, दुःखावर फुंकर घालावी
एकमेकांच्या सहवासात आयुष्य मालवावं
पण मुलांनो
तुमच्या फुंकरी किती हळुवार, किती नाजुक
किंवा खरं म्हणजे किती अशक्त
उडवू शकाल का रे बाळांनो
कोटचवघी मैल पसरलेला निगरगट्ट कचरा
तुमच्या फुंकरींनी ?
तुमची इवली इवली हृदयं
तुमचे इवले इवले उन्हाळे पावसाळे
आणि तुमचे इवलेसे समर्थ हात !
तुमचे उच्छ्वास म्हणजे फुंकरी आहेत
की घाबरलेल्या हृदयाची थरथर ?
तुमच्या रक्ताचे प्रवाह असे अडवेतिडवे का पळताहेत ?
तुम्हाला कसली तरी ठाम समजूत हवी आहे का ?
जो तुम्हाला सर्व अन्यायांतून मुक्त करील ?

काहीही असले तरी शांत रहा, स्वस्थ रहा
या क्षणाकडून काही मागू नका
याला काही विचारू नका
याचा स्वीकारही करू नका
याचा आणि तुमचा काही संबंध नाही

शब्दांच्या सच्च्या आणि कृतींच्या पक्क्या
वीरांनो,
ही काही लढाई नव्हे. . .

असतील
सर्व लढाया अनिवार्य असतील
लढायाच का सर्वच गोष्टी अनिवार्य असतील. . .
आपणही नाही का
अनिवार्यच ?

लुटुपुटूचे राजपुत्र, लुटुपुटूचे राक्षस
आणि लुटुपुटूच्या राजकन्या
त्यांचे वाडे. . .
साधुपुरुष, वाघ, मुंगी
अन् एखादा कावळा

...शिवाय सात समुद्र,
जादूचे डोंगर आणि हलाहलांनी भरलेल्या वन्या..
राजपुत्रांचे विजय, राक्षसांचे पाडाव
आणि नंतरचे सुखाचे राज्य...
पण हे अनभिषिक्त सम्राटांनो
तुमच्या या चित्रमय जगाचे फलित काय ?
—थोडी अक्षरओळख अन् थोडा स्वप्नदोष...

मुलांनो,
सर्व कहाण्या विसरण्याचा हा क्षण ...
अक्षरांहून महत्त्वपूर्ण, शब्दांहून अर्थपूर्ण
आणि सर्व कहाण्यांच्या अतीत ...
...व्यतीत व्हावे सर्व जीवन
या क्षणात
...आणि काहीच करू नये
...असा हा क्षण !
काळाहून भेदक
आणि अनुभवाहून सत्य...

यावर कुणाचाच ठसा उमटू शकणार नाही
हे काही मानववंशांच्या इतिहासातले
पान नव्हे—जीर्ण होऊ शकणारे
कुठेही राहू शकणार नाही हा
साठून, साकळून
कारण याचे अंतरंग, बहिरंग
सर्व संपूर्ण एकच
एखाद्या संध्याकाळी
अनाहूतपणे झालेला मर्मभेद
एक अत्यंत साधा परिस्फोट

हे तुमच्या नाशाचे मूलभूत बीज
तुमच्या आकाशपाळण्यांचा हा अजस्र संहारक
सर्व स्वप्नांचा अंतिम समाप्तक...
याला वेळीच ठेचून टाका
याची आठवणही गाडून टाका
याला पुन्हा कधीच वाव मिळता कामा नये
असे व्हा निरर्गल प्रौढ
सुंदर स्त्रियांच्या उन्मत्त स्तनांहून उद्दाम
... हे खोटे असले तरी अशक्य नाही

खऱ्या क्षणाचेही जीवन
आपल्याच लहरीवर अवलंबून !

खरंच मुलांनो,
काय कराल ? कसे पाहाल ?
नका जाऊ बळी
हे कोमल फुलांनो
संस्कृतीच्या या परंपरागत संरक्षणकल्पनेत
...हा क्षण तुमचे रक्षण करील,
तुम्हाला तेज देईल
अन् करील तुम्हाला
मालिन्य नष्ट ...
खरंच नका नष्ट करू
अनादि अनंत संहाराचे हे क्षणिक सत्य
कारण हे आहे
एक तुमच्या जन्मासाठी उतावीळ गर्भाशय
यातून जन्माला या ...

किती जन्म ...
किती मृत्यु ...
अन् अचानक उगवलेल्या संध्याकाळचा
हा साधा, नकळत, अपरंपार क्षण ...
... कधी ना कधी हा येतोच
प्रत्येकाला भेटतोच ...

हा दूरस्थ
अनाकलनीय
निःसंग
अन् तरीही समक्ष ...
... काळाच्या साखळीतून
नकळत निसटलेला प्रखर,
शांत क्षण ...

याच्याकडून काही ही मागू नका
याला काहीही विचारू नका
याचा स्वीकारही करू नका
याचा आणि तुमचा काही संबंध नाही

तुमचा कुठलाही निर्णय चुकीचा ठरण्याचा
हा पहिलाच संभव ...

फक्त पहा ...

* *

## बेकार आणि भिकारी

वर्षा देशपांडे

पायांनी आघण ओतलं बोटांवर
तरी आधाशीपणानं हात गोंजारणारी,
निराशेचा नग्मा डोळ्यांनी गात
तारेच्या तुटल्या वहाणा गोळा करणारी,
आधारलेल्या खांबावर मृत्यूचं अधिष्ठान लिहिणारी
तुझी अेक ठिण्गी.

अन्त:करण पिळवटून काढताना अेक थेंब,
माझ्याच रक्तानं भिजलेला,
ओठावरचा 'सू हाय' भाजून गेला.
पण
अडखळलेल्या आशेच्या आराधनेत,
दोन चार थेंब आईस्क्रीमचे,
फ्रीजमधून पिळून गेला.

मघापासून पहातो–
माझ्याच कापसाच्या गादीवर
तुला लोळताना.
माझीच अक्कल तुझ्या टकुऱ्यावर
मिरे वाटताना.
माझ्याच अंगावरच्या वस्त्रास
तुझी ठिगळं लावताना.
तुला मागता येतं कटोऱ्यात
सर्कशीतल्या रिंगमास्तरसारखं.
पण–
माझ्यावर वळ उठतात
चाबकातल्या विखाराचे.
तुला मागता येतं
वाघाच्या डरकाळीसारखं
पण–
मला डोलता येत नाही
आकडेवाल्या नागासारखं.
तुला वेचता येतात शितं
विधात्यानं गोंजारलेली.
पण–
मला फोडता येत नाही नारळ
जत्रेतल्या झुंजीसारखा.
तुला वाजवता येतात नाणी
चातुर्मासाच्या नियमांसारखी.
पण–
मला वाचता येत नाही कहाणी
आरशावरच्या रेघांसारखी.
तू वाजवतोस तुणतुणं
मला वाजवता येत नाही
गाजरांची पुंगी.
तुला गाता येतं गीत
माझ्या ओठात टिकत नाही
भैरवीची आसावरी.
तुला पहाता येतं एका डोळ्यानं—
मी आंधळाच आहे
दोन्ही डोळ्यांनी.
तुला बनता येतं देशासाठी फकीर
मला पेलत नाही ओझं
राष्ट्रभक्तीच्या तलम वस्त्राचं.
कितीदा सांगितलं तुला–
नाणी वाजवू नको,
खुर्दा नाही लपायचा,
अभिमानाच्या आशिर्वादाचा.
कितीदा सांगितलं माझ्या मनाला–
खिसे तपासू नको रे,
आठवड्याच्या बाजाराला येणार नाही,
तुझ्या कमाईची नक्कल.
असू दे वेड्याच्याच घरात वावरतो मी–
अशीच तरलता चुंबायची होती,
तर तसबीर हारानं का सजवलीस
कोऱ्या कागदाच्या ?
असेच का अश्रू झोंबायचे होते
जखमेच्या रक्तावर !
मारलेली हाक, फोडलेल्या किंकाळ्या,
उगवायच्या होत्या,
विधात्याच्या खडकावर !
कोवळ्या किरणात होरपळणाऱ्या
ओलेतीचं चित्रं,

वेशीवर टांगायचं होतं !
औदार्याच्या तिजोरीची
चोरी करायची का
कटोऱ्यात टाकायला ?
बघ रे
तुझ्यातला तू विरून गेला
कटोऱ्याच्या कंफात.
माझ्यातला मी मात्र,
लपेटून बसला चादर,
आश्विनाच्या उन्हात.

## दुःस्वप्न

त्र्यंबक चिंतामणी खानोलकर

एका समुद्राजवळ
उभा होता एक उंच माणूस
काहीतरीच बरळत
असंबद्ध हालचालीत मग्न
तो उभा होता,
बसत होता
पळत होता,
पडत होता,
मधूनच दोन्ही हात पसरून
काहीतरी अडवू पहात होता.
सहजच विचारले एकाने त्याला
"तू आहेस तरी कोण ?"
तुझा आकार आहे मनुष्याचा
पण तुझ्या हालचालीत
आहे एक विलक्षण विक्षिप्तता
"तू आहेस तरी कोण ?"
एक घनगंभीर आवाज
त्याच्या सर्वांगातून उमटला—
"माणूस ?
पिशाच्च का नाही ?"
तो एक झाला भयचकित
मोठ्या प्रयासाने उद्‌गारला,
"पिशाच्च ?"
"हो पिशाच्चच !
या घटकेला माझ्यातील,
स्वत्वाचंच झालय् पिशाच्च.
माझं मन, माझी बुद्धी, माझं अस्तित्व;
सर्वांचीच झालीत स्वतंत्र पिशाच्च"
तो एक झाला संभ्रमित गेला—
निघून आल्या वाटेने
तो उंच मात्र राहिला बरळत,
"माझं मन-एक पिशाच्च
माझं अस्तित्व—एका पिशाच्च
पण मी माणूस
सर्व पिशाच्च बंदिस्त माझ्यात !
या क्षणाला
हा समुद्रही मीच आहे
माझ्याच स्वरूपात
किनाऱ्यावर उभा राहून
न्याहाळतोय स्वतःच्याच हालचाली.
वाटतय
दिशा दिशांना हलवणार
उठेल एक प्रलयंकारी तुफान
मग हा समुद्र
भयंकर खवळून आपलं सर्व खारट
पाणी
या अवघ्या जगावर ओकून टाकेल,
मग त्या विलक्षण खोल खोल
नजरेचा ठाव घेऊ न शकणाऱ्या
सागरतळाला दुभंगून
येतील
विद्रुप काळीकुट्ट पिशाच्चं
अनेक बेढब आकारांची
माथ्यावरला पाहून अंधार गडद उभा
दात विचकून
भयाण हसतील
विचित्र त्या हास्याने
कंपित होईल साराच अंधार
अन् पत्करून शरणागती
विलीन होईल काळकुचाट्ट त्यांच्या
रंगात !

क्षणार्धात ती पिशाच्च
रिक्त किनाऱ्यावर उगवतील
आपल्या पेटत्या डोळ्यांनी
सर्व दिशांना भेदक पहातील
दुभंग होतील क्षणार्धात साऱ्या दिशा "
तो उंच
हात पसरून
शिकस्त करू लागला
वाऱ्यालाच पकडण्याची "
"नाही ! या वाऱ्याचं त्या भयाण
तुफानात होऊ देणार नाही मी रूपांतर !
ती पिशाच्च जागृत नाही करायचीत
मला,
मी होऊ देणार नाही,
या दिशा दुभंग !
या दिशातूनच अनेक रात्री
नक्षत्रांचा प्रकाश घेऊन आल्यात
त्यांच्या शीतल स्पर्शाने
मी सुखावलीय अनेकदा.
या दिशा दुभंगल्या तर
त्या पलीकडे
अनेक तारका दिसतील
शिळा होऊन विझलेल्या.
दिशांचे हे पडदे जेव्हा होतील दूर
तेव्हा एक विद्रुप नाटच दिसेल.
त्या नाटयात फक्त
सर्व मानवांचे आत्मेच
विकृत होऊन वावरत असतील
अनेक सूर्यप्रकाश हरवून
स्वतःलाच करतील अर्पण
त्या रंगमंचासाठी
प्रत्येक दिशांत पसरलेला
भीषण अंधार
घेऊन प्रलयरूप
रथ होऊन येईल त्या पिशाच्चांसाठी
त्या विशाल रथावर स्वार होऊन
किनाऱ्यावर उगवलेली ती अवघी पिशाच्चं
त्या नाटयासन्निध जाऊन
सर्व सूत्रे आपल्या हाती घेतील."
तो उंच हळू हळू
त्या विशाल समुद्रावर
सावली सारखा पसरत गेला.
एक घनगंभीर आवाज त्यातूनच विरत गेला.
"वायुदेवा,
ते प्रलयकारी तुफान
येऊ देऊ नकोस."
एक ढग चंद्राआडून सरकत असतानाच
मला जाग आली...
एक भयानक दुःस्वप्न देऊन रात्र
मध्यावर आली...

* *

## स्पार्किंग

प्रकाश देशपांडे

मोकळा रिकामा रस्ता
गच्च दाटीवाटीच्या सुस्त इमारती
माझी रिक्षा आवाज करीत चालली आहे
सिगरेटच्या टोकावर मी जिवंत पेटलो आहे
आणि अचानक स्पार्किंग होते
स्ट्रिटलाईट, नियॉन थंड अंधारतात
आता जागे माझी सिगरेट अन् मी
रिक्षावाला डोळ्यात बोटे घालून फोडून घेतो
"बाबुजी उतर जाइए"
खिशातून साधारण लहान नोट अंदाजाने पुढे करतो
सिगरेट संपत आली आहे
नवीन पेटवली पाहिजे—
अंधार चाचपडत पाऊल मोजणी सुरु करतो
पुढे पडणारं पाऊलही कदमताल करतेय असं वाटतं
पुन्हा दाहिने बाय—
चालतांना सिगरेटची वर्तुळं निघत नाहीत
थांबतो.
एक वर्तुळं अंधारयात्रेसाठी सोडून देतो
त्यांनी इलेक्ट्रिकच्या बल्बला माळ घातली असेल
डावा हात खिशात घालून चालू लागतो
खिशात नोटांची गर्दी आहे

माझ्यावर डाका पडला तर चोराचे आयुष्य बनेल
सिगरेटच्या उजेडात माझे नाक भयानक दिसते
लाल निखारा लय घेवून खालीवर होतो
वरून विमान घरघरून जाते
लाल, निळे (हिरवे) सिग्नल
मी हात उंचावून विश करतो.
पायलटने सलामी दिली असेल
रेडियमचे काटे दौड वाजवतात
पुन्हा एकदा स्पार्किंग होते–
–मी सिगरेट विझवतो
घड्याळ काढून इलेक्ट्रिकच्या बल्बला फेकून मारतो
स्पार्क पडला तेव्हापासून दिडेकशे पावलं आलो असेल.
दोनेकशे पावलावर घागरींच्या तोंडाची विहीर आहे
फुगून माझ्याएवढा झालेला संजू तीन दिवसांनी
निघाला होता!
रस्त्याच्या दुसऱ्या कडेला पळावं का?
ते देऊळ आलं असेल–
डोळे मिटून भिंत चाचपडतो
देवाच्या तुरुंगाचे गज सापडतात
पुजारी दहा पावलांवर झोपला असेल
आवाज न करता दार उघडतो
पावलं मोजतो
आवाज न फुटवता पुजाऱ्याचा गळा दाबतो
सगळी मान नुसती शीर होते
चाचपडून देवाची मूर्ती उचलतो
भर अर्ध्या रात्री बेसूर घंटी वाजवतो
कडेकडेनी बाहेर येतो
चाळीसएक पावलं बिनधास्त चालतो
मग रांगत देवाला पोटाशी घेवून पुढे जातो
विहिरीची जमीनदोस्त कडा सापडते
मी खदखदून हसतो––
खिशातल्या नोटा ताकद लावून दूर भिरकावतो
अंगावरचे एकूण एक कपडे देवाला गुंडाळतो
आणि विहिरीत फेकून देतो––
––खूप फुगून तो उद्या वर येईल का?
आता सारेच संपले आहे
डोळ्यावर झापड येते
वेडेवाकडे आळोखे देवून जांभई आवरतो
विसेक पावलावर दात वाजवित तो पागल झोपला
असेल
चालतो
उघड्या नागड्या पागलाला पोटाशी घेतो
अन् शांत झोपून जातो
आयुष्यात पहिल्यांदा झोपल्यागत्––!

* *

## हवा

वसुधा माने

हवा अस्वस्थ मोरांची
भरल्या हृदयाच्या सांजेची.
निळसर कडु धुरात रंगणाऱ्या
राक्षस, पऱ्यांच्या गोष्टींची;
सोशिक नळ्यांवरचा ताल
कानात घुमवून गर्भस्थ
दिवसांची आठवण
मनात जागवणारी;
मला मात्र ध्यास
सूर्यावरुन सरकणारी
माझी काळोखी सावली
पहाण्याचा.

* *.

□ □

## १. स्वस्तिक
## २. गांधारी
## ३. आस्तिक–नास्तिक

शकुंतला जोग

'स्वस्तिक' हा श्री. वसंत सावंत यांच्या सुमारे अडुसष्ट कवितांचा ऐंशी पानी संग्रह. या कविता साधारणपणे सत्तावन ते सत्तर या बारा तेरा वर्षांच्या कालखंडात लिहिल्या गेल्या आहेत. पण या विशिष्ट काळाचा चेहेरा मोहोरा या कविता रेखाटू शकल्या नाहीत. कालस्वर पकडू शकल्या नाहीत. त्यांमुळे जर कवितेच्या खाली लेखनकाल दिला नसता, तर या कविता कुठल्या काळात बसतात हे सांगणे कठीण गेले असते. सावंतांची कविता बरीचशी आत्मनिष्ठ आणि पुष्कळशी रोमँटिक वाटते. त्यांनीच एका कवितेत म्हटले आहे, 'भोवताली झोपलेल्या जगाला कवीची किंमत नाही.' तसेच त्यांच्या कवितेबद्दल आपणास म्हणता येईल की कवीलाही जगाची किंमत नाही, किंवा जगाकडे त्याचे लक्ष नाहीय. पण तरीही ज्याला आपण अलिप्त किंवा 'आऊटसायडर' म्हणू, तसा तो नाही आहे. त्याला कसलं तरी बिलाँगिंग आहे. मग ते प्रेयसीवरचे असो, निसर्गावरचे असो, ईश्वरावरचे असो नाही तर प्रेमावरचे असो. त्याचप्रमाणे तो बेचैनही नाही. फक्त स्वतःत गुरफटलेला आहे. आत्मनिष्ठ आहे.

सावंतांच्या कवितेला लय आहे. ती भावपरही आहे. उलट कवीचा विचारांपेक्षा भावनेवरच भर जास्त आहे असं दिसतं. म्हणूनच कवितेत सामाजिकतेचा संपूर्ण अभाव आहे. पण कविता जुन्या पठडीतली म्हणावी तर कवीचा शब्दांचा हव्यास ठायी ठायी जाणवतो. पण त्यातल्या त्यात मुक्तछंदापेक्षा सावंतांच्या लयबद्ध कविता चांगल्या वाटतात. सावंतांना शब्दकला साध्य आहेच. अनुभूतीची खोली कमी असल्यामुळे असेल कदाचित पण कवितेला आशयघनता, जीवनविषयक विशिष्ट दृष्टिकोन याही गोष्टी तितक्याशा जाणवत नाहीत. सदुसष्ट अडुसष्ट नंतरच्या कविता जास्त प्रगल्भ चिंतनशील वाटतात. त्यांच्यात विचार; अनुभूति यांची चाहूल लागते. त्याचप्रमाणे त्या नुसत्याच रोमँटिक नाहीत तर थोडीशी चिरंतन सत्याचा शोध घेण्याची प्रवृत्ति वाटते. उदाहरणार्थ साथी, दयामूर्त आकाश, सर्कस, या कविता म्हणता येतील जन्मवाद, जाच या कविता वाचून मात्र वाटते की सावंतांना कवि म्हणून उज्ज्वल भविष्य आहे. 'ज्यांनी घरती गरती केली आणि आपला घाम दिला' किंवा 'विश्वासाला तडा जातो, कुंपणापल्याड सरडा धावतो' अशासारख्या कल्पना वाचकांचं लक्ष वेधतात. 'कृष्णा गोसावी'-सारख्या आणखी कविता सावंतांनी लिहिल्या तर बरे होईल. सामाजिकता हा एक नवा पैलू त्यांच्या कवितांना मिळेल. कलावंत हा बेसिकली कलावंतच असतो हे जरी खरे असले तरी समाजप्रबोधनासाठी कवीनं, आपल्या प्रतिभेला प्रामाणिक राहून का होईना पण थोडंफार सामाजिकतेकडेही वळायला हवं असं मला वाटतं.

सावंतांची शैली मात्र भावमधुर आहे. फुले, दव, चांदणं या स्टीरिओटाईप उपमा जरी वारंवार आल्या असल्या तरीही 'दिशांचा राखी रंग, वाकून उभी असलेली झाडे, डोंगर, धुके, मेघांची घनदाटी हे सर्व चित्र तळघाचा काठ उराशी ओढून घेतो आणि जळावर गारगारसे रंग उमलतात.' ही कल्पना मनाला स्पर्शून जाते.

> 'निळे शिल्प भासातुनी शाश्वताच्या
> मला जाणवे रूप ध्यासांतुनी
> अमर्याद आलेख तू वेदनांचा
> परी कोवळा चंद्र डोईवरी.
> प्रभाती रवी भाळ चुंबी तुझे अन्
> क्षितीजात ओली तुझी प्रार्थना.

यामध्ये मात्र सावंतांच्या आईवडिलांच्या गळ्यात फोंदलेल्या विठूच्या अभंगांची आणि ओवीची लय उतरलीय्. सगुण श्रद्धेतून 'घुमे देह छंदात गीतापरी' ही ओढ दिसून येते.

'कानावर कांकणांचा किरमिजी आवाज सनई होतो' अशा भावुक कल्पनाही आहेत. आणि 'उपरऱ्या स्मशानात जळणारी प्रेतं, त्यांचा वास, तू जळताना तुझा सुद्धा असाच गडचा वास येईल, निदान आपला धर्म बरा, मेल्यावर आपण जागा आडवत नाही' असं थंड, कठोर, परखड सत्यही आहे.

अशीच प्रगती होत राहिली तर शब्दब्रह्माच्या अफाट सागरात सावंतांचा एक अणू निश्चितपणे तरून जाईल असं म्हणायला हरकत नाही.

भटकळांच्या प्रकाशक म्हणून केलेल्या कामगिरीवर बोलायलाच नको. ती नेहेमीच आकर्षक असते. पद्मा सहस्त्रबुद्धेंच्या मुग्ध जंगलातल्या स्तब्ध झावळ्या खूपसं बोलून जातात.

['स्वस्तिक' (कविता संग्रह), ले. वसंत, सावंत, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृष्ठ संख्या–८० कि. ५ रु.]

'गांधारी' ही एका तरल्या, फळल्या, उध्वस्त गावाची हकीकत. या हकीकतीला तसं कथानकाचं सूत्र नाही. त्यामुळे तिला कादंबरी म्हणताना विचार पडतो. कथानक म्हणजे नुसतेच नायक नायिका हव्यात असं माझं म्हणणं नाही. पण त्यात एकसूत्रीपणा अपेक्षित असतो. तरीही ही हकीकत झपाटलेल्या अवस्थेत लिहिलीय हे जाणवतं आणि म्हणूनच ती जिवंत वाटते. पण त्या झपाटलेल्या अवस्थेतच महानोरांनी तिला कथानकाचा धागा दिला असता तर तिचं स्वरूप विस्कळीत झालं नसतं, नुसती वेगवेगळी व्यक्तित्वं डिकानं एकत्र चिकटवल्यासारखी वाटतात ती वाटली नसती. वर्णन, चरित्रचित्रण सगळ्यातच एकसंधपणा आला असता. असं असलं तरीही महानोरांनी प्लॅस्टिक सर्जरी केली नाही हे बरंच झालं. केली असती तर त्याला कृत्रिमपणा आला असता. अर्थात् माझा हा ॲकॅडमिक समीक्षेचा धुरळा नाहीय् तर मनीचा ओलावा आहे. 'रानातल्या कविता' आणि 'वही' वाचता वाचताच हा ओलावा निर्माण झालाय. म्हणूनच साहित्यातल्या काव्य या एका प्रकारात वाचकाला थरारून, खिळवून ठेवणारे महानोर कादंबरी या प्रकारातही तितकेच यशस्वी व्हावेत ही इच्छा.

महानोर म्हणतात, 'गांधारी महाभारतातल्या गांधारीसारखीच राजयोगी पण दुर्दैवी.' पण मला वाटतं भारतातल्या प्रत्येक खेडयाची हीच गत आहे. वैर, वैमनस्य, अडाणीपणा, गुंडगिरी, लाचलुचपतीचे सुरुंग खेडयांना उध्वस्त करत आहेत. स्वातंत्र्यपूर्वही आणि स्वातंत्र्योत्तरही. गांधारी ही त्या परिस्थितीची प्रतिनिधी म्हणून प्रातिनिधिक. निजामाच्या विळख्यातली म्हणून फारतर राजयोगी म्हणता येईल कुठल्याही एखाद्या मौजे ग्रामात स्वातंत्र्योत्तर घडतील अशाच घटना गांधारीत आहेत.

रझाकारांनी केलेले शारीरिक हाल, जगदेवासारख्यांनी केलेली फसवणूक, भागवतसारख्या सुशिक्षित सज्जनाची असहायता, नृत्यानं झपाटलेली गुलाब, शारीरिक भुकेचा घास झालेला विद्वान अध्यात्मिक महाराज यांचं हुबेहूब चित्रं वाचकांच्या समोर उभं करण्यात महानोर निश्चितपणे यशस्वी झाले आहेत. पण त्यावर उपाय सुचवणं, उन्नती करणं त्यांनाही नाही आणि आपल्या कुणालाच शक्य झालं नाहीय. त्याबाबत मात्र सर्व सुशिक्षित, अशिक्षित समाजाची गांधारीसारखीच डोळ्यांवर पट्टी बांधल्यासारखी अवस्था झालीय.





अनुक्रमणिका

निवेदनात तटस्थपणा आहे. त्याचप्रमाणे अतिशय भावविवशाता, काव्यात्मपणा, मेलोड्रामा टाळून महानोरांनी हृद्य संयम दाखविला आहे. त्यामुळे कादंबरीच्या घाटात कच्चेपणा राहिला नाहीय्.

जगदेव हा स्वातंत्र्योत्तर कुठल्याही खेड्यात, ग्रामपंचायतीत, जिल्हा परिषदेत कुत्र्याच्या छत्रीसारखा उगवणारा माणूस आहे. त्यामुळे त्याच्या व्यक्तिरेखेबद्दल सांगण्यासारखं काहीच नाही. भागवत ही मात्र यातील केंद्रभूत व्यक्तिरेखा. हा माणूस उदासीन वाटतो. स्वभावाच्या सौम्यपणामुळे असेल कदाचित्. तसाच आतल्या आत जिवाला खाणारा वाटतो. विचार करून करून स्वत:ला त्रास करून घेतो. पण गावासाठी विधायक काही करणं त्याला शक्य होत नाही. कारण त्याचा मध्यममार्गी संवेदनाक्षम स्वभाव. मर्यादित प्रमाणात तो काही करतोही. पण मर्यादा संपल्या की गप्प होतो. पण त्याच वेळी तो स्वाभिमानशून्य तडजोडही करत नाही. त्याच्या ब्रूडिंग नेचरमुळे तो घरच्या कटकटींपासूनच दूर पळतो. त्यांना तोंड देऊ शकत नाही. घरी न जाता रानातच काळ काढतो. इतकंच काय ? पण स्वत:च्याच पत्नीशी संभोग करण्याची इच्छाही तो रानातच पुरी करतोय. या त्याच्या स्वभावामुळे स्वत:ला झोकून देऊन सनसनाटी काहीतरी करणं त्याला शक्य होत नाही. असा प्रामाणिक, बुद्धिमान, कष्टाळू, लाजाळू, काहीसा दुर्बळ भागवत जसाच्या तसा रंगविल्यामुळे तो वास्तव वाटतो, कृत्रिम वाटत नाही. हळव्या भावविवशतेच्या आहारी जाऊन नायकाला मर्यादापुरुषोत्तम, ध्येयवादी वगैरे वगैरे सद्गुणांचा पुतळा बनवायचा मोह महानोरांनी टाळलाय् याबद्दल त्यांचं अभिनंदन करावं तेवढं थोडं आहे.

एक जिवाला जीव देणारा मित्र आणि कलंदर कलावंत असलेला लालजी आणि संयमी, शहाणी पण नृत्याच्या बाबतीत वेडी म्हणजे जवळ जवळ ल्यूनसीप्रत पोहोचणारी गुलाब या जोडीनं कादंबरीला एक प्रकारचा जिवंतपणा आणला आहे, टवटवी आणली आहे. नवऱ्याच्या इच्छेनुसार कळसूत्री बाहुलीप्रमाणे नाचणारी भित्री, भाबडी गंगा, पैसे बुडवणारे लाचार पाटील, मुर्गाला लालचावलेले अधिकारी या व्यक्तिरेखा आपल्या आसपासच्या कुठल्याही खेड्यात वावरताना दिसतात. बाळपणीच सौभाग्य हरपलेली जयवंता म्हणजे अतृप्तीचं मूर्तिमंत उदाहरण. पण तिच्या अतृप्तीचा महानोरांनी दाखविला आहे तो विकृत आविष्कार दाखवायलाच हवा होता का ? हा प्रश्न पडतो. पण त्याच वेळी महाराजामधला माणूस आणि त्याच्या माध्यमातून दाखवलेलं वासनेचं चिरंजीवित्व मात्र मनाला जिंकून जातं.

महानोरांची शैली साधी, सरळ. कुठेही काव्यात्म होऊन तिनं निवेदनाचा डोल ढासळू दिला नाहीय्. चित्रकार 'क्षीरसागर' हे कादंबरीला मिळालेलं वरदान. डोळ्यांच्या खाचांतूनही आवर्त बघणारी गांधारी; उध्वस्त झालेली गांधारी (पान ९), भागवतच्या रूपानं चंद्रोदय होतोय् पण तरीही वठलेल्या गांधारीला पालवण्याचं सामर्थ्य त्या चंद्रात नाहीय् (पान २७); जयवंताची अतृप्ती, गुलाबचं नृत्यवेड (पान ३७); काळाकुट्ट काळोखातील भागवतच्या विचारचक्रांची गिधाडे (पान ७७). ही आणि अशीच चित्रे काढणाऱ्या माणसाच्या अनुभूतीची, विचारांची खोली सामान्य वाटत नाही.

अशा या दुर्दैवी, नेत्रसुखाला आंचवलेल्या गांधारीच्या व्यथेची गुंफण एकशे सोळा पानांच्या लहानशा भाग्यात पॉप्युलरने केली आहे. व्यथेच्या या छोटयाशा भाग्यालाही दहा रुपये मूल्य पडावं हे जरासं खटकतं.

[गांधारी : रा धों. महानोर : पॉप्युलर प्रकाशन, मुंबई ३४ : पृष्ठे : ११६ : किंमत १० रु.]

३

'आस्तिक नास्तिक' हे देवीदास बागूल यांचे संतवाङ्मयाचा नवा अर्थ उलगडून दाखविणारे पुस्तक. संतांची समाजवादी, मानवतावादी विचारसरणी या विषयीचे मनमोकळे, नव्या अनुभूतीने केलेले चिंतन. तसं पाहिलं तर संतवाङ्मयाच्या डोळस, बुद्धिनिष्ठ वाचकाला, त्याचा लावलेला प्रचलित अर्थ, आणि खरा अर्थ यातली विसंगती केव्हाच जाणवली आहे. देव या कल्पनेच्या सावटाखालून बुद्धिनिष्ठ माणूस केव्हाच निसटलेला असतो. आणि संतांच्याच शब्दातून खरा अर्थ गवसला तरी त्याकडे सोयिस्कर दुर्लक्ष करणं उरलेल्यांच्या हिताचं असतं. तुम्ही झोपी गेलेल्याला जागा कराल पण झोपेचं सोंग घेतलेल्याला कसं जागं करणार ?

बागूल म्हणतात, 'कांदा मुळा भाजी अवघी विठाबाई माझी' म्हणत म्हणतच, 'अरे अंघोळ लौकर

आटोप, पूजा करायची आहे ना ? ' असं माणसं एकमेकाला म्हणत असतात. तसंच आता बागूलांचं पुस्तक वाचतील, त्यातल्या नव्या अनुभूतीला माना डोलवत पसंतीची पावती देतील आणि त्याच ब्रेथमध्ये म्हणतील, ' अरे ड्रिंक लौकर संपव, आचार्य रजनीशांच्या दर्शनाला जायचय् ना ! ' पूर्वी निदान देव या निर्गुण निराकार कल्पनेच्या प्रतिमेची तरी भक्ती आणि पूजा होत असे. आता त्याची जागा रजनीश, महेश योगींनी घेतलीय्. या वरून मनाच्या निबरपणाची जात कळते. जाड कातड्याची घट्ट पोत लक्षात येते. अर्थात हा दोष बागूलांचा नाही. सोशल सेन्स नसलेल्या स्वार्थी सामाजिक रूढींचा आहे.

माणसाचं अस्तित्व नाकारून देवाच्या अस्तित्वासाठी जिवाचा आटापीटा करणं ही संतांची क्रूर थट्टा आहे, हे बागूलांप्रमाणे तुम्हा आम्हालाही जाणवलय्. पण माणसं ती का करतात ? माणसाचंच अस्तित्व क्षणभंगुर आहे, अशाश्वत आहे अशी खोल कुठेतरी प्रत्येकाला जाणीव असते, आणि म्हणूनच भीतीही असते. 'देव' या 'कल्पनेचं' अस्तिव तरी शाश्वत आहे. या गोष्टीचा सामान्य माणसाला एक प्रकारचा

मानसिक आधार वाटतो. म्हणून तो त्या आधाराला चिकटून रहातो. त्याचप्रमाणे 'विसरू नका रंकासी' हे तुकाराम महाराज खूप सांगतील, पण रंकांना आठवणं म्हणजे दारिद्र्याच्या राक्षसाचं दर्शन घेणं, त्याच्या चटक्यांनी अंगाला डागून घेणं, हे सर्वसामान्य भीरू माणसाला शक्य नसतं म्हणून त्याकडे सोयिस्कर दुर्लक्ष करून तुकोबांनीच सांगितलेलं नामस्मरण फक्त तो करतो. ते सोपं असतं. बागूलांच्या म्हणण्याप्रमाणे तुकारामाची वारी खरोखरच आदिवासींचा शोध घेत जायला हवी. पण माणसाला आपल्या सुरक्षिततेला तडा जायला नको असतो. आदिवासींचा उद्धार म्हणजे सुरक्षित संसारावर निखारा. तो एखादी गोदाराणीच ठेऊ जाणे. मग त्यापेक्षा पंढरपूरच्या वारीच्या गुंगीत राहणं जास्त सोपं. अशाश्वतेची भीती, माणुसकीला सोडून केलेल्या वर्तनामुळे अंतर्मनाला लागलेली टोचणी या सर्व गोष्टींवर नामस्मरण, पंढरपूरची वारी हे उतारे सुलभ आहेत. काही काळ गुंगी आणतात म्हणून माणूस तेच अनुसरतो. आणि स्वतःची आणि इतरांची फसवणूक करतो. हे मी सर्वसामान्य माणसाला किंवा दांभिकपणाला डिफेंड करण्यासाठी म्हणत नाही आहे तर वस्तुस्थितीचं स्पष्टीकरण करते आहे. 'परमेश्वर मेला आहे' हे नीत्शेचं तत्त्वज्ञान जेव्हा समाजातल्या प्रत्येक माणसाला पटेल तेव्हाच हा दंभ नाहीसा होईल.

सगळेच संत मानवतावादी होते, समाजवादी होते पण कवी होते हे विसरून चालणार नाही. आपल्या काव्यातून त्यांनी समाजवादाचा पुरस्कार केला पण एकट्यांनीच केला. अनेक अनुयायी जमवून, समाजात मिसळून त्यांना तो करता आला नाही. म्हणून तो समाजवाद फक्त पुस्तकातच राहिला. आणि संतांचा एकेकट्याचा दुबळा स्वर कुणाच्या मेंदूपर्यंत पोचलाच नाही. अर्थात् हा दोष संतांचा नाही. कारण इनिशियली ते कवी होते. आणि कवी हा नेहमी एकटा, एकाकी असतो, नव्हे त्याची प्रवृत्ती एकटा राहण्याची असते.

'देवाला स्वतःची दगडी मूर्ती नीट सुखात ठेवता येत नाही.' किंवा 'धूपारती शेजारती दुसऱ्याकडून करून घ्यावी लागते, तो दुसऱ्याला काय सुखी करणार ?' म्हणून देवाचा पांगुळगाडा टाकून देऊन, संसाराला पंढरपूर करून, गाडग्यामडक्याचाच अवघाची संसार सुखाचा करायला निघालेल्या ज्ञानेश्वरांचं बागुलांनी केलेलं वर्णन दांभिकतेच्या वर्मावर बोट ठेवतं.

'मैत्रियेचा कुत्रा आणि त्यातून डोकावणारे बंडखोर, नास्तिक ज्ञानेश्वर, आक्रमक, देवाच्या सर्वज्ञतेची लाज काढणारे चोखोबा ही रूपं नवीन आहेत. आजही हरिजनावर अत्याचार होताहेत. अशावेळी डोळ्यांवर कातडं ओढून स्वस्थ बसणाऱ्या देवाच्या देवळात हरिजनांनी जाण्याचा आग्रह धरण्याऐवजी चोखामेळ्यासारखे सत्वशील उद्गार काढून स्वतःच्या सारभूत सौंदर्याची कास धरणं श्रेयस्कर नाही काय ?' अशा तऱ्हेचे विचार ओरिजिनल म्हणूनच क्रांतिकारक वाटतात. प्रबोधनाची सुखद चाहूल जवळ जवळ आणणारे वाटतात.

महाराष्ट्रात रानडे-आगरकरांपासून, सरदारापर्यंत अनेकांनी संतवाङ्मयाचे रसग्रहण डोळस आणि नव्या अनुभूतींनी पूर्वी केलेच आहे. पण अज्ञानाच्या दांभिकतेच्या या महासागराला ढवळायला वासुकीचा दोर असलेलीच रवी पाहिजे. कधीकाळी त्यावर नवनीत आलंच तर त्यातल्या एका कणावर तरी बागुलांचा हक्क निश्चितच आहे. आज प्रबोधनाला अनुकूल असा काळ आहे. कारण आजची तरुण पिढी डोळस आहे. भावनेपेक्षा बुद्धीवर, विचारांवर भर देणारी आहे. बागुलांनी योग्य वेळी हे पुस्तक लिहून आपला वाटा उचलला आहे.

बागूलांची भाषा सरळ, सोपी, चटकन् आकलन होणारी आहे. गुळगुळीत दगड वाळू दाखवत दाखवत झुळझुळ वहाणाऱ्या नदीच्या काठाजवळच्या पारदर्शक पाण्यासारखी आहे. तिला अलंकाराचा हव्यास नाही, विद्वत् जडतेचा अहंकार नाही. कधी कधी त्यावर साने गुरुजींची छाप वाटते.

आंधळ्या आस्तिकाच्या केशरी ज्वाला विझवायला डोळस नास्तिकाचं शुभ्र इवलसं नीर आज तरी असमर्थ ठरतंय्. हे चित्रकार देवीदास बागुलांचं मुखपृष्ठावरचं यश निर्विवाद आहे.

['आस्तिक नास्तिक' लेखक—देवीदास बागूल, पृष्ठसंख्या ४४, प्रकाशक—शंकर सारडा, किंमत—चार रुपये.]

□ □

# दुर्दम्य

वसंत कृष्ण वऱ्हाडपांडे

सुप्रसिद्ध कथालेखक प्रा. गंगाधर गाडगीळ यांच्या 'दुर्दम्य' या द्विखंडात्मक कादंबरीने मराठीतील चरित्रात्मक कादंबरी–वाङ्मयात एक मोलाची भर टाकलेली आहे यात संदेह नाही. गेल्या काही वर्षांत मराठीत चरित्रात्मक कादंबऱ्यांच्या निर्मितीला काहीसा वेग आलेला आहे. हरि नारायण, आनंदी गोपाळ, यज्ञ, इन्कलाब यांसारख्या सामाजिक स्वरूपाच्या; तसेच स्वामी, ओंकार, झेप, झुंज, चंबळेच्या पलीकडे इत्यादींसारख्या ऐतिहासिक स्वरूपाच्या कादंबऱ्या पाहिल्या तर या वेगाची काहीशी कल्पना येऊ शकेल. कादंबरी या कलाप्रकाराची निर्मिती म्हणजे प्रतिभावंताच्या आविष्कार–सामर्थ्याची एकप्रकारे कसोटीच असते. त्यातही चरित्रात्मक कादंबरी निर्माण करणे हे अत्यंत कठीण असते. कारण कल्पिताच्या रमणीय आवरणात सत्याची आकर्षक योजना करण्याचा सर्वमान्य मार्ग तेथे प्रतिभावंताला फारसा मोकळा नसतो! क्वचित, मूळ सत्यच अत्यंत आकर्षक असल्याने त्याची मांडणी रसिकांना चित्ताकर्षक होईल अशा रीतीने तो करू शकतो व 'आनंदीगोपाळ'सारख्या कलाकृतींतून ते घडलेही आहे. तथापि ज्या चरित्रात हे रूढ चित्ताकर्षकत्व मुळातच नसेल, ते चरित्र कादंबरीचा विषय झाल्यास, कल्पिताच्या अभावी त्या चरित्रात्मक आविष्कारात एक प्रकारचे रुक्षत्व निर्माण होणे अपरिहार्य असते.

—त्या दृष्टीने लोकमान्य टिळकांचे जीवन कादंबरी-स्वरूपात अभिव्यक्त करणे हे प्रतिभावंताला निश्चितच आव्हान होते असे म्हणावे लागेल! ऐतिहासिक व्यक्तींच्या संबंधात कालाचे दूरत्वही बरेचदा आकर्षण निर्माण करते. बाह्यजीवनातील युद्धात्मक संघर्ष वा भावजीवनातील संघर्ष यांचे प्रभावी चित्रण वाचकांना बांधून घेऊ शकते. दूरस्थ वा समीपस्थ वर्तमान-ही या भावनात्मकतेमुळे चित्तवेधक होत असतो. आणि मराठीतील अन्य चरित्रात्मक कादंबऱ्यांच्या यशस्वितेला बऱ्याच प्रमाणात मूळ चरित्रनायकाच्या (वा नायिकेच्या) जीवनातील या भावनात्मकतेनेही बराच हातभार लावलेला आहे, यात शंका नाही! मात्र लोकमान्य टिळकांच्या जीवनात या परिचित भावनात्मकतेला स्थान दिसत नाही वा स्त्रीपुरुष-संबंधातून प्रस्फुटित होत जाणाऱ्या मानवी भावभावनांच्या संकुलतेचे दर्शन घडण्याला तेथे वावही नाही. लोकमान्यांचे सारे जीवन भावनात्मक पातळीपेक्षा एका बौद्धिक वा तार्किक पातळीवरून अभिव्यक्त झाले आहे. त्यांच्या जीवनातील संघर्षही रूढार्थाने घटनाबहुल नाही. एक प्रकारची उदात्त अशी पातळी त्यांच्या जीवनाने गाठलेली आहे व त्यामुळेच त्यांच्या जीवनात गंगौघासारख्या भव्य, पण अन्य जलप्रवाहांच्या गतिमानतेच्या तुलनेने गंभीर असा प्रवाह एकसारखा आढळून येतो. यामुळेच त्यांचे जीवनचित्रण हे प्रतिभावंताच्या प्रतिभासामर्थ्याला एक प्रकारचे आव्हानच होते! आनंदाची गोष्ट अशी की प्रा. गाडगीळ यांनी हे आव्हान स्वीकारले; इतकेच नव्हे तर ते समर्थपणे स्वीकारले! चरित्रात्मक कादंबरीलेखनाच्या स्वाभाविक मर्यादा लक्षात घेता प्रा. गाडगिळांची 'दुर्दम्य' ही कादंबरी अत्यंत प्रभावी झाली आहे असे म्हणावे लागेल!

प्रस्तुत कादंबरीच्या पूर्वार्धात लोकमान्यांच्या महाविद्यालयीन शिक्षणारंभापासून तर रँडच्या खुनाचे निमित्त करून इंग्रज सरकारने सूडबुद्धीने राजद्रोहाच्या आरोपाखाली दीड वर्षांची सक्तमजुरीची जी कठोर शिक्षा त्यांना दिली त्या शिक्षेतून त्यांच्या झालेल्या सुटकेपर्यंतच्या कालावधीतील जीवन चित्रित करण्यात आले आहे. सन १८७३ पासून तर १८९८ पर्यंतचा

म्हणजे पंचवीस वर्षांचा हा कालखंड आहे. या काल-खंडातील टिळकांच्या व्यक्तित्वाची घडण कसकशी होत गेली याचे अत्यंत प्रत्ययकारी दर्शन प्रा. गाडगिळांनी या पूर्वार्धात घडविले आहे. टिळकांच्या बुद्धिप्रामाण्य-वादी व्यक्तित्वाच्या अंगोपांगांचे दर्शन येथे घडते. त्यांचे वादपटुत्व, त्यांचा निर्धार, तर्ककर्कशपणा, शारी-रिक सुखाविषयीची त्यांची अरुची, निर्भयता, झुंजार-वृत्ती इत्यादी गुणांचे रेखीव दर्शन घडविणाऱ्या विविध प्रसंगांची गुंफण करून टिळकांच्या व्यक्तित्वाचा विकास लेखकाने प्रभावीपणे अभिव्यक्त केला आहे. हे करीत असतांना टिळकांच्या व्यक्तित्वातील विविध रंग तर ते कुशलपणे प्रगट करतातच; पण त्याचबरोबर विष्णु-शास्त्री चिपळूणकर, गोपाळराव आगरकर, प्रो. केरू-नाना छत्रे, सार्वजनिक काका, रावसाहेब मंडलीक, वासुदेव बळवंत फडके इत्यादी तत्कालीन कर्तृत्ववान व्यक्तींचे चित्रणही जिवंतपणे करतात !—उत्तरार्धातही प्रा. गाडगिळांनी आपले हे कसब पूर्ण ताकदीने प्रगट केले आहे. टिळकांच्या जीवनाला खरा आकार आला तो त्यांनी 'पुनश्च हरिॐ' म्हणून भारतीय राजकार-णाच्या वादळी सागरात खंबीरपणे उडी घेतल्यानंतर ! भारतीय राजकारणातील मरगळ काढून टाकून त्यात जिवंतपणा निर्माण केला तो टिळकांनी ! असे करीत असताना तत्कालीन राजकारणातील मवाळ पंथाचे वर्चस्व कमी करून जहाल पक्षाचे राजकारण अखिल भारतीय पातळीवर प्रभावी करण्यासाठी प्रस्थापित भारतीय नेतृत्वाच्या आघाडीविरुद्ध एकीकडे लढत असतानाच प्रबळ इंग्रज सत्तेविरुद्धही त्यांना लढावे लागले !—उच्च सरकारी अधिकाऱ्यांच्या वर्तुळात वावरणाऱ्या भारतीय राजकारणाला बहुजनसमाजाच्या विशाल कक्षेपर्यंत आणून पोहोचवावे लागले ! राज-कीय स्वातंत्र्याची चळवळ खऱ्या अर्थाने लोकचळवळीत रूपांतरित केली ती लोकमान्यांनी !—हे सारे करीत असताना जी प्रखर साधना टिळकांना करावी लागली ती लोकविलक्षण होती...खडतर होती !—ते एक घोर तपाचरण होते ! मानवी कर्तृत्वाचे सारे कंगोरे स्पष्ट करणारे एक भव्योदात्त जीवननाट्य या काळात टिळकांच्या माध्यमातून प्रगट होत होते !—आणि हे सारे शब्दांकित करणे प्रतिभावंताच्या सृजनशीलतेची परीक्षा घेणारे होते !—प्रा. गाडगिळांनी आपले सारे सामर्थ्य पणाला लावून मानवी स्वरूपातील हे विराट वादळ शब्दबद्ध करण्यात यश मिळविले आहे. लोक-मान्यांचे जीवनही सर्वपरिचित बाब असल्याने 'दुर्दम्य' मधील अशा प्रसंगांची उदाहरणे देण्याचे प्रयोजन नाही. साहित्यसम्राट न. चिं. केळकरांचे त्रिखंडात्मक टिळक-चरित्र आणि लोकमान्यांविषयीच्या आठवणी व आख्या-यिका यांचा भरपूर उपयोग करून प्रा. गाडगिळांनी टिळकांची जीवनमूर्ती रेखाटली आहे. कदाचित यामु-ळेच प्रा. भ. प्र. मोहरीर यांना 'दुर्दम्य'चे महत्त्व नोंदत असतानाही कादंबरीतून कल्पितापेक्षा इतिहा-साचे प्राबल्य अधिक आहे व त्यामुळे कादंबरीला कथारूप चरित्राचे स्वरूप आले आहे अशा आशयाचे विधान करावेसे वाटले !—पण चरित्रात्मक कादंबरीच्या लेखनमर्यादा लक्षात घेता मूलतः दोष दिग्दर्शनात्मक वाटणारे प्रा. मोहरिरांचे हे विधान प्रस्तुत कादंबरीच्या यशस्वितेकडेच अंगुलिनिर्देश करते, असे म्हणावेसे वाटते ! किंबहुना, कल्पिताचा आश्रय न घेता सर्व-ज्ञात सत्यावर अधिष्ठिलेली अशी ही एकमेव यशस्वी चरित्रात्मक कादंबरी होय असे म्हणावेसे वाटते !

'दुर्दम्य'चे दुसरे वैशिष्टय म्हणजे तीतील स्त्री-पात्रांचा अभाव. नाही म्हणावयास टिळकांची काकू, पत्नी सत्यभामाबाई आणि ताईमहाराज यांचा आढळ कादंबरीत होतो. पण कादंबरी प्रकारातील स्त्रीविषयक रूढचित्रणाची अपेक्षा प्रस्तुत पात्रांद्वारे पूर्ण होणे शक्यच नाही हे उघड आहे ! अशी स्त्रीपात्रविरहित कादंबरी वाचनीय करणे सोपे नाही. पण प्रा. गाडगिळांनी 'दुर्दम्य' वाचनीय केली आहे. त्यांच्या व्यक्तिचित्रण-कौशल्याचेही दर्शन कादंबरीतून रेखीवपणे घडते. जात्या अबोल...पतीच्या आत्मकेंद्रित व्यक्तित्वामुळे मनातून काहीशी असमाधान वागवणारी...टिळकांच्या सुरक्षित-तेसाठी तुळशीला एकशे आठ प्रदक्षिणा घालणारी... त्यांच्या व्यक्तित्वाशी जवळीक साधू इच्छिणारी अबोल अशी सत्यभामा म्हणजे प्रा. गाडगिळांच्या व्यक्तिचित्रण कौशल्याचे एक प्रातिनिधिक उदाहरण होय ! संपूर्ण कादंबरी वाचून झाल्यानंतरही टिळकांच्या पत्नीचे नीरांजनासारखे हे व्यक्तित्व मनात रेंगाळत राहते !—भाषासौष्ठव ह्या वैशिष्टयाचा स्वतंत्र उल्लेख आता गाडगिळांच्या संदर्भात करण्याचे प्रयोजन राहिले नाही. परंतु एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील पुण्याच्या पांढरपेशीय भाषेची लकब उचलण्याचे लेखकाचे वैशि-ष्टय लक्षणीय वाटते. 'रात्री दोन तरुण शरीरांच्या

क्षिणक्षिण्या निवल्या. पण एक मन आतून कुठेतरी खट्टूच राहिले' यासारखी सूचक वाक्यरचना करून टिळक पतिपत्नीच्या सांसारिक स्नेहबंधाचा उल्लेख गाडगीळ करून जातात. टिळकांच्या मनस्वी व्यक्तित्वाचे शब्दचित्र काढण्यात 'दुर्दम्य'कार यशस्वी ठरले आहेत. ही कादंबरी वाचताच तो जुना कालखंड वाचकांच्या दृष्टीने सजीव होतो व टिळकांच्या व्यक्तित्वाचे यथार्थ दर्शन घडण्यास साह्य होते! पारतंत्र्याच्या काजळरात्री स्वातंत्र्याचे महन्मंगल स्वप्न पाहणाऱ्या व ते स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्यासाठी निष्काम कर्मयोग आचरणाऱ्या लोकमान्यांच्या आदर्श चरित्राची ही कादंबरीमय प्रतिमा प्रा. गाडगिळांनी प्रभावीपणे साकार केली आहे! आजच्या स्वतंत्र भारतातील तरुण पिढीच्या वाचनात ही कादंबरी यावी व लोकमान्यांच्या जीवनापासून तिला प्रेरणा मिळावी असे 'दुर्दम्य'ही कादंबरी वाचून कोणालाही वाटेल! अशी ही कादंबरी लिहून मराठीतील चरित्रात्मक कादंबरीचे दालन समृद्ध केल्याबद्दल प्रा. गंगाधर गाडगीळ यांचे व ती प्रकाशित करून एकूण साडे सातशे पृष्ठांची डेमी आकारातील ही कादंबरी वाचकांना अवघ्या पंचवीस रुपयात उपलब्ध करून दिली याबद्दल प्रकाशक श्री. श्यामकांत बनहट्टी यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो.

[ दुर्दम्य; लेखक: प्रा. गंगाधर गाडगीळ; प्रकाशक: सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे/नागपूर. पृष्ठसंख्या: पूर्वार्ध–३५०, उत्तरार्ध–४०६ (डेमी); किंमत अनुक्रमे रु. १० व १५.]

□ □

# जगावेगळे जग

जयंत देवधर

महारोग हा शब्द उच्चारताच शिसारी येणे ही आपली पहिली प्रतिक्रिया असते. त्या विषयासंबंधी काहीही जाणून घेण्याची आपली तयारीच नसते. त्या शब्दाचा आणि कल्पनेचा साधा संपर्कही आपल्याला नको असतो. मग त्या व्याधीसंबंधी काही जाणून घेऊन, केवळ इतर व्याधीसारखीच एक व्याधी मानून शास्त्रीय चिकित्सा वाचणे, आपली त्यासंबंधीची सामाजिक जबाबदारी मान्य करणे ही गोष्टच फार दूर असते.

महारोग्यांचे तांडेच्या तांडे भीक मागत बाजार दिवशी गटागटाने फिरतात. आपली अत्यंत किळसवाणी राहणी आणि ओंगळ शरीरे यांचे प्रदर्शन करून देवाच्या, धर्माच्या, माणुसकीच्या नावाने दानधर्माचे आवाहन करतात. त्यांची ओंगळवाणी, घृणा व किळस उत्पन्न करणारी सावली आपल्या सुरक्षित, सालस व नितळ जीवनावर पडून कुठेही ओरखडा येऊ नये म्हणून त्यांच्याकडे पैसा दोन पैसे फेकून आपण आपल्या जबाबदारीतून मुक्त होऊ पाहतो. त्यांचा आपला संबंध त्याक्षणी संपतो.

'महारोग : व्याधी, उपचार,' किंवा 'महारोग व सामाजिक जबाबदारी' यासारख्या विषयावर एखादा परिसंवाद, व्याख्यानपर्व घडवून आणल्यास उपस्थिती किती असेल याची कल्पना आपल्याला घरी बसूनही करता येते. या असल्या घाणेरड्या रोगाचे व रोग्यांचे आपण काहीही लागत नाही असे आपण समजतो.

पण या व्याधिग्रस्त जीवांना नवीन जीवन प्राप्त करून देण्यासाठी काही व्यक्ती, खाजगी व सरकारी, निमसरकारी संस्था किती जीवापाड प्रयत्न करीत आहेत याची माहिती करून देणारे पुस्तक सहज हाती लागते व महारोगाविषयीच्या आपल्या कल्पना पार बदलून जातात. आपण त्या रोगाकडे इतर अनेक रोगांसारखाच एक म्हणून पाहू शकू अशी शक्यता निर्माण होते, त्यांच्याशी आपण प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे बांधलेले आहोत ही जाणीव होऊ लागते. तिरस्कार, किळस, घृणा, भीती कमी होते.

महारोगासंबंधीचे आजवर कधीही आपल्याला न शिवलेले प्रश्न मनात उभे राहतात. त्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा फार मोठा प्रयत्न श्री. शरच्चंद्र गोखले यांच्या 'जगावेगळे जग' या ग्रंथात केलेला आहे.

शास्त्रीय विषयासंबंधी विवेचन व मांडणी कशी केली जावी याचा जणू आदर्श म्हणजे हे पुस्तक म्हटले पाहिजे. महारोग व समाज यांच्या परस्पर संबंधावर सतत विचार करणारे, मांडणारे, सर्व स्तरांवर जागृती व जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न करणारे व आशावादाचे मूर्तिमंत प्रतीक असलेले श्री. बाबा आमटे यांची प्रस्तावना ग्रंथाला आहे. त्यानंतर 'महारोग्यांचे मनोगत' हा भाग म्हणजे महारोगाचा शाप मिळालेल्या माणसामधील माणसाचे मनोगत अतिशय हृदयद्रावक आहे. साध्या मानवी भावभावना—अपत्य प्रेम, कुटुंबप्रेम, राग, लोभ, तिरस्कार, सूड—दाबून टाकण्यास भाग पडलेल्या रोग्यांचे मनोव्यवहार किती विविध प्रकाराचे असतात. त्यांचे आपल्या अत्यंत मार्मिक व वैशिष्टयपूर्ण शैलीत आलेखन गोखले यांनी केले आहे. नमुन्यादाखल पुढील काही वाक्ये पहा—'कुष्ठरोग्यांच्यात वावरताना नेहमी संस्थेमधील झाडे माझ्या डोळ्यासमोर उभी राहतात. कोणाचे व्यक्तिमत्व डेरेदार चिंचेसारखे आहे, तर कोणी एकांड्या सुरू-सारखा वाढला आहे. कोणी एखाद्या नाजुक केळीसारखे आहे, तर कोणी तेरड्यासारखे तीन दिवस रंगलेले एरवी सुकलेले आहे. सारी माणसे माझ्याशी बोलतात, एकमेकांशी बोलतात. पण विशेषतः ती स्वतःशी बोलतात. त्यांच्या ह्या स्वगतातून जाणवते की त्यांची

जीवननिष्ठा अजूनही वाळून कोळ झालेली नाही. जळलेल्या झाडावर पालवीचा नवा हिरवा कोंभ फुटावा त्याप्रमाणे त्याच्या आशा पुन्हा पुन्हा पालवतात..." मुलगा मॅट्रिक झाला या बातमीने साईबाबाच्या चित्रापुढे मस्तक ठेवणारी व स्वप्न पाहणारी म्हातारी, विद्रूप चेहरा आणि गेंगाणा आवाज झालेली एकेकाळी एक्स्ट्रा नटी असलेली, सतत स्वतः आरशात न्याहाळणारी रोगी बाई, पूर्वी शिक्षक असलेले व्याधीग्रस्त झाल्यानंतर कुष्ठधामात कुष्ठरोग्यांना शिकविणारे कुळकर्णी, चांगले मृदुंग वाजविणारे पण व्याधीमुळे बोटांची संवेदनाशक्ती नष्ट झालेले बुवा व त्यांचा एकच एकनिष्ठ साथी 'रावण' कुत्रा, मुलीचे लग्न होणार नाही म्हणून घरातून पळून गेलेले रोगी गृहस्थ व वडिलांच्या व्याधीबद्दल स्पष्टपणे सांगितल्यानंतर अत्यंत समजूतदारपणे त्या मुलीशी लग्न करून तिच्या आयुष्याच्या रखरखीत वाळवंटाचे नंदनवनात रूपांतर करणारा कंत्राटदार, तारुण्याचा बहर असलेली, नवऱ्यावर विलक्षण जीव असलेली आणि धुंद पावसात अनावर बेभान होऊन नवऱ्याला मिठीत आवळणारी व त्याप्रसंगाने भडाभडा ओकणारा तिचा नवरा व अपमानित व्यथित झालेली गजाबाई, असे वाचकाच्या मनात करुणेने माणुसकीचे पाझर फोडणारे, मुळातूनच विचार करावयास लावणारे प्रसंग पुस्तकात आहेत. ही मनोगते वाचत असताना कुष्ठरोगासंबंधी अतिशय रसाळ व साध्या भाषेत केलेले पुढील विवेचन वाचायला वाचक उत्सुक होतो. वाचकाची अनुकूल मनोभूमी तयार करण्याचे व या विषयात रस निर्माण करण्याचे कार्य सुरुवातीला यशस्वीपणे केले गेले आहे.

आज जगात जवळ जवळ एक कोटी कुष्ठरोगी असून भारतात त्यांची संख्या २५ ते ३० लक्ष इतकी असावी. या प्रश्नाचे स्वरूप आता मर्यादित राहिलेले नाही. महारोगासंबंधी सर्वसामान्य माणसाला वैद्यकीय दृष्टिकोनातून समजेल अशा भाषेत माहिती देण्याची नितांत आवश्यकता आहे. केवळ दरिद्री, अडाणी वर्गापुरतेच या रोगाचे क्षेत्र मर्यादित नाही. या दृष्टीने कुष्ठरोग त्याचे वैद्यकीय स्वरूप—तो होतो कसा, वाढतो कसा—त्यावरील उपचार यासंबंधी विवेचन करीत असताना कुष्ठरोग निर्मूलनासाठी आयुष्यभर व्रत घेतलेल्या महानुभावांचे ऋण श्री. गोखले यांनी त्यांची ओळख करून देऊन मान्य केले आहे. कुष्ठरोगी व त्यांच्यामुळे निर्माण होणारे सामाजिक, आर्थिक प्रश्न; रोगग्रस्त व रोगमुक्त व्यक्तीचे समाजात पुनर्वसन यासारख्या महत्त्वाच्या प्रश्नाचा ऊहापोह त्यांनी केला आहे. कुष्ठरोग्यांची सध्याची संख्या लक्षात घेता असे दिसेल की त्यांच्यासाठी उपचार व पुनर्वसन यासंबंधी होणारे प्रयत्न अतिशय नगण्य आहेत. लोकजागृती होऊन या प्रश्नाशी आपण प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे कसे निगडित आहोत याची जाणीव समाजात निर्माण करण्याचे प्रयत्न श्री. बाबासाहेब आमटे करीत असतात. समाजाला संबंधित विषयावर शास्त्रशुद्ध माहिती पुरवून समाजाची जबाबदारी त्याला जाणवून देण्याचे फार मोठे कार्य श्री. गोखले यांनी केले आहे हे निःसंशय.

[ जगावेगळे जग—शरच्चंद्र गोखले, मौज प्रकाशन गृह, गिरगाव, मुंबई–४, पृष्ठे १५०, किंमत ७ रुपये ]

□ □

---

● दि. ५ ऑगस्ट १९७३ च्या मुंबईच्या 'नवशक्ती' दैनिकाच्या रविवार आवृत्तीत, 'युगवाणी'च्या जून-जुलै अंकातील श्री. ना. बा. ठेंगडी यांचे 'कोशिश' मधील दुःखाची प्रत' हे टिपण जसेच्या तसे छापले आहे. 'युगवाणी'चा नामनिर्देश नाही किंवा लेखक-संपादकाची परवानगीही घेतली गेलेली नाही. 'युगवाणी'च्या वाचकांची दिशाभूल होऊ नये म्हणून हा खुलासा.—संपादक.

---

## Wallace Stevens


# Of Modern Poetry

*The poem of the mind in the act of finding*
*What will suffice. It has not always had*
*To find : the scene was set; it repeated what*
*Was in the script.*

*Then the theatre was changed*
*To something else. Its past was a souvenir.*

*It has to be living, to learn the speech of the place.*
*It has to face the men of the time and to meet*
*The women of the time. It has to think about war*
*And it has to find what will suffice. It has*
*To construct a new stage. It has to be on that stage*
*And, like an insatiable actor, slowly and*
*With meditation speak words that in the ear,*
*In the delicatest ear of the mind, repeat,*
*Exactly, that which it wants to hear, at the sound*
*Of which, an invisible audience listens,*
*Not to the play, but to itself, expressed*
*In an emotion as of two people, as of two*
*Emotions becoming one. The actor is*
*A metaphysician in the dark, twanging*
*An instrument, twanging a wiry string that gives*
*Sounds passing through sudden rightnesses, wholly*
*Containing the mind, below which it cannot descend;*
*Beyond which it has no will to rise.*

*It must*
*Be the finding of a satisfaction, and may*
*Be of a man skating, a woman dancing, a woman*
*Combing. The poem of the act of the mind.*



## वॉलिस स्टीव्हन्स : अकरा कविता

अनुवाद : प्रदीप गोपाळ देशपांडे

### १ : निळी काच गवतातली

कोणतं आहे वास्तव—

ही बाटली निळ्या काचेची गवतातली,
की हा बाक अन् जेरॅनियमची कुंडी, डागाळलेला
गालिचा आणि धुतलेले झगे उन्हात सुकणारे ?
ह्यापैकी कशात खरोखर सामावलंय् जग ?
ना एकात, ना दोन्हीत मिळून.

### २ : केवळ असतेपणाबद्दल

माड, मनाच्या शेवटी
पलिकडे अंतिम विचाराच्या, उगवतं
ब्रांझच्या अंतरात,

एक पक्षी सोनपिसांचा
गातो माडात, मानवी अर्थाशिवाय,
मानवी जाणिवेशिवाय, एक अनोखं गाणं.

तुम्हाला कळतं तेव्हा की हे नाहीय कारण
जे करतं आपल्याला आनंदी किंवा खिन्न.
पक्षी गातो. त्याची पिसं चम्‌चम्‌तात.

माड उभा राहतो अवकाशाच्या काठावर.
वारा वाहतो संथ फांद्यांमध्ये
पक्ष्याची धगधगती पिसं खाली लोंबतात.

## ३ : घर होतं निवांत आणि जग होतं शांत

घर होतं निवांत आणि जग होतं शांत.
वाचक झाला होता पुस्तक; आणि उन्हाळी रात्र

होती सुजाण असतेपणासारखी पुस्तकाच्या.
घर होतं निवांत आणि जग होतं शांत.

शब्द बोलले गेले होते जणु काही पुस्तक नव्हतंच,
होतं केवळ अपवादात्मकच की तो वाचक झुकलेला
होता पानावर,

वाक् इच्छित होता, अत्यंत होऊ इच्छित होता
विद्वान ज्याला असतं त्याचं पुस्तक सत्य, ज्याला

असते उन्हाळी रात्र पूर्णत्वासारखी एका विचाराच्या.
घर होतं निवांत कारण त्याला असायलाच हवं होतं.

निवांतपण होतं काही भाग अर्थाचा, काही भाग
मनाचा :
प्रवेश पूर्णत्वाचा पानावर.

आणि जग होतं शांतता. एका शांत जगातलं सत्य,
ज्यात नसतो दुसरा कोणताच अर्थ, स्वतःच

असतं शांतता, स्वतःच असतं उन्हाळा आणि रात्र,
स्वतःच
असतं वाचक झुकलेला उशीरा आणि वाचत
असलेला तिथं.

## ४ कहाणी मोराच्या राजकुमाराची

चांदण्यात
भेटला मला बर्सर्क,
झुडपाळ माळरानावरल्या
चांदण्यात.
ओह ! ताजातवाना होता तो
निद्राहीनासारखा !

आणि, मी म्हटलं,
"का असा तांबडा तू ?"
"का असा सूर्यरंगी
जणु जागा झालेला
अर्ध्या झोपेतूनच ?"

तो असं म्हणाला,
"तू, जो भटकतोस
झुडपाळ माळरानावर,
विसरतोस फारच लवकर.
पण मी लावतो माझे सापळे
स्वप्नांच्या मधोमध."

मला कळलं ह्यावरून
की ते निळं मैदान
होतं भरलेलं विटांनी
आणि आडमुठ्या पोलादानं.
मला कळालं भय
झुडपाळ माळरानाचं,
आणि सौंदर्य
चांदण्याचं
तिथं ढळणाऱ्या,
ढळणारं—
जशी ढळते निद्रा
निरागस हवेत.

## ५ : तेरा तऱ्हा काळ्या पक्ष्याकडे पाहण्याच्या

१

वीस बर्फमय पहाडांत
हालणारं असं होतं फक्त एकच
काळ्या पक्ष्याचा डोळा.

२

मी होतो त्रिधा मनःस्थितीत
एखाद्या झाडासारखा
ज्यात आहेत तीन काळे पक्षी.

३

काळ्या पक्ष्याने शरदातल्या वाऱ्यात गिरक्या घेतल्या.
तो होता मूकनाट्याचा एक छोटासा भाग.

४

एक माणूस आणि एक स्त्री
एक आहेत.
एक माणूस आणि एक स्त्री आणि एक काळा पक्षी
एक आहेत.

५

मला समजत नाही काय निवडावं,
सौंदर्य आरोहावरोहाचं,
की सौंदर्य वक्रोक्तीचं,
काळा पक्षी शीळ घालताना
की नुकताच त्यानंतर.

६

हिमलोलकांनी भरली दीर्घ खिडकी
रानटी काचेची.
काळ्या पक्ष्याच्या सावलीनं ती ओलांडली
मागं–पुढं.
त्या भाववृत्तीनं
रेखाटला सावलीमध्ये
एक प्रच्छन्न हेतू.

७

हे हॅडामच्या झिरमिरीत माणसांनो,
का तुम्ही कल्पिता सोनेरी पक्षी ?
दिसत नाही तुम्हाला काळा पक्षी कसा
चालतो पायांभोवती
तुमच्या भोवतालच्या स्त्रीयांच्या ?

८

मला माहीताहेत कुलीन उच्चार
आणि सुबोध, सुबद्ध लयी;
पण मला हेही पण माहिताय
की काळा पक्षी अंतर्भूत आहे
मला जे माहिताय त्यात.

९

काळा पक्षी जेव्हा गेला उडून दृष्टीक्षेपापलीकडे,
त्यानं खूण केली काठाशी
अनेकांपैकी एका वलयाच्या.

१०

नुस्ते पाहिले उडताना काळे पक्षी
हिरव्या प्रकाशात,
तर स्वरब्रह्माचे भाडिचे देखील
किंचाळतील कर्कश्य.

११

तो कनेटिकटवरून गेला पुढं
एका काचेच्या वगीमधून.
एकदा, एक भीती गेली त्याला भेदून,
आणि तो समजला
आपल्या लवाजम्याच्या सावल्यांनाच
काळे पक्षी.

१२

नदी वाहतेय्.
काळा पक्षी उडत असलाच पाहिजे.


१३

संपूर्ण दुपारभर संध्याकाळ होती.
बर्फ पडत होतं
आणि बर्फ पडणार होतं
काळा पक्षी बसला होता
देवदाराच्या अवयवांत.

**६ : बर्फाचा माणूस**

एखाद्याला हेमंताचंच मन असायला हवं
समजून घेण्यासाठी धुकं आणि देवदारांच्या फांद्या
बर्फाच्या खपल्या धरलेल्या;

आणि असायला हवं थंड दीर्घकाळ
न्याहाळण्यासाठी ज्युनिपर्सची झाडं बर्फामुळं
खडबडीत,
स्प्रूसची झाडं चरबरीत दूरस्थ झगझगाटातली



किल्ले लोहगड-विशाळगड मांजीमाई पाटणकर

पौषातल्या सूर्याच्या; आणि वाटून न घेण्यासाठी
कोणतंही दुःख वाऱ्याच्या आवाजात,
आवाजात मोजक्या पानांच्या,

जो आहे आवाज त्या माळाचा
त्याच वाऱ्यानं भरून राहिलेल्या
जो वाहतोय त्याच उजाड ओसाडीतं

ऐकणाऱ्यासाठी
जो—
स्वतः काहीच नसतो—
ऐकतो बर्फात,
आणि न्याहाळतो
काहीच नाही जे नाहीय् तिथं आणि काहीच नाही
जे आहेय्.

### ७ : माणसं जी ढासळताय्‌त

ईश्वर आणि सर्व देवदूत गातात जग निजण्यासाठी,
आता आणि चंद्र उगवतोय् दाहकतेत

आणि रातकिडे आहेत आरोहावर पुन्हा गवतात.
चंद्र जळतोय् मनात हरवलेल्या आठवणींवर.

तो पडलाय् खाली आणि रातवारा वाहतोय् त्याच्यावर
इथं.

घंटा वाढतात दीर्घ. ही निद्रा नाहीय्. ही आहे इच्छा.

हाय् ! होय, इच्छा....ही झुकणारी अंथरूणावर त्याच्या,
ही त्याच्या कोपरांवर झुकणारी अंथरूणावर त्याच्या,

निश्चल पाहणारी, मध्यरात्री, उशीकडे काळ्या
बरबाद खोलीत....पलिकडे निराशेच्या,

एखाद्या तीव्र प्रेरणेसारखी. कशाची इच्छा करतोय तो ?
पण हे समजू शकत नाही तो, तो माणूस ज्याला
वाटतं,

आयुष्य म्हणजे, इच्छांची पूर्ती
धार परजण्याच्या आवाजात, सावकाश पाहतोय
टक लावून

एका मस्तकाकडे उशीवरल्या काळोखातल्या,
सुदारियमपेक्षा अधिक, बोलणारं भाग
निरंकुशाची, तनुहीन, एक मस्तक
दंगल आणि बंडखोर आरोळ्यांमुळं जाड ओठांचं,

मस्तक ढासळणाऱ्या माणसांपैकी एकाचं, मांडलेलं
उशीवर विश्रांतीसाठी आणि बोलण्यासाठी

बोलण्यासाठी आणि म्हणण्यासाठी निष्कलंक अक्षरं
जी तो बोलला त्यानं जे केलं ते करण्यातनंच.

ईश्वर आणि देवदूतांनो, ही होती इच्छा त्याची,
ज्याचं मस्तक पडलंय अंधुक इथं, ह्यासाठीच तो मेला.

रक्ताची चव त्याच्या शहीद ओठांवर,
हे पेन्शनरांनो, हे गावगुंडांनो आणि पगारी
माणसांनो !

हा मृत्यू ही होती त्याची श्रद्धा जरी मृत्यू असतो
एक पाषाण.
ह्या माणसानं प्रेम केलं पृथ्वीवर, स्वर्गावर नव्हे,
जिवापाड.

रातवारा वाहतोय ह्या स्वप्नस्थावर, झुकलेल्या
शब्दांवर जे आहेत आयुष्याचे परखड उद्‌गार.

### ८ : एक पोस्टकार्ड ज्वालामुखीकडून

आमची हाडं उकरणाऱ्या मुलांना
कधीच कळणार नाही की ती होती एकदा
जिवन्त फॉक्सिसइतकीच टेकडीवरल्या;

आणि हे की शरदऋतूत द्राक्षांनी जेव्हा
केली तीव्र हवा अधिकच तीव्र आपल्या गंधानं
ह्यांना होतं एक असतेपण, धुकं श्वासणारं;

आणि थोडेचजण तर्क करतील की आमच्या हाडां-
बरोबर
सोडलं आम्ही बरंच कांही, सोडलं जे अजूनही आहे
वस्तूंचं रूप, सोडलं जे आम्हाला जाणवलं

ज्याकडं पाहून ते. वसंतातले ढग वाहतात
बंद हवेलीवर,
आमच्या फाटकापलिकडे आणि वादळी आभाळ

आक्रोशतंय् एक शहाणी निराशा.
आम्हाला माहीत होतं ह्या हवेलीचं रूप दीर्घकाळ
आणि आम्ही जे म्हटलो त्या विषयी ते झालं

एक भाग ते जे आहे त्याचाचं......मुलं,
अजून गुंफणारी उमलती ऑरियल्स,
बोलतील आमचीच भाषा आणि उमजणार नाहीत
कधीच

म्हणतील ह्या हवेली विषयी की असं दिसतंय्
की जणुं काही जो इथं राह्यला त्यानं सोडलंय् मागं
एक पिशाच्च वादळणारं रिकाम्या भिंतींमध्ये,

एक गलिच्छ घर उध्वस्त जगात
एक लक्तर सावल्यांचं विरून पांढरं झालेलं,
माखलेलं सुवर्णानं संपन्न सूर्याच्या.

## ९ : काळोखाचं वर्चस्व

रात्री, जाळाशेजारी,
रंग झुडपांचे
आणि गळालेल्या पानांचे
पुनरावृत्त होत स्वतः,
खोलीभर फिरले,
पानाप्रमाणं स्वतःशी
वाऱ्यात भिरभिरणाऱ्या.

होय : पण अजस्र हेमलॉक्सचे रंग
आले ढांगा टाकीत.
आणि मला आठवला आक्रोश मोरांचा.

त्यांच्या पिसाऱ्यांचे रंग
होते पानांसारखे स्वतःशीच
वाऱ्यात भिरभिरणाऱ्या,
संधिप्रकाशातल्या वाऱ्यात.
ते झूमले खोलीवरून,
जणु ते उतरलेत फांद्यांवरून हेमलॉक्सच्या
खाली भुईवर.
मी ऐकलं त्यांना आक्रोश करताना—मोरांना.
तो आक्रोश संधिप्रकाशाविरुद्ध होता
की पानांविरुद्ध खुद्द
वाऱ्यात फिरणाऱ्या,
फिरणाऱ्या – जशा ज्वाळा वळसे घेतात शेकोटीत,
फिरणाऱ्या – जसे पिसारे मोरांचे
घेतात वळसे भव्य वणव्यात,
भव्य हेमलॉक्सप्रमाणेच
मोरांच्या आक्रोशांनी भरून राहिलेल्या ?
की तो आक्रोश होता हेमलॉक्सविरुद्ध ?

खिडकीतून बाहेर,
मी पाह्यलं ग्रह कसे गोळा झाले
पानांप्रमाणं स्वतःशी भिरभिरणाऱ्या
वाऱ्यात.
मी पाह्यलं रात्र कशी आली,
आली ढांगा टाकीत रंगासारखी अजस्र हेमलॉक्सच्या.
मी भ्यालो.
आणि मला आठवला मोरांचा आक्रोश.

## १० : मेटॅफर्स ऑफ अ मॅग्निफिको

वीस माणसं ओलांडताना एक पूल,
एका खेड्याकडे,
असतात वीस माणसं ओलांडणारी वीस पूल,
वीस खेड्यांकडे,
किंवा एक माणूस
ओलांडणारा एकच पूल एका खेड्याकडे.

हे जुनं गाणंय्
ते स्वतः व्यक्त होत नाही........

वीस माणसं ओलांडताना एक पूल,
एका खेड्याकडे,
असतात
वीस माणसं ओलांडणारी एक पूल
एका खेड्याकडे.



अनुक्रमणिका

ते स्वत: व्यक्त होत नाही
तरीही आहे निश्चित अर्थाइतकंच........

माणसांचे बूट चालतात जडावत
फळ्यांवर पुलाच्या.
पहिली शुभ्र भिंत खेड्याची
वर येते फळझाडांमधून.
कशाविषयी होतो मी विचार करीत ?
....असा जातो निसटून अर्थ.

पहिली शुभ्र भिंत खेड्याची....
फळझाडं........

## ११ : शेवटचं स्वगत अंतस्थ जाराचं

पेटव पहिला दिवा संध्याकाळचा, खोलीतल्यासारखा
जिथं आपण विसावतो आणि, तात्पुरतं, समजतो
कल्पिलेलं जग हेच अंतिम कल्याण.

हे आहे, म्हणूनच, अत्युत्कट संकेतस्थान.
ह्याच विचारात जमवतो आपण स्वत:

सर्व औदासिन्यातून, एकाच वस्तूत :
फक्त एकाच वस्तूत — चादरीत एका
आपल्या भोवती गच्च लपेटलेल्या,
....ज्याअर्थी आपण गरीब आहोत —
एक ऊब, एक प्रकाश, एक शक्ती, अलौकिक प्रभाव.

इथं आता आपण विसरतो एकमेकांना
आणि स्वत: आपल्याला.
आपल्याला जाणवते दुर्बोधता एका शिस्तीची,
एका समग्रतेची,
एका ज्ञानाची, ज्यानं असतं थाटलेलं हे संकेतस्थान.

त्याच्या आवश्यक सीमेच्या आत, मनात.
आपण म्हणतो ईश्वर आणि प्रतिभा एक आहेत ....
किती उंचावर ती सर्वश्रेष्ठ ज्योत उजळते अंधार.

ह्याच उजेडातून, केंद्रस्थ मनातून,
आपण करतो एक वसती संध्याकाळच्या हवेत,
जिथं असतं केवळ एकत्र असणं पुरेसं.

* *

# अठरा सतें रुक्मिणी सैंवर

वि. भि. कोलते

मराठीचे महाकवी नरेंद्र यांनी लिहिलेल्या 'रुक्मिणी स्वयंवर' या काव्याने मराठी रसिकांचे चित्त विशेष वेधून घेतले आहे. नरेंद्राने मुळात 'अठरा सतें रुक्मिणी सैंवर ग्रंथ केला' (स्मृतिस्थळ ११३); पण महानुभाव पंथात उपलब्ध होणाऱ्या पोथ्यांत मात्र या काव्याच्या केवळ ८७९ ओव्याच आढळतात. एवढ्या अपूर्ण काव्याचीच संहिता संपादन करून मी ती प्रथम इ. स. १९४० मध्ये प्रसिद्ध केली. या काव्यावर द्वितीय आणि तृतीय शोधनीचे जे टीपग्रंथ उपलब्ध आहेत त्यांतही फक्त या ८७९ ओव्यांवरच टीपा आढळतात. उपलब्ध ८७९ ओव्यांच्या या अपूर्ण काव्यानेही रसिकांना वेड लावलेले आहे. नरेंद्राने लिहिलेले संपूर्ण काव्य उपलब्ध झाले तर मराठी रसिकांचा आनंद गगनात मावेनासा होईल हे काय सांगायला पाहिजे ?

नरेंद्राच्या संपूर्ण रुक्मिणी स्वयंवराच्या शोधात मी अनेक वर्षे होतो. कै. कृष्णराजदादा पारिमांडल्य हे सुमारे वीस वर्षांपूर्वी मला म्हणाले होते की 'नरेंद्राच्या रुक्मिणी स्वयंवराची अठराशे ओव्यांची एक पोथी आहे असे माझ्या ऐकण्यात आहे' मी उत्सुकतेने त्यांना विचारले 'कोणाजवळ ?' ते म्हणाले; 'तेच नक्की माहीत नाही. पण नाशिक प्रांताकडे कोणातरी महंताजवळ ती आहे असे ऐकतो' असे म्हणून त्यांनी तो विषय बदलला. त्यांना त्या पोथीची निश्चित माहिती असावी असे मला त्यावेळी वाटले. पण त्यांनी तोंडाला कुलुप पक्के लावले होते. त्यांच्या सूचक उद्‌गाराच्या अनुरोधाने मी पुष्कळ चौकशी केली. नाशिक प्रांतात दोनदा जाऊनही आलो. पण मला यश आले नाही. एखादी दुर्मिळ पोथी मिळणे, न मिळणे हा अनेकदा दैवाचा आणि योगायोगाचाही भाग असतो. आठनऊ महिन्यापूर्वी असाच एक योग जुळून आला. 'ज्ञानप्रबोध'कर्ते विश्वनाथदास व व त्यांची गुरुपरंपरा या विषयी एका विद्वान व आदरणीय संशोधक महंतांशी चर्चा करीत असताना त्यांच्या तोंडून अठराशते रुक्मिणी स्वयंवराच्या पोथीचा अभावितपणे उल्लेख निघाला. तिचा ठावठिकाणाही त्यांनी मला सांगितला. पत्रव्यवहार केल्यानंतर माझ्या माहितीला दुजोरा मिळाला. इतकेच नाही तर एकदोन महिन्यांच्या आत त्या उदार व सौजन्यशाली महंतांच्या प्रसन्नतेने ती पोथी माझ्या हाती आली. त्या पोथीचाच तेवढा परिचय आज करून देत आहे.

इतर महानुभाव पोथ्यांसारखीच या पोथीची बांधणी आहे. पोथीचा कागद फार जुना आहे. अक्षर स्वच्छ व एकटाकी लिहिलेले आहे. पोथीत एकूण पोथीच्या शेवटी असलेल्या समाप्तिलेखात पोथीत असलेल्या ग्रंथांची यादी, प्रत्येक ग्रंथातील ओवी किंवा श्लोक संख्येसहित दिलेली आहे. ती पुढीलप्रमाणे :

"वछाहरण : ५०० : ३ :।। येकादश कंद : ८०० : २७ :।। : ज्ञान प्रबोध १२ : सतें : ३ ।। रूद्धिपूर वर्णन : ६०० : ४२ : ।। : शिशुपाळ वध : १०० : ८६ वोविया : नरेंद्र : १८ : ८५ वोविया ।। ०।। विदेह प्रबोध : ७०० : व्रीताळीस वोवीया : ।। कथा भागवत सात सतें : ८३ : वोविया :।। नरविलाप : २०० : पंचेताळीस : ।। : चौपदीया : ६० : ।। खूकदेवचरीत्र साडे आड सतें : ।। पंडुगीता : ३०० : चौऱ्यासी वोविया : ।। ० ।। ऐसे : ११ : ग्रंथ ।। श्रीरस्तू ।।

यावरून प्रस्तुत पोथीत एकूण ११ ग्रंथ असून त्यात 'नरेंद्र' म्हणजे नरेंद्र कवीने लिहिलेले रुक्मिणी स्वयंवर आहे व या काव्याच्या एकूण १८८५ ओव्या आहेत हे दिसून येईल.

ग्रंथसंख्या देणाऱ्या या निर्देशानंतर त्याखाली निराळ्या हस्ताक्षरात कालोल्लेखाचा श्लोक आहे. त्याच्या पहिल्या ओळीतील 'शोडषपुर्नंद्वये' हा भाग तेथे तेवढीच कागदाची चिठ्ठी जोडून त्यावर लिहिलेला असल्याचे लक्षात आले. त्याची कसून तपासणी केली. पूर्वी लिहिलेल्या अक्षरावर चिठ्ठी जोडून नंतर वरील अक्षरे लिहिली असे दिसत नाही. शेवटच्या ओळीवर पातळ काळी शाई फासलेली आहे. विस्तारक भिंगातून ती पुढीलप्रमाणे वाचता येतात. 'टी उत्तरे कारंजे कमलाख्यसुत लिखतं यथाप्रती पुस्तक ॥१॥' कालोल्लेखाचा संपूर्ण श्लोक पुढीलप्रमाणे आहे—

शाके शोडषपुर्नंद्वये वरुणे रौद्राख्य संवत्सरे
मासे कार्त्तीक शुद्ध पुर्निम तीथी समाप्त वुद्धौ दिने ॥
प्रातं ग्राम वसुमती वडभीदा गंगातटी उत्तरे
कारंजे कमलाख्यसुत लिखतं यथाप्रती पुस्तकं ॥ १ ॥

शोडष = १६, पुर्नं = ०, आणि द्वय = २ म्हणजे शके १६०२, रौद्र संवत्सर, कार्तिक शुद्ध पौर्णिमा, बुधवार त्या दिवशी या पोथीचे लेखन समाप्त झाले. पिल्ले यांच्या जंत्रीनुसार हा कालोल्लेख तिथीवारासुद्धा बरोबर आहे. ख्रिस्ती कालगणनेनुसार बुधवार, २७ ऑक्टोबर इ. स. १६८० ही तारीख येते. लेखनस्थल : वसुमती प्रांतात, गंगेच्या = गोदावरीच्या उत्तर काठावरील 'वड' नावाचे ग्राम, म्हणजे वडगाव. हे स्थान औरंगाबाद जिल्ह्यातील 'अगर वडगाव' असावे. वाडेगाव हे त्या गावाचे पूर्वीचे नाव होते. पोथी लेखकाच्या काळी या गावाचा समावेश वसुमती (=वसमत. जिल्हा नांदेड) प्रांतात होत असावा. पोथीचा लेखक 'कारंजे कमलाख्य सुत' एवढेच आपणाला म्हणवतो. पण त्यावरून त्याच्या नावाचा, गुरूचा वगैरे नीट बोध होत नाही.

सारांश, नरेंद्र विरचित, १८८५ ओव्यांचे, संपूर्ण रुक्मिणी स्वयंवर काव्य या पोथीत उपलब्ध झाले आहे. पोथीतील या काव्याची मायक्रोफिलम मी काढून घेतली आहे. काव्याचा सध्या मी अभ्यास करीत आहे. त्यासंबंधी लौकरच सविस्तर लिहीन.

□ □

---

## साभार पोच

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, सचिवालय, मुंबई—३२**

(१) **आर्थिक सिद्धान्त व अर्धविकसित प्रदेश**
लेखक : रान्नर मिर्दाल
अनुवादक : सरला कारखानीस
पृष्ठे १६३, किंमत ७ रु.

(२) **बुद्धी, प्रेरणा आणि क्रांती.**
भाग १ आणि भाग २
लेखक : मानवेन्द्रनाथ राय.
अनुवादक : बा. रं. सुठणकर
पृष्ठे : २९८, २८६, किंमत ५ रु. प्रत्येकी.

(३) **मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पोर्तुगीज दप्तर–खंड तिसरा आशिया विभाग** (भाग १ ते ५; इ. स. १६६३ ते १७३९)
संपादक : ए. बी. द. ब्रागांस परेरा
अनुवादक : स. शं. देसाई
पृष्ठे : ५६८, किंमत २० रु.

(४+५) **धर्मशास्त्राचा इतिहास** (सारांशरूप ग्रंथ) **पूर्वार्ध व उत्तरार्ध**
लेखक : भावतरत्न म. म. डॉ. काणे.
अनुवाद : यशवंत आबाजी भट
पृष्ठे : ६००/५७६, कि. १० रु., १६ रु.

(६) **अभिनय साधना**
लेखक : कन्स्तान्तिन स्तानिस्लाव्स्की
अनुवाद : के. नारायण काळे
पृष्ठे : ३६८, किंमत ११ रु.

# 'पाठमोरी'च्या निमित्ताने

**इंदुमती शेवडे**

'पाठमोरी' हा अच्युत बर्वे यांचा नवीन कथा-संग्रह. 'आंबटगोड', 'चंदनाचा उंबरठा', 'झोका', 'चांदण्याचा सुगंध', 'शोभेची फुले' हे त्यांचे यापूर्वीचे प्रमुख कथासंग्रह. बर्वे गेल्या पंचवीस-तीस वर्षांपासून लिहीत असून मराठी वाचकांच्या ते परिचयाचे आहेत. 'भाऊजी, शपथ आहे' या त्यांच्या कथेला 'प्रसाद' मासिकाच्या कथा-स्पर्धेत पहिले बक्षीस मागे मिळाले होते. 'कोळीण' ही एक वेगळ्या विषयावरची कथाही वाचकांनी वाखाणली होती.

बर्वे ४० सालाच्या आसपास म्हणजे नवकथेच्या जन्माच्या मागेपुढे लिहू लागले. श्री. ज. जोशी, अग्निहोत्री, दिघे यांच्याशी समकालीन व बरीचशी समानधर्मा अशी त्यांची कथा आहे. त्यांच्याचप्रमाणे बर्व्यांच्या कथांत पांढरपेशा मध्यमवर्गीयांच्या जीवनातील समस्या, बदलते समाजजीवन, नव्याने समाजात शिरत चाललेला भ्रष्टाचार, बदलत्या जीवनमूल्यांशी झगडणाऱ्या व्यक्ती यांचे चित्रण येते. त्यांत भावनांची गुंतागुंत आहे, पण मनोविश्लेषण नाही. काम व प्रेमाच्या समस्या धिटाईने व मोकळेपणे त्यांनी रंगवल्या आहेत. भावे हे बर्व्यांचे आवडते कथाकार. भावे हे प्रेमाचे लेखक मानले जातात. बर्व्यांच्या कथांतही प्रेमकथेला अग्रस्थान आहे. क्वचित 'मद्याचे बोट.', 'अखेर आपण सारी माणसे', 'सुख' (भाव्यांच्या 'दुःख'ची आठवण करून देणारी) अशा काही कथांवर भाव्यांची छाप पडलेली दिसते. भाव्यांप्रमाणे बर्व्यांचेही नायक रंगेल, रसिक, प्रेमवासनेने पछाडलेले पण जुन्या संस्कारांमुळे संघर्षात सापडलेले असे आहेत. पण हे साम्य इथेच संपते.

'आंबटगोड' ते 'पाठमोरी'पर्यंतच्या बर्व्यांच्या कथा वाचल्यानंतर पहिला विचार मनात येतो तो हा की बर्व्यांच्या कथेचे वैशिष्ट्य काय ? खास बर्व्यांचा म्हणता येईल असा तिचा वेगळेपणा कोणता ? बर्व्यांची भाषा, विषय, रचना, विषयांचा आवाका इ. गोष्टी विचारात घेतल्या की अशा वैशिष्ट्यांचा शोध घेणाऱ्या वाचकांची काहीशी निराशा होते. या सर्व कथांतील विषयांचा विचार करू लागले की त्यांचे काही वर्ग आपोआप पडलेले दिसतात. तेच काही विषय पुनरावृत्त झालेले दिसतात त्यांचे एक पॅटर्न बनलेले जाणवते. उदा. (१) कोकणाच्या पार्श्वभूमीवरील कथा, (२) मध्यमवर्गीय जीवन व समस्यांवरील कथा, (३) धंद्यासंबंधीच्या कथा, व प्रामुख्याने (४) प्रेमकथा. या चार विषय-प्रकारात बर्व्यांची कथा फिरताना दिसते. 'पाठमोरी'ही त्याला अपवाद नाही.

बर्व्यांच्या कोंकणावरील कथांत एकप्रकारचा हळुवारपणा दिसून येतो. लेखकाचे कोंकणावर प्रेम आहे. तिथल्या बालपणीच्या किंवा तरुणपणीच्या आठवणी या कथांतून व्यक्त होतात. 'सोन्याचा पिंपळ', 'कल्पद्रुम माझ्या अंगणी', 'झोका', 'अमावास्येचा चंद्र' इ. कथा या दृष्टीने उल्लेखनीय आहेत. या आठवणींना दुःखाची, औदासिन्याची किनार आहे. कारण लेखकाची बालपणीची ही स्वनभूमी कालांतराने आता ओसाड व उध्वस्त झालेली आहे. ओळखीच्या खुणा हारवल्या आहेत. ओळखीची माणसे पोटासाठी दाहीदिशा पांगली आहेत. कुणी खपली आहेत, कुणी थकली आहेत. कुणी उनाड निघून म्हाताऱ्या आईबापांच्या काळजावर ओरखडे काढून निघून गेली आहेत. कुणाला आपले वैभव दाखवावे, टेंभा मिरवावा असे तिथे कुणीच राहिले नव्हते. 'अमावास्येचा चंद्र' ('पाठमोरी') मध्ये लेखकाचा हा अनुभव उत्कटपणे व्यक्त झाला आहे.

पण मध्यम वर्गाचे चित्रण करणाऱ्या बर्व्यांच्या कथांत ही उत्कटता व आत्मीयता कमी होते. खरे तर या कथांतून गरीब व खालच्या लोकांचे दुःख, चाळीतले

गरीबीचे संसार, त्यांचे हेवे दावे, मारलेली मने, पैशाची ओढाताण हे सारे रंगवलेले आढळते. शेजारच्या मुलासारखी खेळातली मोटार आपल्या मुलाला घेता येत नाही...म्हणून व्यथित झालेला बाप इथे आढळतो—('पाठीराखा'). खाणारे एक तोंड कमी झाले म्हणून स्वतःचा मुलगा दुसऱ्याने नेल्यावर हायसे वाटणारा बाप आढळतो—('आकाशाची फुले ! धरतीची फळे !'). पोटासाठी करावी लागणारी धडपड व तीत मरून गेलेल्या अनेक आवडी व स्वप्ने यांच्या झगडघात व्यक्तित्व दुभंगून गेलेला नायक दिसतो—('कवडसा'). पण या चित्रणाला धार नाही. त्यातले दुःख बोथट दाटते.

धंद्यासंबंधीच्या कथांत मात्र एक वेगळेच बर्वे आपल्याला भेटतात. 'टोपी', 'दानत', 'निर्णय', 'पांखर', 'दिव्य' या अशा प्रकारच्या काही कथा. हे जग धंद्याचे, पैशाचे, सौद्याचे, भ्रष्टाचाराचे आहे. या जगात वावरणारे नायक ऐटबाज, कर्तबगार, शौकीन आहेत. रगेल आहेत अन रंगेलही आहेत—मदिरा व मदिराक्षीसाठी आसुसलेले. मद्यपानात मुरलेले (बर्व्यांच्या बऱ्याच कथांत मद्यपानाच्या 'रिच्युअल'ची वर्णने येतात.) त्यांचीही तहान ओळखून स्वतःचा फायदा करून घेण्यासाठी ती भागवणारे धूर्त भामटेही या जगात भेटतात. आपल्या सावजाचा दुबळेपणा त्यांनी हेरलेला असतो. पैसा, दारू व स्त्री ही या जगातली चलनी नाणी आहेत. त्यावर सौदा चालतो. खालचा अधिकारी थोड्याने बधला नाही तर वरच्याला वश करून खालच्याला ते तोंडघशी पाडतात. कधी एखादा आपली नोकरी टिकवण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्याला आपली पत्नीही रात्रीसाठी देऊ करतो तर दुसरा एखादा पैशासाठी आपले इमानही बिनदिक्कत विकतो. हे पैशाचे, सौद्याचे वरून सभ्यतेचा मुखवटा चढवलेले अंधारे जग बर्व्यांनी प्रभावीपणे चित्रित केले आहे. मात्र 'टोपी' ('झोका') हीच त्यांची जुनी कथा नावे बदलून 'पाठमोरीत' 'निर्णय' या नावाने अवतरली आहे असे वाटावे इतके त्या दोन्हीत साम्य आहे.

बर्व्यांच्या कथांत प्रेमकथांचा वर्ग सर्वात मोठा आहे. या कथा बर्व्यांनी समरसून लिहिल्या आहेत. या कथांसाठी बर्वे वेगवेगळी पार्श्वभूमी, वेगवेगळ्या सिचुएशन्स व तऱ्हतऱ्हेची पात्रे वापरतात. पण या कथांचाही एक साचा बनून गेल्यासारखे दिसते. या कथांतील प्रेम बहुधा शारीरिक पातळीवरचे असते. त्याचे स्वरूप समस्यात्मक असते. कथेत बहुधा त्रिकोण—(क्वचित चौकोनही—उदा. 'सरळ चालीचा ऊंट') असतो. हे प्रेम चोरटे, अवैध असते. त्यात एका पक्षाच्या कुठल्या तरी व्यंगामुळे किंवा अॅबनॉर्मलिटीमुळे हा त्रिकोण निर्माण होतो. कधी नवरा षंढ असतो ('द्रौपदी,'), कधी बायकोला व्यंग असते ('सरळ चालीचा ऊंट'), कधी नवरा बथ्थड असतो म्हणून बायको वाईट मार्गाला लागते. ('चांदण्याचा सुगंध'), तर कधी तो आंधळा असतो म्हणून ('सूर्य'). कधी हव्या असलेल्या व्यक्तीकडून प्रतिसाद वेळेवर मिळत नाही व दुसऱ्याशीच लग्न होते व परस्पर प्रेमाची ओळख नंतर पटते म्हणून हा त्रिकोण निर्माण होतो ('पाठमोरी'). या प्रेमकथांतून रंगवलेल्या बर्व्यांच्या बहुतेक स्त्रिया स्वैर, उनाड, बनेल, धीट, अधीर व कामासक्त आहेत (अपवाद; 'पाठमोरी'). काही दुबळ्या व भित्र्या आहेत. काही नुसत्या प्रेमाच्या भुकेल्या आहेत. 'चांदण्याचा सुगंध' मधली नवलिका संधवी धावत्या आगगाडीतील पहिल्या वर्गाच्या एकांतात घटकाभराच्या ओळखीनंतर अगदी सर्वस्वी परक्या अशा पुरुषाला संभोगाची याचना करते. कारण लग्नाला बरीच वर्षे होऊनही तिने तो अनुभव घेतलेला नसतो. 'सूर्य' ('पाठमोरी') मधली नायिका नवरा आंधळा म्हणून घरातल्या भाडेकऱ्याकडे आकर्षित होते. एखादी पुरुषाचा खुळखुळाच करून टाकते ('खुळखुळा'). या प्रेमकथांतले पुरुष चोरट्या प्रेमाच्या खेळात तरबेज, अतिशय स्खलनशील, मित्रांच्या बायकांशीही बिनदिक्कत प्रेमाचे चाळे करणारे, शेजाऱ्यांच्या बायकांवर नजर ठेवणारे, पण जुने संस्कार मनावर असल्यामुळे भित्रे, दुबळे व दुभंगलेल्या मनाचे आहेत. बर्व्यांच्या स्त्रीपुरुषांचे हे जग असे प्रॉमिस्क्युअस आहे. त्यात एकनिष्ठता—पतीशी किंवा प्रियकराशीही—अभावानेच आढळते. आढळते ती उफराट्या स्वरूपाची. 'पाठमोरी'तील दुर्गा नवरा जिवंत असेतो प्रियकराशी मनाने एकनिष्ठ असते. पण नवरा अपघाताने मेल्यानंतर प्रियकराशी मीलनाची वेळ येते तेव्हा "अष्टौप्रहर तुझा विचार करीत होते. फार मोठा विश्वासघात केला मी त्यांचा. या विश्वासघाताचं प्रायःश्चित घेऊ दे मला" असं म्हणून त्याच्या 'स्मृतीशी एकनिष्ठ' राहण्यासाठी प्रियकराला पाठमोरी होते. 'कोळीण' या कथेतली नायिका शरीराने

पतीशी एकनिष्ठ असते. पण आपलं मूल आपल्या दोघांसारखं कुरूप होऊ नये म्हणून शेजारच्या सुंदर पुरुषाचा रात्रंदिवस ध्यास धरते.

जीवनाचा विचार बर्वे प्रेमाच्या संदर्भात या प्रेमकथांतून करताना दिसतात. त्यांची बहुतेक प्रेमी माणसे 'शापित' आहेत. ती प्रेमाच्या त्रिकोणात सांपडलेली, व्यंगाने नाहीतर रोगाने पछाडलेली, नशिबाने चुकीच्या जोडीदाराशी बांधलेली. दोन निष्ठांच्या कात्रीत सांपडलेली अशी आहेत. प्रेमपूर्तीचा क्षण समोर आला की ती पाठमोरी ('पाठमोरी') होतात. कधी दूर निघून जातात ('द्रौपदी'). 'हुंदका' या कथेत त्रिकोण नाही. दोन तरुण माणसांचे ते साधे, सोज्ज्वळ प्रेम असते. पण त्यात असाध्य रोगाने पछाडलेल्या पल्लवीला मृत्यू उचलून नेतो. प्रेमात सापडलेल्या या माणसांना आपले प्रेम सफल होणार नाही याची, वा त्याच्या अपुरेपणाची, चोरटेपणाची सतत जाणीव असते. कधीकधी ती नशिबाला दोष देतात. "गेल्या जन्मी कोणतं पाप केलं होतं म्हणून असा नवरा माझ्या नशिबी आला ?" असं द्रौपदी विचारते ('द्रौपदी'). 'सरळ चालीचा उंट' मधील नायकालाही असाच प्रश्न पडलेला दिसतो. हा नायक 'मी' कर्मठ वातावरणात वाढलेला, सदाचाराची शिकवण मिळालेला. त्याचा मित्र वासुदेव धार्मिक मनोवृत्तीचा सज्जन. त्याची बायको आनंदी मूल होत नाही म्हणून या 'मी'शी संधान बांधते. 'मी'ची बायको आसावरी—पांगळी, नवऱ्याची शारीरिक भूक भागवण्यास असमर्थ. अशा परिस्थितीत चौकोन निर्माण होतो. आनंदीला दिवस गेल्याचे ती नवऱ्याला सांगते. तेव्हा आपल्यापासून हे मूल होणे अशक्य हे ठाऊक असल्यामुळे बायकोचे चोरटे प्रेमप्रकरण उघडकीला येते. बायकोच्या जाराला तो मारायला निघतो, पण मोटारीच्या अपघातात मरतो. हे प्रेमप्रकरण चालू असताना नायकाच्या मनाला अनेक प्रश्न पडलेले असतात. "मी कुणाचे असे काय वाकडे केले असते की आसावरीच्या रूपाने दुःख माझ्या वाटचाला यावे ?" "वासुदेवासारख्या सरळ चालीच्या......सज्जनाच्या

नशीबी प्रतारणा का यावी?" "जुगारी व स्त्रैण माणसाचा संसार फुलत रहावा अन नाकासमोर पाहून चालणाऱ्याचा सुकत जावा, हे कुठच्या न्यायाने?" "पतिव्रतेने हालअपेष्टा भोगीत झिजून मरावे, अन उनाड मैनेने विलासात दंग राहून माडयावर माडया चढवाव्यात हे सारे कुठच्या धर्माने?"

या प्रश्नांची उत्तरे त्याला सापडत नाहीत. शेवटी त्याला वाटते, 'आयुष्याचे गणित चुकले की हे सारे चालू होते.' पण मुळात गणित कसे, कोण चुकवते? मूलभूत प्रश्न असा एकच असतो...पण त्याचे उत्तर नायकाला सापडत नाही...बर्वे या प्रश्नापाशी येऊन थांबतात. त्यापलीकडे जात नाहीत. भावनेच्या व वासनेच्या भोवऱ्यात सापडलेल्या व उफराटे नशीब घेऊन आलेल्या या दुर्दैवी माणसांच्या अगतिकतेची जाणीव झाल्यामुळेच बहुधा बर्व्यांच्या प्रेमकथांत दुःखाचा एक सूर असतो. सुरवातीच्या कथांभोवती रोमँटिकतेचे वलय असते. त्यांतील प्रेमाचे रंगही गडद नाहीत. 'पाठमोरी'तील प्रेमकथांत ते रंग गडद होतात व हा सूर सतत जाणवत राहतो. 'पाठमोरी' व तिच्यापेक्षा अधिक सरस अशी 'सरळ चालीचा ऊंट' (४३ पानी) या दोन्ही कथा बर्व्यांच्या यशस्वी प्रेमकथा म्हणता येतील व त्या वाचकांना चटका लावून जातात.

समाजातील काही विदारक सत्ये प्रगट करण्याच्या दृष्टीने 'मधाचं बोट', 'कक्षा' व 'गोष्ट ज्यूलीची, गोष्ट माझी' अशा काही कथांकडे बोट दाखवता येईल. सुस्थितीतली मोठी माणसे व खालची गरीब माणसे यांच्यात एक अमिट अशी दरी असते. मोठी माणसे या छोटयांना खोटी वचने देतात. त्यांना झुलवत राहतात. ती पुरी करत नाहीत. आणि छोटयांच्या भावनांची, निराशेची त्यांना कदर नसते हे पहिल्या दोन कथांत दाखवले आहे. गुन्हेगार आईबापांची पोरकी पोरे त्यांना कुणी जवळ करणारे भेटले नाही तर वाईट मार्गाने जातात. ज्यूलीच्या गोष्टीतील नायक 'मी'ला असा एक काका भेटतो व त्याचा उद्धार करतो. पण हे सत्य ठाऊक असूनही स्वतःच्या दुबळेपणामुळे त्याला ज्यूलीचा काका होता येत नाही व ज्यूलीचे भविष्य अंधारातच राहते. पण अशा कथांचे प्रमाण बरेच कमी आहे.

'आंब्रटगोड' ते 'पाठमोरी' यात बर्व्यांच्या कथेने बरेच अंतर कापले आहे. बर्व्यांचा मूळ पिंड रोमँटिक लेखकाचा. हळूहळू ही रोमँटिकता कमी होत गेलेली दिसते. 'पाठमोरी'पर्यंत त्यांची कथा अधिक गंभीर व प्रौढ बनते. पण जीवनाच्या विशिष्ट कक्षेपर्यंत जाऊन ती थांबते. त्यापलीकडे जात नाही.

[पाठमोरी : (कथासंग्रह)
लेखक : अच्युत बर्वे
प्रकाशक : मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई–४.
पृष्ठे १९६, किं. १० रु.]

## साभार पोच

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**

(९) स्वातंत्र्योत्तर भारतीय स्त्री
लेखक : डॉ. श्रीमती चंद्रकला हाटे
पृष्ठे : २८४, किमत १० रु.

(१०) महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग
लेखक : कै. नारायण कृष्ण गद्रे
संपादक : प्रा. गणेश हरी खरे
पृष्ठ : ३५३, किमत ५ रु.

**सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लि. मुंबई–१४**

(११) ही काही माणसं (कादंबरी)
लेखक : शरच्चंद्र टोंगो
पृष्ठे : १५३, किमत १४ रु.

(१२) तुळशीपत्र (कादंबरी)
लेखक : शैलजा राजे
पृष्ठे : १६८, किमत १५ रु.

(१३) आस्तिक-नास्तिक (ललितलेख)
लेखक : देवीदास बागूल
प्रकाशक : शंकर सारडा, कर्वे रोड, पुणे ४
पृष्ठे : ४४, किमत ४ रु.

(१४) माधवराव पटवर्धन वाङ्मयदर्शन (समीक्षा)
लेखक : सु. रा. चुनेकर
प्रकाशक : मौज प्रकाशन, गिरगांव, मुंबई ४

मौज प्रकाशन

प्रसिद्ध झाली

## कॉग्ज

कथासंग्रह

**शरच्चंद्र वासुदेव चिरमुले**

## रेणू

कादंबरी

**पुरुषोत्तम शिवराम रेगे**

## नाट्याचार्य कृ० प्र० खाडिलकर

चरित्र

**नरहर रघुनाथ फाटक**

इतर नवी प्रकाशने

**मनोगते** : ललित लेखन : दुसरी आवृत्ती : वि० द० घाटे : ४ रुपये
**माधवराव पटवर्धन** : वाङ्मयदर्शन : सु० रा० चुनेकर : २१ रुपये
**पैस** : ललित लेखन : पुनर्मुद्रण : दुर्गा भागवत : ६॥ रुपये
**पाचोळा** : कादंबरी : विद्यापीठीय आवृत्ती : रा० रं० बोराडे : ४ रुपये
**गारंबीचा बापू** : कादंबरी : पाचवी आवृत्ती : श्री० ना० पेंडसे : ७॥ रुपये

छापत आहेत

**विचारविलसिते** ललित लेखन : वि० द० घाटे
**जास्वंद** : समीक्षा : माधव आचवल
**रंग माझा वेगळा** : कवितासंग्रह : सुरेश भट

सविस्तर सूचीसाठी कार्ड टाका :

**मौज प्रकाशन गृह**

**खटाववाडी, मुंबई-४०० ००४.**

## ॥ संघवार्ता ॥

मा. नी. गलगलीकर, सरचिटणीस

### नाट्य समिती

रविवार दि. २६ ऑगस्ट '७३ रोजी कै. कृ. प्र. खाडिलकर स्मृतिदिनी प्रसिद्ध नाटककार, कादंबरीकार आणि प्रतिभावान कवी श्री. चिं. त्र्यं. खानोलकर (आरती प्रभु) ह्यांचा सत्कार सुप्रसिद्ध नाटककार-दिग्दर्शक श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्या हस्ते झाला. अध्यक्षस्थानी संघाध्यक्ष डॉ. वि. भि. कोलते हे होते. सुरुवातीला आमंत्रक श्री. मनोहर म्हैसाळकर यांनी प्रास्ताविक भाषण केल्यानंतर श्री. चिं. त्र्यं. खानोलकर यांच्या हस्ते सरस्वती व नाटककार कै. कृ. प्र. खाडिलकर यांच्या छायाचित्रांना हार अर्पण करण्यात आल्यावर श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर व डॉ. वि. भि. कोलते यांची भाषणे झाली. श्री. चिं. त्र्यं. खानोलकर यांनी सत्काराला उत्तर दिल्यावर स्वतःच्या 'प्रतिमा' या नवीन नाटकाचे वाचन केले.

आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रम संपला.

### सांस्कृतिक समिती

#### कवी 'बी' स्मृतिदिन

गुरुवार दि. ३० रोजी नारायण मुरलीधर गुप्ते, ऊर्फ कवी 'बी' यांच्या स्मृतिदिनाप्रित्यर्थ त्यांच्या छायाचित्राला हार अर्पण करण्यात आला.

#### नवीन बदल

दि. २९ जुलै १९७३ रोजी झालेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेत नाट्य समितीचे आमंत्रक म्हणून श्री. मनोहर म्हैसाळकर यांची निवड झाली.

#### कार्यकारी मंडळात बदल

दि. २८ जुलै ७३ रोजी संस्थेचे उपाध्यक्ष श्री. शं. बा. शास्त्री यांचे दुःखद निधन झाले, हे अत्यंत खेदाने कळविण्यात येते.

तसेच उपाध्यक्ष प्रा. अ. दे. अडावदकर यांचा राजीनामा व चिटणीस श्री. जयंत देवधर यांनी मुदतीत सभासद वर्गणी न भरल्यामुळे व कार्यकारी मंडळाचे सदस्य श्री. आनंद जोग यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागांची दि. २६ ऑगस्ट रोजी कार्यकारी मंडळाच्या सभेत पुढीलप्रमाणे निवड झाली.

स्थानिक उपाध्यक्ष प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे, नागपूर; बाहेरचे उपाध्यक्ष-प्राचार्य राम शेवाळकर, वणी; चिटणीस-श्री. अ. ल. लिमये, नागपूर; कार्यकारी सदस्य-श्री. शांताराराम पोटदुखे, चंद्रपूर.



अनुक्रमणिका

## श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय
## ग्रंथ प्रदर्शने :

### समीक्षा संशोधन, संदर्भ ग्रंथ प्रदर्शन

जानेवारी १९७१ ते जून १९७३ पर्यंत मराठी वाङमयांत प्रसिद्ध झालेल्या समीक्षा, संशोधन व संदर्भ ग्रंथांचे एक आटोपशीर ग्रंथप्रदर्शन दि. ३० जून व १ जुलै रोजी दोन दिवस अभ्यासकांसाठी आयोजित करण्यात आले होते. जुन्या पिढीतील समीक्षक श्री. भाऊसाहेब माडखोलकर ते आजच्या पिढीतील समीक्षक प्रा. म. ल. वऱ्हाडपांडे, प्रा. म. शं. वाबगांवकर, प्रा. म. रा. जोशी, प्रा. वसंत वऱ्हाडपांडे, प्रा. मोहरीर, प्रा. डोळके इत्यादी वैदर्भीय लेखकांचे या कालखंडातील संशोधनात्मक ग्रंथ मुद्दाम आवर्जून ठेवण्यांत आले होते.

### लो. टिळक अभ्याससाधने

येथील टिळक सांस्कृतिक मंडळाच्या सहकार्याने दि. १ ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथी निमित्ताने महाराष्ट्र को ऑपरेटिव्ह बँकेच्या सभागृहात लो. टिळक अभ्यास साधने या नावाने प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन लोकमत दैनिकाचे संपादक पां. वा. गाडगीळ यांचे हस्ते झाले.

### आचार्य अत्रे साहित्यदर्शन

दिनांक १३ ऑगस्ट रोजी आचार्य अत्रे यांच्या ७५ व्या (अमृत महोत्सवी) जयंती निमित्ताने 'आचार्य अत्रे साहित्यदर्शन' आयोजित केले. मिस्कील विडंबनकारापासून तो झुंजार पत्रकारापर्यंत अत्रे यांच्या विविध वाङमयीन कलाकृती वर्गवारीने मांडण्यात येऊन नवोदित मराठी अभ्यासकांना त्यांच्या समग्र वाङ्मयाची ओळख करून देण्यात आली. प्रदर्शन चार दिवस खुले ठेवण्यात आले होते.

### नवे कवी : नव्या झेपा

नवोदित नव–कवींना त्यांच्या काव्याचे दर्शन घडविता यावे या सद्हेतूने नवकवी व्यासपीठ निर्माण करण्यात आले. या संमेलनात सर्वश्री शिरीष देशपांडे, राजीव पांडे, अनिल कुळकर्णी, प्रकाश देशपांडे, विजय घिरणीकर, श्रीपाद जोशी, विकास पाठक, प्रा. कुळकर्णी या कवींनी भाग घेतला. अध्यक्षस्थानी प्रा. श्रीधर शनवारे होते. हा कार्यक्रम अतिशय रंगतदार झाला. रसिकांची उपस्थिती उल्लेखनीय होती. त्यांत प्रा. महेश एलकुंचवार, प्रा. माणिक गोडघाटे (ग्रेस), प्रा. सुधाकर जोशी व प्रा. वि. स. जोग यांची हजेरी विशेष. हा कार्यक्रम दि. २१ जुलै ७३ रोजी टिळक सभागृहात सायंकाळी ६–३० वाजता झाला.

### ग्रंथदानाचे उदार सहाय्य

वि. सा. संघाचे आजीव सभासद व येथील सुप्रसिद्ध नागरीक श्री. बाळासाहेब कोठेकर यांनी आपल्या अमूल्य ग्रंथ संग्रहातील निवडक महत्त्वाचे संदर्भ विषयक ग्रंथ श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाला देणगी दाखल दिले. वि. सा. संघ त्यांची ऋणी आहे.

### श्री ज्ञानेश्वर सप्तजन्मशताब्दी

मंगळवार दि. २१ ऑगस्ट ७३ रोजी श्री ज्ञानेश्वरांची सातशेवी जन्मशताब्दी साजरी करण्यात आली.

यावेळी श्री. गो. स. देहाडराय यांच्या हस्ते श्री ज्ञानेश्वरांच्या व श्री सरस्वतीच्या प्रतिमांना हार अर्पण करण्यात आला. याचवेळी 'ज्ञानेश्वर वाङमयदर्शन' म्हणून ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले. दुपारी २ वाजता राणी लक्ष्मीबाई भजन मंडळाने भजनाचा कार्यक्रम सादर केला.

कार्यक्रमाचे संयोजन श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाचे संयोजक श्री. चंद्रकांत कुळकर्णी व सह संयोजक श्री. मधुकर राजे यांनी केले.

## संलग्न-संस्थावृत्त

### रंजन कला मंदिर

दि. १ जुलै– संस्थेने 'वाजे पाऊल आपुले' ह्या स्मितप्रसन्न अन् दर्जेदार नाटकाचा प्रयोग वि. सा. संघाच्या धनवटे रंगमंदिरात सादर केला.

दि. २२ जुलै– नागपूरचे सुप्रसिद्ध रंगभूषा व नेपथ्यकार आणि संस्थेचे आजीव सभासद श्री. शंकरराव मगरकर ह्यांच्या ५१ व्या वाढदिवशी संस्थेच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना दीर्घायुष्य चिंतीले व शुभेच्छा व्यक्त केल्या. ह्या प्रसंगी संस्थेतर्फे त्यांना ५१ रु. ची प्रतीकात्मक व औचित्यपूर्ण भेट देण्यात आली.

दि. १७ ऑगस्ट– संस्थेने आपल्या 'घेतलं शिंगावर' ह्या लोकप्रिय विनोदी नाटकाचा एक प्रयोग नागपूर दूध योजनेच्या स्नेहसंवर्धक मंडळाकरता सादर केला.

दि. २५ ऑगस्ट– 'कालाय तस्मै नमः !' ह्या नवीन गंभीर नाटकाचा प्रथम प्रयोग संस्थेने 'माग्रस' संस्थेच्या वर्धापनदिनी 'अभिवादन' ह्या कार्यक्रमात नाटककार श्री. चि. त्र्यं. खानोलकर व संस्थेचे सूत्रधार श्री. दारव्हेकर ह्यांच्या उपस्थितीत सादर केला. दिग्दर्शनाचा श्री. रमेश अंभईकर ह्यांचा हा पहिल्याच प्रयत्न होता. ह्यांत बाळ बक्षी, अरविंद काणे, वसंत रानडे, मदन कापरे, विजय बेनाडीकर, कला काणे, छाया दुपल्लीवार, हेमा पुराणिक ह्या कलावंतांनी भूमिका केल्या. नेपथ्य–विजय देऊस्कर, प्रकाशयोजना–श्री. गणेश नायडू व संगीत दिग्दर्शन श्री. शरद सुतवणे ह्यांचे होते.

दि. २९ ऑगस्ट– 'कालाय तस्मै नमः !' ह्या नाटकाचा दुसरा प्रयोग संस्थेने वि. सा. संघाच्या धनवटे रंगमंदिरात सादर केला.

### शाखावृत्त अकोला

येथील शाखेची सर्वसाधारण सभा दि. २० ऑगस्ट रोजी प्रमिलाताई हॉलमध्ये होऊन पुढील वर्षाकरिता नवीन कार्यकारिणी सर्वानुमते निवडण्यात आली. अध्यक्ष—श्री. नी. म. ऊर्फ बाळासाहेब आठल्ये. उपाध्यक्ष—श्री. शांताराम जैन, प्रा. अनंत अडावदकर. सचिव—श्री. प्र. भा. ऊर्फ दादा खेळकर. सहसचिव—श्री. दत्तात्रय ठोंबरे. कोषाध्यक्ष—श्री. बाबुराव घुगे.

सभासद—श्री. प्र. ना. खोडे, प्रा. पंढरीनाथ मांडवगणे, सौ. पद्मजा मांडवगणे, प्रा. दादेगावकर प्रा. लांजेवार सौ. वासंती गोळे.

याच वेळी पुढील उपसमित्यांच्या आमंत्रकांची नियुक्ती करण्यात आली.

(१) साहित्य विभाग—सौ. पद्मा मांडवगणे.
(२) कला विभाग—प्रा. दादेगावकर.
(३) परीक्षा विभाग—सौ. वासंती गोळे.

### यवतमाळ

येथील शाखेच्या दि. २३. जुलै १९७३ ला टिळक स्मारक मंदिरात झालेल्या सभेत १९७३–७४ या नव्या सत्रासाठी पुढील पदाधिकारी निवडण्यात आले.

## साभार पोच

(१५) व्यक्तिवेध
लेखक : प्रभाकर पाध्ये
प्रकाशक : जयंत श्रीधर टिळक,
केसरी मुद्रणालय, ५६८ नारायण पेठ, पुणे–३०
पृष्ठे : २००, किंमत १२ रु.

(१६) वैदिक अग्नि : दैवतशास्त्र आणि यज्ञसंस्था
लेखक : डॉ. रामचंद्र नारायण दांडेकर
प्रकाशक : पद्मावती प्रतिष्ठान, पुणे– ४
पृष्ठे ५६, किंमत ३ रु.

(१७) आकलन व आस्वाद
लेखक : प्रा. भगवंत प्रल्हाद मोहरीर
प्रकाशक : नागपूर प्रकाशन, नागपूर–१२
पृष्ठे : १७०, किंमत ८–५०

(१८) प्रातिनिधिक लघुनिबंध संग्रह
संपादक : के. ज. पुरोहित
प्रकाशक : साहित्य अकादेमी, नवी दिल्ली
पृष्ठे–१७०, किंमत ५ रु.

(१९) अनुबंध (कथासंग्रह)
लेखक : ब. मा. पाटोदेकर
प्रकाशक : सारंग प्रकाशन, औरंगाबाद
पृष्ठे १०७, किंमत ८ रु.

(२०) स्वान्त
लेखक : फ. मु. शिंदे
प्रकाशक : प्रतिमा प्रकाशन, औरंगाबाद
पृष्ठे : १०३, किंमत ६ रु.

(२१) भारतीय प्रबोधन (समीक्षण व चिकित्सा)
संपादक : दि. के. बेडेकर, भा. शं. भणगे
प्रकाशक: समाज प्रबोधन संस्था, पुणे. ४११०३०
पृष्ठे : ५००, किंमत १५ रु.

(२२) बेनवाड
लेखक : वामन होवाळ
प्रकाशक : अभिनव प्रकाशन, मुंबई–१४
पृष्ठे : १४८, किंमत ६ रु.

(२३) प्राचीन मराठी कविता (खंड ७ वा)
संपादक : ज. शा. देशपांडे
प्रकाशक : मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय,
मुंबई–१४
पृष्ठे–३१३, किंमत ८ रु.

(२४) नाट्याचार्य कृ. प्र. खाडिलकर
लेखक : न. र. फाटक
प्रकाशक : मौज प्रकाशन गृह, मुंबई ४
पृष्ठे : १८६, किंमत १२–५० रु.

### वाचा प्रकाशन, औरंगाबाद

(२५) अरण्य (कविता)
वसंत दत्तात्रेय गुर्जर
पृष्ठे : ८० किं : ६ रु.

(२६) निस्संदर्भ (कविता)
चंद्रकांत पाटील.
पृष्ठे : ४० किं : रु. ५

प्रकाशक : मा. नी. गलगलीकर, सरचिटणीस, वि. सा. संघ, झाशीराणी चौक, नागपूर–१२.
मुद्रक : पां. ना. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धंतोली, नागपूर–१२.



अनुक्रमणिका

## विदर्भ साहित्य संघ, नागपूर

### वार्षिक सर्वसाधारण सभा

**रविवार दि. २९ जुलै १९७३ च्या स्थगित सभेची सूचना**

विदर्भ साहित्य संघाच्या रविवार दि. २९ जुलै १९७३ रोजी भरलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे वेळी विषयपत्रिकेवरील क्रमांक ३, ४ व ५ च्या पुढील विषयांकरिता स्थगित झालेली सभा रविवार दि. २३ सप्टेंबर १९७३ रोजी दुपारी ४–३० वाजता गडकरी सभागृहात भरेल.

**स्थगित सभेपुढील विषयः—**

(१) १९७२–७३ सालचे हिशेब तपासनीसांनी तपासलेले हिशेब

(२) १९७३–७४ चे अंदाजपत्रक

(३) १९७३–७४ करिता अधिकृत हिशेब तपासनीसांची नेमणूक

(४) घटना कलम ११ (औ) प्रमाणे लवादाची नेमणूक

(५) अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

ह्या सभेला सभासदांनी उपस्थित राहावे, ही विनंती.

**टीपः—**घटना कलम १० (इ) प्रमाणे वरील सभा ही स्थगित सभा असल्यामुळे गणपूर्तीच्या अभावी ती स्थगित करण्याचा प्रश्न पुनश्च विचारात घेण्याचे कारण नाही.

**मा. नी. गलगलीकर**
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ

दि. १ सप्टेंबर १९७३

---

**सभासदांसाठी सूचनाः—**घटना कलम ९ (इ आणि ई) प्रमाणे ज्या सभासदांना वि. सा. संघाचे सभासद होऊन १२ महिने पूर्ण झालेले असतील, तसेच यावर्षी ३१ जुलै १९७३ पूर्वी ज्यांनी सभासद वर्गणी भरलेली असेल त्याच सभासदांना सभेस उपस्थित राहून मत देण्याचा अधिकार राहील.

**मा. नी. गलगलीकर**
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

'युगवाणी'चे माजी संपादक आणि विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष श्री. शंकर बाळाजी शास्त्री यांचे शनिवार दि. २८ जुलै १९७३ रोजी निधन झाले.

'युगवाणी' आणि विदर्भ साहित्य संघ त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहेत. —**संपादक**

# विदर्भ साहित्य संघ, नागपूर

## १९७२-७३ चे कार्यवृत्त

१ एप्रिल १९७२ ते मार्च १९७३ चा वार्षिक अहवाल सादर करतांना आम्हाला विशेष आनंद होत आहे. पण हा आनंद व्यक्त करतानादेखील आम्हाला एका दुःखद घटनेचा उल्लेख करणे आवश्यक वाटते. विदर्भ साहित्य संघाचे माजी अध्यक्ष श्री. दि. ब. उपाख्य भाऊसाहेब पंडित यांचे शुक्रवार, दि. १७ नोव्हेंबर १९७२ रोजी दुःखद निधन झाले. हा विदर्भ साहित्य संघावर दारुण आघातच होता. साहित्य संघाच्या विकासाच्या अनेक योजना कै. पंडित यांनी कार्यकर्त्यांसमोर मांडल्या होत्या. या योजना कार्यान्वित करण्यासाठी त्यांनी प्रयत्नही सुरू केले होते. त्यांच्या आकस्मिक निधनामुळे संस्थेची अपरिमित हानी झाली हे निःसंशय. एका खास सभेत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. माजी अध्यक्षांच्या अनेक कल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी आणि संघकार्याचे अध्यक्षस्थान स्वीकारण्यासाठी आम्ही संघाचे पूर्वाध्यक्ष व नामवंत संशोधक डॉ. वि. भि. उपाख्य भाऊसाहेब कोलते यांना विनंती केली आणि संस्थेच्या पूर्वापार प्रेमामुळे त्यांनी ती स्वीकृत केली.

### सभासद संख्या

१ एप्रिल १९७२ पासून सुरू झालेल्या नवीन वर्षात कार्यकारी मंडळाच्या ५ आणि सर्व साधारण सभा २ झाल्या. या वर्षीपर्यंत संस्थेचे एकूण ७७३ सदस्य म्हणून नोंदले गेले. आजीव सभासद २४६ असून त्यांत १० उपकर्ते, ४ आश्रयदाते, १ सहाय्यक व ३ हितचिंतक व ५२७ साधारण सभासद होते. एकूण ७७३ सभासद. वेगवेगळ्या समित्यांनी संबंधित वर्षातील कार्यक्रम व्यवस्थित पार पाडल्याबद्दल त्या त्या समित्यांच्या आमंत्रकांचे आणि कार्यकर्त्यांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो.

### सांस्कृतिक समिती

या समितीच्या अंतर्गत कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमाला व इतर अन्य कार्यक्रम घेण्यात आले.

**१. कै. राम गणेश गडकरी व्याख्यानमाला** – मुंबईचे तरुण व्यासंगी अभ्यासक प्रा. रमेश तेंडुलकर यांनी कै. राम गणेश गडकरी स्मारक व्याख्यानमालेत 'गडकऱ्यांच्या शोकात्म नाट्याचे स्वरूप' या विषयावर दि. २२ व २३ जानेवारी १९७३ रोजी दोन व्याख्याने गुंफिली. सावनेर

येथील गडकऱ्यांच्या स्मारकाला प्रा. तेंडुलकर यांनी भेट देऊन वि. सा. संघ गडकरी स्मारक समितीतर्फे गडकऱ्यांच्या समाधीला पुष्पमाला अर्पण केली.

**२. डॉ. ग. श्री. खैर यांची गीतेवरील व्याख्यानमाला** – सुप्रसिद्ध साहित्यिक व गीतेचे अभ्यासक डॉ. ग. श्री. खैर यांची दि. २९, ३० नोव्हेंबर व १ डिसेंबर रोजी गीतेवर उद्‌बोधक व्याख्याने झाली.

**३. सौ. पद्मावती बनहट्टी स्मारक व्याख्यानमाला** – विदर्भ साहित्य संघाच्या सहकार्याने सौ. पद्मावती बनहट्टी स्मारक व्याख्यानमालेत सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. गंगाधर गाडगीळ यांची दि. २७, २८, २९ डिसेंबर रोजी 'खाडिलकरांची नाटयसृष्टी' या विषयावर तीन व्याख्याने झाली.

**४. कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमाला**– यावर्षी कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमाला दिनांक १८, १९, २० जाने. ७३ रोजी आयोजित करण्यात आली. ही व्याख्यानमाला यंदा श्रीमती दुर्गा भागवत यांनी गुंफिली. त्यांच्या व्याख्यानाचे विषय होते (१) सत्यं शिवं सुंदरम्, (२) देवेंद्रनाथ ठाकूर व द्विजेन्द्रनाथ ठाकूर, (३) रवींद्रनाथावर घरात झालेले साहित्य संस्कार.

**५. गणेश व्याख्यानमाला** – विदर्भ साहित्य संघाला एका सुविद्य भगिनीने दिलेल्या निधीतून होणाऱ्या श्रीगणेश व्याख्यानमालेचे इ. स. १९७१ व १९७२ या वर्षाचे पुष्प दिनांक ११,१२ व १५,१६,१७ एप्रिल १९७२ रोजी सायंकाळी ६–३० वाजता प्रा. डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी 'महाभारत' आणि प्रा. अरविंद मंगरूळकर यांनी 'रामायण' या विषयांवर गुंफले.

**वक्ते**—प्रा. डॉ. रा. शं. वाळिंबे, मराठी विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ, पुणे
**विषय**—'महाभारत'
**प्रथम पुष्प**–मंगळवार ११ एप्रिल 'महाभारताचे आधुनिक मराठी अभ्यासक'
**द्वितीय पुष्प**–बुधवार, १२ एप्रिल 'महाभारताचे ललित मराठी आविष्कार'
**वक्ते**—प्रा. अरविंद मंगरूळकर **विषय**—'रामायण'
**व्याख्यान पहिले**–शनिवार १५ एप्रिल 'रामायणातील काही गुढे'
**व्याख्यान दुसरे**–रविवार, १६ एप्रिल 'वाल्मीकीचा काव्यमार्ग'
**व्याख्यान तिसरे**–सोमवार १७ एप्रिल 'रामायणातील अवघड प्रसंग'

**६. इतर कार्यक्रम : कै. ल. रा. पांगारकर जन्मशताब्दी** – यंदा संत वाङ्मयाचे अभ्यासक कै. ल. रा. पांगारकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त विशेष परिसंवादाचे आयोजन डॉ. वि. भि. कोलते यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. 'पांगारकर आणि संत वाङ्मय' या विषयावर झालेल्या परिसंवादात प्रा. म. शं. वाबगांवकर, डॉ. स. मो. अयाचित व प्रा. म. रा. जोशी यांची अभ्यासपूर्ण व्याख्याने झाली.

**(२) कै. न. चिं. केळकर जन्मशताब्दी** – केळकर जन्मशताब्दी महोत्सवानिमित्त केळकरांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा व वाङ्मयाचा परिचय करून देणारी व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. केळकर व राजकारण (पां. वा. गाडगीळ), निबंधकार केळकर (भ. श्री. पंडित), केळकरांची साहित्यविषयक मते (प्रा. सुरेश डोळके) यांची व्याख्याने या

व्याख्यानमालेत झाली. या प्रसंगी संस्थेच्या श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे 'केळकर वाङमय दर्शन' हे ग्रंथप्रदर्शन आयोजिले होते.

(३) **कै. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर जन्मशताब्दी**– वि. सा. संघाच्या श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयातील एका अभ्यासिकेला 'कै. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर' नाव देऊन यंदा खाडिलकर जन्मशताब्दी महोत्सव साजरा करण्यात आला. नागपूरचे सुप्रसिद्ध समाजसेवक व लोकप्रिय डॉ. श्री. वसंतराव वानकर यांनी आपल्या मातोश्रींच्या स्मरणार्थ दिलेल्या देणगीतून ही अभ्यासिका सुसज्ज करण्यात आली. या प्रसंगी नाटककार श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर व नाटच–समीक्षक प्रा. रू. पां पाजणकर यांची 'खाडिलकरांची नाटचसृष्टी' या विषयावर व्याख्याने झाली.

याशिवाय कविवर्य 'बी' स्मृतिदिन, डॉ. य. खु. देशपांडे स्मृतिदिन, आंबेडकर जयंती इ. कार्यक्रम संस्थेतर्फे घेण्यात आले.

## संगीत केंद्र

संगीतकेंद्रातर्फे दिनांक ३ फेब्रुवारी ७३ रोजी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे व्हायोलिन वादक श्री. आलबर्टो लिसी यांचे व्हायोलिन वादन झाले. याच सभेत डॉ बाळासाहेब पुरोहित, सर्वश्री वसंत अंधारे, शरद सुतवणे यांचे गायन व श्री. प्रभाकर धाकडे यांचे व्हायोलिन, आणि रमेश गडकरी यांचे सतार वादन झाले.

## युगवाणी

प्रा. माणिक गोडघाटे यांच्या संपादकत्वाखाली निघणाऱ्या वि. सा. संघाच्या 'युगवाणी' मासिकात आमूलाग्र बदल झालेला आपणास आढळेल. संशोधक, अभ्यासक व साहित्यप्रेमी यांनी नव्या स्वरूपातील युगवाणीचे स्वागत केले आहे. केवळ विदर्भातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील सर्व जुने व नवे अभ्यासक युगवाणीला साहित्यसाहाय्य देत आहेत. खास युगवाणीसाठी म्हणून वर्गणीदारांच्या संख्येत अधिकाधिक भर पडत आहे. मासिक अधिक आकर्षक व मौलिक करण्याचा प्रा. माणिक गोडघाटे यांचा प्रयत्न सतत चालू आहे. विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे यंदा युगवाणी मासिकाच्या सरकारी अनुदानात वाढ करण्यासाठी साहित्य संस्कृती मंडळाकडे प्रयत्न चालू आहेत. त्यांना यश येईल अशी अपेक्षा आहे. युगवाणी मासिकाचे स्थान वि. सा. संघास गौरवास्पद ठरेल हे निश्चित.

## नाटयसमिती

**कै. नाना जोग स्मृतिदिन** – वि. सा. संघाच्या वतीने सोमवार दि. १ मे १९७२ रोजी सायंकाळी ६–३० वा. कै. नाना जोग स्मृतिदिनानिमित्त ॲड. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या हस्ते कै. नाना जोग यांच्या पुतळ्याला व छायाचित्राला हार अर्पण करण्यात आला.

यानिमित्त रंजन कला मंदिर या संलग्न संस्थेच्या वतीने तीन निवडक एकांकिका वि. सा. संघाच्या धनवटे रंगमंदिरात सादर करण्यात आल्या.

रत्नाकर मतकरी लिखित 'काळवेळ', सतीश अळेकर लिखित 'झुलता पूल' व पु. ल. देशपांडे लिखित 'नाही आसू! नाही माया' या तीन एकांकिकांचे दिग्दर्शक अनुक्रमे डॉ. शशांक कुळकर्णी, रमेश अंभईकर व नरेश जोशी हे होते. रंजन कला मंदिराच्या एकूण २० कलावंतांनी या कार्यक्रमांतर्गत विविध एकांकिकांतून भूमिका केल्या.

या संपूर्ण कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ॲड. श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी हे होते

**कै. डॉ. द. रा. गोमकाळे यांच्या छायाचित्राचे अनावरण** – विदर्भाचे विख्यात नाटच-समीक्षक कै. डॉ. द. रा. गोमकाळे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शनिवार, दि. १३ मे १९७२ रोजी सायंकाळी ६॥ वा. नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. वि. भि. कोलते यांच्या हस्ते डॉ. गोमकाळे यांच्या छायाचित्राचे अनावरण झाले. डॉ. गोमकाळे यांचे छायाचित्र त्यांच्या चिरंजिवांनी संस्थेला भेट म्हणून दिले.

**श्रीमती रमाबाई गडकरी यांची भेट** – सुप्रसिद्ध नाटककार कै. राम गणेश गडकरी यांच्या पत्नी श्रीमती रमाबाई गडकरी ह्यांनी शनिवार दि. २७ मे १९७२ रोजी सायंकाळी ७ वाजता संस्थेला भेट दिली.

**श्री. खोलकुटे आंतर महाविद्यालयीन ढाल नाटचस्पर्धा** – महाविद्यालयांसाठी असलेल्या १९७२–७३ मध्ये झालेल्या श्री. खोलकुटे ढाल नाटचस्पर्धेत १० नाटके सादर करण्यात आली.

या स्पर्धेत नागपूरच्या शासकीय विज्ञान संस्थेच्या 'ससा आणि कासव' या नाटकाचा प्रथम क्रमांक येऊन त्यांनी फिरती खोलकुटे ढाल पटकाविली. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या (अमरावती) 'वाजे पाऊल आपुले' या नाटकाचा द्वितीय क्रमांक आल्याबद्दल त्यांना फिरता रौप्यचषक मिळाला. तसेच या स्पर्धेतील पुरुष भूमिकेचे वैयक्तिक पारितोषिक रु. १५ चे वरील नाटकात श्रीधरची भूमिका केल्याबद्दल श्री. सुधीर ठाकरे यांना मिळाले आणि स्त्री भूमिकेचे रु. १५ चे वैयक्तिक पारितोषिक 'लग्नाआधी वरात' या नाटकात मीनाची भूमिका केल्याबद्दल कु. संध्या जोग यांना मिळाले.

परीक्षक म्हणून सर्वश्री मधुकर राजे, मदन गडकरी व श्री. केशव जोशी यांनी सहकार्य दिल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

**कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धा** – २२, २४ व २५ जानेवारी ७३ रोजी कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेत ९ नाटचसंस्थांनी भाग घेतला.

या स्पर्धेत रंजन कलामंदिर, नागपूर या संस्थेने सादर केलेल्या 'सफाई' या एकांकिकेला प्रथम क्रमांकाची फिरती ढाल व रुपये पन्नास रोख पारितोषिक मिळाले. आनंद कला निकेतन, नागपूरने 'भले तरी देऊ' एकांकिका सादर करून द्वितीय क्रमांक मिळविला. त्याचप्रमाणे अभिनयाचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक 'भेकड' या एकांकिकेतील 'राम'च्या भूमिकेतील श्री. गजानन सगदेव यांना, द्वितीय पारितोषिक 'भेकड' या एकांकिकेतील निर्मलाचे भूमिकेतील सौ. अनुराधा टेकाडे यांना व तिसरे पारितोषिक 'सफाई' एकांकिकेतील 'सुषमा'च्या भूमिकेतील कु. छाया दुपल्लीवार यांना मिळाले.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून सौ. शकुंतलाबाई खोत, श्री. अरविंद पाठक व प्रा. हरिहर घोंगे यांनी सहकार्य दिले त्याबद्दल संस्था त्यांची ऋणी आहे.

**बाल नाट्यस्पर्धा** – दि. ३०, ३१ डिसेंबर व ९, १४ जानेवारी ७३ रोजी बाल नाट्योत्सव साजरा झाला.

या स्पर्धेत भाग घेणाऱ्या संस्था १३ होत्या. या स्पर्धेत देववाप्पा, नागपूर या संस्थेने सादर केलेल्या 'अडकित जाऊ खिडकीत जाऊ' या नाटकाला प्रथम क्रमांक मिळून रंजन कला मंदिर फिरता रौप्यचषक व रोख रु. ५० चे पारितोषिक प्राप्त झाले. द्वितीय क्रमांक सुभाष मंडळ, नागपूरने सादर केलेल्या 'यक्ष नगरीत विदूषक' नाटकाचा आला. त्याला रु. ३० चे रोख पारितोषिक मिळाले. तसेच तृतीय क्रमांक सोमलवार हायस्कूल, नागपूर या संस्थेने सादर केलेल्या 'शुभांगी' नाटकाचा आला व त्याला रोख रु. २० चे पारितोषिक मिळाले. वैयक्तिक अभिनयगुणांत 'यक्ष नगरीतील विदूषक' मधील महेश पातुरकर, 'अडकित जाऊ' या नाटकातील श्री. आनंद घारपुरे तसेच 'बंडूची आईस्क्रीम पार्टी' मधील अंजली सरवटे व 'श्रीशिवसमर्थ' मधील कु. शैलजा जोशी यांना अनुक्रमे रु. १५, १० व १५, १० ची रोख पारितोषिके मिळाली.

परीक्षक म्हणून सौ. कमल आंबेकर, सौ. अनुराधा जोशी, श्री. मधुकर जोशी यांनी सहकार्य दिले. संस्था त्यांची ऋणी आहे.

**श्री. अरुण सरनाईक यांच्या हस्ते पारितोषिक समारंभ** – दि. ८ मार्च रोजी सुप्रसिद्ध नट श्री. अरुण सरनाईक यांचे हस्ते बालनाट्योत्सव, कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धा व श्री. खोलकुटे ढाल स्पर्धेतील विजेत्यांना फिरती रौप्यढाल, रौप्यचषक व वैयक्तिक पारितोषिके देण्यात आली.

सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त दि. ५ फेब्रुवारी ७३ रोजी रंजन कला मंदिर तर्फे 'वाजे पाऊल आपुले' या नाटकाचा प्रयोग सादर केला. मध्यंतरात सुप्रसिद्ध नाटककार आणि दिग्दर्शक श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर यांचा संघाध्यक्ष डॉ वि. भि. कोलते यांच्या हस्ते सत्कार केला.

**कै. शंकर घाणेकर यांना श्रद्धांजली** – मराठी रंगभूमीवरील एक प्रसन्न व्यक्तिमत्व व विनोदी नट शंकर घाणेकर यांचे दि. २०–३–७३ रोजी आकस्मिक निधन झाले. त्या प्रसंगी नाट्यसमितीतर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

## श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय

संदर्भ ग्रंथालयाने ७२–७३ च्या कालखंडात रु. ३५०० चे महत्त्वाचे संदर्भ ग्रंथ खरेदी केले. संदर्भ ग्रंथ खरेदी करताना प्रा. म. शं. वाबगांवकर, प्रा. म. रा. जोशी, डॉ. द. भि. कुळकर्णी, प्रा. सुरेश डोळके इ. अभ्यासकांचा सल्ला घेण्यात आला. खाडिलकर, पांगारकर, कोल्हटकर जन्म-शताब्दी निमित्त प्रसिद्ध झालेले सर्व महत्त्वाचे संदर्भ ग्रंथ विकत घेण्यात आले. याशिवाय या कालात प्रसिद्ध झालेले महत्त्वाचे कोशवाङ्मयही विकत घेण्यात आले. संघाच्या युगवाणीकडे अभिप्रायार्थ येणारी पुस्तके अभिप्राय आल्यानंतर ग्रंथालयाच्या नोंदवहीत नोंदविण्यात येतात.

**सरकारी अनुदान** — ग्रंथ खरेदीसाठी आजपर्यंत ग्रंथालयाला सरकारी अनुदान मिळत नसे. परंतु यंदा महाराष्ट्र सरकारच्या ग्रंथालय विभागाने रु. २००० चे तात्पुरते अनुदान (Ad hoc Grant) दिले. या अनुदानातून रु. १२०० ची संदर्भ ग्रंथ खरेदी व रु. ८०० ची उपस्कर खरेदी १९७३-७४ वर्षात करण्यात येणार आहे हे अनुदान प्राप्त होण्यासाठी ग्रंथालय संचालक श्री. कृ. द. पुराणिक, श्री वसंतराव शब्दे तसेच विदर्भ ग्रंथालय संघाचे सर्व कार्यकर्ते व विशेषत: श्री. अ. ल. लिमये यांचे अमूल्य सहाय्य झाले. हे अनुदान वाढीव स्वरूपात असेच नियमित मिळावे असा प्रयत्न चालू आहे

**श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाची संदर्भ सेवा** — श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाचा अभ्यासक फार मोठ्या प्रमाणावर फायदा घेत आहेत. पत्रकार, संशोधक, एम्. ए. चे अभ्यासक, वि. सा. संघाच्या मराठी परीक्षांना बसणारे विद्यार्थी, आकाशवाणी नागपूर केंद्र इ. व्यक्ती आणि संस्था यांना संदर्भ ग्रंथालयाचा फार फायदा होत आहे. संदर्भ सेवा त्वरित व अचूक प्राप्त व्हावी म्हणून नागपूर विद्यापीठ वाचनालय, राजाराम वाचनालय, धरमपेठ महाविद्यालय वाचनालय, शासकीय वाचनालय या महत्त्वाच्या ग्रंथालयांचे व तज्ज्ञांचे व्यक्तिशः सहकार्य श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाला सतत लाभत आले. याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे आवश्यक आहे

**काही महत्त्वाचे कार्यक्रम 'नवे संशोधक नवे विचार'** — मराठी वाङमयात नव्याने संशोधन करणाऱ्या संशोधकांना आपले विचार मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे या उद्देशाने एक नवीन व्याख्यानमाला संदर्भ ग्रंथालयातर्फे सुरू करण्यात आली. या व्याख्यानमालेत सौ. आशा सावदेकर (तांबे-एक अभ्यास) सौ. तारा सावंगीकर (कुसुमाग्रजांची कविता), प्रा. कृष्णा चौधरी (मर्ढेकर) या संशोधकांनी आपआपले विचार मांडले.

**अभ्यासमंडळ व्याख्यानमाला** — नाशिकचे सुप्रसिद्ध पंडित श्री. भालचंद्र मुळे यांनी ज्ञानेश्वरीवर दोन अभ्यासपूर्ण व्याख्याने आक्टोबर महिन्यात दिली.

**विदर्भातील लेखक व त्यांच्या नव्या कलाकृती** — विदर्भातील लेखक व त्यांच्या नव्या कलाकृती ही नवीन चर्चा माला यंदा नव्याने सुरू करण्यात आली. या मालेत प्रभाकर पुराणिक यांच्या 'पळस' व सौ. यमुना शेवडे यांच्या 'पूर्णाहुती' या नवीन कादंबऱ्यांवर चर्चा आयोजित करण्यात आली. याशिवाय 'माग्रस' या संस्थेच्या सहकार्याने श्री. वसंत निगवेकर यांचा विनोदी 'कथा कथनाचा' कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

**ग्रंथ प्रदर्शने** — अभ्यासकांना वाङमयातील नवीन प्रवाहांचा परिचय करून देण्याच्या उद्देशाने वेळोवेळी ग्रंथप्रदर्शने भरविण्यात आली.

**मदतीसाठी 'सागरा प्राण तळमळला'** — दि. २९ मार्च रोजी संदर्भ ग्रंथालयाचे मदतीसाठी श्री. गोविंद भिडे यांचा 'सागरा प्राण तळमळला' हा कार्यक्रम धनवटे रंगमंदिरात सादर करण्यात आला.

ग्रंथालयाच्या कार्यात श्री. मधुकर राजे यांचे अमूल्य सहकार्य लाभले.

## वि. सा. संघाचे ३० वे साहित्य संमेलन

विदर्भ साहित्य संघाचे तिसावे साहित्य संमेलन दि. १९ व २० नोव्हेंबर ७२ रोजी सोमनाथ येथे आयोजित करण्यात आले होते. अध्यक्ष होते सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. विश्राम

बडेकर व उद्‌घाटक होते प्रा. नरहर कुरुंदकर. संस्थेचे अध्यक्ष श्री. दि. व पंडित यांच्या आकस्मिक निधनामुळे संमेलन गंभीर वातावरणात व अत्यंत साधेपणात साजरे झाले. संमेलन यशस्वी करण्यामागे प्रेरकशक्ती होती श्री. बाबासाहेब आमटे यांची. त्यांच्या प्रेरणेमुळे व यशस्वी संयोजनामुळे संमेलन यशस्वी झाले.

## वक्तृत्वं स्पर्धा

डॉ. वसंतराव वानकर यांनी दिलेल्या देणगीतून यंदा शालेय वक्तृत्व स्पर्धा नव्याने सुरू करण्यात आली. यंदा ही स्पर्धा दि. १७ डिसेंबर रोजी धनवटे रंगमंदिरात आयोजित करण्यात आली. नाटककार पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्या हस्ते बक्षिस वितरण समारंभ पार पडला.

## माननीय व्यक्तींची भेट : आणि सत्कार

केंद्रीय पर्यटनमंत्री डॉ. करणसिंग यांनी दि. २२ आक्टोबर रोजी संस्थेला भेट दिली. महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री माननीय अनंतराव नामजोशी यांनी २७-११-७२ रोजी संस्थेला भेट दिली. तसेच सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. माधव आचवल यांनी १२ जुलै रोजी संस्थेला भेट दिली.

११ एप्रिल १९७२ रोजी डॉ. रा. शं. वाळिंबे यांच्या षष्टयब्दिपूर्तीनिमित्त श्री. माडखोलकर यांचे अध्यक्षतेखाली त्यांचा सत्कार झाला.

**कै. न्यायमूर्ती रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा** – विदर्भ साहित्य संघाच्या वतीने दि. ३० सप्टेंबर व १ आक्टोबर रोजी श्रीकृष्णभवन, वणी येथे झालेल्या कै. न्यायमूर्ती रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धेत विदर्भातील एकूण २० महाविद्यालयांनी भाग घेतला. अमरावती येथील शिवाजी कला-वाणिज्य महाविद्यालयाने फिरती रौप्य ढाल जिंकली. तसेच प्रथम क्रमाकांचे रु. १०० चे पारितोषिक अमरावतीच्या श्री शिवाजी कला-वाणिज्य महाविद्यालयाचे श्री. जगदीश काशीकर यांना मिळाले.

**वि. सा. संघाचा ५० वा वर्धापन दिन** – विदर्भ साहित्य संघाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष असूनही दुष्काळ परिस्थितीमुळे वर्धापन दिन भव्य प्रमाणात करण्यात आला नसला तरी १४ जानेवारी ७३ रोजी सुप्रसिद्ध कवि आणि वि. सा. संघाचे भूतपूर्व अध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे (कवि अनिल) यांच्या अध्यक्षतेखाली ५० वा वर्धापन दिन अत्यंत साधेपणात साजरा झाला. या प्रसंगी प्रा. म. शं. वाबगांवकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

## परीक्षा समिती :

१९७२-७३ सालात परीक्षा समितीतर्फे घेण्यात आलेल्या 'मराठी वाङमय व भाषेच्या' परीक्षांना दोन्ही सत्रांत खालीलप्रमाणे परीक्षार्थी बसले.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| आक्टोबर | १९७२ | केंद्रे | १२ | परीक्षार्थी | ६९५ |
| फेब्रुवारी | १९७३ | केंद्रे | १७ | परीक्षार्थी | ६८३ |

## शाखा प्रतिवृत्त

### यवतमाळ

दि. २३, २४, २५ व २६ एप्रिल रोजी पुण्याच्या भारत इतिहास संशोधन मंडळाचे सभासद श्री. बाबासाहेब ठकार यांची चार व्याख्याने रोज टिळकस्मारकात झाली. 'शिवाजी व रामदास संबंध' ह्या विषयावर एक, 'संभाजी, एक नवीन दृष्टिकोन' ह्यावर दोन आणि 'पानपतात मराठ्यांचा पराभव झाला काय' ह्यावर एक अशी चार व्याख्याने झाली.

२४ जून १९७२ ला या जिल्ह्यातील नामवंत साहित्यिक श्री. डॉ. मा. गो. देशमुख स्मृतिदिनानिमित्त सभा झाली. त्यांत सर्वश्री बाबासाहेब एकबोटे, प्रा. गोविंद देशपांडे, प्रा. दीक्षित व सौ. श्रीखंडे ह्यांची भाषणे झाली.

२१ ऑगस्ट १९७२ ला नव्या कार्यकारिणीची पुढीलप्रमाणे निवड करण्यात आली.

**अध्यक्ष**—श्री. ब. ना. एकबोटे, **कार्यवाह**—प्रा. दिनकर बोधनकर, **उपाध्यक्ष**—सौ. मंगलाताई श्रीखंडे, **सहकार्यवाह**—प्रा. बाळासाहेब दीक्षित.

**अन्य सभासद**—सर्वश्री डॉ. पंडित, शरच्चंद्र टोंगो, बाबासाहेब महाजन, रावसाहेब श्रीखंडे, सदुभाऊ पांडे, हरीश मानधना, अशोक पांढरीपांडे, भाऊसाहेब बर्वे, डॉ. बाबासाहेब नंदुरकर, रमेश साखरे, सौ. निर्मलाताई कोठारी, सौ. माई पंडित, सौ. आशाताई बर्वे आणि केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य ह्या नात्याने पदसिद्ध सदस्य म्हणून श्री. गोविंदराव देशपांडे.

विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे ह्या सर्व निवडणुका अविरोध झाल्या. ह्याच बैठकीत माजी कार्यवाह श्री. गोविंद देशपांडे यांच्या गेल्या वर्षीच्या कार्याबद्दल आभारदर्शक ठराव मंजूर करण्यात आला.

साहित्यसम्राट न. चिं. केळकर जन्मशताब्दीनिमित्त पुसदचे प्रा. ग. वा. करंदीकर ह्यांचे (२३ सप्टेंबर) रोजी व्याख्यान झाले.

२३ आक्टो. १९७२ ला मराठी नाटचपरीक्षण मंडळाचे सदस्य श्री. दीनानाथ भोसले (सांगली) व कविवर्य पी. सावळाराम ह्यांच्या भाषणाचा व काव्यगायनाचा कार्यक्रम झाला.

७ डिसें. १९७२ ला साधनेच्या श्री. यदुनाथ थत्ते यांनी साहित्य संघास भेट दिली.

१४ जानेवारी ७३ रोजी संघाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त प्राचार्य राम शेवाळकरांचे व्याख्यान झाले.

प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ व गीतेचे व्यासंगी पंडित डॉ. ग. श्री. खैर ह्यांची २७, २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी 'गीता आजही उपयोगी आहे' ह्या विषयावर व्याख्याने झाली.

वि. सा. संघाचे दिवंगत अध्यक्ष श्री. दि. व. पंडित ह्यांना २०. नोव्हेंबर १९७२ रोजी व यवतमाळचे सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. ना. ना. हूड ह्यांना दि. ५ मार्च रोजी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



अनुक्रमणिका

वणी

| | |
|---|---|
| दि. ३१ जुलै ७२ | डॉ. ग. त्र्यं. देशपांडे, नागपूर यांची भेट. |
| दि. १ ऑगस्ट ७२ | पत्रपंडित पां. वा. गाडगीळ, नागपूर यांची भेट |
| दि. १ व २ ऑक्टो. ७२ | कै. न्या. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा. उद्घाटक पू. दत्ता बाळ, समारोप श्री. बळीरामपंत एकवोटे. ४० महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी भाग घेतला. |
| दि. २१ ऑक्टो. ७२ | महाराष्ट्र राज्य नाटच परीक्षण मंडळाचे अध्यक्ष व सदस्य यांच्या सहवासात कोजागिरी. |
| दि. १२ डिसेंबर ७२ | सुगम संगीताचा कार्यक्रम 'स्वरयामिनी.' |
| दि. १४ जाने. ७२ | वि. सा. संघ वर्धापन दिन व भारतीय स्वातंत्र्याचे रौप्यमहोत्सवी वर्ष यानिमित्त शालेय विद्यार्थ्यांची 'स्फूर्तिगीत स्पर्धा' |
| दि. १९ जाने. ७३ | श्री. वामन इंगळे यांच्या काव्यगायनाची मैफल |
| दि. २० जाने. ७३ | केळकर जन्मशताब्दीनिमित्त प्रा. श्री. मा. कुळकर्णी यांचे व्याख्यान. विषय 'केळकरांचा कलाविचार' |
| दि. २२ जाने. ७३ | 'बी' जन्मशताब्दी निमित्त प्रा. शां. सी. कवडे यांचे व्याख्यान. विषय बी कवीची कविता. |
| दि. २३ जाने. ७३ | डॉ. विनोद देशमुख यांचे व्याख्यान, विषय मेंदू आणि मन. |
| दि. २८ जाने. ७३ | श्री. शांताराम आठवले, पुणे यांचे व्याख्यान. विषय 'संत, संस्कृती व विज्ञान.' |
| दि. ८ फेब्रु. ७३ | खाडिलकर नाटचसंगीताचा स्थानिक शाखेने बसविलेला कार्यक्रम— 'इंद्रधनुष्य.' |
| दि. ७ मार्च ७३ | सुप्रसिद्ध कवी ना. ना. हूड यांच्या दु:खद निधनानिमित्त शोक सभा. |

पुलगाव

दि. २६ ऑगस्ट रोजी डॉ. सरदेशपांडे यांच्या निवासस्थानी श्री. भालचन्द्र भागवत संगीत अलंकार, खैरागड यांच्या शास्त्रोक्त गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

दि. १३ ऑक्टोबर रोजी स्थानिक शाखेच्या सभासदांची सर्वसाधारण सभा होऊन त्यात १९७२–१९७४ या कालावधीसाठी नूतन कार्यकारिणी एकमताने निवडण्यात आली.

दि. १६ ऑक्टोबर रोजी, नगरभवनात स्थानिक शाखेचा वर्धापन–दिन प्रा. मधुकर आष्टीकर, अमरावती यांच्या शुभ हस्ते पार पडला. या प्रसंगी आयोजित केलेल्या मराठी कविसम्मेलनात श्री. सुरेश भट, अमरावती; श्री. वसन्त वऱ्हाडपांडे, नागपूर; श्री. मधुकर गडेकर नागपूर व सौ. उषाताई लिमये, नागपूर या कवींनी भाग घेतला.

वसन्त व्याख्यानमालेच्या निमित्ताने दि. २९ ते ३१ मार्च पर्यंत विज्ञानाचार्य प्र. गो. मुडकी यांची तत्त्वज्ञानावर व्याख्याने नगरभवनात आयोजित करण्यात आली.

**कार्यकारिणी १९७२–७४ – अध्यक्ष** प्राचार्य सुरेन्द्रकुमार जैन, **उपाध्यक्ष** डॉ वसन्त लाखे, डॉ. विजय डहाके, **कार्यवाह** प्रा. चन्द्रकान्त जोगी, **सहकार्यवाह** श्री. श्रीराम सहारे, श्री. अरुणकुमार बोपचे, कु. आशा बापट, **कोषाध्यक्ष** श्री. मनोहर बंदनोर, **प्रसिद्धी प्रमुख :** श्री. वसन्त पैकिने, **सदस्य** डॉ. नागेश सरदेशपांडे, प्राचार्य श्रीराम जोशी, श्री. आबासाहेब देशपांडे, श्री. मधुकर पेंढरकर, श्री. रामचन्द्र देशपांडे, श्री. पी. सी. मोहोड, सौ. प्रतिभा धान्दे, सौ. कुसुमावती देशपांडे.

## अकोला

कविवर्य 'बी' यांच्या जन्मशताब्दीचे हे वर्ष असल्याने व अकोला येथेच 'बी' कवींचा फार महत्वाचा काळ गेला असल्यामुळे केंद्रीय कार्यालयाच्या मदतीने दोन महत्वाचे कार्यक्रम यंदा घेण्यात आले.

(१) दि. ३०–८–७२ रोजी, तत्कालीन संघाध्यक्ष (कै) श्री. दि. ब. ऊर्फ भाऊसाहेब पंडित यांच्या अध्यक्षतेखाली, सुप्रसिद्ध मराठी टीकाकार प्रा. भ. श्री. पंडित यांचे 'बीं'च्या काव्याचे रसग्रहण करणारे सुश्राव्य व्याख्यान झाले


(२) दि २८–१२–७२ रोजी मुंबईच्या सुविद्य कवियित्री प्रा. शांता ज. शेळके व प्रा. केशव मेश्राम यांच्या प्रमुख उपस्थितीत, (स्थानिक कवींसह) कविसंमेलनाचा उत्कृष्ट कार्यक्रम झाला.

दुष्काळी परिस्थितीमुळे 'बीं'च्या स्मारकाची कल्पना व अन्य संकल्प आकार घेऊ शकले नाहीत

## समारोप

संस्थेच्या कार्यकारी मंडळाने संस्थेच्या वतीने अहवाल वर्षात केलेले कार्य आपणापुढे आम्ही मांडले. या सर्व कार्याला सन्मान्य सभासदांनी साद दिली. ही आमची कर्तबगारी नसून आपल्या सर्वांची प्रेमपुण्याईच आहे असे आम्हाला वाटते. या पुण्याईची परंपरा चालविण्याची जबाबदारी आमची आहे. भावी काळात देखील आपले सहकार्य व मार्गदर्शन संस्थेच्या कार्यकारी मंडळाला लाभेल अशी आशा बाळगतो. पुन: एकदा ज्यांनी ज्यांनी आम्हास साहाय्य केले त्यांचे आभार आणि अनवधानाने ज्यांचा नामोल्लेख करावयाचा राहून गेला असेल त्याबद्दल क्षमस्व !

| | | | |
|---|---|---|---|
| **वि. भि. कोलते** | **म. गो. मांबूरकर** | **मा. नी. गलगलीकर** | **वसंत खेर्डीकर** |
| अध्यक्ष | कोषाध्यक्ष | सरचिटणीस | चिटणीस |



आधेअधुरे : ओम शिवपुरी /सुधा शिवपुरी



कै. मोहन राकेश

अनुक्रमणिका